अहवाल क्रमांक : १८८

सत्यमेव जयते

# पंचायती राज समिती

## (२०२०-२०२१)

## (चौदावी महाराष्ट्र विधानसभा)

**महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या सांगली जिल्हा परिषदेच्या सन २०११-२०१२ च्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदांबाबत**

# नववा अहवाल

**(सदर अहवाल दिनांक २८ डिसेंबर, २०२१ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
विधान भवन, मुंबई
२०२१

# पंचायती राज समिती

## (२०२०-२०२१)

## (चौदावी महाराष्ट्र विधानसभा)

**महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या सांगली जिल्हा परिषदेच्या सन २०११-२०१२ च्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदांबाबत**

# नववा अहवाल

## पंचायती राज समिती
## (सन २०२०-२०२१)

**समिती प्रमुख**

(१) श्री. संजय रायमुलकर, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. प्रदीप जैस्वाल, वि.स.स.

(३) श्री. कैलास पाटील (घाडगे), वि.स.स.

(४) डॉ. राहुल पाटील, वि.स.स.

(५) श्री. अनिल पाटील, वि.स.स.

(६) श्री. संग्राम जगताप, वि.स.स.

(७) श्री. दिलीपराव बनकर, वि.स.स.

(८) श्री. शेखर निकम, वि.स.स.

(९) श्री. सुभाष धोटे, वि.स.स.

(१०) श्री.माधवराव पवार, वि.स.स.

(११) श्रीमती प्रतिभा धानोरकर, वि.स.स.

(१२) श्री. हरिभाऊ बागडे, वि.स.स.

(१३) डॉ. विजयकुमार गावीत, वि.स.स.

(१४) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(१५) श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.

(१६) *श्री. विजय रहांगडाले, वि.स.स.

(१७) श्री. राणा जगजितसिंह पाटील, वि.स.स.

(१८) श्री. प्रशांत बंब, वि.स.स.

(१९) श्रीमती मेघना बोर्डीकर-साकोरे, वि.स.स.

(२०) श्री. किशोर जोरगेवार, वि.स.स.

(२१) श्री. अंबादास दानवे, वि.प.स.

(२२) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(२३) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

(२४) श्री. निरंजन डावखरे, वि.प.स.

(२५) श्री. सुरेश धस, वि.प.स.

**विशेष निमंत्रित :**

(२६) श्री. किशोर आप्पा पाटील, वि.स.स.

(२७) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

(२८) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.

(२९) श्री. किशोर दराडे, वि.प.स.

(३०) श्री. रत्नाकर गुट्टे, वि.प.स.

(३१) श्री. महादेव जानकर, वि.प.स.

(३२) श्री. सदाशिव खोत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. राजेन्द्र भागवत, प्रधान सचिव

(२) श्री. विलास आठवले, उप सचिव

(३) श्री.प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(४) श्री. प्रकाश थिटे, कक्ष अधिकारी

(५) श्रीमती सुषमा लोंढे, कक्ष अधिकारी.

* डॉ.संजय कुटे, वि.स.स. यांनी समिती सदस्य पदाचा राजीनामा दिल्यामुळे त्यांच्या रिक्त झालेल्या जागेवर श्री. विजय रहांगडाले, वि.स.स. यांची समिती सदस्य म्हणून दिनांक १३ ऑक्टोबर, २०२१ रोजीपासून नामनियुक्ती केलेली आहे.

## पंचायती राज समिती
## (सन २०१७-२०१८)

**समिती प्रमुख**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.
(३) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.
(४) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.
(५) ॲड. राहुल कुल, वि.स.स.
(६) श्री. आर.टी.देशमुख, वि.स.स.
(७) डॉ. देवराव होळी, वि.स.स.
(८) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स.
(९) डॉ. सुधाकर भालेराव, वि.स.स.
(१०) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.
(११) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
(१२) श्री. किशोर पाटील, वि.स.स.
(१३) श्री. राजेश क्षीरसागर, वि.स.स.
(१४) श्री. तुकाराम काते, वि.स.स.
(१५) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.
(१६) श्री. भारत भालके, वि.स.स.
(१७) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(१८) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.
(१९) श्री. राहुल मोटे, वि.स.स.
(२०) श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
(२१) श्री. प्रविण दरेकर, वि.प.स.
(२२) प्रा. डॉ. तानाजी सावंत, वि.प.स.
(२३) श्री. विक्रम काळे, वि.प.स.
(२४) श्री. सतीश चव्हाण, वि.प.स.
(२५) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**विशेष निमंत्रित :**

(२६) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.
(२७) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.
(२८) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.
(२९) श्री. किशोर दराडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. जितेंद्र भोळे, सचिव (कार्यभार)
(२) श्री. विलास आठवले, सह सचिव (२) (का.)
(३) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
(४) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

**(प्रस्तावना)**

मी, पंचायती राज समितीचा "समिती प्रमुख" या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरून पंचायती राज समितीचा नववा अहवाल सादर करीत आहे.

सन २०२०-२०२१ या वर्षाकरिता समिती दिनांक १३ जानेवारी, २०२१ रोजी गठीत झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुर्नविलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय महसुली लेखे यांच्या परीक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

शासनाच्या विविध कामकाजाचा वाढलेला व्याप (Enormous range and complexity) लक्षात घेता विधानमंडळाला उपलब्ध वेळेत आपली कर्तव्ये पुरेशा क्षमतेने बजावता येणे अशक्य झाले आहे. शासन यंत्रणेकडे उक्त किचकट प्रशासकीय कामासाठी सक्षम व तज्ज्ञ प्रशासक यंत्रणा उपलब्ध असते. संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीतेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, संपूर्ण, प्रभावी व अर्थपूर्ण असे (effective meaningful) नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे आणि म्हणूनच कार्यकारी प्रशासन (Executive) राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी, त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी (Tone of administration) मा.सभापती, विधानपरिषद व मा.अध्यक्ष, विधानसभा यांनी दोन्ही सभागृहाच्या निवडक सदस्यांचा समावेश असलेल्या पंचायती राज समितीचे गठन दिनांक १३ जानेवारी, २०२१ रोजी केले. समिती पद्धतीचे वैशिष्ट असे की, सभागृहात पक्षीय ध्येयधोरणांचा सदस्यांवर प्रभाव पडतो. त्या उलट संसदीय लोकशाही पद्धतीमध्ये विधानमंडळाची ही समिती फार मोठ्या मोलाचे कार्य पार पाडीत आहे. ही समिती विधानमंडळाची निर्मिती असून ती साहजिकच विधानमंडळास दुय्यम आहे. या समितीला सर्व अधिकार विधानमंडळापासूनच प्राप्त झालेले आहेत. (They derive authority from the Legislature) या समितीला "Mini Legislature" सभागृहाची छोटी प्रतिकृती संबोधली जाते. शासनाने राबविलेल्या योजनांच्या अंमलबजावणीला पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी व प्रशासनावर सातत्याने नियंत्रण व प्रभावीपणे पहारा ठेवण्याचे महत्त्वाचे काम विधानमंडळाच्या या समितीद्वारे केले जाते. समितीचे कामकाज पक्षविरहीत तत्त्वावर (irrespective of party affiliation) चालत असल्यामुळे समिती समोरील बाबी पक्षीय अभिनिवेशरहीत पद्धतीने (Non-Party Basis) विचारात घेण्यात येतात त्यामुळे एखाद्या विषयाचा अभ्यास अत्यंत निःपक्षपातीपणे व तपशिलात जाऊन केला जातो. परिणामी त्यास पूर्ण न्याय मिळतो.

शासनाचे एखादे धोरण वा योजना याची आखणी कशी करावी याबाबत समिती सल्ला देऊ शकणार नाही, तथापि शासनाने अंमलात आणलेल्या धोरणांची वा योजनेची फलश्रुती अपेक्षेप्रमाणे होत नसेल वा होणार नसेल तर ही बाब संबंधित समिती सभागृहाच्या नजरेस आणून त्या धोरणात वा योजनेत बदल करण्यासंबंधी शासनास सुचविण्याचे काम करते. समिती पद्धतीचा हा एक विशेष फायदा आहे.

विधिमंडळाप्रती शासनाची जबाबदारी ही मर्यादित स्वरूपाची आहे. संसदीय लोकशाहीमध्ये शासन हे प्रत्येक बाबतीत विधानमंडळाला सर्वतोपरी जबाबदार असते आणि शासनाच्या संपूर्ण प्रशासनावर विधीमंडळाचे नियंत्रण हा संसदीय लोकशाहीचा आत्मा आहे.

समितीचे अधिकार, कार्यकक्षा, प्रशासनावर ठेवावयाचे नियंत्रण, शासनाचे समितीप्रती व विधानमंडळाप्रती असलेले उत्तरदायित्व या सर्वांचा साकल्याने विचार केल्यास समितीचे अधिकार निश्चित व निर्विवादपणे सर्वश्रेष्ठ आहेत. परंतु, योजना राबविण्यापूर्वी वा एखादे धोरण आखण्यापूर्वी प्रशासन यंत्रणेने मंत्रिमंडळाला दिलेल्या सल्ल्याची तपासणी करणे निश्चितच समितीच्या कार्यकक्षेबाहेरील होईल. मात्र योजना अस्तित्वात आल्यानंतर व त्यावर आर्थिक तरतूद करण्यात आल्यानंतर समिती या प्रकरणी संपूर्णपणे व तपशिलवार छाननी करण्यास समर्थ ठरेल. ही योजना अगदी अनावश्यक आहे काय, त्यावर अपेक्षेपेक्षा जास्त खर्च करण्यात आला आहे काय ? योजनेची उद्दीष्टे साध्य झाली आहेत काय ? योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे किंवा कसे, इतकेच काय एखादी योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्यास ती बंद करण्यात यावी व त्याऐवजी दुसरी एखादी योजना आखण्यात यावी या मर्यादेपर्यंत सुद्धा समिती शिफारस करू शकते व त्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व माहिती समितीला मागविण्याचा अधिकार आहे.

समित्यांचे कामकाज अधिक परिणामकारक करण्यासाठी मा.सदस्यांनी समितीच्या कामात जास्तीत जास्त सहभाग घेणे जरुरीचे आहे. या अहवालात नमूद बाबीसंदर्भात समितीने एक एक प्रश्न हाती घेऊन त्या प्रत्येक प्रश्नावर समाधानकारकरीतीने साक्षीपुरावा गोळा केला, तसेच मा. समिती सदस्यांनी आळीपाळीने प्रश्न विचारून संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती मिळविण्याच्या विनिर्दिष्ट पद्धतीचे पालनसुद्धा भेटीच्या वेळी केलेले आहे. एका सदस्यांनी त्यांचा मुद्दा पूर्ण केल्यानंतरच दुसऱ्या सदस्यांनी माहिती विचारण्याची पद्धत जोपासली आहे. या पद्धतीने समितीचे कामकाज सुव्यवस्थित पद्धतीने चालविण्याचा या समितीने प्रयत्न केलेला आहे.

समितीला तिच्याकडे सोपविण्यात आलेल्या विषयावरील मुद्दे तयार करून आणि त्यांच्या विनिर्दिष्ट क्रमाने त्यांचे परिक्षण करून विषयाशी संबंधित नियम किंवा कार्यपद्धतीमधील त्रुटी आणि उणीवा शोधून काढतेवेळी समितीचा दृष्टीकोन वस्तुनिष्ठ व विधायक होता. केलेल्या चुका सुधारण्यासाठी किंवा प्रशासकीय पद्धतीत सुधारणा घडविण्याच्यादृष्टीने समितीने अनेक बाबतीत सुधारणात्मक उपाय सुचविलेले आहेत, चुकांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी देखील समितीने उपाययोजना सुचविलेल्या आहेत. शासनाच्या प्रतिनिधीप्रती सदस्यांचे वर्तन संयमी आणि सौजन्यशील ठेवून कोणताही साक्षीदार काही वस्तुस्थिती लपवित असल्याबद्दल दोषी असल्याचे किंवा असहकार दर्शवित असल्याचे आढळून आल्यानंतर समितीने संबंधितांविरुद्ध कारवाईदेखील सुचविली आहे. समितीची बैठक बोलविणे आणि साक्षीदारांना साक्षीसाठी बोलविणे यासंबंधीच्या इतर किरकोळ मुद्दयांच्या बाबतीत साक्षीदारांना पुरेसा वेळ देऊन व नोटीस देऊन बोलविण्यात आलेले आहे. थोडक्यात, समिती पद्धती ही अत्यंत उपयुक्त व परिणामकारक असून संसदीय कामकाज प्रणालीमध्ये या पद्धतीचे स्थान व महत्त्व अनन्यसाधारण असेच आहे. संसदीय शासन प्रणाली अधिकाधिक वृद्धिंगत करण्याच्या दृष्टीने या महत्त्वपूर्ण अशा संसदीय समितीच्या कामकाजाचा स्तर उत्तरोत्तर उंचावत नेणे ही आपणा सर्वांची जबाबदारी आहे.

राज्यात समिती जिल्हा परिषदांना भेटी देत असताना समितीला अनेक चांगल्या संकल्पना व राबविलेल्या योजना आढळून आल्या आहेत. त्याचप्रमाणे काही बाबतीत प्रचंड अनियमितता व गैरव्यवहाराची प्रकरणेदेखील आढळून आली आहेत. समितीने चांगल्या बाबींना समर्थन देऊन संबंधितांना प्रोत्साहन दिले. तद्वतच काही अनियमितता किंवा गैरव्यवहाराच्या प्रकरणात समितीने कठोरपणे निर्णयदेखील घेतले आहेत. असे करीत असताना दोषारोपित व्यक्तीवर कारवाई करताना नैसर्गिक न्यायाची पायमल्ली होऊ नये अशा प्रकारच्या सूचनादेखील प्रशासनास केल्या आहेत. लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून न देणे अशी असंख्य प्रकरणे समितीला आढळून आली. अशा प्रकरणी समितीने कोणताही मुलाहिजा न ठेवता संबंधितांवर मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियमातील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाईदेखील प्रस्तावित केली आहे. या माध्यमातून शासनखाती दंडाची रक्कम जमा होत असताना संबंधित कर्मचाऱ्यांना जरबदेखील बसविण्याचे काम समितीने केले आहे.

या समितीने ज्या ज्या जिल्ह्यांना भेटी दिल्या आहेत त्या त्या जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांना भेटी देऊन उक्त पंचायत समित्यांच्या प्रशासनिक अहवालावर सखोल चर्चा करून ज्या बाबतीत दोष आहेत त्या सुधारून घेण्याबाबत त्यांना उपयुक्त सूचना केल्या आहेत. तसेच पंचायत समित्यांच्या क्षेत्रातील विविध कामांना भेटी देऊन त्याची पाहणी करणे, शालेय पोषण आहार, पुरक पोषण आहार, सार्वजनिक आरोग्य केंद्रे/उपकेंद्रे, पशु वैद्यकीय दवाखाने, रस्ते, जलसिंचनाची कामे, पाणीपुरवठ्याची कामे इत्यादींना भेटी देऊन त्याबाबतही चुकांचे निरसन करून काही चांगल्या बाबींचे समर्थन करून संबंधितांना प्रोत्साहितदेखील केले आहे. या अहवालात अशा अनेक बाबींचा उहापोह केला आहे.

सन २०११-१२ या वर्षाच्या लेखा परीक्षा पुनर्विलोकन व सन २०१२-१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात सन २०१७-१८ साठी गठीत झालेल्या समितीने सांगली जिल्हा परिषदेची सखोल तपासणी केली. समितीने सांगली जिल्हा परिषदेस दिनांक २२, २३ व २४ नोव्हेंबर, २०१७ रोजी भेट देऊन श्री. अभिजीत राऊत मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांची साक्ष घेतली.

सन २०१७-२०१८ या वर्षाकरिता गठीत झालेल्या समितीने सांगली जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या तसेच साक्षीच्या वेळी संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्द्यांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने दिनांक १६ ऑक्टोबर, २०१८ व सन २०२०-२०२१ या वर्षाकरिता गठित झालेल्या समितीने दिनांक १७ जानेवारी २०२१ रोजी जिल्हा परिषद, सांगली संदर्भात मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या, प्रतिनिधींच्या साक्षी घेतल्या.

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीचेवेळी श्री.श्यामलाल गोयल, अपर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, श्रीमती वंदना कृष्णा, अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री.संजय चहांदे, अपर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, श्री. अनुप कुमार, प्रधान सचिव, कृषी व पदुम विभाग, श्रीमती निलिमा करेकट्टा, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, श्री. श्याम तागडे, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, श्री. असिमकुमार गुप्ता, सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.एकनाथ डवले, सचिव, कृषी विभाग, श्री. विवेक नाईक, सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, ग्रामविकास विभाग, श्रीमती विनिता वेद सिंगल, सचिव, महिला व बालविकास विभाग, श्रीमती आय ए कुन्दन, सचिव, महिला व बालविकास विभाग, श्री. ला. रा. गुजर, सह सचिव, महिला व बालविकास विभाग, श्री. मनोहर ठोंबरे, सह सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, श्री. संजय बनकर, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. युवराज अजेटराव, उप सचिव, गृह विभाग, श्री. रविंद्र गुरव, उप सचिव, पशुसंवर्धन विभाग, श्री. किरण पाटील, उप सचिव, कृषी विभाग, श्री. म. रं. शेळके, उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग, श्री.दि.मा.सोनवणे, उप सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, श्री. कांतीलाल उमाप, आयुक्त, पशुसंवर्धन विभाग तसेच श्री. प्रताप मोहिते/संजय शहा, संचालक, स्थानिक लेखा निधी संचालनालय, नवी मुंबई यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे. तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी समितीला माहिती पुरवून केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्टामध्ये दिले आहे.

लेख्यांवरील लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या सांगली जिल्हा परिषदेच्या कामकाजाची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्द्यांबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात देण्यात आल्या आहेत.

सन २०२०-२०२१ साठी नव्याने गठीत झालेल्या समितीने दिनांक २४ डिसेंबर, २०२१ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेऊन तो किरकोळ दुरुस्तींसह संमत केला.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : २४ डिसेंबर, २०२१.

**संजय रायमुलकर,**
समिती प्रमुख,
पंचायती राज समिती.

**अनुक्रमणिका**


| अ.क्र. (१) | प्रकरण क्रमांक (२) | विषय (३) | परिच्छेद क्रमांक (४) | पृष्ठ क्रमांक (५) |
|---|---|---|---|---|
| (१) | एक | जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत मोठ्या ग्रामपंचायतींना नागरी सुविधासाठी विशेष अनुदान वाटपातील अनियमिततेबाबत (सन २०११-१२) | ३.२१ | १ |
| (२) | दोन | पटसंख्येच्या आधारे शिक्षक निश्चिती व समायोजन करण्याबाबत (सन २०११-१२) | ३.१०१ | ९ |
| (३) | तीन | गणवेश खरेदीसाठी जादा विद्यार्थी नमूद केल्याने जादा खर्च झालेबाबत (सन २०११-१२) | ३.१०३/८२ | १६ |
| (४) | चार | प्रमाणकांच्या झेरॉक्स प्रतीवर देयक पारीत केलेबाबत (सन २०११-१२) | ३.१०५/८३ | २० |
| (५) | पाच | नाविन्यपूर्ण योजनेंतर्गत लाकडी बाक खरेदीत झालेली अनियमितता (सन २०११-१२) | ३.१०६ | २५ |
| (६) | सहा | राष्ट्रीय कृषी विकास योजना अंतर्गत मिनी हँचर मशिन खरेदी, जिल्हा वार्षिक योजनेतून वैरण व पशुखाद्य विकास कार्यक्रम अंतर्गत झालेली अनियमितता (सन २०११-१२) | ३.५४३, ३.५४४ व ३.५४५ | २९ |
| (७) | सात | दलित वस्ती सुधार योजनेतील अनियमितता (सन २०११-१२) | ३.६०९ | ३४ |
| (८) | आठ | थकित पाणीपट्टी वसुलीबाबत (सन २०११-१२) | ३.८०९(८)/ ४४७ | ४३ |
| (९) | नऊ | उपकर निधीतून ताडपत्री खरेदीत झालेली अनियमितता (सन २०११-१२) | ४.२२९ | ४६ |
| (१०) | दहा | लेखापरिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करुन न दिल्याबाबतत (सन २०११-१२) | ३.२०/४०, ३.२३, ३.१०२/३०, ३.१०४, ३.१०५, ३.१०७, ३.१०८, ३.१०९, ३.३२३, ३.३२४, ३.४०८, ३.५००, ३.५४३, ३.५४४, ३.५४५, ३.६११, ३.७७१ | ४९ |
| (११) | अकरा | सर्वसाधारण शिफारशी | | ८३ |
| | | परिशिष्ट "अ", "ब" शासनाचे आदेश व परिपत्रके आणि समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त | | ८५ |

प्रकरण एक

## जिल्हा परिषद, सांगली

## जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत मोठ्या ग्रामपंचायतींना नागरी सुविधासाठी विशेष अनुदान वाटपातील अनियमिततेबाबत

### परिच्छेद क्रमांक ३.२१ (सन २०११-२०१२)

जिल्हा परिषद, सांगली सदर योजनेअंतर्गत ५००० लोकसंख्येवरील मोठ्या ग्रामपंचायतीना रुपये २,६९,३७,७४७/- इतका निधी वाटप केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हीपीएम/ २६१०/प्र.क्र.१२९/पंरा-४/दिनांक १६ सप्टेंबर, २०१० **(परिशिष्ट क्र.१.१)** परिच्छेद क्र.३१ अन्वये ग्रामसभेने ज्या कामास प्रशासकीय मान्यता दिलेली आहे त्याच कामाच्या प्रस्तावास मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मान्यता देणे आवश्यक आहे. ग्रामपंचायत कुची, तालुका कवठेमहाकाळ, ग्रामसभेने ज्या कामास प्रशासकीय मान्यता दिलेली आहे त्या कामाव्यतिरिक्त इतर कामासाठी खात्याने रक्कम रुपये १४,३२,०००/- इतके अनुदान वितरीत केलेले आहे. सदर अनुदान शासन निर्णयातील तरतूदीच्या विरूद्ध ग्रामपंचायतीना वितरीत केलेचे दिसून येते.

(२) ग्रामपंचायत – सावंतपूर, तालुका पलूस ग्रामसभेने ज्या कामास प्रशासकीय मान्यता दिलेली आहे त्या कामाव्यतिरिक्त इतर कामासाठी खात्याने रक्कम रुपये ४,७२,९९२/- इतके अनुदान वितरीत केलेले आहे. सदर शासन निर्णयातील तरतूदीच्या विरुद्ध ग्रामपंचायतीना अनुदान वितरीत केल्याचे दिसून येते.

(३) वाळवा तालुक्यातील मौजे बोरगांव येथे बाजारकट्टे बांधणे व जोतीर्लिंग मंदिराभोवती कंपाऊड भिंत बांधणे या कामांना प्रशासकीय मान्यता देऊन रक्कम रुपये १५,००,०००/- इतके अनुदान वाटप केलेले आहे. या कामाना अनुक्रमे रक्कम रुपये १५,४३,८३३/- व रक्कम रुपये ७,४९,३८४/- इतक्या रक्कमेस तांत्रिक मान्यता दिलेली आहे.

शासन निर्णय दिनांक १६ सप्टेंबर, २०१० अन्वये सदर योजनेतून मंदिराभोवती कंपाऊंन्ड भिंत बांधणे हे काम घेता येत नसल्याने ग्रामपंचायत बोरगांव याना वाटप केलेले अनुदान रुपये १५,००,०००/- मधून बाजारकट्टे बांधणे या अनुज्ञेय कामाच्या अंदाजपत्रकीय रकमेच्या म्हणजेच १५,४३,८३३/- च्या ७५ टक्के रक्कम रुपये ११,५७,८७५/- वजा जाता उर्वरित अनुदान रक्कम रुपये ३,४२,१२५/- वसुल करुन शासन निधीत भरणा केल्याचे दाखवावे.

(४) उपरोक्त शासन निर्णय दिनांक १६ सप्टेंबर, २०१० परिच्छेद क्र.२.३ अन्वये कामाच्या २५ टक्के इतका निधी ग्रामपंचायतीना स्व:निधीतून अथवा इतर स्त्रोतातून उभारणे बंधनकारक आहे. असे असताना मिरज तालुक्यातील ग्रामपंचायत भोसे यांना बाजारपेठ विकास अंतर्गत सर्व सुविधा व गावांतर्गत रस्ते रक्कम रुपये १८,५२,०४९/- या कामास रुपये १४,०६,९७५/- इतके अनुदान वितरीत केलेले आहे. सदर कामासाठी रक्कम रुपये १८,५२,०४९/- च्या ७५ टक्के रक्कम रुपये १३,८९,०३७/- इतके अनुदान देय असताना रुपये १४,०६,९७५/- इतके म्हणजे रुपये १७,९३८/- इतके जादा अनुदान जादा अदा केलेले आहे. सदरचे जादा अनुदान वसुल करणे आवश्यक आहे.

(५) ग्रामपंचायत कवठेपिरान, ता.मिरज ग्रामसभेने गावांतर्गत रस्ते बांधकाम या कामास प्रशासकीय मान्यता दिलेली असून अंदाजपत्रक मात्र खुले गटर (OPEN GUTTER) बांधकामाचे आहे. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक विपीएम/२६११/ प्र.क्र २०९/पंरा-४/दिनांक ९ नोव्हेंबर, २०११ अन्वये भूमिगत नाल्यांचे बांधकाम सदर योजनेतून हाती घेता येते. असे असताना खात्याने बाजारपेठ विकास अंतर्गत सर्व सुविधा, बागबगीचे उद्याने, चौकाचे सुशोभिकरण, सार्वजनिक दिवाबत्तीची सोय व गावांतर्गत रस्ते करणे या कामासाठी रुपये १२,७९,२३०/- इतके अनुदान वितरीत केलेले आहे. शासन निर्णय दिनांक १६ सप्टेंबर, २०१० परिच्छेद क्र.३.१ अन्वये ग्रामसभेने ज्या कामास प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. त्याच कामाच्या प्रस्तावास मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मान्यता देणे आवश्यक आहे. सदर शासन निर्णयांविरूद्ध प्रशासकीय मान्यता मिळालेल्या कामाव्यतिरिक्त इतर कामासाठी खात्याने वितरीत अनुदान रुपये १२,७९,२३०/- वसुल करणे आवश्यक आहे.

(६) खात्याने २१ ग्रामपंचायतीना रस्ते कामासाठी दि. २७/०३/२०१२ रोजीच्या आदेशाने एकूण वाटप रक्कम रुपये १,३८,४६,३५३/- व दिनांक २७/०३/२०१२ रोजीच्या आदेशाने एकमण वाटप रक्कम रुपये ६७,७४,१७२/- असे एकूण रुपये २,०६,२०,५२५/- इतके अनुदान वाटप केलेले आहे. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग आदेश क्र.व्हीपीएम-२६११/ प्र.क्र.२०९/पंरा-४/दिनांक ९/११/२०११ अन्वये रस्ते बांधणे ह्या कामासाठी द्यावयाच्या अनुदानाची किमान व कमाल मर्यादा निश्चित केलेली नसताना २१ ग्रामपंचायतीना वेगवेगळ्या दराने काय आधारे अनुदान वितरीत केले याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे. अन्यथा शासन आदेशापेक्षा जादा दिलेले अनुदान संबंधीत ग्रामपंचायतीकडून वसुलात आणून शासन निधीत भरणा केल्याचे दाखविणे आवश्यक आहे.

(७) ग्रामपंचायत-नरवाड, तालुका मिरज ग्रामसभेने गावांतर्गत मुख्य रस्ता डांबरीकरणे व आर.सी.सी. गटर बांधकाम या कामास प्रशासकीय मान्यता दिलेली असून सदर कामांना तांत्रिक मान्यताही प्राप्त आहे. खात्याने नरवाड बाजारपेठ विकास अंतर्गत सर्व सुविधा व गावांतर्गत रस्ते करणे

या कामासाठी रुपये १४,०६,२६५/- इतके अनुदान वितरीत केलेले आहे. सदर कामांच्या अंदाजपत्रकाचे अवलोकन केले असता अ.क्र. ३ चे अंदाजपत्रक उघडे गटर या प्रकारचे आहे. महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांक व्हीपीएम-२६११/प्र.क्र.२०९/पंरा-४, दिनांक ९ नोव्हेंबर, २०११ अन्वये सांडपाणी व्यवस्थापनासाठी भूमीगत नाल्यांचे बांधकाम करणे हे काम सदर योजनेतून घेता येते. सदर शासन निर्णयातील तरतूदी विरूद्ध अनुदान रुपये ६,८४,९७८/- वाटप केलेचे दिसून येते.

(८) पंचायत समिती, जत यांनी सदर योजनेतून ग्रामपंचायत-शेगाव, दारिबडची, हिवरे व खलाटी यांना अनुदान वर्ग केलेली असून रक्कम प्राप्त झालेबाबत नमुना नंबर ७ मधील पोहोच घेतलेली नाही. तसेच रक्कम खर्च केलेबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र ही घेतलेले नाही.

(९) पंचायत समिती, तासगांव यांनी सदर योजनेतून एकूण ४५,००,०००/- व जनसुविधासाठी २०,८०,१५६/- इतके अनुदान ग्रामपंचायतीना वर्ग केले आहे. नागरी सुविधा योजनेअंतर्गत ज्या ग्रामपंचायतीना अनुदान वर्ग केले आहे. त्यांचेकडील कामाचा आराखडा, प्रशासकीय मान्यतेचा तपशिल, मुख्य कार्यकारी अधिकारी यांची प्रस्तावास असलेली मान्यता, तांत्रिक मंजूरीचा तपशिल, अंदाजपत्रके, मंजूरी प्लॅन, जागा ताब्यात (ग्रा.पं.) च्या असलेबाबत उतारे कामांचे नस्ती सोबत नसल्याने याबाबत खात्री करता आली नाही. जनसुविधा अनुदान योजनेअंतर्गत महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र.ददभ-२०१०/प्र.क्र.६२, दिनांक १६/०९/२०१० नुसार जनसुविधासाठी विशेष योजना राबविणेबाबत शासनाने मार्गदर्शक सुचना दिल्या आहेत. त्यातील अटी व शर्तीनुसार कार्यवाही केल्याची कागदपत्रे नस्ती सोबत नाहीत. त्यामुळे सदर योजना योग्यरितीने राबविलेची खात्री करता आली नाही.

(१०) पंचायत समिती, आटपाडी यांनी सदर योजनेतून एकूण रुपये १५,००,०००/- ग्रामपंचायत करगणी यांना वर्ग केले आहे

(अ) शासन निर्णय दिनांक १६/०९/२०१० अन्वये ग्रामपंचायतील प्रथम ग्रामविकास आराखडा व पर्यावरण विकास आराखडा तयार करणेसाठी निधी या योजनेतून देणेत यावा. त्यानंतर सदर प्रस्तावास मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, सांगली यांची मान्यता घ्यावी. व त्यानंतर सदर कामासाठी निधी उपलब्ध करून देणेचे शासन आदेश असताना अशी कार्यवाही केलेली नाही.

(ब) तसेच परि.क्र.१.२ ते १.५ मधील कामासाठी २५ टक्के निधी ग्रामपंचायतीनी स्वनिधी किंवा इतर स्त्रोतातून उभा केलेनंतरच कामाचा ७५ टक्के निधी नागरी सुविधा विशेष घटक योजनेतून देणेची कार्यवाही करणेचे शासनाचे आदेश असताना उपरोक्त कामाच्या बाबतीत अशी कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे शासनाचा उद्देश सफल झालेला नाही.

(क) मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, सांगली यांनी अनुदानाचा मंजूर आदेश काढताना कामाच्या ७५ टक्के प्रमाणे येणारी रक्कम पाहूनच अनुदान मंजूरीचा आदेश काढणे आवश्यक असता अशी कार्यवाही केलेली नाही.

(ड) सदर अनुदानातून केलेल्या कामाचे उपयोगिता प्रमाणपत्र व काम पूर्णत्वाचा दाखला गट विकास अधिकारी यांनी दि. १२/०४/२०१२ पूर्वी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पाठविणे आवश्यक असता तो पाठविल्याचा पहायला मिळाला नाही.

(इ) सदर विकास काम त्वरीत पूर्ण करून मुल्यांकन दाखल्यासह देयकातून आवश्यक त्या सर्व कपाती केलेबाबत साधार खात्री पटविणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सांगली यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) मौजे कुची, ता. कवठेमहांकाळ येथील ग्रामसभा ठराव क्रमांक ९, दि. १३-१२-२०११ अन्वये गावांतर्गत सिमेंट कॉंक्रीट रस्ता या कामास रक्कम रुपये १५,००,०००/-मंजूर करण्यात आलेले होते. सदर कामाची तांत्रिक मान्यता रक्कम रुपये १९,०९,९२८/- असलेने ७५ टक्के रक्कम रुपये १४,३२,०००/- अदा केलेले आहेत. त्याच प्रमाणे गावांतर्गत सिमेंट कॉंक्रीट रस्ता कामास मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मान्यता आदेश ही दिलेला आहे व त्याच कामावरीती रक्कम रुपये १४,३२,०००/- अनुदान खर्च झालेला आहे.

(२) सावंतपूर, ता. पलूस येथील ग्रामपसभा ठराव क्रमांक ५(१) दि.२६/११/२०११ अन्वये रस्त्यावरील पेव्हींग ब्लॉक कामास रक्कम रुपये ५,००,०००/- मंजूरी दिलेली आहे. तांत्रिक मंजूरी रक्कम रूपयचे ६,३०,६५६/- इतकी असलेने ७५ टक्के रक्कम रुपये ४,७२,९९२/- इतकी अदा केलेली असून उर्वरित २५ टक्के रक्कम १,५७,६६४/- ग्रामपंचायतीने स्वनिधितून खर्च केलेला आहे. ग्रामपंचायतीने ग्रामसभेत निवडलेल्या कामास कार्यकारी अभियंता (इवद), जि.प. सांगली यांनी तांत्रिक मंजुरी दिलेली असून मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मान्यता आदेश दिलेला आहे व त्याच कामावरती रक्कम रुपये ४,७२,९९२/- अनुदान खर्च झालेला आहे.

(३) बोरगांव, ता.वाळवा येथे ग्रामसभा दिनांक १५/०८/२०११ मधील ठराव क्रमांक १७/३ व १७/४ अन्वये नागरी सुविधा योजनेअंतर्गत बाजारकट्टेचे काम व जोर्तिलिंग मंदीरजवळ बगीचा व कंपाऊंड या कामास प्रशासकीय मंजूरी दिलेली आहे त्यानुसार कार्यकारी अभियंता इ.व.द. यांचेकडील तांत्रिक मंजूरी प्राप्त झालेली आहे त्यास अनुसरून मान्यता आदेश दिलेला आहे. ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्रमांक व्ही.पी.एम.२६१०/प्र.क्र.१२९/पंरा-४, दि.१६ सप्टेंबर, २०१० मधील १.४ अंतर्गत बागबगीचे उद्याने तयार करणे, गावातील चौक सुशोभीकरण

करणे अशी कामे अनुज्ञीय आहे त्यानुसार सदरचे काम पुर्ण करणेत आलेले आहे व तांत्रिक मंजूरीच्या ७५ टक्के रक्कम अदा करणेत आली आहे. उर्वरित निधी ग्रामपंचायतीने स्वनिधीतून खर्च केलेला आहे सदर कामाचे पुर्णत्वाचे दाखल दप्तरी ठेवणेत आलेली आहेत.

(४) भोसे, ता. मिरज येथील तांत्रिक मंजूरी रक्कम रुपये १८,५२,०४९/- या रक्कमेस अधिन राहून ७५ टक्के रक्कम अदा करणे गरजेचे होते. परंतू अंदाजपत्रकीय रक्कम रुपये १८,७५,९६७/- या रक्कमेच्या ७५% रक्कम रुपये १४,०६,९७५/- अदा केलेली आहे परंतु तांत्रिक मान्यता रक्कम रुपये १८,५२,०४९/- च्या ७५% रक्कम रुपये १३,८९,०३७/- इतकी अदा करणे गरजेचे होते. त्यामुळे जादा अदा झालेली रक्कम रुपये १७,९३८/- ही ग्रामपंचायत भोसेकडून वसुलात आणून दिनांक १२ जानेवारी, २०१५ रोजी शासन भरणा करणेत आलेला आहे.

(५) कवठेपिरान, ता.मिरज ग्रामपंचायत मासिक सभा ठराव क्रमांक ६ दिनांक १६/१२/२०११ अन्वये व ग्रामसभा दिनांक १७/१२/२०११ ठराव क्रमांक ४ अन्वये गावांतर्गत रस्ते करणे व बाजारकटयाचे ठिकाणी गटर करणे या कामास प्रशासकीय मंजूरी देण्यात आली आहे. तसेच कार्यकारी अभियंता इ.व.द. यांनी रक्कम रुपये १७,०५,६४०/- या अंदाजपत्रकास तांत्रिक मंजूरीसह गावठण अंतर्गत रस्ते करणे या कामाचे अंदाजपत्रक सादर केलेले आहे. सदर अंदाजपत्रकाच्या सर्वसाधारण विवरणपत्रामध्ये तीन रस्ते १५५ मीटर लांबीचे गटर बांधणे अशी कामे नमुद आहेत. कार्यकारी अभियंता इ.व.द. यांचेकडील तांत्रिक मंजूरीनुसार मान्यता आदेश दिलेला आहे. ग्रामपंचायतीने ग्रामसभेमध्ये प्रशासकीय मान्यतेचा ठराव घेवून सुचित केलेली कामे ही ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय दि.१६ सप्टेंबर, २०१० व शासन शुद्धीपत्रक दिनांक ९ नोव्हेंबर, २०११ अन्वये सदर कामास मान्यता देणेत आलेली आहे. सदर कामाची मंजूरी रक्कम रुपये १५,००,०००/- होती व तांत्रिक मंजूरी रक्कम रुपये १७,०५,६४०/- होती त्याच्या ७५% रुपये १२,७९,२३०/-अदा केलेली असून त्याच कामावरती खर्च झालेला आहे.

(६) शासन निर्णय दिनांक १६ सप्टेंबर,२०१० व शासन शुद्धीपत्रक दिनांक २० ऑक्टोबर, २०११ अन्वये जिल्हा नियोजन समितीने मंजूर केलेल्या कामांचे अनुदानानुसार ग्रामसभेने मंजूर अनुदानास अधिन राहून रस्त्याची कामे प्राधान्याने हाती घेतलेली आहेत. सदर कामांना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मान्यता आदेश दिलेले आहेत. शासन निर्णय दिनांक १६ सप्टेंबर, २०१० व २० ऑक्टोबर, २०११ च्या शासन निर्णयाने पालन केलेले आहे.

(७) ग्रामपंचायत नरवाड, ता.मिरज यांनी ग्रामसभेने दिलेली प्रशासकीय मंजूरी ठराव क्रमांक ५/२, दि.२८/११/२०११ अन्वये गावातील मुख्य रस्ता खडीकरण, डांबरीकरण करणे व दोन्ही बाजूने गटर बांधकाम करणे तसेच ग्रामपंचायतीशेजारी रस्ता खडीकरण, डांबरीकरण करणे या कामास प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार कार्यकारी अभियंता इ.व.द. यांचेकडून रक्कम रुपये १८,७५,०२१/- रकमेच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मंजूरी प्राप्त झाली असून त्यानुसार मान्यता आदेश दिलेला आहेत. सदरचे काम या कार्यालयाकडून गावांतर्गत मुख्य रस्ते डांबरीकरण व गटर बांधकाम करणे असा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा मान्यता आदेश दिलेला आहे व याच कामावरती खर्च करण्यात आलेला आहे. सदर मंजूर केलेल्या कामास रक्कम रुपये १५,००,०००/- मंजूर होते व तांत्रिक मंजूरी रक्कम रुपये १८,७५,०२१/- होती त्याची ७५ टक्के रक्कम रुपये १४,०६,२६५/- इतकी अदा केलेली आहे व शासन निर्णय दिनांक २० ऑक्टोबर, २०११ च्या शासन निर्णयानुसार मान्यता आदेश दिलेला आहे. सदर कामास रक्कम रुपये १५,००,०००/- मंजूर होते शासन निर्णयाप्रमाणे अंदाजपत्रकीय रकमेच्या ७५ टक्के रक्कम रुपये १४,०६,२६५/- इतकी रक्कम अदा केलेली आहे. सदरचे काम पूर्ण झालेले असून काम पुर्णत्वाचा दाखला दप्तरी ठेवण्यात आलेला आहे.

(८) शेगांव, दरिबडची, हिवरे, खलाटी, ता. जत येथील प्राप्त अनुदानाबाबतची नमुना नंबर ७ ची पावती व उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त करून दप्तरी ठेवणेत आलेली आहेत व खलाटी येथील काम झालेले नसलेने सव्याज रक्कम रुपये ९,४६,१४३/- शासन भरणा करण्यात आलेली आहे.

(९) नागरी सुविधा योजनेतून ग्रामपंचायत विसापूर , सावळज व तुरची यांना प्रत्येकी रक्कम रुपये १५,००,०००/- एकूण रक्कम रुपये ४५,००,०००/- व जनसुविधा योजनेतून गोटेवाडी, सिध्देवाडी, वासुंबे व नरसेवाडी या ग्रामपंचयतींना एकूण रक्कम रुपये २०,८०,१५६/- इतके अनुदान मंजूर केलेले आहे. सदर कामांचे प्रशासकीय मान्यतेचे ठराव, तांत्रिक मंजूरी अंदाजपत्रके व जागेचे उतारे नस्तीसोबत जोडणेत आलेली आहेत. शासन निर्णय क्र.ददभू-२०१०/प्र.क्र.६२/पंरा-६/दि.१६/०९/२०१० मधील अटी व शर्तीनुसार कार्यवाही केलेली आहे.

(१०) पंचायत समिती, आटपाडी—

(अ) ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील पत्र क्र. व्हीपीएम-२०१०/स.क्र.१६१६/पंरा-४/दि. २८/१२/२०११ अन्वये २०११-१२ अखेरच्या कामांना पर्यावरण विकास आराखड्याची अट शिथिल करणेत आलेली आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करणेत आलेली आहे.

(ब) सदरच्या कामासाठी रक्कम रुपये १५,००,०००/- मंजूर होते व तांत्रिक मंजूरी रक्कम रुपये २०,०८,२९२/- होते. ग्रामपंचायत करगणी कडील ठराव क्र.७/१, दि.२६/११/२०११ मधील २५ टक्के अनुदान ग्रामपंचायतीचे स्वनिधीतून व उपलब्ध अनुदानातून खर्च करणेत मंजूरी दिलेली आहे. त्यानुसार प्रशासकीय मान्यतेचे कामास ७५ टक्के निधी उपलब्ध करून दिलेली आहे.

(क) प्रशासकीय मंजूरी देताना कार्यकारी अभियंता इ.व.द. जि.प.सांगली, यांचेकडील तांत्रिक मंजूरीस अधिन राहून ७५ टक्के रक्कम सदर कामावरती पंचायत समिती स्तरावर वर्ग केलेल्या आहेत.

(ड) मंजूर कामाचे काम पुर्णत्वाचे दाखले व उपयोगिता प्रमाणपत्र दप्तरी ठेवणेत आले आहेत.

(इ) मंजूर कामांची बिले पंचायत समिती स्तरावर पारित होत असलेने पंचायत समितीचे लेखाविभागाने सर्व कपाती केलेल्या आहेत.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

सांगली जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २२ नोव्हेंबर, २०१७ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, शिस्तभंगाची कारवाई केव्हा करण्यात आली आहे, मंदिराभोवती कंपाऊंड भिंत बांधणे हे काम बाग, बगीचे, उद्याने तयार करणे, गावातील चौक सुशोभीकरण करणे या बाबी खाली कसे येते, रक्कम रुपये १७.९३७/- विलंबाने वसुलीची कारणे काय आहेत, जादा रक्कम अदा करण्यास कोण जबादार आहेत, त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली आहे ? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस खुलासा केला की, वाळवा तालुक्यातील मौजे बोरगाव येथे बाजारकट्टे बांधणे, जोतिर्लिंग मंदिराजवळ बगिचा व कंपाऊंड भिंत बांधणे ही कामे नागरी सुविधा विशेष अनुदानांतर्गत घेण्यात आली होती. सदर कामे दिनांक १६ सप्टेंबर, २०१० रोजीच्या शासन निर्णयानुसार घेण्यात आली आहेत. या शासन निर्णयानुसार बागबगीचे, उद्याने तयार करणे, गावातील चौक सुशोभीकरण करणे अशी कामे अनुज्ञेय आहेत. त्या अनुसार सदरचे काम पूर्ण करण्यात आले आहे. तसेच, मौजे कुची, ता.कवठेमहांकाळ येथे ग्रामपंचायतीच्या ठरावानुसार ग्रामपंचायतीसाठी नागरी सुविधा योजने अंतर्गत कामांचा कृती आराखडा तयार करण्यात आला होता. त्यामध्ये गावांतर्गत रस्ते कॉंक्रीटीकरण करणे या कामाचा समावेश होता. त्यास तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मान्यता दिली होती. तथापि, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निधी वितरण आदेशामध्ये गावठण अंतर्गत रस्ते कॉंक्रीटीकरण करणे या ऐवजी सार्वजनिक दिवाबत्तीची सोय, गावातील चौक सुशोभीकरण करणे असे अनवधानाने नमूद केले.

यावर समितीने विचारणा केली की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून अनवधानाने असे का घडले आहे ? तसेच प्रशासकीय मान्यता देताना सगळी कागदपत्रे प्रस्तावाला जोडली जातात. या प्रकरणी आपण शिस्तभंगाची कारवाई का केलेली नाही ? लोकेशन मॅप दिल्यानंतर लोकेशन चेंज करण्यात आले आहे असे दिसते. यावर संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा यांनी समितीस विदित केले की, काम एकच होते. परंतु, यात ग्रँट रिलिज करताना चूक झालेली आहे. त्यामुळे ऑब्जेक्शन घेण्यात आले होते. त्याच लोकेशनवर काम झालेले आहे.

तद्नंतर समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विचारणा केली की, या प्रकरणी आपण संबंधितांवर कारवाई केली आहे तो अधिकारी कोण आहे? मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला विदित केले की, वरिष्ठ सहायक स्तरावर कारवाई करण्यात आलेली आहे. पुढे समितीने विचारणा केली की, ग्रँट रिलिज करताना आपण सर्व कागदपत्र तपासली होती की नाही? कॅफोंच्या अकाऊंटमधून पैसे जमा झाले असणार. सर्व बाबी तपासून घेणे ही कॅफोंची जबाबदारी असते. ही फाईल सर्व प्रोसेसमधून गेली तेव्हा कोणालाही ही चूक का आढळून आली नाही ? समितीचे असे म्हणणे आहे की, ज्या ज्या अधिकाऱ्यांच्या टेबलावरून ही फाईल गेली त्या सर्व अधिकाऱ्यांविरूद्ध शिस्तभंगाची कारवाई केली पाहिजे.पुढे समितीने अशीही विचारणा केली की, आपण कोणावर शिस्तभंगाची कारवाई केली आहे ? यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी समितीला विदित केले की, श्री.कोरे, वरिष्ठ सहायक यांनी नस्ती तयार केली होती. त्यांनी चुकीचा प्रस्ताव तयार केला म्हणून त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली आहे. यावर समितीने विचारणा केली की, ही कारवाई केव्हा करण्यात आली आहे ? यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी समितीला विदित केले की, ही कारवाई आता करण्यात आलेली आहे. समितीने विचारणा केली की, सदर कारवाई ही समिती येण्याआधीच का केली नाही ? ही फाईल किमान ७-८ अधिकाऱ्यांकडून गेली असणार. त्यांच्या विरूद्ध काय कारवाई करण्यात आलेली आहे ? जो टेबल वर्क करतो त्या व्यक्तीचा नेहमी बळी दिला जातो. परंतु, ज्याच्या हातून निर्णय होतो तो नेहमी सेफ राहतो. श्री.कोरे यांच्या व्यतिरिक्त अन्य कोणाला जबाबदार धरण्यात आले आहे काय ? यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी समितीस विदित केले की, या प्रकरणी श्री. कोरे यांना जबाबदार धरण्यात आले असून त्यांच्यावर दिनांक १८ नोव्हेंबर २०१७ रोजी कारवाई करण्यात आली आहे. पुढे समितीने असे मत व्यक्त केले आहे की, या प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देखील जबाबदार धरले पाहिजे. ही फाईल सर्व खातेप्रमुखांकडे नक्की गेली असणार. कॅफो यांनी देखील या फाईलला मंजुरी दिली असणार. असे असताना खालच्या कर्मचाऱ्यावर कारवाई का केली जाते ? समिती येणार म्हणून श्री. कोरे यांच्यावर आपण दिनांक १८ नोव्हेंबर २०१७ रोजी कारवाई केली आहे. या प्रकरणी फार मोठी अनियमितता झालेली आहे. चुकीच्या व्यक्तिवर जबाबदारी फिक्स करण्यात आली आहे. खाते प्रमुखांवर कारवाई न करता मोघम उत्तरे देण्यात आली आहेत. समितीला थातूरमातूर उत्तरे देणे बरोबर नाही. या प्रकरणी नैसर्गिक न्याय तत्त्वानुसार कारवाई करणे आवश्यक होते. या प्रकरणामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी, कॅफो, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) सह सर्वच अधिकारी जबाबदार आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सर्व बाबी तपासणे आवश्यक होते. सर्व वरिष्ठ अधिकारी जबाबदार असताना त्यांच्या विरूद्ध मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कारवाई का प्रस्तावित केली नाही ? कॅफो हे निधी वितरणाचे काम करतात. त्यामुळे या प्रकरणी जे अधिकारी जबाबदार आहेत त्यांच्या विरूद्ध जबाबदारी निश्चित करून त्यांच्या विरूद्ध तात्काळ कारवाई करावी व तसा अहवाल समितीला सादर करावा.

लेखापरीक्षणाच्या वेळी कागदपत्रे दाखविण्यात आलेली नाहीत. त्यामुळे कलम ७ नुसार कारवाई करुन संबंधितांना २५ हजार रुपये दंड केला पाहिजे. या प्रकरणी दोष सिद्ध झालेला आहे. त्यामुळे प्रशासकीय कारवाई करणे अपेक्षित आहे. संबंधितांची एक वेतनवाढ थांबवून त्यांच्या सेवापुस्तकात नोंद घ्यावी. आपण कलम ७ नुसार कारवाई करुन समितीला १५ दिवसात अहवाल सादर करावा. तसेच ग्रामपंचायत-सावंतपूर, तालुका पलूस ग्रामसभेने ज्या कामास प्रशासकीय मान्यता दिलेली आहे त्या कामाव्यतिरिक्त इतर कामासाठी ४,७२,९९२/- रुपये वितरित केल्याचे नमूद केलेले आहे. ज्या कामास प्रशासकीय मान्यता दिली त्या कामाव्यतिरिक्त इतर कामासाठी निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. म्हणजे ही स्वतःची मालमत्ता आहे काय ? हे काम कोणत्या अधिकाऱ्याने केलेले आहे ? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला विदित केले की, तत्कालीन उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पं.) बैठकीस उपस्थित आहेत. समितीच्या परवानगीने त्यांना बोलावून घेतो. यावर समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विचारणा केली की, आता ते शासकीय सेवेत आहेत का सेवानिवृत्त झालेले आहेत ? यावर आता ते सेवानिवृत्त झालेले आहेत असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस सांगितले. यावर समितीने विचारणा केली की, जिल्हा परिषद सदस्यांना डीपीसीच्या माध्यमातून विकास कामांसाठी निधी उपलब्ध करुन दिला जातो. परंतु, ज्या ठिकाणी काम मंजूर झाले होते तेथे काम न करता १० टक्के, २० टक्के रक्कम घेऊन ते काम विकण्यात आले. ते काम दुसरीकडे झालेले आहे. समितीने ही बाब संबंधित अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिलेली आहे. जिल्हा परिषद निवडणुकीपूर्वी जिल्ह्यात अशा बऱ्याच गोष्टी झालेल्या आहेत. म्हणजे एका मतदारसंघातील काम १०-२० टक्के रक्कम घेऊन दुसऱ्या मतदारसंघात विकले गेले. या प्रकरणामुळे पंचायत समितीच्या बांधकाम विभागातील अधिकाऱ्याची बदली सुद्धा झालेली आहे. या प्रकरणाची चौकशी झाली पाहिजे. तद्नंतर समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पुढीलप्रमाणे निदर्शनास आणून दिले की, एका मतदारसंघात मंजूर झालेले काम संबंधित अधिकाऱ्याने १०-२० टक्के रक्कम घेवून दुसऱ्या मतदारसंघात विकले आहे. तसेच, मयत व्यक्तीच्या नावे पैसे काढण्यात आलेले आहेत. यामध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता झालेली आहे. हे सर्व बघण्याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांची आहे. त्यामुळे या प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्यावर जबाबदारी निश्चित केली पाहिजे. तसेच आपण तत्कालीन उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पं.) यांना बोलावून घ्यावे. आपण ग्रामपंचायत, सावंतपूर कामाच्या संदर्भातील आक्षेप कोणत्या कारणामुळे काढलेला आहे ? त्यानुषंगाने मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनीही पुढीलप्रमाणे सुचित केले की, ग्रामपंचायतीने ज्या कामाचा ठराव केलेला आहे त्या प्रमाणे प्रशासकीय मान्यता देणे अपेक्षित असते. म्हणजे त्यांनी जे उत्तर दिले त्या उत्तरामुळे आपले समाधान झालेले नाही. कनिष्ठ अभियंता कामाची शंभर टक्के तपासणी करतात. ग्रामसेवक आणि सरपंच मासिक सभेत ठराव मंजूर झाल्यानंतर आपल्याकडे प्रस्ताव पाठवितात. त्या प्रस्तावाला प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर शाखा अभियंता यांनी लोकेशन बघून ले-आऊट द्यावयाचा असतो. त्यांनी ले-आऊट दिला किंवा नाही हे बघणे आवश्यक आहे. उप अभियंता यांनी ५ टक्के आणि कनिष्ठ अभियंता यांनी १०० टक्के तपासणी करावयाची आहे. आपण सांगितले की, प्रशासकीय मान्यतेप्रमाणे काम झालेले आहे. परंतु, आपल्याला तीन वेळा संधी देऊन देखील आपण समाधानकारक खुलासा सादर करु शकला नाही. त्यामुळे हा आक्षेप आलेला आहे. समितीला जे उत्तर दिले ते समाधानकारक नाही. त्यामुळे या प्रकरणी जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी. अशी समितीने नाराजी व्यक्त करीत तत्कालिन उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांना विचारणा केली की, आपण केव्हा सेवानिवृत्त झालेला आहात ?यावर (तत्कालीन उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पं.) मी साडेपाच वर्षापूर्वी सेवानिवृत्त झालेलो आहे. असे समितीला उत्तर दिले तद्नंतर समितीने विचारणा केली की, ज्या ग्रामपंचायत क्षेत्रात काम करावयाचे आहे त्या ग्रामपंचायतीने ठराव केला होता. परंतु, त्या कामाला प्रशासकीय मान्यता न देता दुसऱ्याच कामाला प्रशासकीय मान्यता देण्यात आली, असा मुद्दा आहे. म्हणजे ज्या कामाचा ठराव करण्यात आला तेथे काम न करता दुसरीकडेच काम करण्यात आले. ग्रामपंचायतीला काम मंजूर करण्याचा अधिकार आहे. त्यांनी लेखापरीक्षणाच्या वेळी ग्रामपंचायतीचा ठराव मागितला असेल. परंतु, तो एखाद्या ठेकेदाराने काढून घेतला असेल. तसेच जिल्ह्यातील किती लोकांवर एफआयआर दाखल झालेला आहे.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, मागील ४ महिन्यात अशी प्रकरणे समोर आलेली नाहीत. सन्माननीय सदस्यांनी जो विषय उपस्थित केला ते मागील आर्थिक वर्षातील प्रकरण आहे. त्या प्रकरणी कार्यवाही सुरु आहे. यावर समितीने मत व्यक्त करीत निदेश दिले की, या प्रकरणामध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता झालेली आहे. तसेच, भूमिगत गटार बांधावयाचे असताना ओपन गटार बांधण्यास परवानगी देण्यात आल्याचे नमूद केलेले आहे. शासन तशी परवानगी देत नाही. यामध्ये नियमाचे उल्लंघन झालेले आहे. या प्रकरणामध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाल्याचे दिसते. ग्रामपंचायतीचा ठराव आहे किंवा नाही, कामामध्ये बदल झालेला आहे किंवा कसे, हे तपासण्याची जबाबदारी कनिष्ठ अभियंता यांची आहे. अंदाजपत्रक तयार करताना ग्रामपंचायतीचा ठराव आहे किंवा नाही हे बघितले पाहिजे. सदर कामाची फाईल कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग आणि प्रशासकीय मान्यता देणारे उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मार्फत पुढे गेली असेल. म्हणून त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे. पुढे समितीने भूमिगत गटार बांधणे म्हणजे काय ? असा प्रश्न विचारला असता. (कार्यकारी अभियंता (बां)) : यांनी समितीस विदित केले की, भूमिगत म्हणजे ते ओपन नसावे, त्यावर स्लॅब टाकला पाहिजे. यावर मग ओपन गटार बांधण्यासाठी मंजुरी कशी काय देण्यात आली ? असा प्रश्न विचारून नाराजी व्यक्त करीत पुढीप्रमाणे निदेश दिले की, या प्रकरणामध्ये अनियमितता झालेली आहे. कनिष्ठ अभियंता कामाची तपासणी करतात. सदर काम बरोबर झालेले आहे किंवा नाही हे बघण्याची जबाबदारी उप अभियंता, कार्यकारी अभियंता यांची होती. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पं) यांची सुद्धा जबाबदारी होती. मुख्य लेखा व वित्त अधिकारी हे सुद्धा यामध्ये सहभागी आहेत. आपण या प्रकरणी तत्काळ जबाबदारी निश्चित करावी आणि जे अधिकारी दोषी आढळून येतील त्यांच्यावर कारवाई करुन समितीला १५ दिवसात अहवाल सादर करावा.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

**जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत मोठ्या ग्रामपंचायतीना नागरी सुविधासाठी विशेष अनुदान वाटपातील अनियमितते बाबत :-**

(१) मौजे कुची ता. कवठेमहांकाळ येथील ग्रामपंचायती मध्ये नागरी सुविधासाठी विशेष अनुदान वाटपातील अनियमितते प्रकरणी संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्या विरुद्ध जबाबदारी निश्चित करून त्याचे विरूद्ध कोणती कारवाई करणेत आली आहे, याबाबतचा अहवाल समितीला सादर करणेत यावा ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

(१) प्रस्तुत प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे. मौजे कुची ता. कवठेमहांकाळ येथे नागरी सुविधा योजनेतंर्गत ग्रामपंचायतकडील ग्रामसभा ठराव क्र.२ दि. १२/१२/२०११ नुसार कृती आराखड्यातील-गावांतर्गत रस्ते कॉक्रीटीकरण करणे यामध्ये कोणतीही अनियमितता झालेली नाही. फक्त निधी वितरण आदेशामध्ये टंकलेखनाची चुक झालेमुळे लेखा परीक्षण आक्षेप उद्‌भवला आहे. या बाबीस तत्कालीन कनिष्ट सहाय्यक व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) जबाबदार असल्याने संबंधित कनिष्ट सहाय्यक यांची एक वेतनवाढ रोखणेत आलेली आहे. त्याची त्यांच्या सेवा पुस्तकात नोंद घेण्यात आली आहे.

तसेच या संबंधात जबाबदार असणारे तत्कालीन विस्तार अधिकारी (सां), उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) आणि गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कवठेमहांकाळ हे नियत वयोमानानुसार शासन सेवेतून अनुक्रमे दिनांक ३१/०५/२०१६, ३१/०५/२०१२ आणि ३१/०७/२०१८ रोजी सेवा निवृत्त झालेने महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम क्र.२७ मधील तरतूदीस अनुसरून त्यांचेविरूद्ध कारवाई करणेत आलेली नाही.

(२) प्रस्तुत प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे. ग्रामपंचायत सावंतपूर तालुका पलूस येथे ग्रामसभेने गावठाणहद्दीत रस्त्यावर पेविंगब्लोक बसविणे व आरसीसी गटर करणे या कामास तांत्रिक मान्यता व प्रशासकीय मान्यता दिली आहे व सदर कामावर मुल्यांकनानुसार खर्च झाला आहे.

मा. पंचायत राज समितीचे जिल्हा परिषद, सांगली येथे झालेल्या बैठकीदरम्यान मा.समिती प्रमुख यांनी जबाबदार अधिकारी यांचेवर कारवाई करणेबाबत निर्देश दिलेनुसार अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत केली होती.

ग्रामविकास विभागातील दि.१६/०९/२०१० रोजीच्या शासन निर्णयानुसार आरसीसी गटर घेणे हे काम अनुज्ञेय नसलेने सदर प्रकरणी दोषी असलेल्या तत्कालीन ग्रामसेवक यांची एक वेतनवाढ रोखणेत आलेली असून तांत्रिक मंजूरीस शाखा अभियंता, उप अभियंता आणि कार्यकारी अभियंता जबाबदार आहेत. त्यांचेविरूद्ध शिस्तभंग विषयक कारवाई प्रस्तावित केली असून विस्तार अधिकारी (सां) हे दिनांक ३१/०५/२०१६ रोजी सेवा निवृत्त झाले असलेने व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) हे दिनांक ३१/०५/२०१२ रोजी सेवा निवृत्त झाले असलेने त्यांचेवर कारवाई करणेत आली नाही.

(३) चौकशी अहवालानुसार मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांची भूमिका वित्त प्रेषणापूरती मर्यादित असलेने प्रस्तुत अनियमिततेमध्ये त्यांचा दोष दिसून येत नसलेने त्यांचेवर कारवाई करणेत आलेली नाही.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-**

(१) जिल्हा परिषदेच्या अभिप्रायाशी सहमत आहे.

(२) जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत मोठ्या ग्रामपंचायतींना नागरी सुविधा देणे या योजनेमध्ये ग्रामपंचायत सावंतपूर येथील गावठाण हद्दीत आरसीसी गटर करणे हे काम अनुज्ञेय नसताना त्यास प्रशासकीय/तांत्रिक मान्यता देऊन अंमलबजावणी करून खर्च केल्याचे मुद्याच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेने नेमलेल्या चौकशी समितीच्या निष्कर्षामध्ये पंचायत समिती स्तरावरील गट विकास अधिकारी व लिपिक हे जबाबदार असल्याचे नमूद केले आहे.तसेच प्रशासकीय मान्यतेच्या दिनांक १२/०३/२०१२ रोजीच्या आदेशामध्ये गट विकास अधिकारी यांच्या शिफारशीवरून प्रस्तुत प्रकरणी मान्यता दिल्याचे निदर्शनास येत आहे. त्यामुळे ज्याप्रमाणे तांत्रिक मान्यतेच्या आदेशास जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कार्यवाही करण्यात आली आहे त्याप्रमाणे पंचायत समिती स्तरावरील तत्कालिन गट विकास अधिकारी व संबंधित कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद , सांगली यांना निर्देश देण्यात येत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने सांगली जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या महितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १६ ऑक्टोबर, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत मोठ्या

ग्राम पंचायतींना नागरी सुविधांसाठी विशेष अनुदान वाटपातील अनियमिततेबाबत. आपण या संदर्भात कारवाई केल्याचे दिसून येत आहे. आपल्याला या संदर्भात अजून काही सांगावयाचे आहे काय? तसेच या संदर्भात कारवाई केली आहे काय ? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस होकारार्थी उत्तर दिले. पुढे समितीने विचारणा केली की, त्यांची वेतनवाढ रोखलेली आहे. सेवापुस्तिकेत नोंद केलेली आहे व चौकशी सुद्धा सुरु केलेली आहे. यामध्ये काय अनियमितता झाली ? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, विद्यार्थ्यांना गणवेश वाटपाची अल्पसंख्याक विभागाची योजना होती. अल्पसंख्याक समुदायाचे ७५१४ विद्यार्थी असताना पुरवठा आदेश ८१३६ विद्यार्थ्यांसाठी दिला होता. पुढे समितीने असही मत व्यक्त केले की, जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत मोठ्या ग्रामपंचायतींना नागरी सुविधांसाठी विशेष अनुदान वाटपातील अनियमिततेबाबतचा हा मुद्दा आहे. हा नागरी सुविधांचा विषय आहे. हा गणवेश वाटपाचा विषय नाही. यामध्ये दोन विषय आहेत. पहिला विषय असा आहे की, मौजे कुची, ता. कवठेमहांकाळ येथील ग्रामपंचायतीमध्ये नागरी सुविधासाठी विशेष अनुदान वाटपातील अनियमितते प्रकरणी संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांविरुद्ध जबाबदारी निश्चित करुन त्यांच्या विरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली आहे ? दुसरा विषय असा आहे की, ग्राम पंचायत सावंतपूर, ता.पलूस येथे जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत नागरी सुविधांचा आराखडा मंजूर असून सदर आराखड्यामध्ये समाविष्ट असलेल्या कामामध्ये अनियमितता झाल्याप्रकरणी संबंधितांविरुद्ध जबाबदारी निश्चित करुन केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला सादर करण्यात यावा. तसेच समितीने पुढे असेही निदर्शनास आणून दिले की, आपण दिलेल्या माहितीमध्ये निधी वितरण आदेशामध्ये टंकलेखनाची चूक झाल्यामुळे असे नमूद केले आहे. निधी वितरण आदेशामध्ये चूक का होती ? तसेच निधी वितरणाची जबाबदारी ही खाते प्रमुखाची आहे असे असताना आपण कारवाई कोणावर केली आहे ? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, आम्ही कनिष्ठ सहाय्यकावर कारवाई केली आहे. यावर कनिष्ठ सहाय्यकावर कारवाई करायची होती तर ती ऑडिटच्या अगोदर केली पाहिजे होती. यामध्ये खाते प्रमुख जबाबदार नाही काय ? असा समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रश्न विचारला असता त्यावेळेचे खाते प्रमुख म्हणजे उप मुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रामपंचायत हे आता सेवानिवृत्त झाले आहेत. असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस उत्तर दिले यावर समितीने विचारणा केली की, तसे असले तरी चोर सोडून आपण संन्याशाला फाशी कसे काय देणार ? त्या खाते प्रमुखांनी त्या कनिष्ठ लिपिकाचा सी.आर. चांगला नोंदविला असेल तर याचा अर्थ त्यांनी त्या वर्षी चांगले काम केले. तुम्ही त्या कनिष्ठ लिपिकावर कारवाई करीत आहात. मात्र खाते प्रमुख जबाबदार आहेत का, ते सेवानिवृत्त झाले आहेत काय ? यावर खाते प्रमुख सेवानिवृत्त झाले आहेत. असे उत्तर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस दिले यावर कोणावर कारवाई केली ? असा प्रश्न समितीने विचारला असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस असे विदित केले की, कनिष्ठ सहाय्यकावर कारवाई केली. त्यावेळेचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी सेवानिवृत्त झाले. त्यामुळे त्यांच्यावर कारवाई केली नाही. यावर समितीने विचारणा केली की, ते सेवानिवृत्त झाले तरी जबाबदारी निश्चित झाली पाहिजे. तुम्ही कनिष्ठ अधिकाऱ्यावर दोषारोप करीत आहात. तसेच खाते प्रमुखांनी त्या कनिष्ठ लिपिकाच्या त्या वर्षीच्या सी.आर.मध्ये काही शेरे, ताशेरे ओढले काय? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नाही असे उत्तर दिले. यावर समितीने विचारणा केली की, मग तुम्ही त्याच्यावर कारवाई कशी करता ? कार्यालय प्रमुखांनी त्याचे काम चांगले आहे म्हणून सेवापुस्तिकेत नोंद घेतली. याचा अर्थ कार्यालय प्रमुखांनी बरोबर पाहणी केली नाही. त्यांचे सुपरव्हिजन होते. ऑडिटमध्ये हे येण्यापूर्वी कामकाजामध्ये जर अनियमितता दिसली होती तर त्यावेळेसच कारवाई करायची होती. आपण आता पंचायती राज समिती समोर कनिष्ठ लिपिकावर कारवाई केली असे सांगणे अपेक्षित नाही. प्रत्येक परिच्छेदावरील कारवाईमध्ये त्यांनी असेच नमूद केले आहे. तसेच कनिष्ठ कर्मचाऱ्यांबाबत असे करणे चुकीचे आहे. याबाबत वारंवार सांगितले जाते. ज्यावेळेस साक्ष झाली होती त्यावेळेस सूचना देण्यात आल्या होत्या. कनिष्ठ कर्मचाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करुन त्याच्यावर कारवाई करुन आपण मोकळे होऊन जाता. परंतु, त्यामध्ये बाकीच्या अधिकाऱ्यांची तपासणी वगैरे बाबी असतात. त्याला आपण सोडून देता. दौऱ्याच्या वेळेसही याबाबत सूचना केल्या होत्या. त्या सर्वांवर जबाबदारी निश्चित झाली पाहिजे. त्याला नैसर्गिक न्याय तत्वानुसार त्याचे म्हणणे मांडण्याची संधी देऊन त्याचे म्हणणे ऐकल्यानंतर त्याच्यावर जबाबदारी निश्चित करण्याच्या संदर्भात सूचना केल्या होत्या. यावर सर्व परिच्छेदांच्या अनुषंगाने ७ खाते प्रमुखांवर जबाबदारी निश्चित झाली होती. अशी माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस दिली असता दोन वगळता बाकीच्यांवर जबाबदारी निश्चित झाली काय असा प्रश्न समितीने विचारला असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, आम्ही त्या त्या विभागांना तसे प्रस्ताव पाठविलेले आहेत. यावर समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पुढीलप्रमाणे निदेश दिले की, इन्क्वायरी रि-ओपन करावी. तो दोषी नसेल तर त्याच्यावरचे चार्जेस मागे घ्यावेत. केवळ या प्रकरणामध्येच नाही तर अशा इतर प्रकरणांमध्ये आपण कनिष्ठ अधिकाऱ्यांवर कारवाई केली असेल व इतर अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित केली नसेल तर ते प्रकरण पुन्हा सादर करुन, सर्व जबाबदाऱ्या निश्चित करुन तत्काळ कारवाईसह या १५ दिवसांत समितीकडे अहवाल पाठवावा. बाकीच्या प्रकरणांबाबतही सांगितले आहे हे तुम्ही लक्षात घ्यावे. तुम्ही अजून एक प्रकरण सांगितले. अशी २ प्रकरणे आहेत. बाकीच्यांवर तुम्ही जबाबदाऱ्या निश्चित केलेल्या आहेत.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायती राज समितीने सांगली जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे आक्षेपार्ह मुद्यांबाबत विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. यावेळेस जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत ग्रामपंचायतींना नागरी सुविधांसाठी विषेश अनुदान वाटपातील अनियमितताबाबत कार्यवाही केल्याचे समितीच्या निदर्शनास आले.

**मौजे कुची, ता. कवठेमहांकाळ येथील ग्रामपंचायतीमधील नागरी सुविधासाठी विषेश अनुदान वाटपातील अनियमिततेप्रकरणी संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांविरूद्ध जबाबदारी निश्चित करून त्यांच्याविरूद्ध कारवाई करणे आवश्यक असताना, कनिष्ठ सहायकावर कारवाई करण्यात आलेली आहे, असे समितीच्या निदर्शनास आलेले असल्याने या प्रकरणाची पुर्नचौकशी करावी यात कनिष्ठ सहायक दोषी नसेल तर त्याच्यावर केलेली कारवाई मागे घेण्यात यावी तसेच अशा इतर प्रकरणांमध्येही कनिष्ठ अधिकाऱ्यांवर कारवाई केली असेल व इतर अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित केलेली नसेल तर त्याही प्रकरणांची पुन्हा चौकशी करून सर्व संबंधितांवर जबाबदाऱ्या निश्चित करुन कारवाई करण्यात यावी व याबाबतचा अहवाल समितीला सादर करण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

तसेच ग्रामपंचायत सावंतपूर, ता. पलूस ग्रामसभेने ज्या कामास प्रशासकीय मान्यता दिलेली आहे त्या कामाव्यतिरिक्त इतर कामासाठी निधी उपलब्ध करून दिला आहे. ज्या ग्रामपंचायातीक्षेत्रात काम करायचे आहे त्या ग्रामपंचायतीने ठराव केला होता परंतु त्या कामाला प्रशासकीय मान्यता न देता दुसऱ्याच कामाला प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. म्हणजेच ज्या कामाचा ठराव करण्यात आला त्या ठिकाणी काम न करता दुसऱ्याच ठिकाणी काम करण्यात आले आहे. यावरून स्पष्ट होते की, एका मतदार क्षेत्रात मंजूर झालेले काम संबंधित अधिकाऱ्याने दुसऱ्या मतदार क्षेत्रात अनधिकृतरित्या हस्तांतरित केले आहे. यामध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता झालेली आहे. या प्रकरणाची चौकशी करण्याचे समितीने निदेश दिले होते. त्यानुसार मंत्रालयीन विभाग व, जिल्हा परिषेदने कारवाई केली असल्याने समिती समाधान व्यक्त करीत आहे.

**नागरी सुविधा योजनेंतर्गत ज्या ग्रामपंचायतींना अनुदान वर्ग केले आहे. त्यांचेकडील कामाचा आराखडा, प्रशासकीय मान्यतेचा तपशील मुख्य कार्यकारी अधिकारी यांची प्रस्तावास असलेली मान्यता, तांत्रिक मंजुरीचा तपशील, अंदाजपत्रके, मंजुर आराखडा, ग्रामपंचायतीची जागा ताब्यात असलेबाबतचे उतारे याची तपासणी करण्यासह ग्रामसभेने ज्या कामास प्रशासकीय मान्यता दिली आहे. त्याच कामाच्या प्रस्तावास मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मान्यता देण्याची दक्षता घ्यावी, अशी शिफारस समिती करीत आहे.**

प्रकरण दोन

## जिल्हा परिषद, सांगली

## पटसंख्येच्या आधारे शिक्षक निश्चिती व समायोजन करण्याबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.१०१ सन २०११-२०१२**

शिक्षक निश्चितीबाबत जिल्हा परिषद, सांगली, सन २०११-२०१२( परिच्छेद क्रमांक २७) (अ) शिक्षण विभाग (प्राथमिक) सन २०११-२०१२ चे लेखा परिक्षण करताना दिनांक ३०/०९/२०११ च्या पटसंख्येच्या आधारे केलेल्या शिक्षक निश्चिती बाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) सन २०११-१२ च्या शिक्षक निश्चितीनुसार जिल्हा स्तरावर एकूण मान्य शिक्षक ६५८२ असून ६६३१ + ८८ निमशिक्षक कार्यरत होते. म्हणजेच ४९ शिक्षक जादा होते. त्यांचे समायोजन झाल्याने दिसून येत नाही.

(२) तालुका निहाय एकूण २४४ शिक्षक जादा असलेचे दिसून येते. त्यांचे समायोजन झाल्याची माहिती प्राप्त झाली नाही.

(३) सन २०१०-११ च्या शिक्षक निश्चितीप्रमाणे जादा शिक्षक १५४ असताना सन २०११-१२ मध्ये सप्टेंबर, २०१२ अखेर १९७ शिक्षणसेवक नियुक्त केलेले आहेत.

(४) पंचायत समिती मिरज दिनांक ३० सप्टेंबर, २०११ च्या पटसंख्येवर निश्चित केल्यानुसार २८ शिक्षक पदे जादा झाल्याचे दिसून आले. समायोजन आदेश वेळेत न काढलेले वेतन २०,४९,३६३/- (माहे मार्च, २०१२ पर्यंत) लेखा परिक्षणास मान्य करता येत नाही. तसेच पात्र पदवीधरांचे समायोजन दिनांक ७/७/२०१२ च्या आदेशाने केल्याने तोपर्यंत जादा पदांवर कार्यरत शिक्षकांना वेतन दिले आहे. एकूण रक्कम रुपये २,८२,४७३/- (मार्च पर्यंत) जादा पदांवर शिक्षकांना वेतन अदा केल्याचे दिसून येते.

(५) पंचायत समिती तासगाव तालुक्यातील ५ शिक्षक अतिरिक्त ठरले आहेत. त्यांचे समायोजन वेळेत न केल्यास रक्कम रुपये ४,८४,८३०/- एवढे जादा शिक्षकांचे वेतन अदा झाले आहे. जादा वेतन लेखा परिक्षणांस मान्य करता येणार नाही.

(६) पंचायत समिती कवठेमहांकाळ यांना शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद, सांगली यांनी कमी/ जादा शिक्षक दर्शवून मंजूरी दिली आहे. मंजूरीवर दिनांकित मंजूरी नाही. १३ कमी व जादा १८ शिक्षकांचे समायोजन केव्हा झाले याचा अहवाल प्राप्त झाला नाही.

(७) पंचायत समिती विटा १४ शिक्षक जादा असलेले जादा पदांबाबत विहित मुदतीत कार्यवाही केलेबाबतचे व पदनिहाय व रिक्त पदांचे शाळेमध्ये समायोजन झालेबाबतचे अभिलेखे उपलब्ध झाले नाहीत.

(८) पंचायत समिती जत कडील ४४ शिक्षकांची पदे जादा दर्शविली आहेत. त्यान्वये जादा शिक्षकांवर खर्च केल्याचे दिसून येते.

(९) जिल्हा स्तरावरून व तालुका स्तरावरून विहीत वेळेत शिक्षक निश्चिती व समायोजन न झाल्याने पगारावर रुपये ४९,६७,३९४/- नाहक खर्च झाला आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सांगली यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) सन २०११-१२ ची शिक्षक निश्चिती शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर यांच्या दिनांक २५ ऑक्टोबर २०११ च्या मंजुरीनुसार माध्यम निहाय खालीलप्रमाणे

तक्ता - अ

| माध्यम | व. मुख्या | पा.प. | उ.शि. | एकूण |
|---|---|---|---|---|
| मराठी | ४६४ | ४०३ | ५१७० + ७७ | ६०३७ + ७७ |
| उर्दू | १९ | ५ | ९६ | १२० |
| कन्नड | ३३ | ३१ | ३६१ + ११ | ४२५ + ११ |
| एकूण | ५१६ | ४३९ | ५६२७ + ८८ | ६५८२ + ८८ |

सदर माहितीमध्ये ८८ शिक्षक-वस्तीशाळा शिक्षक असून सदर पदांना शिक्षण उपसंचालक यांनी मंजुरी दिली असल्याने एकूण पदांमध्ये सदर पदे समाविष्ट करणे आवश्यक आहे.

सदर संच मान्यतेवेळची कार्यरत स्थिती पुढीलप्रमाणे आहे.

तक्ता - ब

| माध्यम | व. मुख्या | पा.प. | उ.शि. | एकूण |
|---|---|---|---|---|
| मराठी | ४३० | ३८६ | ५२८४ + ७७ | ६१०० + ७७ |
| उर्दू | १६ | ४ | ८३ | १०३ |
| कन्नड | ३० | २९ | ३६९ + ११ | ४२८ + ११ |
| एकूण | ४७६ | ४१९ | ५७३६ + ८८ | ६६३१ + ८८ |

तक्ता अ व ब नुसार माध्यमनिहाय संवर्गनिहाय रिक्त व अतिरिक्त पदांचा अहवाल खाली तक्ता क मध्ये नमुद केलेला आहे.

तक्ता - क

| माध्यम | वरिष्ठ मुख्याध्यापक | पात्र पदविधर | उपशिक्षक | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| मराठी | ३४ रिक्त | १७ रिक्त | ११४ अतिरिक्त | ६३ अतिरिक्त |
| ऊर्दू | ३ रिक्त | १ रिक्त | १३ रिक्त | १७ रिक्त |
| कन्नड | ३ रिक्त | २ रिक्त | ८ अतिरिक्त | ३ अतिरिक्त |

उपरोक्त तक्ता-क रकाना ५ मध्ये नमूद केले प्रमाणे जिल्हास्तरावर मराठी माध्यमांची ६३ उपशिक्षक पदे अतिरिक्त व कन्नड माध्यमाची ३ उपशिक्षक पद अतिरिक्त अशी एकूण ६६ उपशिक्षक पदे अतिरिक्त ठरतात.

सदर पदांना जिल्हास्तरावर अतिरिक्त ठरल्याने शिक्षण उपसंचालक कोल्हापूर विभाग कोल्हापूर यांनी दिनांक २५ ऑक्टोबर २०११ च्या पत्राने मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, सातारा कडे वर्ग करणेचे आदेश प्राप्त झाले आहेत. सबब या कार्यालयाकडून दिनांक ३० ऑक्टोबर २०११ च्या पत्रानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, सातारा यांना सदर अतिरिक्त पदे सामावून घेणेबाबत कळविणेत आलेले आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद सातारा यांनी दिनांक १७ नोव्हेंबर २०११ च्या पत्रान्वये सदर अतिरिक्त उपशिक्षकांना सामावून घेणेबाबत नकार कळविलेला आहे.

सबब सदर मराठी माध्यमाची अतिरिक्त ६३ उपशिक्षक पदे व कन्नड माध्यमाची अतिरिक्त ३ उपशिक्षक पदे त्या-त्या माध्यमाच्या पदोन्नती, सेवानिवृत्ती व जिल्हा बदली वेळोवेळी रिक्त होणाऱ्या पदांवर त्या-त्या तालुक्यात समायोजन करणेत आलेले आहे.

(२) दिनांक १२ मे २०११ च्या शासन निर्णयानुसार तालुका स्तरावरील अतिरिक्त शिक्षकांच्या बदल्या रिक्तपदानुसार करून उर्वरित अतिरिक्त शिक्षकांच्या बदल्या जिल्हा स्तरावरून केलेल्या आहेत. दिनांक ३० सप्टेंबर २०११ च्या शिक्षक निश्चितीनुसार तालुका निहाय अतिरिक्त /रिक्त पदांची माहिती पुढीलप्रमाणे

तक्ता-१

| अ.क्र | तालुका | अतिरिक्त | | | | रिक्त | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मराठी | कन्नड | ऊर्दू | एकूण | मराठी | कन्नड | ऊर्दू | एकूण |
| १ | शिराळा | १० | - | - | १० | १४ | - | - | १४ |
| २ | वाळवा | ३२ | - | - | ३२ | १७ | - | ५ | २२ |
| ३ | मिरज | २८ | - | - | २८ | १७ | - | १ | १८ |
| ४ | तासगांव | ३१ | - | - | ३१ | २२ | - | - | २२ |
| ५ | पलूस | १७ | - | - | १७ | १२ | - | - | १२ |
| ६ | खानापूर | २४ | - | - | २४ | ९ | - | - | ९ |
| ७ | कडेगांव | २९ | - | - | २९ | ४ | - | २ | ६ |
| ८ | आटपाडी | ११ | - | - | ११ | १८ | - | - | १८ |
| ९ | क.म. | १८ | - | - | १८ | १३ | - | - | १३ |
| १० | जत | २८ | १५ | १ | २८ | ३९ | १२ | १० | ६१ |
| | एकूण | २२८ | १५ | १ | २४४ | १६५ | १२ | १८ | १९५ |

दिनांक ३०/०९/११ च्या शिक्षक निश्चितीनुसार तालुक निहाय समायोजन केलेल्या पदांची माहिती पुढीलप्रमाणे

तक्ता-२

| अ. क्र. | तालुका | | तालुकास्तर समायोजन | | | | जिल्हा स्तर समायोजन | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मराठी | कन्नड | ऊर्दू | एकुण | मराठी | कन्नड | ऊर्दू | एकूण | |
| १ | शिराळा | १० | - | - | १० | - | - | - | - | १० |
| २ | वाळवा | १५ | - | - | १५ | १६ | - | - | १६ | ३१ |
| ३ | मिरज | २१ | - | - | २१ | ७ | - | - | ७ | २८ |
| ४ | तासगांव | २६ | - | - | २६ | ५ | - | - | ५ | ३१ |
| ५ | पलूस | १२ | - | - | १२ | ४ | - | - | ४ | १६ |
| ६ | खानापूर | १२ | - | - | १२ | १२ | - | - | १२ | २४ |
| ७ | कडेगांव | ४ | - | - | ४ | २५ | - | - | २५ | २९ |
| ८ | आटपाडी | ११ | - | - | ११ | - | - | - | - | ११ |
| ९ | क.म. | १५ | - | - | १५ | २ | - | - | २ | १७ |
| १० | जत | २४ | १३ | १ | ३८ | - | ३ | - | ३ | ४१ |
| | एकूण | १५० | १३ | १ | १६४ | ७१ | ३ | - | ७४ | २३८ |

मुद्दा क. २ मधील तक्ता क.१ मधील अतिरिक्त शिक्षक २४४ आणि तक्ता क.२ मधील तालुका व जिल्हास्तरावरील समायोजन शिक्षक २३८ मधील फरक ६ असून सदर शिक्षकांचे जिल्हास्तरावरून पुढील कालावधीत समायोजन करणेत आलेले आहे.

३) दिनांक ३०/०९/२०१० च्या शिक्षक निश्चितीनुसार जिल्हा परिषद सांगलीकडे तालुका निहाय १५४ पदे जरी अतिरिक्त असली तरी सर्व तालुक्यात मिळून २२३ पदे ही रिक्त होती. अतिरिक्त असणाऱ्या १५४ पदांचे रिक्त असणाऱ्या २२३ पैकी १५४ पदांवर समायोजन करणेत आलेनंतर ६९ उपशिक्षकांची पदे रिक्त राहतात. अशा प्रकारे सदर रिक्त ६९ पदे व पदोन्नती, सेवानिवृत्त व जिल्हा बदली मिळून एकूण पदांवर (सन २०११-१२ पर्यंत), सन २०११-२०१२ मध्ये १९७ शिक्षक सेवकांना नियुक्ती देणेत आलेली आहे.

४) १. ग्रामविकास व जलसंधारण विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र.जि.प.ब.५११/प्र.क्र./आ-१४ दि. १२/०५/२०११ **(परिशिष्ट क्र.२.१)** नुसार समायोजन होईपर्यंत शिक्षकांना त्याच पदावर ठेवणेचे आहे. व सदर कालावधीचे वेतन अदा करणेचे आहे.

२. तसेच निवडणूक आचारसंहितेमुळे ही समायोजन प्रक्रिया विलंबाने झालेली आहे. पंचायत समिती मिरज दिनांक ३० सप्टेंबर, २०११ च्या पटसंख्येवर निश्चित केल्यानुसार २८ शिक्षक पदे अतिरिक्त होते. त्या पैकी १६ पदांचे समायोजन दि.०३/०१/२०१२ रोजी केले होते. त्या पुढील ४ पदांचे समायोजन दि.२३/०२/२०१२ अखेर केले व उर्वरित पदांचे समायोजन ०७/०७/२०१२ अखेर करणेत आलेले आहे. उपसंचालक कोल्हापूर यांचेकडून दिनांक २५/१०/२०११ च्या पत्रानुसार दिनांक ३०/०९/२०११ च्या संच मान्यतेनुसार मान्यता दिलेली आहे. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडील आदेश क्र.जा.क्र/प्राशिवि/आस्था-१/वशी-५६१९ दिनांक ३/१/२०१२ रोजी तालुकास्तरीय समायोजन केले आहे. दिनांक १/२/२०१२ नुसार जिल्हास्तरीय समायोजन तालुका स्तरावरील रिक्त पदावर केलेले आहे. तसेच त्यातून अतिरिक्त राहिलेल्या पदांचे रिक्त पदांच्या उपलब्धतेनुसार जिल्हा स्तरावर समायोजन केलेले आहे. सदरचे समायोजन उपसंचालक यांचे मान्यतेने व मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकारी यांचे वेळोवेळी मिळणारे मार्गदर्शनानुसार करणेत आलेले आहे.

५) १. ग्रामविकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र.जि.प.ब.५११/प्र.क्र./आ-१४ दिनांक १२/०५/२०११ नुसार समायोजन होईपर्यंत शिक्षकांना त्याच पदावर ठेवणेचे आहे. व सदर कालावधीचे वेतन अदा करणेचे आहे.

२. तसेच निवडणूक आचारसंहितेमुळे ही समायोजन प्रक्रिया विलंबाने झालेली आहे. दिनांक ३० सप्टेंबर, २०११ च्या पटनिश्चिती नुसार तालुकास्तरीय समायोजन दिनांक ०३/०१/२०१२ रोजी घेणेत येऊन तालुकास्तरावर अतिरिक्त झालेल्या ५ शिक्षकांचे समायोजन रिक्त पदांच्या उपलब्धतेनुसार जिल्हास्तरावर करणेत आले. उपसंचालक कोल्हापूर यांचेकडून दिनांक २५/१०/२०११ च्या पत्रकानुसार दिनांक ३०/९/२०११ च्या संच मान्यतेनुसार मान्यता दिलेले आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडील आदेश क्र.जा.क्र./प्राशिवि/आस्था-१/वशी-५६१९ दिनांक ३/१/२०१२ रोजी तालुकास्तरीय समायोजन केलेले आहे. दिनांक १/२/२०१२ नुसार जिल्हास्तरीय समायोजन तालुका स्तरावरील रिक्त पदावर केलेले आहे. तसेच त्यातून अतिरिक्त राहिलेल्या पदांचे रिक्त पदांच्या उपलब्धतेनुसार जिल्हा स्तरावर समायोजन केलेले आहे. सदरचे समायोजन उपसंचालक यांचे मान्यतेने व मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकारी यांचे वेळोवेळी मिळणारे मार्गदर्शनानुसार करणेत आलेले आहे.

६) १. ग्रामविकास व जलसंधारण विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र.जि.प.ब.५११/प्र.क्र./आ-१४ दिनांक १२/०५/२०११ नुसार समायोजन होईपर्यंत शिक्षकांना त्याच पदावर ठेवणेचे आहे. व सदर कालावधीचे वेतन अदा करणेचे आहे.

२. तसेच निवडणूक आचारसंहितेमुळे ही समायोजन प्रक्रिया विलंबाने झालेली आहे. पंचायत समिती कवठेमहाकाळकडे एकूण संच मान्यतेनुसार १७ पदे अतिरिक्त होती. त्यापैकी १५ पदांचे तालुकास्तरावर समायोजन करणेत आलेले असून दोन पदांचे समायोजन करणेकरता जिल्हास्तरावर पाठविणेत आली होते. दिनांक ३० सप्टेंबर, २०११ च्या पटनिश्चिती नुसार तालुकास्तरीय समायोजन दिनांक ०३/०१/२०१२ रोजी घेणेत येऊन तालुकास्तरावर अतिरिक्त झालेल्या ५ शिक्षकांचे समायोजन रिक्त पदांच्या उपलब्धतेनुसार जिल्हास्तरावर करणेत आले. उपसंचालक कोल्हापूर यांचेकडून दिनांक २५/१०/२०११ च्या पत्रानुसार दिनांक ३०/०९/२०११ च्या संच मान्यतेनुसार मान्यता दिलेली आहे. मा.मु.का.अ. यांचेकडील आदेश क्र. जा.क्र./ प्राशिवि/आस्था-१/वशी-५६१९ दिनांक ३/१/२०१२ रोजी तालुकास्तरीय समायोजन केलेले आहे. दिनांक १/२/ २०१२ नुसार जिल्हास्तरीय समायोजन तालुकास्तरावरील रिक्त पदांवर केलेले आहे. तसेच त्यातून अतिरिक्त राहिलेल्या पदांचे रिक्त पदांच्या उपलब्धतेनुसार जिल्हास्तरावर समायोजन केलेले आहे. सदरचे समायोजन उपसंचालक यांचे मान्यतेने व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकारी यांचे वेळोवेळी मिळणारे मार्गदर्शना नुसार करणेत आलेले आहे.

७) १. ग्रामविकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र.जि.प.ब.५११/प्र.क्र./आस्था-१४ दिनांक १२/०५/ २०११ नुसार समायोजन होईपर्यंत शिक्षकांना त्याच पदावर ठेवणेचे आहे. व सदर कालावधीचे वेतन अदा करणेचे आहे.

२. तसेच निवडणूक आचारसंहितेमुळे ही समायोजन प्रक्रिया विलंबाने झालेली आहे. पंचायत समिती विटाकडील संच मान्यतेनुसार उपशिक्षकांची १४ पदे अतिरिक्त होती त्यापैकी ८ पदांचे समायोजन तालुकास्तरावर रिक्त पदावर करणेत आले व १ पद वरिष्ठ मुख्याध्यापक रिक्त पदी तात्पुरते समायोजन केले. दिनांक ३० सप्टेंबर, २०११ च्या पटनिश्चितीनुसार तालुकास्तरीय समायोजन दिनांक ०३/०१/२०१२ रोजी घेणेत येऊन तालुकास्तरावर अतिरिक्त झालेल्या ५ शिक्षकांचे समायोजन रिक्त पदांच्या उपलब्धतेनुसार जिल्हास्तरावर करणेत आले. उपसंचालक कोल्हापूर यांचेकडून दिनांक २५/१०/२०११ च्या पत्रानुसार दिनांक ३०/०९/२०११ च्या संच मान्यतेनुसार मान्यता दिलेली आहे. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडील आदेश क्र.जा.क्र./प्राशिवि/आस्था-१/वशी-५६१९ दिनांक ०३/०१/२०१२ रोजी तालुकास्तरीय समायोजन केलेले आहे. दिनांक १/२/ २०१२ नुसार जिल्हास्तरीय समायोजन तालुका स्तरावरील रिक्त पदावर केलेले आहे. तसेच त्यातून अतिरिक्त राहिलेल्या पदांचे रिक्त पदांच्या उपलब्धतेनुसार जिल्हा स्तरावर समायोजन केलेले आहे. सदरचे समायोजन मा.उपसंचालक यांचे मान्यतेने व मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकारी यांचे वेळोवेळी मिळणारे मार्गदर्शनानुसार करणेत आलेले आहे.

८) १. ग्रामविकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र.जि.प.ब.५११/प्र.क्र./आ-१४ दिनांक १२/०५/२०११ नुसार समायोजन होईपर्यंत शिक्षकांना त्याच पदावर ठेवणेचे आहे. व सदर कालावधीचे वेतन अदा करणेचे आहे.

२. तसेच निवडणूक आचारसंहितेमुळे ही समायोजन प्रक्रिया विलंबाने झालेली आहे. पंचायत समिती जत कडील दिनांक ३० सप्टेंबर, २०११ च्या पटनिश्चितीनुसार माध्यमनिहाय खालीलप्रमाणे पदे अतिरिक्त होती.

| माध्यम | उपशिक्षक | पा.प. | व.मु. |
|---|---|---|---|
| मराठी | २६ | ०० | ०२ |
| कन्नड | १३ | ०१ | ०१ |
| ऊर्दू | ०१ | ०० | ०० |
| एकूण | ४० | ०१ | ०३ |

दिनांक ३० सप्टेंबर, २०११ च्या पटनिश्चिती नुसार तालुकास्तरीय समायोजन दिनांक ०३/०१/२०१२ रोजी घेणेत येऊन तालुकास्तरावर अतिरिक्त झालेल्या ५ शिक्षकांचे समायोजन रिक्त पदांच्या उपलब्धतेनुसार जिल्हा स्तरावर करणेत आले. सदरचे समायोजन उपसंचालक यांच्या मान्यतेने व मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकारी यांच्या मार्गदर्शनानुसार करण्यात आलेले आहे.

९) सन दिनांक ३० सप्टेंबर, २०११ च्या संच मान्यतेनुसार जिल्हा परिषद सांगली कडे सर्व माध्यमांची एकूण ६५८२ मंजूर पदे होती व ६६३१ इतकी पदे कार्यरत होती. तालुकास्तरावर एकूण २४४ पदे अतिरिक्त होती त्यापैकी तालुकास्तरावर समायोजन करून उर्वरित शिक्षकांचे रिक्त जागांच्या उपलब्धतेनुसार जिल्हा स्तरावर टप्याटप्याने समायोजन करण्यात आलेले आहे. सदर कार्यवाही वेळेत पूर्ण न होण्यामागे तत्कालीन परिस्थितीमध्ये आचारसंहिता होती.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

सांगली जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २२ नोव्हेंबर, २०१७ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, शासन निर्णय दिनांक १२.५.२०११ अन्वये कालावधी निश्चित केलेला असतानाही त्यानुसार कार्यवाही का करण्यात आली नाही, नोव्हेंबर, २०११ पर्यंत कार्यवाही होणे आवश्यक असताना माहे जुलै, २०१२ पर्यंत दीर्घ विलंबाने समायोजन करण्याचे प्रयोजन स्पष्ट करावे, दीर्घ विलंबाने समायोजन केल्याने झालेल्या शैक्षणिक नुकसानीस व नियमाबाह्य वेतन अदा केलेबाबत शासन निर्णय दिनांक १२.५.२०११ अन्वये शिक्षणाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे का, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे खुलासा केला की, शिक्षकांच्या समायोजनाबाबतचा हा प्रश्न आहे. शिक्षकांचे समायोजन करण्यासाठी उप संचालक, शिक्षण, कोल्हापूर यांना प्रस्ताव पाठविला होता. सातारा जिल्हापरिषदेत शिक्षकांचे समायोजन करता येईल का अशी त्यांच्याकडे विचारणा केली होती. परंतु सातारा जिल्हापरिषदेने दिनांक ३१ ऑक्टोबर, २०११ रोजी नकार कळविला. त्यानंतर उप संचालकांनी त्या शिक्षकांचे जिल्हास्तरावर समायोजन करण्याच्या सूचना दिल्या. जुलै, २०१२ पर्यंत म्हणजे पुढील सहा-सात महिन्यांमध्ये शिक्षकांची पदोन्नती किंवा सेवानिवृत्त झाले त्या जागांवर त्यांचे समायोजन करण्यात आले. नियमबाह्य वेतन अदा करण्यात आले असा आक्षेप आहे. या संदर्भात वित्त विभागाचा दिनांक १० सप्टेंबर, २००१ (परिशिष्ट क्र. २.२) रोजीचा शासन निर्णय आहे. त्यानुसार शिक्षक अतिरिक्त असले तरी त्यांना वेतन द्यावे लागते. त्यामुळे ते नियमबाह्य ठरत नाही. यावर समितीने विचारणा केली की, मग त्यांचे पगाराचे बिल कसे काय मंजूर केले आहे ? अतिरिक्त शिक्षक असले तरी ते शाळेत कार्यरत असतात. कागदावर फक्त ते अतिरिक्त असतात. समितीची अधिकाऱ्यांना सूचना आहे की, त्यांनी बरोबर माहिती द्यावी. चुकीची माहिती आल्यामुळे संभ्रम निर्माण होतो. या कालावधीत शिक्षकांनी कोणते काम केले आहे ? RTE च्या विद्यार्थी संख्येच्या निकषानुसार शिक्षकांनी काम केलेले आहे. पटसंख्येनुसार अतिरिक्त शिक्षक असतील तर त्यांचे डेली नोटस कसे काय भरून निघतात ? यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी समितीला विदित केले की, शिक्षक प्रत्यक्षात शिकविण्याचे काम करीत असतात. ते संख्येने फक्त अतिरिक्त असतात.

तद्नंतर समितीने मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना पुढीलप्रमाणे निदेश दिले की, नरेगामध्ये काम करणाऱ्या मजुराने किती काम केले याचे मोजमाप केले जाते. तेव्हा शिक्षकांना जादा वेतन अदा करताना त्यांच्या कामाचे देखील मोजमाप केले पाहिजे. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, शिक्षकांचे वेतन हे त्यांच्या मूळ शाळेतूनच निघते. नरेगावरील मजुराने किती काम केले आहे त्याचे मोजमाप करून त्याला मजुरी दिली जाते मात्र अतिरिक्त शिक्षकांने काम केले नाही तरी त्यास वेतन मिळते असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे या विषयासंबंधी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात येईल. यातील २-३ मुद्दे गंभीर आहेत. यात फार मोठी अनियमितता दिसते आहे. त्यामुळे शिक्षण विभागाच्या सचिवांची साक्ष घेण्यात येईल. तसेच नियमबाह्य पद्धतीने वेतन अदा झालेले आहे. त्यासंबंधात आपण कोणती कारवाई केली आहे ? यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी समितीला विदित केले की, यात नियमबाह्य पद्धतीने वेतन अदा करण्यात आलेले नाही. अतिरिक्त शिक्षक असतील त्यांना वेतन अदा करावे असा दिनांक १० सप्टेंबर २०१० रोजीचा शासन निर्णय आहे. त्यानुसार त्या शिक्षकांना वेतन अदा करण्यात आलेले आहे. दिनांक १२.५.२०११ रोजीचा शासन निर्णय हा समायोजनासंदर्भातील आहे. यावर शिक्षक हे कोणत्या वर्षी अतिरिक्त झाले होते व त्यांची संख्या किती होती ? असा प्रश्न समितीने केला असता मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे समितीला खुलासा केला की, सन २०११-१२ च्या सुरुवातीला जिल्ह्यामध्ये मराठी, कन्नड, उर्दू या माध्यमातील एकूण ६६ शिक्षक अतिरिक्त होते. आज रोजी कोणत्याही माध्यमातील शिक्षक अतिरिक्त नाहीत. शिक्षकांचे १०० टक्के समायोजन झालेले आहे.

यावर समितीने पुढीलप्रमाणे विचारणा केली की, स्पष्टीकरणात असे नमूद करण्यात आले आहे की, सदर पदांना शिक्षण उप संचालक, कोल्हापूर यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.सातारा यांना सामावून घेण्याबाबत कळविले होते. परंतु, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प., सातारा यांनी या पदांना सामावून घेण्याबाबत नकार कळविलेला आहे. यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी शिक्षण उप संचालक यांनी सातारा जिल्हा परिषदेकडे अतिरिक्त शिक्षक वर्ग करण्यासाठी विचारले होते. त्यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प., सातारा यांनी नकार दिलेला आहे.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

शिक्षक निश्चितीबाबत :- सांगली जिल्हा परिषदेमध्ये सन २०११-२०१२ मध्ये पटसंखेच्या आधारे शिक्षक निश्चिती करताना जिल्हा स्तरावर अतिरिक्त शिक्षकांना नियमबाह्य पद्धतीने वेतन अदा करण्यात आल्याप्रकरणी जबाबदारी निश्चित करुन संबंधिताविरुद्ध कोणती कारवाई करणेत आली आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

१) सन २०११ - २०१२ ची शिक्षक निश्चिती दि. २५/१०/२०११ रोजी मंजूर झाली असून त्यानुसार मंजूर शिक्षक संख्या ६५८२ इतकी होती तर कार्यरत शिक्षक संख्या ६६३१ इतकी होती. रिक्त १७ (उर्दू माध्यम) व अतिरिक्त ६६ (६३ मराठी माध्यम व ३ कन्नड माध्यम) पदे होती.

२) जिल्हा स्तरावरील अतिरिक्त शिक्षकांना जिल्हा परिषद सातारा कडे वर्ग करणेबाबत शिक्षण उप संचालक यांनी दि.२५/१०/२०११ चे पत्रान्वये निर्देश दिले होते.

३) त्यानुसार अतिरिक्त शिक्षक जिल्हा परिषद साताराकडे पाठविणेबाबतचे आदेश दि.३१/१०/२०११ रोजी देणेत आले होते.

४) तथापि, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा यांनी दिनांक-१७/११/२०११ च्या पत्रानुसार सदर शिक्षकांना जिल्हा परिषद सातारा कडे सामावून घेता येत नसलेबाबत कळविले होते.

५) सदरची बाब उप संचालक, कोल्हापूर यांच्या निदर्शनास आणली असता त्यांचेकडून दिनांक २४/११/२०११ च्या पत्रान्वये सेवानिवृत्त, पदोन्नती व अन्य कारणाने रिक्त झालेल्या पदावर समायोजन करणेबाबत सूचना दिलेल्या होत्या.

६) त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प., सांगली यांनी दिनांक ७/७/२०१२ अखेर शालेय शिक्षण विभागाकडील शासन निर्णय दि.१२/५/२०११ मधील तरतुदीनुसार समायोजन प्रक्रिया पूर्ण केली आहे.

७) महाराष्ट्र शासन वित्त विभागाकडील दि. १०/०९/२००१ रोजीच्या शासन निर्णयामधील ५ (२) नुसार अतिरिक्त ठरलेल्या संबंधित शिक्षकांना वेतन अदा केलेले आहे.

### मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्राम विकास विभागाचे अभिप्रायः-** (आस्था-१४) सदर परिच्छेदास अनुसरून संबंधितांनी म्हणजे जिल्हा परिषदेने नियमाप्रमाणे कार्यवाही केलेली आहे.

### विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने सांगली जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या महितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १६ ऑक्टोबर, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, शिक्षक निश्चितीबाबत. जिल्हा परिषद सांगलीमध्ये सन २०११-२०१२ मध्ये पटसंख्येच्या आधारे शिक्षक निश्चिती करताना जिल्हास्तरावर अतिरिक्त शिक्षकांना नियमबाह्य पद्धतीने वेतन अदा करण्यात आल्या प्रकरणी जबाबदारी निश्चित केली आहे काय ? यावर मुख्य लेखा अधिकारी यांनी समितीस पुढीलप्रमाणे खुलासा केला की, सन २०११-२०१२ मध्ये ज्यावेळेस लेखा परीक्षण झाले त्यावेळेस एकूण मंजूर पदे ६५८२ होती. कार्यरत शिक्षक ६६३१ होते. ४९ शिक्षक अतिरिक्त होते. यावर शिक्षणाचा विषय आहे, याबाबत सचिव महोदयांनी माहिती द्यावी. असे समितीकडून सुचविण्यात आले असता मुख्य लेखा अधिकारी यांनी समितीला विदित केले की, शिक्षक आस्थापनेचा विषय ग्रामविकास विभागाकडे आहे. ४९ शिक्षक अतिरिक्त होते. त्यावेळेस उप संचालक, शिक्षण-कोल्हापूर यांच्याकडे प्रस्ताव दाखल होता. सदरहू प्रस्ताव त्यांना सातारा जिल्ह्यामध्ये वर्ग करण्याचे आदेश दिले. परंतु, सातारा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी उलट कळविले की, त्यांच्याकडेही अतिरिक्त शिक्षक असल्याने त्यांना तेथे वर्ग करता येणार नाही. त्यानंतर पुढच्या ९ महिन्यांच्या कालावधीमध्ये या शिक्षकांना सेवानिवृत्त जागांवर नियमित करण्यात आले. मुद्दा असा होता की, त्यांचे वेतन दिले ते नियमबाह्य होते की नाही. वित्त विभागाच्या दिनांक १० सप्टेंबर, २००१ च्या शासन निर्णयानुसार शिक्षक हे अतिरिक्त झाले तरी त्यांना वेतन द्यावे लागते. यावर समितीने मत व्यक्त केले की, समितीचे म्हणणे असे आहे की, त्या शिक्षकांना काम नसताना वेतन दिले. जेथे शिक्षकांच्या जागा रिक्त होत्या तेथील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले. त्यांचे वेतन उपयोगात आले नाही. तुमचे म्हणणे मान्य आहे. परंतु, ते शिक्षक कुठल्यातरी शाळेत कार्यरतच होते. ते कार्यरत होते तरीही ते अतिरिक्त होते. त्यांच्यावर कुठलाही कार्यभार नव्हता. कार्यभार असता तर ते अतिरिक्त ठरले नसते. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला विदित केले की, महोदय, कार्यभार होता. फक्त आपल्याकडे १:३० अशी शिक्षकांची संख्या निश्चित आहे, त्यामुळे ते अतिरिक्त झाले. पटसंख्येनुसार शिक्षकांची संख्या जास्त असेल तर शिक्षक अतिरिक्त ठरतात. हे तसेच आहेत की नाहीत ? त्यांना कोणतेही पिरियड नव्हते तरी त्यांना तुम्ही पेमेंट केले. त्यांना पेमेंट का केले हा विषय महत्त्वाचा नाही. परंतु, नंतर तुम्ही समायोजन केले ते वेळेवर केले असते तर विद्यार्थ्यांनाही शिक्षण मिळाले असते. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला विदित केले की, एक उदाहरण देतो. एका शाळेत ६० विद्यार्थी असतील तर १:३० च्या गुणोत्तरानुसार तेथे २ शिक्षक पाहिजेत. परंतु, तेथे ३ शिक्षक होते. ६० मुलांना ३ शिक्षक शिकवत होते. यावर समितीने विचारणा केली की, १ शिक्षक अतिरिक्त होते. तुम्ही तिन्ही शिक्षकांना काम वाटून दिले असेल म्हणजे त्यांनी कमी पैशांमध्ये काम केले. तुम्ही कामाचे मोजमाप करताना हे अपेक्षित आहे की नाही? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी होय असे उत्तर दिले. यावर जेथे शिक्षकांच्या जागा रिक्त होत्या तेथील शिक्षकांनी जास्त काम केले, त्यांना तुम्ही जास्त वेतन दिले काय, असा समितीने प्रश्न विचारला असता, नाही असे उत्तर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिले. तद्नंतर समितीने विचारणा केली की, या संदर्भात सन २०१० च्या शासन निर्णयानुसार कारवाई

केलेली आहे. ही कारवाई बरोबर आहे काय, उप संचालक यांना ते अधिकार आहेत. ते जर तुमच्याकडे दिले तर लवकर कारवाई होऊ शकते, असे आहे काय ? यावर अप्पर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस पुढीलप्रमाणे खुलासा केला की, हा फार मोठा विषय आहे. मी याचा अभ्यास करीत आहे. त्यामध्ये काही समायोजन विदिन डिस्ट्रिक्ट आहे, ते त्यांच्या लेव्हलवर करणे शक्य आहे. काही एका विभागामध्ये, एका जिल्ह्यातून दुसऱ्या जिल्ह्यात करणे शक्य आहे. ते उप संचालकाच्या स्तरावर करणे शक्य आहे. काही एका विभागाकडून दुसऱ्या विभागाकडे सुद्धा करावे लागते. कारण कधी कधी एका विभागातही रिक्त/अतिरिक्त असतात किंवा रिक्त नसतात मात्र अतिरिक्त नसतात त्यामुळे ॲक्रॉस डिव्हीजन सुद्धा जावे लागते. हा वेगवेगळ्या टप्प्यांचा विषय आहे, ठीक आहे.

यावर समितीने विचारले की, समितीला सांगा की, साताऱ्याने नाकारले त्यांना ते बाईंडिंग होते काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मग त्यांच्याकडे अतिरिक्त झाले असते. असे उत्तर दिले यावर मग त्यांच्याकडे वर्ग कसे केले होते. असा प्रश्न समितीने विचारला असता अगोदर आपण विदिन डिव्हीजन ऑफर करतो. डिव्हीजनच्या बाहेर समायोजन करण्याचे अधिकार कोणाकडे आहेत. यावर समितीने विचारले की, अप्पर मुख्य सचिव, शालेय शिक्षण यांनी समितीस विदित केले की, अजून आपण डिव्हीजनच्या बाहेर गेलोच नाही. परंतु, गेले पाहिजे. आता ही सिस्टिम ऑनलाईन आहे. त्यावेळेस कदाचित हे मॅन्युअल होत असेल. यावर समितीने हे अधिकार ग्राम विकास विभागाच्या सचिवांकडे आहेत, आयुक्तांकडे आहेत की मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे आहेत.

आपण यामध्ये नियमानुसार कार्यवाही केलेलीच आहे. समितीचा असा विषय होता की, आता उप संचालकाबाबत सांगितले. समजा ही कार्यवाही मुख्य कार्यकारी अधिकारी यांना करायला दिली तर ते गतिमान होईल काय, यावर अपर मुख्य सचिव यांनी समितीस विदित केले की, जिल्ह्यांतर्गत दिले तर होईल. परंतु, जिल्ह्याच्या बाहेरही समायोजन करावे लागते. यावर समितीने होकारत्मक संमती दिली.

## अभिप्राय व शिफारशी

शासन निर्णय दिनांक १२ मे, २०११ अन्वये माहे नोव्हेंबर, २०११ पर्यंत पटसंख्येच्या आधारे शिक्षक निश्चिती व समायोजन करण्याची कार्यवाही पूर्ण करणे आवश्यक असताना, माहे जुलै, २०१२ पर्यंत विलंबाने समायोजन केले आहे. जिल्हा व तालुका स्तरावरील शिक्षक निश्चिती व समायोजन विहित वेळेत न झाल्याने वेतनावर रुपये ४९,६७,३९४/- नियमबाह्य पद्धतीने अतिरिक्त खर्च झाल्याप्रकरणी जबाबदारी निश्चित करण्याचे निदेश समितीने दिले.

यासंदर्भात विभागीय सचिवांच्या झालेल्या साक्षीत विभागाने समितीच्या निदर्शनास आणले की, जिल्हास्तरावर मराठी माध्यमांची ६३ व कन्नड माध्यमांची ३ अशा एकूण ६६ उपशिक्षकांची पदे अतिरिक्त होती. शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर यांचे जिल्हा परिषद, सातारा कडे वर्ग करण्याचे आदेश प्राप्त झाले, त्यानुसार दिनांक ३० नोव्हेंबर, २०११ च्या पत्रान्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा यांना पदे सामावून घेण्याबाबत कळविण्यात आले. तथापि, दिनांक १७ नोव्हेंबर, २०११ च्या पत्रान्वये अतिरिक्त उपशिक्षकांना सामावून घेण्याबाबतचा नकार जिल्हा परिषद, सातारा यांच्याकडून कळविण्यात आला. सदर उपशिक्षकांची अतिरिक्त पदे त्या-त्या माध्यमांच्या पदोन्नती, सेवानिवृत्ती व जिल्हा बदली वेळोवळी रिक्त होणाऱ्या पदांवर त्या-त्या तालुक्यात समायोजन करण्यात आले आहे. वित्त विभागाच्या दिनांक १० सप्टेंबर, २००१ च्या शासन निर्णयानुसार शिक्षक अतिरिक्त झाले तरी त्यांना वेतन द्यावे लागते. त्यामुळे अतिरिक्त शिक्षकांच्या वेतनावर झालेला खर्च नियमबाह्य नाही. याप्रकरणात केलेली संपूर्ण कार्यवाही नियमानुसार आहे. विभागाकडून उपरोक्त प्रमाणे दिलेले स्पष्टीकरण समितीने मान्य केले.

**जिल्हा व तालुका स्तरावरील शिक्षक निश्चिती व समायोजन विनाविलंब जलदगतीने होण्यासाठी सदरची जबाबदारी शिक्षण उप संचालकांऐवजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे देता येईल किंवा कसे याबाबतची अधिक तपासणी करावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

प्रकरण तीन

## जिल्हा परिषद, सांगली

## गणवेश खरेदीसाठी जादा विद्यार्थी नमूद केल्याने जादा खर्च झालेबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.१०३/८२ ( सन २०११-१२)**

(१) शिक्षण विभागाने इयत्ता १ ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यासाठी १०३ विकास गटातील सर्व विद्यार्थी व इतर सर्व अनुसुचीत जाती जमाती/ विमुक्त व भटक्या जमातीतील विद्यार्थ्यांसाठी पाट्या ५५,७९५ नग व गणवेश खरेदी ६८,२०२ नग म्हणजेच गणवेश खरेदीसाठी १२,४०७ एवढे विद्यार्थी जादा नमुद झालेले आहेत. त्यान्वये जादा मुले ६,११७ दर रुपये ५७.२१ प्रमाणे रक्कम रुपये ३,४९,९५३-५७/- व मुली ६,२९० दर रुपये ६९.७५/- प्रमाणे रक्कम रुपये ४,३८,७२७.५०/- असे एकूण रक्कम रुपये ७,८८,६८१.७०/- विद्यार्थी नसताना जादा खर्च नमुद केला आहे.

(२) विद्यार्थ्यांची नावासह यादी शिक्षण विभागाने न ठेवल्याने सर्व शिक्षा अभियान १०३ विकास गट या योजनेतून दुबार लाभ दिला गेल्याची शक्यता आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सांगली यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) १०३ विकास गट योजनेच्या निकषानुसार जिल्हा परिषदेने चालविलेल्या प्राथमिक शाळातील इयत्ता १ ली ते ४ थी तील अनुसुचीत जाती/ जमातीचे विद्यार्थी तसचे विमुक्त भटक्या जमातीतील विद्यार्थ्यांना शालेय पाट्या वाटपाकरीता दिनांक २०/०८/२०११ चे पत्रान्वये सर्व गट स्तरांवरून लाभार्थी संख्या मागणी केलेली होती. त्याप्रमाणे गटस्तरावरून प्राप्त झालेली लाभार्थी संख्या ५५,७९५ अंतिम धरून दिनांक ३० डिसेंबर, २०११ रोजी शालेय पाट्या पुरवठा आदेश देणेत आलेला आहे. सदर आदेशानुसार गटस्तरांवर पाट्या प्राप्त झालेल्यांची पोहोचच्या सत्यप्रति उपलब्ध आहेत. तसेच गणवेश वाटपाच्या योजनेचे निकषानुसार इयत्ता १ ली ते ८ वी च्या शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये शिक्षण घेत असलेल्या सर्व मुली व अनुसुचीत जाती /जमातीचे मुले, तसेच दारिद्रय रेषेखालील पालकांची मुले या लाभार्थीना, राज्य शासन (डिपीसी) व केंद्र शासन (सर्व शिक्षा अभियान) अशी एकत्रित अंमलबजावणी करावयाची असल्यामुळे माहे सप्टेंबर, २०११ चे पटपडताळणी नुसार, यु-डायस वारून ६८,२०२ इतकी पात्र लाभार्थी संख्या अंतिम धरून दिनांक २२/०३/२०१२ आणि दिनांक २९/०६/२०१२ चे आदेशान्वये, मोफत गणवेश वाटपासाठी तालुका स्तरावर अनुदान वितरीत करणेत आलेले आहेत. त्यामुळे लाभार्थी संख्येत तफावत दिसून येते. सदरच्या शालेय पाट्या वाटप व मोफत गणवेश वाटप याबाबत वेगवेगळ्या निकषानुसार स्वतंत्र नस्त्या सादर करणेत आलेल्या असून त्याप्रमाणे पात्र लाभार्थ्यांना लाभ दिलेला आहे. सबब कोणत्याही प्रकारचा जादा खर्च झालेला नाही.

(२) विद्यार्थ्यांची नावाची / लाभार्थ्यांची पोहोच शाळास्तरावरील नोंदवहीत घेण्यात आली आहे. तसचे कोणत्याही लाभार्थीस दुबार लाभ दिला नसलेचे सर्व गट शिक्षणाधिकारी यांचे प्रमाणपत्र दप्तरी उपलब्ध आहे.

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

सांगली जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २२ नोव्हेंबर, २०१७ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, अखर्चित अनुदान किती होते, अखर्चित अनुदान शासनाकडे कधी भरण्यात आले आहे, अखर्चित अनुदानातून पाट्या खरेदी न करता लोकवर्गणीतून पाट्या का खरेदी करण्यात आल्या आहेत, अनुसूचित जाती, जमाती/ विमुक्त व भटक्या जमातीतील विद्यार्थ्यांसाठी पाट्या ५५७९५ नग व गणवेश खरेदी ६८२०२ नग म्हणजेच गणवेश खरेदीसाठी १२४०७ एवढे विद्यार्थी जादा होते. त्यावेळी शिक्षणाधिकारी कोण होते, शिक्षणाधिकारी (प्राथमीक) यांनी विदित केले की, श्री. पोले हे शिक्षणाधिकारी होते.

असे समितीने विचारणा केली की, पाट्या लोकवर्गणीतून मिळाल्या आहेत. गणवेश लोकवर्गणीतून मिळाले काय, शिक्षणाधिकारी प्राथमीक यांनी स्पष्ट केले की, गणवेश लोकवर्गणीत मिळाले नाहीत. यावर समितीने मत व्यक्त केले की, कोणत्या गावातून लोकवर्गणीतून काय मिळाले यासंबंधातील समितीला माहिती देण्यात यावी. तसेच त्यावेळी पटसंख्या किती होती याचीही माहिती समितीस देण्यात यावी. ६८२०२ पात्र लाभार्थीपैकी ६२४७३ लाभार्थीना लाभ देण्यात आला असून उर्वरित लाभार्थीची रक्कम शासन निधीत चलनाने भरण्यात आली आहे. यात देखील ऑर्डर जास्त देण्यात आलेली आहे. शासन निधीत चलनाने रक्कम भरलेली आहे. ही रक्कम लेखा आक्षेप आल्यानंतर भरण्यात आली आहे की त्यापूर्वी भरण्यात आलेली आहे यासंबंधातील देखील समितीला माहिती देण्यात यावी. हा मुद्दा अनुसूचित जाती, जमाती आणि विमुक्त व भटक्या जमातीच्या विद्यार्थ्यांशी संबंधित आहे. हा एक गंभीर विषय आहे. त्या संदर्भातील स्पेसिफिक उत्तर अधिकाऱ्यांनी द्यावी.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले की, या योजने अंतर्गत जिल्ह्यात ६२,४७३ विद्यार्थी पात्र होते. त्या सर्वांना गणवेश देण्यात आलेले आहेत. समितीने पुढे अशी विचारणा केली की, ६२ हजार पटसंख्या असताना ६८ हजार पटसंख्या कशी दाखवण्यात आली आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, गट विकास अधिकाऱ्यांकडून चुकीची मागणी नोंदविण्यात आली होती. यावर तत्कालीन शिक्षणाधिकारी (प्राथमीक) यांनी अधिकची माहिती दिली की, आम्ही यु डायस संगणक प्रणालीवरुन विद्यार्थ्यांची आकडेवारी घेतली होती. समितीने

निदेश दिले की, हा अनुसूचित जाती, जमाती, विमुक्त व भटक्या जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या संदर्भातील प्रश्न आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या संदर्भात ब्रिफिंग घेतलेले आहे काय, अगोदरच या संदर्भात संबंधित अधिकाऱ्यांसमवेत चर्चा करावयास पाहिजे होती. समिती मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेत आहे. मग ही जबाबदारी कोणाची होती ? मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून ही जबाबदारी आपली होती. मुख्य कार्यकारी अधिकारी देखील समाधानकारक उत्तर देत नाहीत. आता तत्कालीन शिक्षणाधिकारी यांच्याकडे रेकॉर्ड उपलब्ध नाही. ते ही उत्तर देण्यास तयार नाही. याप्रकरणी समितीला समाधानकारक उत्तर देणे अपेक्षित आहे. या प्रकरणामध्ये अनियमितता झालेली असल्यामुळे जबाबदारी निश्चित केली पाहिजे. समितीने अशी विचारणा केली की, शालेय पाट्या आणि गणवेश पुरवठ्याचा आदेश कोणी दिला होता, शालेय पाट्या देताना जेवढी विद्यार्थी संख्या नमूद करण्यात आली होती तेवढी संख्या गणवेश देताना का नमूद करण्यात आली नाही, शिक्षणाधिकारी, अधीक्षक यांनी हे का तपासून घेतले नाही, लोकवर्गणी जिल्हा परिषदेकडे जमा झाली होती काय, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शालेय पाट्या आणि गणवेश पुरवठ्याचा आदेश दिलेला होता. लोकवर्गणी जिल्हा परिषदेकडे जमा झालेली नाही. समितीने विचारणा केली की, ५० टक्के सबसिडी बेस योजना आहे. ५० टक्के सबसिडी बेस योजनेच्या लोकवर्गणीचे पैसे जिल्हा परिषदेकडे जमा करण्यात आले आहेत का ? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, ही सबसिडी बेस स्कीम नाही. जेवढे विद्यार्थी आहेत त्यांना शाळेस पाट्या दिलेल्या आहेत. समितीने पुढे अशीही विचारणा केली की, लेखापरीक्षकांनी कागदपत्रे तपासल्यानंतर आक्षेप काढलेला आहे. लोकवर्गणी जिल्हा परिषदेकडे जमा झाली नव्हती. मग पुरवठा आदेश कसा दिला, लोकवर्गणी शाळेकडे जमा झाली होती कि जिल्हा परिषदेकडे जमा झाली होती, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले की, यामध्ये लोकसहभाग होता. शाळेत पाट्या देण्यात आलेल्या आहेत. ही योजना लोकवर्गणी जमा करुन शालेय पाट्या वाटप करण्याची नव्हती. विद्यार्थ्यांना लोकांनीच शालेय पाट्या दिलेल्या आहेत.

समितीने विचारणा केली की, जेवढी रक्कम आहे त्याच्या आधारे पुरवठा आदेश देता येतो. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पुरवठा आदेश दिलेला आहे. शिक्षणाधिकारी यांनी पुरवठाधारकाला पेमेंट केलेले आहे काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले की, त्यामध्ये लोकवर्गणीची अट नव्हती. यावर अधिकची माहिती शिक्षणाधिकारी प्राथमिक यांनी विदित केले की, आटपाडी येथे लोकसहभागातून शालेय पाट्या दिलेल्या आहेत. तालुका स्तरावर त्याचे रेकॉर्ड उपलब्ध आहे. यु डायस संगणक प्रणालीवरुन विद्यार्थ्यांची आकडेवारी घेतली होती. त्यानुसार मागणी करण्यात आली होती. प्रत्यक्षात ७,४०१ विद्यार्थ्यांनाच गणवेश पुरवठा करण्यात आला होता.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, निधी केव्हा प्राप्त झाले आणि ते केव्हा परत करण्यात आले होते, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की, सन २०११ मध्ये निधी प्राप्त झाला होता. मार्च, २०१३ मध्ये अतिरिक्त गणवेशाचे पैसे परत करण्यात आले होते. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी अधिकची माहिती दिली की, दिनांक २२.०३.२०११ रोजी निधी प्राप्त झाला होता. मार्च, २०१३ मध्ये पैसे परत करण्यात आलेले आहेत. ही योजना वर्षभरात राबविण्यात आली होती. यावर समितीने विचारणा केली की, लोकवर्गणी आपल्याकडे जमा करण्यात आली होती काय, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी समितीला विदित केले की, लोकवर्गणी गोळा केली जात नाही. लोकांकडून विद्यार्थ्यांसाठी पाट्या मागितल्या होत्या. एक पाटी २२ ते २३ रुपयांना मिळते. त्यासाठी पैसे जमा करण्यात आले नव्हते. लोकवर्गणीतून ६६७८ पाट्या घेतल्या होत्या. समितीने विचारणा केली की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पुरवठा आदेश दिलेला आहे. मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी पेमेंट दिलेले आहे. आक्षेपामध्ये नमूद केलेले आहे की, " गणवेश खरेदीसाठी १२,४०७ एवढे विद्यार्थी जादा नमूद झालेले आहेत. त्यापैकी जादा मुले ६,११७ दर रुपये ५७.२१ प्रमाणे रक्कम रुपये ३,४९,९५३.५७ व मुली ६,२९० दर रुपये ६९.७५ प्रमाणे रक्कम रुपये ४,३८,७२७.५० असे एकूण रक्कम रुपये ७,८८,६८१.७० एवढी रक्कम विद्यार्थी नसताना जादा खर्च केला आहे. हे पेमेंट लोकवर्गणीतून झालेले नाही. हे पेमेंट जिल्हा परिषदेकडून झालेले आहे.

याबाबत संचालक स्थानिक निधी यांनीही विचारणा केली की, पाट्यांचे पेमेंट असे म्हटलेले नाही. गणवेशाची संख्या आणि शालेय पाट्यांची संख्या घेतलेली आहे. पाट्यांची संख्या ५५,७९५ आहे. लोकवर्गणीतून पाट्या दिलेल्या आहेत. त्यामुळे गणवेशाची संख्या बरोबर आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, ५५,७९५ शालेय पाट्यांचा आदेश दिला गेला, तो बरोबर होता. ६८,२०२ गणवेश खरेदीचा आदेश दिला होता. त्यामध्ये ५७२९ गणवेश जास्त होते. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शालेय पाट्यांचा आदेश दिला आहे काय ? असे समितीने विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, लोकांनी शालेय पाट्या खरेदी करुन दिलेल्या आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून ६ हजार पाट्यांचा पुरवठा आदेश दिला गेलेला नाही.

समितीने अशी विचारणा केली की, लोकवर्गणीतून ६ हजार शालेय पाट्या दिल्या गेल्या. मग ते रेकॉर्डवर कसे आले, आजही लोकवर्गणी गोळा केली जाते. पूर्वीसुद्धा लोकवर्गणी गोळा केली जात होती. लोकवर्गणी पैशांच्या स्वरुपात गोळा केली जाते, वस्तूंच्या स्वरुपात नाही. शिक्षणाधिकारी यांनी जे उत्तर दिलेले आहे ते चुकीचे आहे. पालक शालेय पाट्या आणून देत नाहीत. शाळेसाठी पैसे पाहिजे असतील तर कोणी १० रुपये तर कोणी २० रुपये आणून देतात आणि ते पैसे एकत्र करुन साहित्य खरेदी केले जाते. यामध्ये १२,४०७ विद्यार्थी संख्येचा फरक आहे. या संदर्भात समितीला उत्तर देण्यात यावे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, ५,७२९ अतिरिक्त गणवेशाची मागणी होती. त्यासाठी पैसे समर्पित करावे लागले. यासाठी जास्त पेमेंट केलेले नाही. ते पैसे शासन खाती जमा केलेले आहेत. समितीने विचारणा केली की, याबाबत पटसंख्येत फरक कसा काय पडला, तत्कालीन शिक्षणाधिकारी प्राथमिक यांनी विदित केले की, लोकसहभागातून पाट्या घेतलेल्या आहेत. गट शिक्षणाधिकारी

यांच्याकडून जी मागणी आली होती त्यानुसार पुरवठा आदेश दिलेला आहे. यावर समितीने विचारणा केली की, १२ हजाराचा फरक कसा काय पडला, आपण काही तरी माहिती लपविण्याचा प्रयत्न करीत आहात. यु डायस संगणक प्रणालीमध्ये बरोबर माहिती असते. यामध्ये १२ हजाराची तफावत कशी काय आहे, आज जिल्ह्यातील पटसंख्या किती आहे, शिक्षणाधिकारी प्राथमिक यांनी स्पष्ट केले की, जिल्हा परिषदेच्या शाळेतील पटसंख्या १,२७,४७४ आहे. इयत्ता १ ली ते ४ थी मधील पटसंख्या ९६,६९३ आहे.

समितीने निदेश दिले की, हा विषय अनुसूचित जाती, जमाती, विमुक्त व भटक्या जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या संदर्भातील आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पुरवठा आदेश दिलेला आहे. मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी पेमेंट केलेले आहे. गणवेश आणि शालेय पाट्यांच्या संदर्भात तफावत आहे. परंतु, या संदर्भातील माहिती लपविण्यात येत असल्याचे दिसते. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करावी. समिती या संदर्भात शिक्षण विभागाच्या सचिवांची साक्ष घेईल. साक्षीच्या वेळी काही निष्पन्न झाले तर संबंधितांवर तत्काळ कारवाई होणार आहे. या प्रकरणी सखोल चौकशी करुन जे दोषी आढळून येतील त्यांच्यावर तत्काळ कारवाई करुन समितीला १५ दिवसात अहवाल सादर करावा.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

गणवेश खरेदीसाठी जादा विद्यार्थी नमूद केल्याने ज्यादा खर्च झाल्याबाबत शिक्षण विभागाने इयत्ता १ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांसाठी १०३ विकास गटातील सर्व विद्यार्थी व इतर सर्व अनुसूचित जमाती व विमुक्त व भटक्या जमातीतील विद्यार्थ्यांसाठी पाट्या व गणवेश खरेदी प्रकरणी सखोल चौकशी करून संबंधितांविरुद्ध जबाबदारी निश्चित करुन कोणती कारवाई करण्यात आली आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत.

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :–**

१) सदर प्रकरणी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) आणि दोन गट शिक्षणाधिकारी अशा त्रिसदस्यीय समिती मार्फत चौकशी करणेत आलेली आहे.

२) १०३ विकास गट व नियमित तसेच सर्वसाधारण योजनेच्या निकषानुसार इयत्ता १ ली ते ४ थी तील अनुसूचित जाती / जमातीचे विद्यार्थ्यांना शालेय गणवेश व पाट्या वाटप करणेकरिता यु-डायस नुसार ६८२०२ इतके लाभार्थी होते.

३) सदर ६८२०२ लाभार्थी विद्यार्थ्यांना गणवेशाचा लाभ देणेत आला आहे. मात्र पाट्या वाटपचा लाभ ६८२०२ विद्यार्थ्यांना देणे आवश्यक असताना जिल्हा वार्षिक योजनेतून ५५७९५ इतक्याच विद्यार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे.

४) त्यामुळे लाभार्थी विद्यार्थी संख्येमध्ये तफावत आढळत आहे.

३) जिल्हा वार्षिक योजनेतून १०३ विकास गटातील इयत्ता १ ली ते ४ थी विद्यार्थ्यांसाठी मोफत गणवेश व लेखन साहित्य या योजनेसाठी रु. २८,१२,००० रक्कम प्राप्त होती. पैकी ५५७९५ पाट्यासाठी १२,६०,९६७ इतकी रक्कम खर्च झाली असून उर्वरित र.रु. १५,५१,०३३ इतकी रक्कम शासन सदरी भरणा केली आहे.

४) सदर प्रकरणी अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या तत्कालीन शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचेविरुद्ध प्रशासकीय कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली असुन संबधित कर्मचाऱ्याची एक वेतनवाढ रोखुन ठेवणेत आलेली आहे. तसेच त्याबाबत त्यांच्या सेवापुस्तकात नोद घेणेत आलेली आहे.

**मंत्रालय विभागाचा अभिप्राय**

**शालेय शिक्षण विभागाचे अभिप्रायः-** जिल्हा परिषद, सांगली यांनी दिलेल्या अभिप्रायाशी सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने सांगली जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या महितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १६ ऑक्टोबर, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, गणवेश खरेदीसाठी जादा विद्यार्थी नमूद केल्याने जादा खर्च झाल्याबाबत शिक्षण विभागाने इयत्ता १ ली ते ४ थीच्या विद्यार्थ्यांसाठी १०३ विकास गटातील सर्व विद्यार्थी व इतर सर्व अनुसूचित जमाती विमुक्त व भटक्या जमातीतील विद्यार्थ्यांसाठी पाट्या व गणवेश खरेदी प्रकरणी सखोल चौकशी करुन संबंधितांविरुद्ध जबाबदारी निश्चित करुन कोणती कारवाई करण्यात आली.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, चौकशी झाली आहे गणवेश अतिरिक्त नाही तर पाट्या कमी दिल्याचे आढळून आले. गणवेशधारक जेवढे विद्यार्थी होते तेवढ्यांना देण्यात आले. पाट्यांची कमतरता भासल्यामुळे शिक्षणाधिकारी यांच्या विरुद्ध कारवाई प्रस्तावित केली आहे. त्यांची वेतनवाढ रोखलेली आहे.

यावर समितीने विचारणा केली की, पुरवठा कमी झाला असला तरी देयके अदा केली आहेत, त्यांची वसूली कोण करणार आहे, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले की, जेवढा पुरवठा झाला तेवढीच देयके अदा करण्यात आली आहेत. यावर समितीने मत व्यक्त केले की, त्यांनी अतिरिक्त पैसे दिलेले नाहीत.

**अभिप्राय व शिफारशी**

शिक्षण विभागाने इयत्ता १ ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यासाठी १०३ विकास गटातील सर्व विद्यार्थी व इतर सर्व अनुसुचीत जाती जमाती/विमुक्त व भटक्या जमातीतील विद्यार्थ्यांसाठी खरेदी केलेल्या शालेय पाट्या व गणवेशामध्ये १२४०७ जादा लाभार्थी गणवेशासाठी नमुद करण्यात आले आहे. सदर विषय अनुसूचित जाती, जमाती, विमुक्त व भटक्या जमाती प्रवर्गातील असून गणवेश आणि शालेय पाट्यांच्या लाभार्थी विद्यार्थांमध्ये तफावत असल्याने या प्रकरणाची चौकशी करून दोषी संबंधीतांवर कारवाई करण्याचे निदेश समितीने दिले.

त्यानुसार या प्रकरणी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) आणि दोन गट शिक्षणाधिकारी अशा त्रिसदस्यीय समितीने केलेल्या चौकशीत निदर्शनास आले की, एकूण ६८२०२ इतके लाभार्थी होते. या सर्व विद्यार्थांना गणवेशाचा लाभ देण्यात आला परंतु ५५७९५ इतक्याच विद्यार्थांना शालेय पाट्यांचा लाभ देण्यात आला. जेवढा पुरवठा झाला तेवढीच देयके अदा करण्यात आली आहेत. **या प्रकरणी अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या तत्कालीन शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची एक वेतनवाढ रोखुन ठेवण्यात आली असून त्यांच्याविरूद्ध प्रशासकीय कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली आहे. त्यानुषंगाने शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्यावरील प्रशासकीय कार्यवाही तातडीने पूर्ण करुन केलेल्या कारवाईची माहिती दोन महिन्याच्या आत समितीस पाठविण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

प्रकरण चार

## जिल्हा परिषद, सांगली

## प्रमाणकांच्या झेरॉक्स प्रतीवर देयक पारीत केलेबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.१०५/८३ (सन २०११-२०१२)**

शिक्षण विभाग (प्राथमिक) यांनी प्रमाणक क्रमांक १०१४ दिनांक ३१/०३/२०१२ रक्कम रुपये ३,४९,३४७/- चे कार्यालयीन खर्च स्टेशनरीचे देयक अदा केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत :—

१) प्रमाणकाच्या झेरॉक्स प्रतिवर देयक लेखा विभागाकडून पारीत केले असल्याने सदरची रक्कम दुबार आदा झाली नसल्याची खात्री करता आली नाही.

२) झेरॉक्स प्रतिवर खरेदी केलेल्या स्टेशनरी व इतर साहित्याची नोंद महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहिता १९६८ चे नियम ९१ अन्वये नमुना नं.३३ मध्ये घेणे आवश्यक आहे. व प्राप्त स्टेशनरी / साहित्याचा विनियोग काय केला याबाबत संबंधिताच्या स्वाक्षरीसह विनियोग दाखविणे आवश्यक आहे. परंतू शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परिषदेने खरेदी केलेल्या साहित्याच्या नोंदी व विनियोग केलेला नाही. सन २००३-२००४ पासूनच्या साठा नोंदवह्या मागुनही उपलब्ध केलेल्या नाहीत. त्यामुळे विना नोंद व विना विनियोग केलेला खर्च रक्कम रुपये ३,४९,३४७/- लेखा परिक्षणास मान्य करता येत नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सांगली यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) सन २०११-२०१२ मध्ये जिल्हा परिषद, सांगली कडील वित्त विभाकडील भांडार विभागाची स्टेशनरी साहित्याचे अनुदान अभावी सन २००३-०४ पासूनची प्रलंबित देयके अदा केलेली आहेत. सादील अनुदान ३१/०३/२०१२ रोजी प्राप्त झाले परंतू सदरची देयके संबधित मेजच्या कर्मचाऱ्याकडून मूळ प्रती गहाळ झालेले होते. वित्त विभागाकडून स्टेशनरी देयके अदा करणेबाबत वारंवार सुचित केलेमुळे अनुदान प्राप्त होताच दिनांक ३१/०३/२०१२ रोजी वित्त विभागाकडील स्थळ प्रतिवरून प्रलंबित बिलाची छायांकित प्रतिनुसार वित्त विभागास रक्कम अदा केलेली आहे. याबाबत सदर देयके दुबार अदा झाली नसलेची खात्री केली आहे.

२) सादील नोंदवही नमुना नं.३३ विहीत नमुन्यात ठेवणेत आलेली असून झेरॉक्स प्रतिवर खरेदी केलेल्या स्टेशनरी व इतर साहित्याचा विनियोग कार्यालयीन कामकाजासाठी करणेत आलेला आहे. सदर साहित्याचे संबंधिताना वाटप करणेत आलेले आहे. परंतू संबंधिताची साहित्य वाटपावर स्वाक्षरी घेणेत आलेली नाही. या कामकाजामध्ये निष्काळजीपणा केलेले श्री. व्हरकल लिपिक यांना मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांचेकडील आदेश क्र. पत्र जा.क्र.साप्रवि/आस्था-५/वशी/२८३/२०१० दिनांक १५/०३/२०१० अन्वये श्री. एस. जे. व्हरकल, कनिष्ठ सहाय्यक यांचेवर जोडपत्र क्र. २ अन्वये आरोप पत्र क्र. ३ (बाब क्र. १) नुसार कार्यविवरण नोंदवही, सादील नोंदवही, नमुना नं. ३०, जडसंग्रह नमुना नं. ३२, साठा नोंदवही नमुना नं. ३३ व प्रमाणकाच्या स्थळप्रती इत्यादी विविध बाबीच्या खरेदी नस्त्या कागदपत्रे अद्यावत नोंदीसह परिपूर्ण ठेवलेली नाहीत या कारणास्तव श्री.व्हरकल यांना दिनांक १५/०३/२०१० पासून निलंबित करणेत आलेले आहे. कारवाईची कागदपत्रे दप्तरी उपलब्ध आहेत.

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

सांगली जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २२ नोव्हेंबर, २०१७ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, या प्रकरणाबाबत अधिकाऱ्यांचे काय म्हणणे आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, सदरची खरेदी ही वित्त विभागाच्या भांडारातून झाली होती. त्याची (कन्फर्मेशन) मान्यता घेतलेली आहे. रक्कम बरोबर दिलेली आहे. कोणत्याही प्रकारे दुबार (पेमेंट) देयक अदा झालेले नाही. यामध्ये कर्मचाऱ्याने मूळ नस्ती हरवली होती. श्री.व्हरकल यांना सन २०१३-२०१४ मध्ये निलंबित केलेले आहे व त्यांच्यावर पुढील कारवाई सुरु आहे. ही खरेदी वित्त विभागाकडून झाली होती. समितीने अशी विचारणा केली की, झेरॉक्स प्रत जोडली म्हणून कनिष्ठ लिपिकावर कारवाई केली. हे देयक कोणी मंजूर केले, झेरॉक्स प्रतवर देयक मंजूर केले की, कन्फर्मेशन घेऊन नंतर देयक दिले, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे समितीस विदित केले की, कन्फर्मेशन घेऊन देयक दिले. यावरील अधिक माहिती देताना मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी समितीस विदित केले की, हे इतर विभागाचे ट्रान्झॅक्शन होते. वित्त विभागाने शिक्षण विभागाला देयक दिले होते. कारण वित्त विभागाकडे सर्व स्टोअर असते आणि ही ॲडजेस्टमेंट होती. शिक्षण विभागाने वित्त विभागाला पैसे दिले. यामध्ये प्रायव्हेट पार्टी इन्व्हॉल्व्ह नाही. मूळ देयकाची प्रत हरवली होती. वित्त विभागाकडून त्यांनी झेरॉक्स प्राप्त करुन घेतली आणि त्या आधारावर देयक मंजूर झाले.

यावर समितीने अशी विचारणा केली की, शिक्षण विभागाने वित्त विभागाकडून देयकाची झेरॉक्स प्रत उपलब्ध करुन घेतली आणि ते देयक शिक्षणाधिकारी यांनी मंजूर केले. यामध्ये कनिष्ठ लिपिकावर कारवाई का केली यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की,

सदर कर्मचाऱ्यांनी मूळ नस्ती हरवली हा मुख्य आक्षेप होता. यावर समितीने विचारणा केली की, मूळ नस्ती हरवली तर आपण देयक मंजूर कसे केले, आपण त्याच वेळी कारवाई करावयास पाहिजे होती. घोटाळा दडपण्यासाठी नस्ती हरवली आणि नस्ती हरवली म्हणून लिपिकाला निलंबित केले. देयक काढणारा मुख्य आरोपी आहे आणि तो शिक्षणाधिकारी आहे. यामध्ये कार्यालय प्रमुख जबाबदार आहेत. सन २०११-२०१२ चे लेखा परिक्षण (ऑडीट) आहे. त्या लिपिकाने नस्ती हरवली म्हणून त्या वर्षाच्या गोपनीय अहवालामध्ये तशी नोंद केली काय ? मला वाटते त्या वर्षाच्या गोपनीय अहवालामध्ये चांगला शेरा दिलेला असणार. आता (ऑडीट) लेखा आक्षेप आल्यानंतर त्याला निलंबित करण्यात आलेले आहे. तसेच दिनांक ९.११.२०१७ रोजी कारणे दाखवा नोटीस कोणाला दिलेली आहे, यावर शिक्षणाधिकारी (प्रा) यांनी समितीला असे विदित केले की, संबंधित लिपिकाने नस्ती हरवली म्हणून त्याला कारणे दाखवा नोटीस दिलेली आहे. यावर समितीने असे निदर्शनास आणले की, नस्ती हरवल्याबद्दल आक्षेप आलेला नाही. आपणास तीन वेळा संधी दिली त्यावेळी नस्ती हरवली असे सांगितलेले नाही. आक्षेप असा आहे की, देयकाची झेरॉक्स प्रत कशी जोडण्यात आली, त्यावेळच्या शिक्षणाधिकारी यांनी झेरॉक्स प्रतवर देयक मंजूर कसे केले, झेरॉक्स प्रतवर देयक मंजूर करताना कनिष्ठ लिपिकावर काही चार्जेस लावले होते काय, मूळ नस्ती हरवली म्हणून झेरॉक्स प्रत देयक मंजूर करण्यात येत आहे आणि ज्यांनी मूळ नस्ती हरवली त्यांच्यावर कारवाई प्रस्तावित करून देयक मंजूर करण्यात येत आहे असे नमूद केले होते काय, यावर तत्कालीन अधिकारी शिक्षणाधिकारी (प्रा.) यांनी समितीस अशी माहिती दिली की, संबंधित लिपिक अफरातफरीमध्ये निलंबित झाले होते आणि हे देयक देणे आवश्यक होते. समितीने अशी विचारणा केली की, ज्यावेळी कर्मचाऱ्याने हे देयक हरविले त्यावेळी कारवाईस सुरुवात केली काय, आपणास देयकाची झेरॉक्स प्रत कशी उपलब्ध झाली, यावर तत्कालीन अधिकारी शिक्षणाधिकारी (प्रा.) यांनी समितीस असे विदित केले की, जिल्हापरिषदेच्या मुद्रणालयामध्ये मिळाली. यायवर समितीने असा प्रश्न विचारला की, जेव्हा हे देयक मंजूर केले त्यावेळी कनिष्ठ लिपिकावर कोणती कारवाई केली, यावर तत्कालीन अधिकारी शिक्षणाधिकारी (प्रा.) यांनी समितीस असे उत्तर दिले की ते अगोदरच एका प्रकरणात निलंबित झाले होते. यावर समितीने अशी विचारणा केली की, एका प्रकरणात निलंबित झाले आहेत म्हणून दुसऱ्या प्रकरणात निलंबित करता येत नाही काय, जर ते पहिल्या प्रकरणात निलंबित झाले होते तर ते आपल्या आस्थापनेवर राहिले कसे, त्यांना निलंबित केल्यामुळे त्यांचे मुख्यालय बदलले असेल.

यावर तत्कालीन अधिकारी शिक्षणाधिकारी (प्रा.) यांनी समितीस असे उत्तर दिले की, मुद्रणालयाचे देयक देणे आवश्यक होते. ३ लाख ४९ हजार रुपयांचे देयक होते. यावर समितीने अशी विचारणा केली की, सन २०११-२०१२ मध्ये त्या कर्मचाऱ्याचे गोपनीय अहवाल कोणी लिहिले , त्या वर्षी संबंधित लिपिकाचे शिक्षणाधिकारी यांनी काय मूल्यमापन केले ते समितीला सादर करावेत. तसेच शिक्षणाधिकारी यांनी झेरॉक्स प्रतीवर देयक मंजूर करणे ही गंभीर बाब आहे. खरे म्हणजे शिक्षणाधिकारी यांचेवर जबाबदारी निश्चित केली पाहिजे. खालचा कर्मचारी अगोदरच निलंबित झालेला होता आणि त्याच्यावर हे आणखी प्रकरण जोडून दिले खरे म्हणजे झेरॉक्स प्रतवर देयक मंजूर करता येत नाही. बनावट देयक करुन अफरातफर केलेली आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, लेखा परिक्षणा(ऑडीट)मध्ये हे निदर्शनास आले. परंतु निलंबित होण्यापूर्वी त्या कर्मचाऱ्याने हे केले होते.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, विभाग प्रमुख कोणतीही गोष्ट न पाहता देयक मंजूर करतात काय, जर त्यांनी हे देयक मंजूर केले त्याचवेळी संबंधितांवर कारवाई प्रस्तावित केली काय , मूळ नस्ती सापडत नाही म्हणून झेरॉक्स प्रतीवर देयक मंजूर करण्यात येत आहे आणि ज्या कनिष्ठ लिपिकाने ही चूक केली त्याच्यावर कारवाई करून देयक मंजूर करण्यात येत आहे असे नोटींग करण्यात आले काय , सदर कर्मचारी अद्याप सेवेत आहे काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, होय. कवठेमहाकाळ पंचायत समितीमध्ये कार्यरत आहे.

यावर समितीने असे मत मांडले की, या प्रकरणाची वेगळ्या पद्धतीने चौकशी करणे गरजेचे आहे. यावर स्थानिक निधी लेखा संचालक यांनी समितीस अशी माहिती दिली की, जिल्हापरिषदेच्या मुद्रणालयाकडून जिल्हापरिषदेला पुरवठा केला जातो. हे सन २००३-२००४ मधील देयक आहे. लिपिक बिनकामाचा दिसत आहे. देयक न दिल्यामुळे मुद्रणालयाची थकबाकी दिसते. आम्ही मुद्रणालयामध्ये आक्षेप घेतला. मूळ देयक हरविलेले आहे. तेव्हा मुद्रणालयाकडून डुप्लीकेट (दुसरी प्रत) देयक घ्यावे लागेल. यापूर्वी त्याचे देयक अदा करण्यात आले किंवा कसे हे पाहतो. दोन्ही संस्था जिल्हापरिषदेच्या आहेत. यावर समितीने अशी विचारणा केली की, सन २००३-२००४ मधील देयक आहे. सदर देयक झेरॉक्स प्रतवर मंजूर करण्यात आले आणि ते देयक सन २०११-२०१२ मध्ये आले. ९ वर्षे देयक प्रलंबित राहण्याचे कारण काय ? ९ वर्षानंतर देयक अदा करतो तेव्हा शंका येते. यामध्ये खातेप्रमुखाचा दोष आहे. विलंबाने अदायगी करायची असेल तर पुन्हा नव्याने मंजुरी घ्यावी लागते. तशी मंजुरी घेण्यात आली काय, हे देयक कोणाकोणाच्या सह्यांनी मंजूर झालेले आहे, हा गंभीर विषय आहे. सदर कर्मचारी दोन प्रकरणात निलंबित आहे. एका कर्मचाऱ्याला दोन वेगवेगळ्या प्रकरणात दोनवेळा निलंबित करता येते काय, सदर कर्मचारी निलंबित झाल्यानंतर त्याच्यावर १ ते ४ जोडपत्रासह आरोपपत्र बजावले होते काय, असल्यास केव्हा आणि त्यानंतर त्याला कोणती शिक्षा करण्यात आली, सध्या तो सेवेत असेल तर तो कोणत्या आधारावर सेवेत आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, सदर कर्मचाऱ्याच्या वर आरोपपत्र बजावण्यात आले असून त्याची विभागीय चौकशी सुरु आहे. तसेच उपायुक्त (प्रभारी) यांनी पुढीलप्रमाणे खुलासा केला की, त्यांच्याकडे वर्ग-३ आणि वर्ग- ४ ची प्रकरणे येतात. हे प्रकरण त्यांच्याकडे आलेले नाही. संयुक्त चौकशी असेल म्हणजे वर्ग- १ ते वर्ग-४ या संवर्गातील सर्वजण असतील. जर प्रकरण संयुक्त असेल तर ते त्यांच्याकडे येणार नाही. यावर समितीने अशी विचारणा केली की, दोन्ही अधिकाऱ्यांच्या उत्तरामध्ये विसंगती आहे. आपण सांगता की मला असे असे वाटते. आपण समितीसमोर जबाबदारीने उत्तर देणे अपेक्षित आहे. एकमेकांना पाठिशी घालण्याचा हा प्रकार आहे. समितीने अशी नाराजी

व्यक्त केली. उपायुक्त (प्रभारी) यांनी समितीस असे विदित केले की, प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी - १ हे आयुक्त कार्यालयात बसतात. मी सहाय्यक आयुक्त (चौकशी) आहे. माझ्याकडे पुणे विभागातील पाच जिल्हापरिषदेतील वर्ग-३ आणि वर्ग-४ च्या चौकशीची प्रकरणे येतात. माझे पद वर्ग-१ चे आहे. त्यामुळे मी समकक्ष पदाची चौकशी करु शकत नाही. यावर समितीने अशी विचारणा केली की, आताच मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी उत्तर दिले की, कनिष्ठ लिपिकाला निलंबित करण्यात आले असून त्यांच्यावर १ ते ४ जोडपत्रासह आरोपपत्र बजावण्यात आले आहे. यामध्ये वर्ग-१ चा प्रश्न येत नाही. आपल्याकडे हे प्रकरण आले आहे काय, यावर उपायुक्त (प्रभारी) यांनी नाही असे उत्तर दिले यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अशीही माहिती दिली की, हे प्रकरण सन २०१४ मध्ये विभागीय आयुक्त यांच्याकडे पाठविले आहे. यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी समितीस विदित केले की, श्री. व्हरकल, कनिष्ठ सहायक हे सन २०१० मध्ये निलंबित झाले होते. त्यावेळी वर्ग-३ व वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांची विभागीय चौकशी सुरू होती. तत्कालीन गट शिक्षण अधिकारी यांची (फाईल) नस्ती विभागीय चौकशीसठी शासनस्तरावर गेली. सदर चौकशी ही संयुक्त चौकशी होती. ती सन २०१४ पासून सुरू आहे. या प्रकरणाची संयुक्त चौकशी सध्या विभागीय आयुक्त कार्यालयातील श्री. गोसावी यांच्याकडे सुरू आहे. श्री. गोसावी हे प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी आहेत. यावरील अधिक माहिती उपायुक्त (प्रभारी) यांनी समितीला दिली की, सहायक प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी यांच्याकडे वर्ग-१ व वर्ग-२ यांची विभागीय चौकशी असते. यावर समितीने अशी विचारणा केली की, वर्ग-१ व वर्ग-२ तसेच संयुक्त विभागीय चौकशी श्री. गोसावी यांच्याकडे आहे. वर्ग-३ व वर्ग-४ ची विभागीय चौकशी आपल्याकडे आहे. आपण विभागीय आयुक्तांच्या प्रतिनिधी म्हणून आलेल्या आहात. आपण समजेल असे उत्तर द्यावे. आपण येथे आयुक्तांच्यावतीने आलेल्या आहात. त्यामुळे आपण आपली जबाबदारी ढकलू शकत नाही. आपण येथे येण्यापूर्वी आयुक्त कार्यालयात विभागीय चौकशीची किती प्रकरणे प्रलंबित आहे आहेत याची चर्चा करून येणे अपेक्षित होते. माझ्याकडे ही विभागीय चौकशी नाही असे उत्तर समितीला अपेक्षित नाही. आपण आयुक्त कार्यालयाशी समन्वय साधणे आवश्यक होते. आपण योग्य तो आढावा घेऊन आला असता तर समितीचा वेळ वाया गेला नसता. विनाकारण समितीचा वेळ जात असल्यामुळे विभागीय आयुक्तांना समितीपुढे बोलवावे. व तसेच विभागीय आयुक्त यांच्याकडे प्रलंबित चौकशा आहेत. त्यासंबंधातील माहिती समितीला द्यावी. असे समितीने निदेश दिले.

समितीने असे मत व्यक्त केले की, सन २००३-२००४ मधील प्रकरण ८-९ वर्षानंतर पुढे येत आहे. विभागीय आयुक्तांपासून ते अगदी खालच्या स्तरापर्यंतच्या माणसापर्यंत इन्स्पेक्शन होत असते. त्यामुळे संबंधितांनी ९ वर्षे डोळे झाकून ठेवले होते काय, याप्रकरणी एक लिपिक निलंबित आहे. अधिकाऱ्यांनी स्वतःची बाजू वाचविण्यासाठी त्याला निलंबित केले असावे असे दिसते. याप्रकरणी विभागीय आयुक्त स्तरापर्यंत जे कोणी अधिकारी जबाबदार असतील त्यांच्यावर कारवाई करावी. शेवटी दरवर्षी ऑडिट, इन्स्पेक्शन होत असते. संबंधितांना साहित्याचे वाटप करण्यात आले, परंतु, त्यांची स्वाक्षरी घेण्यात आली नाही. त्यामुळे यातील सर्वजण हे संशयाच्या फेऱ्यामध्ये येतात. आपण स्वाक्षरी का घेतली नाही याचे कारण सांगावे.

तसेच सन २००३-२००४ पासूनच्या साठा नोंदवह्या मागणी करूनदेखील उपलब्ध करून देण्यात आलेल्या नाहीत. विना विनियोग केलेला खर्च रक्कम रुपये ३,४९,३४७/- इतका आहे. हा खर्च आपण कोणाकडून वसुलपात्र ठरविला आहे काय, येथे आपण फक्त जुजबी उत्तर दिलेले आहे. सन २००३-२००४ पासून आपण पुन्हा साठा नोंदवही तयार केली आहे काय ? मागणी करूनदेखील आपण लेखा परिक्षणाच्या वेळी साठा नोंदवही उपलब्ध करून दिलेली नाही. ही फार गंभीर बाब आहे. हे प्रकरण गंभीर आहे. यात अनियमितता मोठ्याप्रमाणावर दिसते आहे. विभागीय आयुक्तांकडे प्रकरण गेल्यानंतर देखील सोक्षमोक्ष लागलेला नाही. झेरॉक्स प्रतिवर देयक मंजूर करण्याचे काम ९ वर्षापूर्वी झालेले आहे. विभागीय आयुक्तांकडे अशा प्रकारची किती तरी प्रकरणे प्रलंबित असतील. तेव्हा विभागीय आयुक्तांनी या जिल्हा परिषदेची चौकशीची किती प्रकरणे प्रलंबित आहेत व किती प्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली आहे यासंबंधातील माहिती समितीपुढे सादर करावी. येथे लिपिकाला निलंबित करण्यात आले आहे. ९ वर्षापासून या प्रकरणी कोणत्याही प्रकारची कार्यवाही विभागीयस्तरावरून करण्यात आलेली नाही. त्यामुळे विभागीय कार्यालयावरदेखील आपण कारवाई केली पाहिजे. असे एक प्रकरण आता उघडकीस आलेले आहे. अशी किती तरी प्रकरणे विभागीय आयुक्तांकडे प्रलंबित असतील. अशा प्रकरणांमध्ये विभागीय आयुक्त १०-१० वर्षे काहीच कारवाई करीत नसतील तर संबंधितांवर कारवाई ही केलीच पाहिजे. समितीने विभागीय आयुक्तांच्या प्रतिनिधींना विचारणा केली की, त्रुटी पूर्ततेसाठी अहवाल आपण संबंधितांकडे पाठवून देतात.तयासाठी आपल्याकडे काही प्रारूप आहे काय ? एका एका कागदासाठी प्रकरण १५-१५ दिवस या खात्यातून त्या खात्यात फिरत असते. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे या या कागदपत्रांची पूर्तता झाली नाही असे कधी आपण त्यांना लिहिले आहे काय ? वरिष्ठ कार्यालय कनिष्ठ कार्यालयावर दोषारोपपत्र बजावत असते. तेव्हा आपणदेखील वेळेवर पाठपुरावा करणे आवश्यक आहे यावर उपायुक्त (प्रभारी) यांनी समितीस माहिती दिली की, जोडपत्र १०४ शिवाय विभागीय चौकशी सुरू होत नाही. उपायुक्त (प्रभारी) रूजू होण्याच्या आधी सुरूवातीला अशी पद्धत होती की, त्रुटी असेल तर सरसकट आरोपपत्र हे मागे पाठविले जात होते. उपायुक्त (प्रभारी) आल्यानंतर अशी पद्धत सुरू केली आहे की, अशी प्रकरणे परत न पाठविता त्याच्या कागदपत्रांची पूर्तता उपायुक्त (प्रभारी) करून घेते. विभागीय चौकशीची काय कार्यपद्धती असते ती शासकीय कर्मचाऱ्यांना माहीत नसते. त्यामुळे उपायुक्त (प्रभारी) स्तरावर स्वतः कर्मचाऱ्यांचे कॅम्प घेतलेले आहेत. हे कॅम्प मी कोल्हापूर, पुणे, सांगली येथे घेतलेले आहेत. अशा प्रकरणांचा निपटारा व्हावा म्हणून दर १५ दिवसांनी पुणे येथून सांगली, कोल्हापूर, सोलापूर येथे येते. तेथे आल्यानंतर विभागीय चौकशीची सुनावणी ठेवते.

यावर समितीने विचारणा केले की, आपण एखादी त्रुटी काढल्यानंतर त्या त्रुटीची पूर्तता वर्ष-दोन वर्ष होत नाही. त्रुटी पूर्तता जिल्हा परिषद करीत नाही. ती करण्यासाठी काय करता येईल हा मुख्य विषय आहे. संबंधित कर्मचाऱ्याला वाचविण्यासाठी जाणीवपूर्वक २-२, ३-३ वर्ष त्रुटी पूर्तता केली जात नाही.

त्रुटी पूर्ततेसंबंधात आता उपायुक्त (प्रभारी) यांनी खुलासा केलेला आहे. महाराष्ट्र नागरी सेवा नियम आहेत. त्यानुसार आपण सर्व कारवाई करीत असतो. असे असताना आपण संबंधित कर्मचाऱ्यांना पाठीशी का घालता, येथे जोडपत्र १०४ चा उल्लेख करण्यात आला आहे. जोडपत्र १०४ हे मुख्य कार्यकारी अधिकारी देतात. त्यानंतर त्याची प्रत चौकशी अधिकाऱ्याकडे पाठविली जाते. त्यामुळे वर्ग-३ व वर्ग-४ च्या प्रकरणात त्रुटी असण्याचे काहीच कारण असू शकत नाही. त्रुटी पूर्तता करूनच मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तो प्रस्ताव आपल्याकडे द्यावयाचा आहे. वर्ग-१ व वर्ग-२ च्या अधिकाऱ्यांची चौकशी करण्याचे अधिकार उप आयुक्त यांना आहेत हे मान्य आहे.

समितीने असे मत व्यक्त केले की, या प्रकरणी समितीने जे प्रश्न उपस्थित केलेले आहेत ते गंभीर आहेत. प्रमाणकांच्या झेरॉक्स प्रतीवर देयक पारीत करणे या प्रकरणामध्ये मोठ्याप्रमाणावर अनियमितता असल्याचे चर्चेच्या माध्यमातून निदर्शनास आलेले आहे. संबंधित कर्मचाऱ्यांविरुद्धचे प्रकरण महाराष्ट्र नागरी सेवा नियमाप्रमाणे सादर करावयास पाहिजे. परंतु, त्या प्रमाणे प्रकरण सादर केले जात नाही. नंतर त्रुटींची पुर्तता करून संबंधितांना बरी करण्याचे काम होते. इन्क्वॉयरी मॅन्युअल प्रमाणे प्रकरण पाठविले जात नसल्यामुळे संबंधितांना पाठीशी घालण्याचा प्रकार निदर्शनास येतो, हे बरोबर नाही. विभागीय आयुक्तस्तरावर बरीच प्रकरणे प्रलंबित आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या संदर्भात तत्काळ चौकशी करावी. या प्रकरणामध्ये कोण दोषी आहेत ? मागील ८-९ वर्षांपासून प्रकरण का प्रलंबित राहिले ? अशी बरीच प्रकरणे आहेत. आपण या प्रकरणी तत्काळ चौकशी करून संबंधितांवर जबाबदारी निश्चित करावी आणि वेळ प्रसंगी संबंधितांवर फौजदारी गुन्हा दाखल करून समितीला अहवाल सादर करावा.

मी आपल्याला सांगू इच्छितो की, आपण २४ तारखेला आयुक्तांना बोलावून या प्रकरणी व इतर प्रलंबित प्रकरणांच्या संदर्भात त्यांच्याकडून सविस्तर माहिती घेऊ. सहायक आयुक्तांनी विभागीय आयुक्तांना प्रलंबित प्रकरणांची इत्थंभूत माहिती घेऊन येण्याबाबत सूचना द्याव्यात. तसेच, समितीने सांगितल्याप्रमाणे या प्रकरणी तत्काळ चौकशी करून संबंधितांवर फौजदारी गुन्हा दाखल करून समितीला एका महिन्यात माहिती सादर करावी.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

**प्रमाणकाच्या झेरॉक्स प्रतीवर देयक पारीत केल्याबाबत:-** शिक्षण विभाग (प्राथमिक ) यांनी प्रमाणक १०१४ दि.३१/०३/२०१२ रक्कम रुपये ३,४९,३४७/- चे कार्यालयीन खर्च स्टेशनरीचे देयक प्रकरणी सखोल चौकशी करून गत वर्षापासून प्रकरण प्रलंबित राहिल्यामुळे संबंधिताविरुद्ध जबाबदारी निश्चित करुन कोणती कारवाई करण्यात आली आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत,

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

१) प्रस्तुत प्रकरणी चौकशी करणेत आलेली आहे.

२) कार्यालयाच्या कार्यालयीन वापरासाठी जिल्हा परिषदेच्या भांडार विभागाकडून खरेदी केलेल्या स्टेशनरी साहित्याची देयके सन २००३-०४ पासून सन २०११-१२ पर्यंत अनुदान अभावी प्रलंबित होती. मार्च, २०१२ मध्ये अनुदान प्राप्त झालेवर प्रलंबित देयके अदा करणे क्रमप्राप्त होते. परंतु त्या वेळी देयकाच्या मूळ प्रती उपलब्ध नसल्याने यापूर्वी सदरची रक्कम अदा केली नसलेची खात्री करून देयकाच्या छायांकित प्रती जिल्हा परिषदेच्या भांडार विभागाकडून उपलब्ध करून घेऊन भांडार विभागाची थकीत रक्कम अदा केलेली आहे. यामध्ये कुठलीही आर्थिक अनियमितता झालेली नाही.

देयकांच्या मूळ प्रती सांभाळून न ठेवल्याबद्दल संबंधित कर्मचारी श्री.एस.जे.व्हरकल कनिष्ठ सहायक यांचेविरुद्ध अन्य प्रकरणामध्ये सुरु असलेल्या विभागीय चौकशीमध्ये सदरचा दोषारोप अंतर्भूत आहे. प्रस्तुत प्रकरणी विभागीय चौकशीचा निकाल अंतिम झालेनंतर संबंधिताविरुद्ध अंतिम शास्ती निश्चित करणेत येत आहे.

**मंत्रालय विभागाचा अभिप्राय**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :–** (उ.स. जि.प. आस्थापना) सदर प्रकरणी जिल्हा परिषदेने कार्यवाही केलेली आहे.

**शालेय शिक्षण विभागाचे अभिप्राय :–** सदर मुद्दा ग्रामविकास विभागाशी संबंधित आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने सांगली जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या महितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १६ ऑक्टोबर, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, प्रमाणकाच्या झेरॉक्स प्रतीवर देयक पारित केल्याबाबत, जिल्हा परिषदेने या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीमध्ये असे नमूद केले आहे की, प्रस्तुत प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे. तसेच, भांडार विभागाची थकित रक्कम अदा केलेली आहे. त्यांनी मान्य केलेले आहे. तसेच, शास्ती निश्चित करण्यात येत आहे असे म्हटले आहे. परंतु, चौकशी अहवाल अद्याप आलेला नाही व चौकशी पूर्ण झालेली नाही, याबाबत खुलासा करावा. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, ज्या व्यक्तीच्या चुकीमुळे हे झाले त्या व्यक्तीची सद्य:स्थितीमध्ये विभागीय चौकशी सुरु आहे. त्यातच हे अतिरिक्त दोषारोप पत्र दिले आहे. जेणेकरून त्याला मोठी शास्ती करता येईल. यावर समितीने अशी विचारणा केली की, तुम्ही कनिष्ठ सहाय्यकांवर कारवाई केली आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, ही पूर्ण कनिष्ठ सहाय्यकाची जबाबदारी आहे. प्रत्येक देयक सांभाळून ठेवणे हे त्या त्या टेबलच्या कनिष्ठ सहाय्यकाच्या जॉब चार्टमध्ये आहे. दिलेल्या उत्तरावर समितीने असे विचारले की, असे असले तरी देयक खाते प्रमुखाने संमत केले. त्यावेळेस केवळ देयक जोडले होते की, इतर सर्व (डॉक्युमेंट्स) कागदपत्रे जोडली होती, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी उत्तर दिले की ते अंतर्गत देयक जिल्हा परिषदेच्या भांडार विभागाचे देयक होते. यावर समितीने अशी विचारणा केली की, देयक कुठलेही असेल. परंतु, कनिष्ठ लिपिकावर कारवाई करीत आहात. ती खाते प्रमुखाची जबाबदारी आहे. हा विषय समिती पुढे येण्यापूर्वी त्यावर कारवाई केली पाहिजे होती. आम्ही सचिवांची साक्ष करिता घेतो ती जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यावर कारवाई करण्याकरिता घेतो काय, तुम्ही त्याच्यावर चार्ज कसा ठेवला, तो प्रुव्ह झाला काय, तो चार्ज प्रुव्ह होत असेल किंवा नसेल तर कनिष्ठ अधिकाऱ्यांवर चार्ज कसा काय ठेवला आहे. तुमच्या साप्ताहिक चुका होतात. त्यांचा आढावा तुमचे खाते प्रमुख घेतात. ते सर्व नस्तींचा आढावा घेतात. मग त्यांनी जेव्हा बिल पास केले तेव्हा अनियमितता का दिसली नाही ? मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी (कॅफो) ने (बिल) देयक मंजूर केले त्याला का दिसली नाही ? आता हे प्रकरण पंचायती राज समिती समोर आल्यावर तुम्ही कनिष्ठ लिपिकावर कारवाई करीत आहात. तुम्ही लेखा परिक्षणाच्या अगोदर कारवाई केली पाहिजे होती. लेखा परिक्षण झाल्यानंतर उत्तर देण्यास तुम्ही जबाबदार आहात. आपण कनिष्ठ लिपिकावर कारवाई केली. हे आपले कर्मचारी आहेत. जिल्हा परिषदेच्या पद भरतीमध्ये हे कनिष्ठ सहाय्यक येतात. ते वर्ग-३ चे कर्मचारी आहेत. पंचायती राज समितीच्या समोरचा आपला अहवाल खाते प्रमुख मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे सादर करतात.

समितीने असा निर्णय दिला की, या प्रकरणामध्ये व अशा इतर प्रकरणामध्ये आपण कनिष्ठ अधिकाऱ्यांवर कारवाई केली असेल व इतर अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित केली नसेल तर ते प्रकरण पुन्हा सादर करून, सर्व जबाबदाऱ्या निश्चित करून तत्काळ कारवाईसह समितीकडे अहवाल पाठवावा. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, प्रकरण पुन्हा सादर करून सर्व जबाबदाऱ्या निश्चित करून तत्काळ कारवाईसह समितीकडे अहवाल पाठविण्यात येईल.

## अभिप्राय व शिफारशी

सांगली जिल्हा परिषदेतील शिक्षण (प्राथमिक) विभागाने प्रमाणकाच्या झेरॉक्स प्रतीवर देयक लेखा विभागाकडून पारित केलेबाबत व खरेदी केलेल्या साहित्याच्या नोंदी व विनियोग केलेला नाही. सन २००३-२००४ पासूनच्या साठा नोंदवह्या लेखा परिक्षणास उपलब्ध केलेल्या नाहीत त्यामुळे विना नोंद व विना विनियोग केलेला खर्च रक्कम रुपये ३,४९,३४७/- लेखा परिक्षणास मान्य करता येत नाही असा आक्षेप प्रस्तुत प्रकरणात घेण्यात आला आहे.

उपरोक्त लेखा आक्षेपाच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने साक्ष घेतली असता समितीच्या असे निदर्शनास आले की, या प्रकरणातील मूळ नस्ती श्री. व्हरकल या कनिष्ठ लिपिकाने गहाळ केल्यामुळे शिक्षण विभागाने वित्त विभागाकडून देयकाची झेरॉक्स प्रत उपलब्ध करून घेतली व भांडार विभागाची थकीत रक्कम अदा केल्याचे जिल्हा परिषदेने पाठविलेल्या चौकशी अहवालात नमूद केले असून शासनाने या मतास दुजोरा दिला आहे.

प्रमाणकांच्या झेरॉक्स प्रतीवर देयक पारीत करणे या प्रकरणामध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता झालेली असून असे देयके पारित करणे योग्य नाही असे समितीचे मत आहे. संबंधित कर्मचाऱ्यांविरुद्धचे प्रकरण महाराष्ट्र नागरी सेवा नियमाप्रमाणे सादर करणे आवश्यक असतानाही जिल्हा परिषद प्रशासनाने चौकशीची कार्यवाही नियमाच्या तरतूदी प्रमाणे केली नाही याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.

**याबाबत कनिष्ठ लिपिकावर जबाबदारी निश्चित केली असतांना व इतरही अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे. तथापि, या प्रकरणी तसे होताना दिसत नाही. त्यामुळे सध्या सुरु असलेल्या चौकशी प्रकरणात उक्त मुद्याचा देखील समावेश करून त्याची चौकशी करावी व संबंधितांवर जबाबदाऱ्या निश्चित करून त्याबाबतचा चौकशी अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावा अशी, समिती शिफारस करीत आहे.**

प्रकरण पाच

## जिल्हा परिषद, सांगली

## नाविन्यपूर्ण योजनेंतर्गत लाकडी बाक खरेदीत झालेली अनियमितता

**परिच्छेद क्रमांक ३.१०६ (परिच्छेद क्र.४४) (सन २०११-२०१२)**

नाविन्यपूर्ण योजनेंतर्गत शिक्षण विभागाने लाकडी बाक खरेदीसाठी रक्कम रुपये ४८,००,०००/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत :—

१) दरपत्रक व पुरवठा आदेशातील बाक यांच्या साईजमध्ये तफावत आहे. कमी साईजचा पुरवठा आदेश दिला आहे.

२) ॲम्बीशन ब्लाईड इंडस्ट्रियल को.ऑपरेटीव्ह प्रोड्युसर्स लि.मुंबई यांचे डिलीव्हरी चलन व जिल्हा परिषद कडील खर्च देयक नमुना नंबर २९ यामध्ये तालुका शिराळातील औढी, बिऊश्न, भटवाडी व पाडवी या चार शाळांमध्ये तफावत आढळून येते.

३) डिलीव्हरी चलनावर वाहन नंबर तसेच जकात माफीसाठी आवश्यक असलेली कागदपत्रे दिसून येत नाहीत.

४) उद्योग संचालनालय मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना यांचे परिपत्रक क्र.तुस/भांखस/लाकडी फर्निचर/दरनिश्चिती/०१/११-१२/बी १६८३२ दिनांक ३०/०८/२०११ नविन लाकडी फर्निचर दर निश्चितीबाबत नमूद केल्याप्रमाणे संस्थानी उत्पादीत झालेले आहेत. असे प्रमाणित करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही नाही.

५) उपलब्ध लाकडी बाक व मागणी यांचा ताळमेळ घेतलेला नाही. शाळांच्या मागणीपेक्षा १४२ जादा लाकडी बाक खरेदी केले आहेत.

६) खरेदी केलेल्या बाकाची नोंद शाळेच्या जडसंग्रह नोंदवहीत घेण्यात येऊन त्याचा अहवाल नोंदवहीचा उतारा / सांक्षाकित झेरॉक्स प्रत सादर करणे आवश्यक असताना तसेच दरवर्षी खरेदी केलेले बाक सुस्थितीत व वापरात असलेचे व साहित्याची गणना दरवर्षी करून संख्या बरोबर असल्याचे प्रमाणपत्र आवश्यक असताना त्याचप्रमाणे खरेदी केलेल्या बाकांच्या बाबतीत अहवाल सादर केलेला नाही.

७) महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.भांखस १०८८/(२५१२)/ उद्योग-६, दिनांक ०२/०१/१९९२ प्रमाणे गुणवत्ता चाचणी अहवाल घेतलेला नाही.

८) भारतीय आयकर अधिनियम, १९६१ मधील १९४ प्रमाणे रक्कम रुपये ३,१६८/- आयकर कपात करून भरणा केलेली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सांगली यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) उद्योग संचालनालय, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना यांचे परिपत्रक क्र. उसं/भांखस/लाकडी फर्निचर/दरनिश्चिती/०१/११-१२/बी १६८३२, दिनांक ३०-०८- २०११ अन्वये नवीन लाकडी फर्निचरच्या दरनिश्चिती पत्रकासोबतचे परिशिष्ट अ मधील अ.क्र. ६८ मध्ये (अ), (ब), (क) मध्ये वेगवेगळे साईज नमूद केलेले आहे (पान क्र. १९ व २० ची प्रत सोबत उपलब्ध आहे) अ.क्र. ६८ (क) मध्ये डेस्क साईज ३६ इंच उंची असा लाकडी बेंचचा आकार नमूद केलेला असून परंतू बेंच पुरवठा आदेश संगणिकृत करतेवेळी बेंचचा आकार ३५ इंच लांब, १२ इंच रुंद, २५ इंच उंची संगणिकृत करण्यात आलेला होता. तथापि ही बाब करारनामा सादरीकरणाचे वेळी, लक्षात आल्यामुळे डयुएल डेस्क साईज ३६ इंच लांब, १२ इंच रुंद, २९ इंच उंची असा उल्लेख करणेत आलेला आहे. तसेच पुरवठादाराने प्रपत्रातील अ.क्र. ६८ मधील (क) डेस्क साईज ३६ इंच लांब, १२ इंच रुंद, २९ इंच उंची या आकाराचेच बेंचचा पुरवठा केलेला असलेबाबत सुपरिन्टेडन्स कंपनी ऑफ इंडिया प्रा. लि. मुंबई यांचेकडील PC/TEST/B-८५०/२०११-१२, दिनांक ३१/०१/२०१२ अन्वये प्राप्त झालेल्या चाचणी / तपासणी अहवालावरून खात्री करणेत आलेली आहे. तपासणी अहवालाची प्रत दप्तरी उपलब्ध आहे.

२) ॲम्बीशी अस ब्लाईड इंडस्ट्रियल को-ऑप प्रोड्युसर्स सोसायटी लि. मुंबई यांची डिलीव्हरी चलने व नमुना नंबर २९ (आकस्मिक खर्च) देयक प्रत दप्तरी उपलब्ध आहे. दिनांक ३०/१२/२०११ च्या पुरवठा आदेशात नमूद केलेनुसार पाडवी १२, बिऊर १०, औढी १० व भटवाडी १० असा पुरवठा आदेश दिला असून त्यानुसारच या शाळांना पुरवठा प्राप्त झाला आहे. नमूना नंबर २९ मध्ये गोषवाऱ्यामध्ये नजरचुकीने विसंगती असलेले बेंच नग नमूद झाले आहे. पुरवठा आदेश व डिलीव्हरी चलने दप्तरी उपलब्ध आहेत.

३) शासनाचे दर कराराच्या अटी व शर्तीमध्ये जकात माफी व वाहतूक हे पुरवठाधारकांने करणेचे असलेने जकात माफी बद्दल तसेच डिलीव्हरी चलनावर वाहन नंबर नमूद करणेबाबत या कार्यालयाने स्वतंत्र आदेश दिलेले नाहीत.

४) महाराष्ट्र शासन उद्योग संचालनालय मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना मुंबई यांचेकडील नवीन लाकडी फर्निचरच्या दरनिश्चितीबाबत शासनाने ॲम्बीशीअस ब्लाईंड इंडिस्ट्रियल को-ऑप प्रोड्युसर्स सोसायटी लि.मुंबई या संस्थेकडून लाकडी फर्निचरची खरेदी करणेत आलेली आहे. फर्निचर संस्थेमध्ये उत्पादित झाले आहे याबाबत प्रमाणपत्र देणेविषयी या कार्यालयाकडून पत्र देणेत आलेले आहे.

५) जिल्ह्यातील प्राथमिक शाळेसाठी १२९५२ लाकडी बाकांची मागणी होती. परंतू प्राप्त अनुदान रक्कम रुपये ४८,००,०००/- विचारात घेऊन अनुदान मर्यादेत १७२६ + २७८१ रुपये प्रति बाक याप्रमाणे ४८०००० ६ रुपये १७२६ नग लाकडी बाक खरेदी केलेले आहेत. शाळेच्या एकूण मागणी संख्येपेक्षा कमी लाकडी बाक खरेदी केलेले आहेत. मागणी पत्रक दप्तरी उपलब्ध आहे.

६) खरेदी केलेल्या बाकाची नोंद शाळेच्या जडसंग्रह नोंदवहीत घेण्यात आलेले आहे. नोंदवहीचा उतारा सांक्षाकित झेरॉक्स प्रत सोबत उपलब्ध आहे. तसेच दरवर्षी खरेदी केलेले बाक सुस्थितीत असलेबाबत सक्षम अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र दप्तरी उपलब्ध आहे.

७) महाराष्ट्र शासन उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.भांखस १०८८/(२५१२)/ उद्योग-६, दिनांक ०२/०१/१९९२ प्रमाणे सुपरिन्टेडन्स कंपनी ऑफ इंडिया प्रा. लि. मुंबई यांचेकडून गुणवत्ता चाचणी अहवाल प्रत दप्तरी उपलब्ध आहे.

८) भारतीय आयकर अधिनियम १९६१ मधील १९४ प्रमाणे रक्कमेच्या २ टक्के प्रमाणे रुपये ९६,०००/- इतकी आयकर कपात करणेत आलेली आहे. आयकर भरलेबाबत दिनांक २०/०४/२०१२ चलन दप्तरी उपलब्ध आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

सांगली जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २२ नोव्हेंबर, २०१७ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, लेखापरीक्षणाच्या वेळी तपासणी अहवाल निदर्शनास का आणून देण्यात आला नाही, त्रयस्त यंत्रणेकडून/शासकीय यंत्रणेकडून तपासणी अहवाल उपलब्ध करुन घेण्यात आला आहे काय, सदर योजनेंतर्गत किती डेस्कसाठी पुरवठा आदेश देण्यात आला होता, त्यानुसार डेस्कचा पुरवठा झाला आहे काय व त्यावर किती खर्च झाला, लेखापरीक्षणाच्या वेळी गुणवत्ता चाचणी अहवाल का उपलब्ध करुन देण्यात आला नाही, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस पुढीलप्रमाणे खुलासा केला की, डेस्कचा पुरवठा आदेश देताना चूक झाली होती. दर पत्रकाप्रमाणे ३६ x १२ x २९ आकाराच्या डेस्कचा पुरवठा झालेला आहे. वॉलचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, सांगली या संस्थेने इन्स्पेक्शन (पाहणी) देखील केलेले आहे.

यावर कार्यालयीन यंत्रणा कोणती होती असा प्रश्न समितीने विचारला असता शिक्षण विभाग ही कार्यालयीन यंत्रणा होती असे उत्तर मुख्य कार्यकारी अधिकारी समितीला दिले. यावर समितीने विचारणा केली की, स्थायी समितीची मंजुरी घेण्यात आली होती काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला विदित केले की, ५० लाखापेक्षा कमी रक्कम असेल तर स्थायी समितीची मंजुरी घ्यावी लागते. स्थायी समितीची मंजुरी घेण्यात आलेली आहे. यावर समितीने विचारणा केले की, खरेदी प्रक्रियेबाबत जे आक्षेप उपस्थित होतात त्या संदर्भात स्थानिक निधी लेखा संचालनालयाने जिल्हा परिषदांना सूचना दिल्या पाहिजेत की, खर्चाला मंजुरी देताना केवळ खर्च मंजुरीचा ठराव न घेता विषय समितीच्या ठरावामध्ये स्पेसिफिकेशन सुद्धा नमूद केले पाहिजेत. यावर संचालक, स्थानिक निधी लेखा अधिकारी यांनी समितीला विदित केले की, आपण ग्रामविकास विभागाला शिफारस करु शकतो. यावर आपल्याला या संदर्भात शुद्धीपत्रक काढावे लागेल. विषय समितीच्या ठरावामध्ये स्पेसिफिकेशन नमूद केले पाहिजेत. असे मत व्यक्त करुन विचारणा केली की, लेखापरीक्षणाच्या वेळी गुणवत्ता चाचणी अहवाल उपलब्ध करुन देण्यात आलेला नाही, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला विदित केले की, वॉलचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरींग या संस्थेकडून अहवाल घेण्यात आलेला आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, लेखापरीक्षणाच्या वेळी अहवाल का दाखविण्यात आला नाही, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला विदित केले की, आपण त्रयस्थ यंत्रणेकडून दिनांक ६ मार्च २०१२ रोजी अहवाल घेतला होता. पेमेंट अगोदरच झालेले आहे. समितीने अशी विचारणा केली की, समितीला संबंधित अधिकाऱ्यांकडून समाधानकारक उत्तरे मिळाली नाहीत. समितीने उपस्थित केलेल्या प्रश्नांना संबंधित अधिकाऱ्यांनी समाधानकारक उत्तरे दिली पाहिजेत. गुणवत्ता चाचणी अहवाल घेतलेला नाही आणि ४८ लाख रुपयांचे देयक मंजूर केलेले आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला महिती दिली की, गुणवत्ता चाचणी अहवाल घेतलेला आहे. परंतु, तो लेखापरीक्षणाच्या वेळी दाखविण्यात आला नाही, ही चूक झालेली आहे.

यावर समितीने अशी विचारणा केली की, आपण समिती दौऱ्यावर आली म्हणून दंडाची रक्कम भरुन घेणार आहात काय, दंडाची रक्कम अगोदरच का भरुन घेण्यात आली नाही, ही कोणाची जबाबदारी होती, या प्रकरणी आता पर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी सुद्धा कारवाईस पात्र आहात. ज्यांच्याकडे कार्यवाही करण्याची जबाबदारी होती त्यांनी कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे समितीचा वेळ वाया गेलेला आहे. समितीची दिशाभूल झालेली आहे. म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी हेच कारवाईस पात्र आहेत. या संदर्भात शासनाचे काय म्हणणे आहे. मग ज्यांनी कार्यवाही केली नाही ते कारवाईस पात्र आहेत किंवा नाही ? या संदर्भात शासनाचे म्हणणे रेकॉर्डवर आले पाहिजे.यावर ग्रामविकास विभागाचे उप सचिव यांनी अशी माहिती दिली की, लेखापरीक्षण झाल्यानंतर आपण अहवाल टेबल करतो. त्या अहवालाची एक प्रत जिल्हा स्तरावर पाठविण्यात येते. त्यांनी त्यानुसार कार्यवाही केली पाहिजे. कार्यवाही वेळेत पूर्ण होणे आवश्यक आहे.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, या प्रकरणी आता पर्यंत कार्यवाही व्हावयास पाहिजे होती. परंतु, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अद्याप या प्रकरणी कार्यवाही केलेली नसल्यामुळे त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे, असे शासनाच्या प्रतिनिधींनी सांगितले आहे. आपण समितीला मोघम उत्तर देऊ नये. आपण चालढकल करु शकत नाही. आपल्याला मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून समितीला जबाबदारीने उत्तर द्यावे लागेल.

तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी कारवाईस पात्र आहेत. आपण या प्रकरणी तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांवर कारवाई प्रस्तावित करु. तसेच अशीही विचारणा करण्यात आली की, शासकीय संस्थेकडून चाचणी अहवाल घेतला जातो. वॉलचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, सांगली या संस्थेकडून अहवाल घेण्यात आलेला आहे, हे योग्य आहे काय, याप्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस असे विदित केले की, या प्रकरणी दिनांक ३१ जानेवारी २०१२ रोजी सुपरीटेंडन्स कंपनी ऑफ इंडिया प्रा. लि. मुंबई या संस्थेकडून अहवाल घेतला होता. खरेदी संदर्भात दिनांक २ जानेवारी १९९२ रोजीचा शासन निर्णय आहे. त्यांच्याकडून तपासणी करुन घेऊ शकतो व वॉलचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, सांगली या संस्थेकडून दुसरा अहवाल घेतलेला आहे. पुढे समितीने अशी विचारणा केली की, आपण पुरवठा आदेशामध्ये स्पेसिफिकेशन्स नमूद केले त्यावेळी आपल्याकडे मालाचे नमूने होते काय, ज्यावेळी अभिलेखे सादर केले त्यावेळी टेस्ट रिपोर्ट उपलब्ध नव्हता. म्हणून लेखापरीक्षकांनी आक्षेप घेतलेला आहे. आपण विना टेस्टींग मालाचा वापर केलेला आहे, हा गंभीर गुन्हा आहे. आपण विना टेस्टींग पेमेंट करावयास नको होते. टेस्टींग न करता पेमेंट कसे काय करण्यात आले, समितीने तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना साक्षीसाठी बोलवावे. तसेच या प्रकरणामध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता झालेली आहे या प्रकरणी तत्काळ चौकशी करावी आणि जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करावी. ज्या अधिकाऱ्यांनी अनियमितता केली असेल, जे अधिकारी दोषी असतील त्यांच्यावर तत्काळ कारवाई करुन एका महिन्याच्या आत समितीला अहवाल सादर करावा. या प्रकरणामध्ये वरिष्ठ अधिकारी दोषी आहेत परंतू केवळ कनिष्ठ अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाते. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आपली जबाबदारी योग्य रितीने पार पाडली पाहिजे. आपण संबंधितांवर कारवाई करुन एका महिन्याच्या आत समितीला अहवाल सादर करावा. आपण हा मुद्दा सचिवांच्या साक्षीसाठी घेत आहोत. असे निदेश देण्यात आले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

**नाविण्यपूर्ण योजनेअंतर्गत लाकडी बाक खरेदीबाबत :–** नाविण्यपूर्ण योजनेअंतर्गत लाकडी बाक खरेदीमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास उक्त चौकशीत काय आढळून आले आहे, त्यानुसार संबंधिताविरुद्ध जबाबदारी निश्चित करून कोणती कारवाई करण्यात आली आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत,

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

१) सदर प्रकरणी चौकशी करणेत आलेली आहे.

२) लाकडी बेंच खरेदी प्रक्रियेमध्ये उद्योग संचालनालय, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना यांचे परिपत्रक-क्र.उसं/भांखस/लाकडीफर्निचर/ दरनिश्चिती/०१/१११२/बी १६८३२ दिनांक ३०/०८/२०११ अन्वये नविन लाकडी फर्निचरच्या दर निश्चिती पत्रकासोबतचे परिशिष्ट अ मधील अ.क्र.६८ मध्ये (अ), (ब), (क) मध्ये वेगवेगळे साईज नमूद केलेले आहे. त्यामधील (क) मध्ये डेस्क साईज ३६ इंच लांब, १२ इंच रुंद, २९ इंच उंची असा लाकडी बेंचचा आकार नमूद केलेला असून बेंच पुरवठा आदेश टंकलिखित करतेवेळी बेंचचा आकार ३५ इंच लांब, १२ इंच रुंद, २५ इंच उंची असा नमूद केलेला आहे. प्रत्यक्षात मात्र दरपत्रकानुसार पुरवठा झालेला आहे. तसेच तपासणी अहवालामध्ये दरपत्रकात नमूद साईज प्रमाणे अहवाल प्राप्त आहे.

३) सदर प्रकरणी टंकलेखनामधील चुकीसंदर्भात तत्कालीन कर्मचारी यांची एक वेतनवाढ रोखून ठेवनेची शास्ती केली आहे. तसेच तत्कालीन शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांचेविरुद्ध प्रशासकीय कारवाईचा प्रस्ताव मा. आयुक्त शिक्षण, पुणे यांचेकडे सादर करणेत आला आहे.

### मंत्रालय विभागाचा अभिप्राय

**शालेय शिक्षण विभागाचे अभिप्राय :-** शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सांगली यांच्या अभिप्रायाशी सहमत आहे.

### विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने सांगली जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या महितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १६ ऑक्टोबर २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, नाविन्यपूर्ण योजनेंतर्गत लाकडी बाक खरेदीबाबत यामध्ये देखील यांनी चौकशी केलेली आहे. तसेच, तत्कालिन शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याविरुद्ध प्रशासकीय कारवाईचा प्रस्ताव आयुक्त शिक्षण, पुणे यांच्याकडे पाठविण्यात आलेला आहे. ही चौकशी कधी पूर्ण होणार आहे व ही चौकशी करुन समितीला अहवाल कधी पाठवणार आहात, यावर विभागीय सचिवांनी समितीस विदित केले की, मागच्या महिन्यामध्ये आयुक्तांकडे प्रस्ताव पाठविला आहे. आता त्याच्यावर कारवाई होईल. कारण ते आयुक्तांना नुकतेच मिळालेले आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, त्याचवेळेस चौकशी करुन कारवाईसह साक्षीकरिता विभागीय सचिवांनी आले पाहिजे. परंतु, तसे झालेले दिसत नाही.

यावर विभागीय सचिवांनी समितीस असे विदित केले की, त्यामध्ये काय अनियमितता झाली याबाबतची चौकशी केलेली आहे. त्यामध्ये असे दिसले की, त्यावेळेस असे काही मिसअॅप्रोप्रिएशन, गैरव्यवहार झालेला नाही, दरामध्ये तफावत असे काही नाही. असे ठरले होते की, २९ इंच

उंचीच्या बाकांची ऑर्डर द्यायची. परंतु, वर्क ऑर्डरमध्ये चुकीने २५ इंच उंचीचे असे लिहिण्यात आले. प्रत्यक्षात जेव्हा ऑर्डरचा पुरवठा झाला तो योग्य होता. २९ इंच उंचीच्या बाकाचा सप्लाय झाला. त्या दोघांचे रेटही सारखेच आहेत. आम्ही आर.सी. सुद्धा चेक केली. त्यामुळे रेटमध्ये काही तफावत आली किंवा पुरवठादाराला जास्त रक्कमेची अदायगी झाली असे काही घडलेले नाही. दिलेल्या उत्तरावर समितीने अशी विचारणा केली की, काहीच चूक झाली नाही मग या कर्मचाऱ्याची वेतनवाढ कशासाठी थांबवली, यावर विभागीय सचिवांनी समितीस विदित केले की, त्यांनी उंची चुकीची लिहिली. त्यांनी २९ इंचांच्या ऐवजी २५ इंच उंची लिहिली. यावर समितीस असे मत व्यक्त केले की, ही त्या टंकलेखकाची जबाबदारी होती काय, त्या टंकलेखकाची चूक त्यावेळेस खाते प्रमुखाच्या लक्षात का आली नाही, कनिष्ठ कर्मचाऱ्यांवर कारवाई केली जात आहे. हे पंचायती राज समितीला बिलकुल अपेक्षित नाही. टंकलेखकाची वेतनवाढ थांबवली व प्राथमिक शिक्षण अधिकाऱ्यांचा प्रस्ताव पाठवून दिला. त्याची किरकोळ चूक झाली आहे. परंतू आक्षेप असा होता की, विनिर्देशाप्रमाणे मालाचा पुरवठा करण्यात आला नाही.

यावर विभागीय सचिवांनी समितीला असे विशद करण्यात आले की, किरकोळ चूक आहे. कारण त्यांनी उंची २९ इंच लिहिली पाहिजे होती. त्यांनी त्याऐवजी ती २५ इंच लिहिली. त्याबाबत खात्री केली. तसेच, यांनी स्वतंत्र त्रयस्थ संस्थेमार्फत खात्री केली की, बाकांचा प्रत्यक्ष पुरवठा हा २९ इंच उंचीप्रमाणेच झालेला आहे. विभागीय सचिवांनी त्याची तपासणी केलेली आहे. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, टंकलेखनात चूक झालेली आहे, असे आपण नमूद करायला पाहिजे होते. समितीचा असा आक्षेप होता की, स्पेसिफिकेशनप्रमाणे मालाचा पुरवठा करण्यात आलेला नाही. पुरवठा आदेशात स्पेसिफिकेशन कोणी नमूद केले, त्यावर सही कोणाची होती. विभाग फक्त टंकलेखकावर कारवाई करीत आहे. यामध्ये टंकलेखक दोषी नसताना त्याला दोषी का धरण्यात आले. त्या कर्मचाऱ्याची वेतनवाढ सुरु करण्याचा आदेश देण्यात यावा टंकलेखकाने जी चूक केली ती वरिष्ठ अधिकाऱ्यांनी बघायला पाहिजे होती. नाविण्यपूर्ण योजनेमध्ये लाकडी बाक खरेदीत झालेली अनियमितता हा मूळ प्रश्न खरेदी संदर्भातील आहे. यावर विभागीय सचिवांनी समितीस असे विदित केले की, या विषयाची सविस्तर तपासणी केली आहे. यामध्ये अनियमितता घडलेली नाही. बाकाची उंची चुकीची लिहिली ही किरकोळ चूक आहे. ती माफ करण्यात यावी.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, आपण तपासणी केल्यामुळे सांगितले की, खरेदीमध्ये कोणतीही चूक आढळून आलेली नाही. टंकलेखनाची चूक माफ करण्याची विनंती केली असून चूक माफ करण्यात येत आहे. टंकलेखकावर जी कारवाई करण्यात आली ती मागे घेण्यात यावी. त्यांची वेतनवाढ सुरु करण्यात यावी. ही बाब खाते प्रमुखांच्या लक्षात आली असती की, टंकलेखकाने चूक केली तर त्यांनीच कारवाईची शिफारस करायला पाहिजे होती. तांत्रिक मंजूरी खाते प्रमुख देतो व कारवाई टंकलेखकावर करण्यात येत आहे ही बाब बरोबर नाही अशी नाराजी समितीने व्यक्त केली व त्या टंकलेखकाची वेतनवाढ सुरु करण्यात यावी. असा निर्णय समितीने दिला.

## अभिप्राय व शिफारशी

नाविन्यपूर्ण योजनेंतर्गत शिक्षण विभागाने लाकडी बाक खरेदीसाठी रुपये ४८,००,०००/- खर्च केले आहेत. परंतु दरपत्रक व पुरवठा आदेशातील लाकडी बाक यांच्या साईज मध्ये तफावत असून कमी साईजच्या लाकडी बाकांचा पुरवठा आदेश दिला आहे. या प्रकरणामध्ये अनियमितता झालेली असल्याने याची चौकशी करावी व संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन कारवाई करावी असे निदेश समितीने दिले.

**विभागीय सचिवांच्या घेण्यात आलेल्या साक्षीत विभागाकडून नमूद करण्यात आले की, २९ इंच उंचीच्या लाकडी बाकांची ऑर्डर द्यायची होती परंतु वर्क ऑर्डरमध्ये चुकीने २५ इंच उंच असे टंकलिखीत करण्यात आले, प्रत्यक्षात २९ इंच उंचीच्या बाकांचा पुरवठा झालेला आहे. दरामध्ये कोणतीही तफावत नसून पुरवठादाराला अधिक रक्कम अदा करण्यात आलेली नाही. याप्रकरणाची चौकशी करण्यात आलेली असून टंकलेखनामधील चुकी संदर्भात तत्कालीन कर्मचारी यांची एक वेतनवाढ रोखून ठेवण्यात आली असून तत्कालिन शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याविरुद्ध प्रशासकीय कारवाईचा प्रस्ताव आयुक्त शिक्षण, पुणे यांच्याकडे पाठविण्यात आला आहे.**

**सदर प्रकरणी टंकलेखनातील चुकीमुळे संबंधित कर्मचारी यांची एक तात्पुरती वेतनवाढ रोखून ठेवण्याची कारवाई केली असून या कार्यवाहीस विभागीय सचिवांनी देखील सहमती दिली आहे. तसेच शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचेविरुद्ध प्रशासकीय कारवाई करण्याबाबतचा प्रस्ताव पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठविला असून आयुक्त शिक्षण, पुणे यांनी याबाबत तातडीने कार्यवाही पूर्ण करावी व उक्त प्रस्तावावर केलेल्या कार्यवाहीची माहिती दोन महिन्याच्या आत समितीस सादर करावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

प्रकरण सहा

## जिल्हा परिषद, सांगली

## राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत मिनी हँचर मशीन खरेदी, जिल्हा वार्षिक योजनेतून वैरण व पशुखाद्य विकास कार्यक्रम अंतर्गत झालेली अनियमितता.

**परिच्छेद क्र. ३.५४३, ३.५४४ व ३.५४५ (सन २०११-२०१२)**

पशुसंवर्धन विभागाचे राष्ट्रीय कृषि विकास योजनेतून प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेच्या अधीन राहून दर करारावर पुरवठा आदेशाने तिरूपती ट्रेड लिंक हैद्राबाद यांचेकडून रक्कम रुपये २७,७२,०००/-इतक्या रकमेचे एकूण १८ मिनी हँचर मशीन खरेदी केले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत :—

(१) दर कराराची मूळ प्रत लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाही.

(२) कुक्कुट पालन व्यवसाय प्रशिक्षण झालेल्या लाभार्थ्यांची निवड केली नाही.

(३) पुरवठा आदेशातील अटी व शर्तीनुसार प्रत्येक लाभार्थीस पोहोच करण्याचे आदेश असताना एकत्रितपणे भिलवडी कुक्कुट पालन केंद्रावर पोहोच केल्या आहेत.

(अ) तिरूपती ट्रेडलिंक हैद्राबाद यांचेकडून प्राप्त साहित्य रक्कम रुपये २६,१७,२००/- चे असता कंपनीला आयकरासह रक्कम रुपये २७,७२,०००/- प्रदान केले आहे. त्यामुळे जादा अदाई रक्कम रुपये १,५४,८००/- संबंधिताकडून वसूल करणे आवश्यक आहे.

(ब) आयुक्त, पशुसंवर्धन पुणे यांचेकडील मार्गदर्शक सुचनेनुसार मशीनबाबत वर्तमान पेपर मध्ये जाहिरात देऊन लाभार्थ्यांची निवड केलेली नाही.

**जिल्हा वार्षिक योजनेतून वैरण व पशुखाद्य विकास कार्यक्रम अंतर्गत झालेली अनियमितता.**

**जिल्हा परिषद सांगली, सन २०११-२०१२ (परिच्छेद क्र.१०) ३.५४४**

पशुसंवर्धन विभागाचे उपरोक्त योजना अंतर्गत कार्यक्रमासाठी प्रशासकीय तांत्रिक मान्यतेच्या अधीन राहून मका बियाना वाटपासाठी एकूण रक्कम रुपये २९,९९,६८६/- इतका खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहे :—

(१) महाराष्ट्र शासन उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भाखस. १०८८/ (२५१२)/उद्योग -६ दिनांक ०२/०१/१९९२ अन्वये बियाण्यांच्या खरेदीसाठी किती दर पत्रके प्राप्त झाली व किती पुरवठादार निविदा उघडतेवेळी हजर होते याची कागदपत्रे उपलब्ध झाली नाहीत. त्यामुळे स्पर्धात्मक दराचा लाभ झाल्याची पुर्तता दर्शवावी.

(२) एकूण रक्कम रुपये ५,५५,९४६/- इतक्या रकमेचे साहित्य ६९ दिवस उशिराने मिळाल्याबद्दल पुरवठादाराकडून कमी वसूल केलेली दंडाची रक्कम रू. ६८५/- वसूल करणे आवश्यक आहे.

(३) शासकीय प्रयोग शाळेतून बियाणे तपासणी केलेची तपासणी अहवाल नाही. त्यामुळे योग्य दर्जाचा माल प्राप्त झाल्याची पुर्तता दर्शवावी.

(४) पुरवठा आदेशानुसार प्रत्येक तालुक्यास मका बियाणे पोहच केलेची डिलीव्हरी चलने आवश्यकत्या शेऱ्यासह उपलब्ध नाहीत त्यामुळे योग्य दर्जाचा माल प्राप्त झाल्याची खात्री करता आली नाही.

(५) नवलखा सिडस् पुणे व युनायटेड फॉस्परस पुणे यांचेकडून आयकर रक्कम रुपये ४७,४६१/- वसूल करणे आवश्यक आहे.

(६) बियाणे लाभार्थींना वाटप केल्याची पोहच नाहीत. त्यामुळे योग्य विनियोग झाल्याची पुर्तता दर्शवावी.

(७) आयुक्त, पशुसंवर्धन विभाग,पुणे यांचेकडील मार्गदर्शक सूचनेनुसार फलश्रुती अहवाल घेतलेला नाही.

**कामधेनू दत्तक ग्राम योजना**

**जिल्हा परिषद सांगली, सन २०११-२०१२ (परिच्छेद क्र.१३) ३.५४५**

पशुसंवर्धन विभागाचे उपरोक्त योजना अंतर्गत कार्यक्रमासाठी प्रशासकीय तांत्रिक मान्यतेच्या अधीन राहून तालुक्यांना वित्तप्रेशन रक्कम रुपये ३,८०,०००/- व रक्कम रुपये ११,४३,४४४/- कंपनीचे नांवे अशी एकूण रक्कम रुपये १५,२३,४४४/- इतकी रक्कम वाटप केली आहे याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आह :—

(१) पशुपालक मंडळे स्थापन केल्याची कागदपत्रे जोडलेली नाहीत.

(२) आयुक्त यांचे मार्गदर्शक सुचना नुसार एका गावात ३०० पेक्षा जास्त पैदासक्षम जनावरे असल्यास अहवाल नाही.

(३) बिलासोबत डिलीव्हरी चलने नाहीत. त्यामुळे माल प्राप्त झाल्याची खात्री करता आली नाही.

(४) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ मधील नियम २२ नुसार बिलासोबत आगाऊ पोहच पावती नाही.

(अ) महाराष्ट्र शासन , निर्णय दिनांक ०२/०१/१९९२ नुसार शासन मान्य संस्थेकडून चाचणी तपासणी केलेचे तपासणी अहवाल नाही.

(ब) वित्त प्रेषण रक्कम रुपये ३,८०,०००/- तालुक्यांना दिलेल्या खर्चाचे अहवाल जिल्हास्तरावर उपलब्ध नाहीत.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सांगली यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—**

(१) मे. तिरूपती ट्रेडलिंग नागपूर यांचा मा. आयुक्त पशुसंवर्धन यांचेशी दर करार झालेला असून आयुक्त पशुसंवर्धन पुणे यांचे कडून (जा.क्र.कुक्कुट-२/५५६/भाग-६/१००१७४/२०१२/पस १३ दि.६/१/१२) नुसार प्राप्त असून सोबत जोडला आहे.

(२) निवड समिती मध्ये मा. अति. मुख्य कार्यकारी अधिकारी अध्यक्ष असून जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी हे सदस्य सचिव आहेत. जिल्हा पशुसंवर्धन उप आयुक्त, प्रकल्प संचालक ग्रामीण विकास यंत्रणा, पशुसंवर्धन विकास अधिकारी (कुक्कुट) पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांचा समावेश असून १८ लाभार्थीची निवड केली असून सदर लाभार्थींना हॅचर मशीन प्राप्त झालेनंतर प्रशिक्षण दिलेले आहे. १८ लाभार्थी यांची यादी सोबत सादर केली. प्राप्त अर्जामधून निवड समितीने लाभार्थीची निवड केली आहे. तसेच निवडीचे नियमामध्ये लाभार्थीने कुक्कुट पालन प्रशिक्षण पूर्ण केलेले असणे/पूर्ण करणे आवश्यक राहील असे म्हटले आहे. त्यामुळे त्यांना निवडीनंतर आवश्यक ते प्रशिक्षण दिले आहे.

(३) सर्व हॅचर भिलवडी येथील प्रक्षेत्रावर जागा उपलब्ध असलेने व सर्व मशीनची चाचणी एकाच वेळी घेणे शक्य असलेने आवश्यक तपासणी व चाचणी घेऊन हॅचर मशीन सुस्थितीत असलेची खात्री केलेनंतर पुरवठा धारकांने सर्व लाभार्थीना त्याचे पत्यावर मशीन पोहच करून बसवून चालू करून दिलेले आहे. लाभार्थीची पोहच सोबत जोडली आहे.

(अ) मे. तिरूपती ट्रेडलिंग हैद्राबाद यांचे कडून साहित्य खरेदी केलेले रक्कम रु. २७,७२,०००/- असून त्या संपूर्ण रकमेमधून २ टक्के प्रमाणे T. D. S. कपात करून रु. ५५४४०/- घेणेत आला आहे. उर्वरित रक्कम हॅचबेलीटीचा अहवाल प्राप्त झालेनंतर ज्या प्रमाणात प्राप्त झाले नुसार टप्पाटप्याने १) र. रु. १५०९२००/-दिनांक २९-५-२०१२ (२) ६०३६८०/- दिनांक २५-६-२०१२ (३) ६०३६८० दि. २६-७-२०१२ या प्रमाणे एकूण रक्कम २६१६५६०/- रु. अदा केलेले आहेत त्यामुळे नियमानुसार व पुरवठा आदेशा नुसार रक्कम अदा केलेले आहे. त्यामुळे जादा रक्कम अदा केलेले नाही.

(ब) सदर योजनेमध्ये निवड समितीत प्रकल्प संचालक, ग्रामीण विकास यंत्रणा हे सदस्य असून त्याचे महिला बचत गटाशी संपर्क जादा असलेने व पशुधन विकास अधिकारी तालुकास्तर व ग्रामीण स्तरावरील संस्था यांचे मार्फत तालुकास्तरावरील सभा, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा व स्थानिक संस्था मार्फत गावा मध्ये आवश्यक ती प्रसिद्धी देणेत आली आहे. त्यामुळे कोणीही लाभार्थी वंचीत राहीला नाही. संस्थेमार्फत आवश्यक ती प्रसिद्धी देण्यात आली आहे.

(१) तीन दरपत्रके प्राप्त झाली. पुरवठाधारांना उपस्थित राहणेबाबत कळविणेत आले होते. परंतु एकही पुरवठादार हजर नव्हता. स्पर्धात्मक दराचा लाभ झाल्याचा तुलनात्मक दरपत्रक तक्ता दप्तरी उपलब्ध आहे.

(२) उशिरा प्राप्त झालेल्या बियाणांची दंडाची होणारी रक्कम रु. १३७०/- वसूल करणेत आली आहे. सोबत संबधितांना रुपये १३७०/- वजा जाता रक्कम अदा केलेचे बीलाची झेरॉक्स प्रत उपलब्ध आहे.

(३) Seed Testing Board Pune Letter No. ४३४/४५१, दिनांक १६/६/२०११ या शासकीय प्रयोगशाळेचा बियाणे तपासणीचा अहवाल प्राप्त झाला आहे. त्याची प्रत उपलब्ध आहे.

(४) पुरवठा आदेशानुसार पुरवठा करावयाचे मका बियाणे जिल्हा स्तरावर पुरवठा करणेबाबत सुचित केलेनुसार व त्यानुसार पुरवठा झाला आहे त्याच्या पोहोच पावत्या उपलब्ध आहे.

(५) देयकातून नियमानुसार २ टक्के रक्कम रु. ४९,८६३/- आयकर कपात करणेत आली आहे. सोबत T.G.S. FORM No. १६ ची प्रत उपलब्ध आहे.

(६) तालुकास्तरावर व दवाखानास्तरावर बियाणे लाभार्थीना वाटपाचे कार्यक्रम घेण्यात आले असून बियाणे लाभार्थ्यांना वाटप केलेची पोहोच नस्ती दप्तरी उपलब्ध आहे.

(७) आयुक्त पशुसंवर्धन विभाग पुणे यांचेकडील मार्गदर्शक सुचनेनुसार लाभार्थ्यांचा फलश्रृती अहवाल दप्तरी उपलब्ध आहेत.

(१) मा.आयुक्त यांचे मार्गदर्शक सुचनेनुसार निवड झालेल्या प्रत्येक गावांमध्ये पशुपालक मंडळे स्थापन करण्यात आली आहेत त्यांचे अहवाल तालुकास्तरावर संकलित करून त्याच्या झेरॉक्स प्रती उपलब्ध आहे.

(२) मा.आयुक्त यांचे मार्गदर्शक सुचनेनुसार निवडलेल्या प्रत्येक गावात ३०० पेक्षा जास्त पैदासक्षम जनावरे असलेचा पशुगणनेचा अहवाल दप्तरी उपलब्ध आहे.

(३) Delivery challan दप्तरी उपलब्ध आहे.

(४) देयकासोबत आगावू पोहच पावती उपलब्ध आहे.

(अ) Ana Labortories Mumbai या शासन मान्यता असलेल्या प्रयोगशाळेकडून सर्व औषधीचे नमुने तपासणेत आले असून औषधी योग्य दर्जाची असल्याचा अहवाल प्राप्त आहे. औषधीचे नमुने तपासणी अहवाल अवलोकनार्थ उपलब्ध आहे.

(ब) वित्तप्रेषणाद्वारे प्रति पंचायत समिती रक्कम रुपये ३८,०००/- प्रमाणे १० पंचायत समितीना एकूण र.रू. ३,८०,०००/- वितरीत केले आहे. संबधित पंचायत समितीचे खर्चाचे अहवाल, देयकांच्या सत्यप्रती उपलब्ध केले आहेत.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

सांगली जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २२ नोव्हेंबर, २०१७ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, लेखापरीक्षणाच्या वेळी दर कराराची प्रत व लाभार्थी निवडीची यादी उपलब्ध का करुन देण्यात आली नाही, लाभार्थ्यांची निवड विषय समितीमध्ये केली होती काय, शासन दरकरारानुसार मिनी हँचर मशीनचा दर किती होता व पुरवठाधारकास कोणत्या दराने रक्कम अदा करण्यात आली, आयुक्त, पशुसंवर्धन यांचे सुचनेनुसार वृत्तपत्रात जाहीरात देऊन लाभार्थ्यांची निवड करण्यात आलेली आहे काय तसेच लेखी उत्तरातील अ.क्र.१ मध्ये मे. तिरुपती ट्रेड लिंक नागपूर असा उल्लेख आहे आणि अ.क्र.३ (ब) मध्ये मे. तिरुपती ट्रेड लिंक हैद्राबाद असा उल्लेख आहे. यापैकी नेमके कोणते उत्तर बरोबर आहे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी समितीस असे विशद केले की, आर.सी. नागपूर येथील आहे. हैद्राबाद शब्द चुकीने छापला गेलेला आहे. त्यावेळी १८ मिनी हँचर मशीन खरेदी करून त्यांचे वाटप करण्यात आले होते. संबंधित लाभार्थ्यांना शासन निर्णयानुसार एका दिवसाचे प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. भिलवडी येथील शासकीय पोल्ट्री फार्ममध्ये मशीन उतरवून घेतल्या होत्या. तेथून कंपनीच्या खर्चाने लाभार्थ्यांच्या घरापर्यंत मशीन पोहचविण्यात आलेल्या आहेत. नियमानुसार ५५,४४०/- रुपये (टीडीस) आयकर कापून घेण्यात आलेला आहे. एका मशीनची किंमत १ लाख ५४ हजार रुपये होती.

समितीने अशी विचारणा केली की, आपल्याला तीन वेळा संधी देऊन सुद्धा आपण हा आक्षेप निकाली काढलेला नाही. आपण आता समितीला जे उत्तर दिले तेच उत्तर अगोदर का दिले नाही, यावर स्थानिक निधी संचालक यांनी माहिती दिली की, संबंधितांकडून काही वेळा खुलासा सादर केला जातो तर काही वेळा खुलासा सादर केला जात नाही. त्यामुळे हा मुद्दा आलेला आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, लाभार्थ्यांची निवड कशी करण्यात आली , लाभार्थी निवडण्याचे अधिकार कोणाला होते, लाभार्थ्यांची कोणत्या आधारावर निवड करण्यात आलेली आहे. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी समितीस असे विशद केले की, लाभार्थ्यांनी २५ टक्के प्रमाणे ४१ हजार रुपये भरणे आवश्यक होते तसेच संबंधित लाभार्थ्याने कुक्कुट पालनाचे प्रशिक्षण घेतलेले असले पाहिजे. यावर समितीने अशी विचारणा केली की, कुक्कुट पालन व्यवसायाचे प्रशिक्षण घेतलेल्या लाभार्थ्यांची निवड करण्यात आली नाही, असे आक्षेपात नमूद केलेले आहे. मग लाभार्थ्यांची निवड कशाच्या आधारे करण्यात आली, लाभार्थी निवडण्याचे अधिकार कोणाला होते, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी असे समितीस विशद केले की, निवड समिती मार्फत लाभार्थ्यांची निवड केली जाते. निवड समितीमध्ये अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, पशुधन विकास अधिकारी यांचा समावेश आहे. निवड समितीच्या माध्यमातून लाभार्थ्यांची निवड करण्यात आलेली आहे. आयुक्त कार्यालयाकडून लाभार्थी निवडी संदर्भात मार्गदर्शक सूचना प्राप्त झालेल्या आहेत.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की,आपण खाते प्रमुखांना लाभार्थी निवडण्याचे अधिकार देता. मग जिल्हा परिषदेच्या सदस्यांनी कशासाठी निवडून यावयाचे, लाभार्थी निवडीचे अधिकार कोणाला आहेत, आयुक्त कार्यालयाकडून लाभार्थी निवडण्यासंदर्भात कोणत्या मार्गदर्शक सूचना प्राप्त झालेल्या आहेत, मार्गदर्शक सूचनांची प्रत समितीला सादर करावी. तसेच तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार खातेप्रमुखांना आहेत, लाभार्थ्यांची निवड पदाधिकाऱ्यांना करावयास पाहिजे. तसेच राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत निधी खर्च करण्यात आलेला आहे. लाभार्थ्यांची निवड करण्यासाठी जाहिरात द्यावयास पाहिजे होती. परंतु, जाहिरात देण्यात आलेली नाही.

समितीने अशी विचारणा केली की, परि.क्र.३.५४३, परि.क्र.३.५४४ व परि.क्र.३.५४५ या तिन्ही परिच्छेदांना सारखीच लेखी उत्तरे देण्यात आलेली आहेत. पृष्ठ क्र.१६३ वर नमूद केलेले आहे की, याबाबत संबंधित तत्कालीन कर्मचारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात आली असून दंडात्मक आणि शिस्तभंग विषयक कारवाई सुरू करण्यात आली आहे. पृष्ठ क्र.१६१ वर नमूद केलेले आह की, याबाबत तत्कालीन जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे. पृष्ठ क्र. १५९, १६१ व १६३ वरील लेखी उत्तरामध्ये संबंधितावर

दंडात्मक व शिस्तभंग विषयक कारवाई सुरू करण्यात आल्याचे किंवा कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्याचे नमूद केलेले आहे. कारणे दाखवा नोटीत केव्हा बजावण्यात आलेली आहे ? यावर मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी समितीस विशद केले की, माहे नोव्हेंबर २०१७ मध्ये कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे. यावर समितीने असा निर्णय दिला की, परि.क्र. ३.५४३, परि.क्र.३.५४४ व परि.क्र.३.५४५ या तिन्ही प्रकरणांमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता झालेली आहे. लाभार्थ्यांची निवड करण्याचे अधिकार कोणाला होते, शासनाच्या तशा प्रकारच्या (गाईड लाईन्स) मार्गदर्शक सूचना होत्या काय या संदर्भात चौकशी केली पाहिजे. समिती दौऱ्यावर येणार असल्यामुळे संबंधितांवर कारणे दाखवा नोटीस किंवा दंडात्मक आणि शिस्तभंग विषयक कारवाई करण्यात आलेली आहे. लेखापरीक्षणाच्या वेळी अभिलेखे उपलब्ध करून देण्यात आलेली नाहीत. त्यामुळे संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्यावर नियम ७ नुसार प्रत्येकी २५ हजार रुपये दंड प्रस्तावित करुन दंडाची रक्कम वसूल करण्यात यावी. अशा बाबी सातत्याने होत असल्यामुळे समितीच्या शिफारशीनुसार संबंधितांची तात्पुरती एक वेतनवाढ थांबवावी व त्यांच्या सेवा पुस्तकात नोंद घ्यावी. आपण या प्रकरणी सर्वकष चौकशी करून, कार्यवाही करून एका महिन्याच्या आत समितीला अहवाल सादर करावा. समिती या संदर्भात सचिवांची साक्ष घेणार आहे. आयुक्त, पशुसंवर्धन आणि तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.अश्विन मुद्गल यांना सुद्धा साक्षीसाठी बोलाविण्यात यावे. असे निदेश दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली :—**

**राष्ट्रीय कृषि विकास योजना अंतर्गत मिनी हॅचर मशीन खरेदी जिल्हा वार्षिक योजनेतून वैरण व पशुखाद्य विकास कार्यक्रम अंतर्गत झालेली अनियमितता** :- राष्ट्रीय कृषि विकास योजना अंतर्गत मिनी हॅचर मशिन खरेदी, जिल्हा वार्षिक योजनेतून वैरण व पुशखाद्य विकास कार्यक्रम अंतर्गत झालेली अनियमितता तसेच कामधेनू दत्तक ग्राम योजना या तिन्ही प्रकरणांसदर्भात सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुसार संबंधिताविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :—**

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सांगली यांनी त्यांचे कार्यालयीन पत्र दि. ७/३/२०१८ अन्वये जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांना प्रस्तुतच्या तीनही प्रकरणा संदर्भात संखोल चौकशी करण्याचे आदेश दिले होते. त्या अनुषंगाने जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांनी सहाय्यक अधिकारी सहाय्यक लेखाधिकारी जिल्हा परिषद, सांगली, पशुधन विकास अधिकारी, पशुवैद्यकीय दवाखाना समडोळी, पशुधन विकास अधिकारी, पशुवैद्यकीय दवाखाना, ऐतवडे बु. आणि पशुधन विकास अधिकारी, कोतीज यांचे समवेत उपरोक्त तीन्ही प्रकरणांशी संबंधित उपलब्ध अभिलेखे तपासून तीन्ही प्रकरणांचे अनुषंगाने चौकशीचे निष्कर्ष खालीलप्रमाणे सादर केले आहेत **:—**

(अ) मिनी हॅचर मशीन खरेदी.**—**

चौकशीचे निष्कर्ष :- योजनेच्या मार्गदर्शक सूचना, पशुसंवर्धन विभागाने केलेला भावबंद करार व त्यातील अटी व शर्तीनुसारच खर्च केलेला आहे, त्यामध्ये कोणतीही अनियमितता झालेली दिसून येत नाही.

(ब) वैरण बियाणे खरेदी -

चौकशीचे निष्कर्ष:- आयुक्त पशुसंवर्धन यांनी निर्गमित केलेल्या योजनेच्या मार्गदर्शक सूचना, पशुसंवर्धन विभागाने केलेला भावबंद करार व त्यातील अटी व शर्तीनुसार या योजनेंतर्गत खर्च केलेला असून, या मध्ये कोणतीही अनियमितता झालेली दिसून येत नाही.

(क) कामधेनू दत्तक ग्राम योजना राबविणे-

चौकशीचे निष्कर्ष :- आयुक्त पशुसंवर्धन यांनी निर्गमित केलेल्या योजनेच्या मार्गदर्शक सूचना, पशुसंवर्धन विभागाने केलेला भावबंद करार व त्यातील अटी व शर्तीनुसार या योजनेंतर्गत खर्च केलेला आहे. खरेदी केलेल्या १३ पैकी २ औषधांची डिलेवरी चलन न आढळलेल्या त्रुटीबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांनी संबंधितांवर कार्यवाही करणेसाठी आयुक्त पशुसंवर्धन यांना दि. २७/८/२०१८ च्या पत्रान्वये कळविलेले आहे.

सदरचा चौकशी अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांनी स्विकृत करून त्यानुसार पुढील कार्यवाही करण्याबाबत त्यांचे पत्र जा.क्र. जिपसां /पशुसं/आस्था/१८७२/२०१८/ दि. १४/९/२०१८ अन्वये पशुसंवर्धन आयुक्तालयास कळविले आहे. ही बाब विचारात घेता, तसेच, पंचायत राज समितीने सांगली येथे दि. २२, २३, २४ नोव्हेंबर, २०१७ रोजी भेट देऊन संबंधित अधिकाऱ्यांची साक्ष घेऊन केलेल्या तपासणीमध्ये शिफारस केली होती की, परिच्छेद क्र. ३.५४३, ३.५४४ आणि क्र. ३.५४५प्रकरणांमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाली आहे. त्यामुळे संबंधितांची तात्पुरती एक वेतनवाढ थांबवावी व त्यांच्या सेवापुस्तकात नोंद घ्यावी. तसेच संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर नियम ७ नुसार २५ हजार दंड प्रस्तावीत करुन दंडाची रक्कम वसूल करण्यात यावी.

या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांनी त्यांचे पत्र जा. क्र. पशुसं/आस्था/१७००/२०१८/दि.२७/८/२०१८ अन्वये आयुक्त पशुसंवर्धन कार्यालयास डॉ. बनसोडे, तत्कालीन जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांचेकडून रुपये २५,०००/- दंडाची रक्कम वसूल करण्याबाबत कळविले.

### मंत्रालय विभागाचा अभिप्राय

**कृषी, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास विभागाचे अभिप्राय :-** मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सांगली यांनी त्यांचे कार्यालयीन पत्र दि.०७/०३/२०१८ अन्वये प्रस्तुतच्या तीनही प्रकरणासंदर्भात सखोल चौकशी करण्याचे निर्देश जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांना दिले होते. तद्नुषंगाने जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांनी सहाय्यक लेखा अधिकारी जिल्हा परिषद सांगली, पशुधन विकास अधिकारी पशुवैद्यकीय दवाखाना समडोळी, पशुधन विकास अधिकारी पशुवैद्यकीय दवाखाना ऐतवडे बु.आणि पशुधन विकास अधिकारी पशुवैद्यकीय दवाखाना कोतीज यांच्या समवेत तीनही प्रकरणांशी संबंधित उपलब्ध अभिलेखे तपासून चौकशीचे निष्कर्ष सादर केलेले आहेत. सदर प्रकरणी सादर केलेला चौकशी अहवाल मान्य असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सांगली यांनी त्यांच्या दि.१४/९/२०१८ रोजीच्या पत्राव्दारे आयुक्त पशुसंवर्धन यांना कळविले आहे. सदर प्रकरणी करण्यात आलेल्या चौकशीअंती राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत मिनी हॅचर मशीन खरेदी, जिल्हा वार्षिक योजनेंतील वैरण व पशुखाद्य विकास कार्यक्रम या योजनांच्या अंमलबजावणीमध्ये कोणतीही अनियमितता झाली नसल्याचे निष्कर्ष चौकशी समितीने नोंदविलेले आहेत. तथापि, कामधेनू दत्तक ग्राम योजनेंतर्गत खरेदी केलेल्या १३ औषधांपैकी २ औषधांची डिलेवरी चलने आढळून न येणे ही त्रुटी वगळता योजनेच्या अंमलबजावणीमध्ये अन्य कोणतीही अनियमितता झाली नसल्याचे समितीने निष्कर्ष काढलेले आहेत.

राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत मिनी हॅचर मशीन खरेदी, जिल्हा वार्षिक योजनेंतील वैरण व पशुखाद्य विकास कार्यक्रम आणि कामधेनू दत्तक ग्राम योजना या तीनही योजनांच्या अंमलबजावणीमध्ये कोणतीही गंभीर अनियमितता झालेली नसल्यामुळे संबंधितांची तात्पूर्ती वेतनवाढ थांबविण्याची आवश्यकता नाही.

### विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने सांगली जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक सुस्पष्ट माहिती घेण्यासाठी दिनांक २७ जानेवारी, २०२० रोजी विभागीय सचिवांची साक्ष आयोजित करण्यात आली होती. सदर साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, याबाबत कार्यवाही पूर्ण झालेली आहे काय, त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस होकारार्थी उत्तर दिले. यावर समितीने असा निर्णय दिला की, इतर प्रकरणांमध्ये आपण कनिष्ठ अधिकाऱ्यांवर कारवाई केली असेल व इतर अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित केली नसेल तर ते प्रकरण पुन्हा सादर करून, सर्व संबंधितांवर जबाबदाऱ्या निश्चित करुन तात्काळ कारवाईसह या १५ दिवसांत समितीकडे अहवाल पाठवावा. बाकीच्या प्रकरणांबाबतही कारवाई करावी. उपरोक्त नमुद २ प्रकरणे आहेत. प्रकरणांप्रमाणे इतर कर्मचाऱ्यांवर आपण जबाबदाऱ्या निश्चित केलेल्या आहेत तशीच कारवाई इतरही प्रकरणात करण्यात यावी.

### अभिप्राय व शिफारशी

पशुसंवर्धन विभागाचे राष्ट्रीय कृषी विकास योजनेतून प्रशासकिय व तांत्रिक मान्यतेच्या अधिन राहून दर करारावर पुरवठा आदेशाने तिरूपती ट्रेड लिंक हैद्राबाद यांचेकडून रक्कम रुपये २७,७२,०००/-इतक्या रक्कमेचे एकूण १८ मिनी हॅंचर मशीन खरेदी केले आहेत. तसेच पशुसंवर्धन विभागाचे उपरोक्त योजना अंतर्गत कार्यक्रमासाठी प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेच्या अधिन राहून मका बियाणे वाटपासाठी एकूण रक्कम रुपये २९,९९,६८६/- इतका खर्च केला आहे. राष्ट्रीय कृषी विकास योजना अंतर्गत मिनी हॅचर खरेदी, जिल्हा वार्षिक योजनेतून वैरण व पशुखाद्य विकास कार्यक्रमांतर्गत झालेली अनियमितता तसेच कामधेनू दत्तक ग्राम योजना या तिन्ही प्रकरणांमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता झालेली आहे. तसेच राष्ट्रीय कृषी विकास योजने अंतर्गत निधी खर्च करण्यात आलेला आहे. लाभार्थ्यांची निवड करण्यासाठी जाहिरात द्यावयास पाहिजे होती. परंतु, जाहिरात देण्यात आलेली नाही. इत्यादीबाबत समितीने विचारणा केली असता ज्या प्रकरणी चौकशी समिती गठीत केली होती. उक्त समितीने चौकशी केली असता समितीने यात कोणतीही अनियमितता झाली नाही असे नमुद केले आहे. तसेच चौकशी समितीने व्यक्त केलेल्या अभिप्रयास विभागाने देखील सहमती दर्शविली आहे.

लाभार्थ्यांची निवड करण्याचे अधिकार कोणाला होते, शासनाच्या तशा प्रकारच्या (गाईड लाईन्स) मार्गदर्शक सूचना होत्या काय, या संदर्भात चौकशी केली पाहिजे. समिती दौऱ्यावर येणार असल्यामुळे संबंधितांवर कारणे दाखवा नोटीस किंवा दंडात्मक आणि शिस्तभंग विषयक कारवाई करण्यात आलेली आहे. लेखापरीक्षणाच्या वेळी अभिलेखे उपलब्ध करुन देण्यात आलेली नाहीत. **त्यामुळे संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्यावर नियम ७ नुसार प्रत्येकी २५ हजार रुपये दंड प्रस्तावित करुन दंडाची रक्कम वसूल करण्यात यावी. अशा बाबी सातत्याने होत असल्यामुळे समितीच्या शिफारशीनुसार संबंधितांची तात्पुरती एक वेतनवाढ थांबवावी व त्यांच्या सेवा पुस्तकात नोंद घ्यावी. या प्रकरणी सर्वंकष चौकशी करून, कार्यवाही करुन एका महिन्याच्या आत समितीला अहवाल सादर करण्याबाबत समितीने सूचना केली. तसेच यामध्ये काही अनियमितता झाली असल्यास संबंधीत दोषींवर नियमानुसार कोणताही पक्षपात न करता कारवाई करण्यात यावी व संबंधितांवर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्याच्या आत सादर करण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

## प्रकरण सात

## जिल्हा परिषद, सांगली

## दलित वस्ती सुधार योजनेतील अनियमितता

**परिच्छेद क्र.३.६०९ (सन २०११-२०१२)**

समाजकल्याण विभागास दलित वस्ती सुधार योजनेकरीता रुपये ४,३५,००,०००/- अनुदान प्राप्त व खर्च झालेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

अ) १) एकूण रद्द झालेल्या १८ कामांची पहिल्या हप्त्यांची रक्कम रुपये २६,७९,८००/- ग्रामपंचायतीकडे विनावापर पडून आहे. ती व्याजासह शासन निधीत भरणा करणे आवश्यक आहे.

२) कामाच्या नस्तीमध्ये ७/१२ व ८ अ चे उतारे नसल्याने दलितवस्तीतच काम झालेची खात्री पटत नाही.

३) कामांचे पुर्णत्वाचे दाखले उपलब्ध झाले नाहीत.

४) पंचायत समिती स्तरावरील अखर्चीत रक्कमेचा तपशील उपलब्ध झाला नाही. तरी सदर रक्कम शासनास भरणा केलेचे दाखवणे आवश्यक आहे.

५) जिल्हयात एकूण २८२ काम अपूर्ण असून सदर काम सत्वर पूर्ण करणे आवश्यक आहे. अन्यथा अपूर्ण कामावर झालेला खर्च वाया जाण्याची शक्यता आहे.

ब) खानापूर पंचायत समिती विटा- एकूण खर्च रक्कम रुपये ४,९९,८६२/-

१) रस्ता कॉंक्रीटीकरण व रस्ता गटर या कामासाठी प्रशासकीय तांत्रिक मंजूरी स्वतंत्रपणे प्रदान केलेली आहे. तथापि दोन्ही कामाची मापे मोजमाप पुस्तक क्रमांक ४ ते ७ मध्ये एकत्रित नोंदविलेली आहेत. त्यामुळे दोन्ही कामावर निश्चित किती खर्च झाला याबाबत पूर्तता दर्शवावी.

२) कॉंक्रीटीकरण कामास तांत्रिक मंजूरी पेक्षा रक्कम रुपये ८१,१४५/- इतक्या कमी रकमेने प्रशासकीय मान्यता दिली आहे. याबाबत प्रयोजन स्पष्ट होणे आवश्यक आहे.

३) सदर कामामध्ये मंजूर अंदाजपत्रकीय दरापेक्षा जादा दराने प्रदान केल्याने रक्कम रुपये ३७,३३७/- इतके अतिप्रदान झाले असून रक्कम वसूल करून शासन निधीत भरणा करणे आवश्यक आहे.

४) अंदाजपत्रकाच्या लिड स्टेटमेंट मध्ये ठिकाण नमुद केलेले नसून अंतर प्रत्यक्ष पडताळणी केले बाबत प्रमाणपत्र नाही.

५) साहित्य खरेदीची प्रामणके सादर करून योग्य निवड लिड चार्जेस दिलेबाबत पूर्तता दर्शविणे आवश्यक आहे.

६) कामाची नोंद ग्रामपंचायतीच्या नमुना नंबर २६ ला घेतलेचे दाखविणे आवश्यक आहे.

क) पंचायत समिती वाळवा-एकूण खर्च रक्कम रुपये १,२८,१३,६६१/-

१) कामामध्ये वापलेल्या साहित्याचे तपासणी अहवाल सादर करणे आवश्यक आहे.

२) कामाचे देयकातून ५ टक्के ग्रामनिधी ५ टक्के डिपॉझीट २ टक्के आयकर सरचार्ज व शिक्षणकर ४ टक्के व्हॅट विमा १ टक्के व रॉयल्टी इत्यादी कपातीच्या रक्कमा भरणा केलेबाबत चलने सादर करणे आवश्यक आहे.

३) एकूण ४१ ग्रामपंचायती लाभधारक असून एकूण ७४ मंजूर कामे असून त्यापैकी ४८ कामे पूर्ण झाली असून २५ कामे अपूर्ण असून १ काम रद्द करणेत आले आहे. सदर प्रमाणे मंजूर अहवाल खर्च रक्कम व देणे बाकी रक्कम याचा तपशिल पहाता दलित वस्ती कामासाठी पहिला हप्ता ४० टक्के दुसरा हफ्ता ४० टक्के व अंतिम हप्ता २० टक्के देय आहे. परंतू पहिला हप्त्याशी दिलेल्या रकमेची मुल्यांकन सादर केल्यानंतर दुसरा हप्ता देय आहे. परंतू सदर कामामध्ये पहिला हप्ता दिल्यानंतर पहिल्या हप्त्याच्या रकमेचे मुल्यांकन सादर न केलेने दुसरा अंतिम हप्ता देणेत आलेला नाही. त्यामुळे पहिला हप्त्याचा खर्च वाया गेल्याचे दिसून येते.

४) रक्कम रुपये १६,४३,२००/- रकमेच्या कामात तांत्रिक मंजूरी दिलेचे आढळून येत नाही. तांत्रिक मंजूरीशिवाय खर्च केला असून तांत्रिक मंजूरी शिवाय केलेला खर्च वसूल करून शासन निधीत जमा करणे आवश्यक आहे.

ड) पंचायत समिती मिरज एकूण खर्च रक्कम रुपये २०११-१२ रक्कम रुपये ४९,३८,०००/-

लेखापरिक्षण कालावधी अखेर एकूण ५२ कामे अपूर्ण असल्याचे दिसून आले. दलित वस्ती कामासाठी पहिला हप्ता ४० टक्के, दुसरा हफ्ता ४० टक्के व अंतिम हप्ता २० टक्के देय आहे. परंतू पहिल्या हप्त्याच्या रकमेचे मुल्यांकन सादर केल्यानंतर दुसरा हप्ता देय आहे. परंतू सदर कामामध्ये पहिला हप्ता दिल्यानंतर पहिल्या हप्त्याच्या रक्कमेचे मूल्यांकन सादर न केल्याने दुसरा व अंतिम हप्ता देण्यात आलेला नाही. त्यामुळे पहिल्या हप्त्याचा खर्च वाया गेलेला आहे. काम विहित मुदतीत केलेले नाही. त्यामुळे रक्कम रुपये ४९,३८,०००/- वसूल करून शासन निधीत भरणा करणे आवश्यक आहे.

इ) पंचायत समिती कवठेमहांकाळ व जत यांवर अनुक्रमे एकूण खर्च रक्कम रुपये १३,६७,९४६/- व २३,३२,१२५/-

१) दलित वस्ती सुधार योजना शर्ती अटीनुसार पंचायत समितीने ग्रामपंचायतीसोबत करारनामा करणे आवश्यक आहे. तथापि तसा करारनामा आढळून आला नाही.

२) तांत्रिक मान्यता आदेश उपलब्ध झाला नाही. उपलब्ध करणे आवश्यक आहे.

३) सदर कामाची नोंदवही नमुना नंबर २३ मध्ये ठेवलेली नसल्याने किती कामे मंजूर केली व किती पूर्ण झाली व किती अपूर्ण राहिली याबाबत माहिती उपलब्ध करून पुर्तता करणे आवश्यक आहे.

४) सदर कामाची जागा जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायतीच्या मालकीची असल्याबाबत नमुना नंबर ८ चे दाखले घेतलेले नाहीत. तरी दाखले घेऊन दाखविणे आवश्यक आहे.

५) पूर्ण झालेल्या कामाबाबत पूर्णत्वाचा दाखला मुल्यांकन न.नं.२५,२६,२७ ला नोंद घेतल्याचा उतारा, लोकवर्गणी जमा केलेबाबत दाखला, उपयोगिता प्रमाणपत्र इ. कागदपत्रे जोडल्याचे दिसून येत नाही.

६) काम विहित मुदतीत पूर्ण झालेबाबत कागदपत्रासह पूर्तता होणे आवश्यक आहे.

ज) पंचायत समिती तासगाव एकूण खर्च रक्कम रुपये ३२,६९,१५८/-

१) दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत सन २००५-०६ सालापासून एकूण १८७ कामे मंजूर झाली, त्यातील १३२ कामे पूर्ण झाली तर २८ कामे अपूर्ण असून २७ कामे रद्द झाली आहेत. सन २००९-१० मधील एकूण २७ कामावर खर्च ३२,६९,१५८/- करण्यात आलेला आहे. वरील कामाचा पहिला हप्ता ४० टक्के, दुसरा हफ्ता ४० टक्के व तिसरा हप्ता २० टक्के प्रमाणे देय असून पहिल्या हप्त्याचे रकमांचे मुल्यांकन घेवून दुसरा हप्ता देय असताना दिलेल्या रकमांचे मुल्यांकन दाखले लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

ड) पंचायत समिती कडेगाव एकूण खर्च रक्कम रुपये ७,८८,४००/-

१) ग्रामपंचायत निमसोड, येतगाव, शिवाजीनगर, बोंबळेवाडी मध्ये अनुक्रमे रस्ता कॉंक्रीटीकरण व गटर बांधणे, रस्ता कॉंक्रीटीकरण, रस्ता खडीकरण, डांबरीकरण, रस्ता खडीकरण डांबरीकरण सदर कामे अपूर्ण आहेत.

२) सदर कामातून ५ टक्के ग्रामनिधी नफा, ५ टक्के डिपॉझिट, आयकर त्यावरील सरचार्ज, विमा,रॉयल्टी, व्हॅट इत्यादी रकमा शासनास व ग्रामपंचायतीकडून भरणा केलेबाबत संबंधीत ग्रामपंचायतीकडून कागदपत्रे लेखापरिक्षणास सादर करणे आवश्यक आहे.

ठ) पंचायत समिती पलूस एकूण खर्च रक्कम रुपये १९,३०,०००/-

१)बुरूंगवाडी, माळवाडी,पलूस,तावदरवाडी मध्ये रस्ता कॉंक्रीटीकरण , रस्ता कॉंक्रीट व गटर, समाजमंदीर, रस्ता कॉंक्रीट व गटर या कामासाठी कामांना ग्रामपंचायतीला रक्कम प्राप्त झालेबाबत पंचायत समितीला नमुना नंबर ७ ची पावती दिलेची पहायला मिळाली नाही.

ड) पंचायती समिती आटपाडी एकूण खर्च रक्कम रुपये ९,२१,३३९/-

अ) १) ग्रामपंचायत कौठुळी, पिंपरी बु.माळवाडी व घाणंद या ग्रामपंचायतींना अनुदान वाटप केले असून त्याकामात वापरलेल्या साहित्याबाबत गुणनियंत्रक अधिकाऱ्याचा दाखला घेतलेचे पहायला मिळाले नाही.

२) वरील कामातून ५ टक्के ग्रामनिधी नफा, ५ टक्के डिपॉझिट, २ टक्के आयकर , १० टक्के सरचार्ज, ३ टक्के शिक्षणकर, ४ टक्के कार्यकंत्राटकर, १ टक्के विमा व गौण खनिज इत्यादी रक्कम चलनाने शासणास भरणा केल्याचे दाखविणे आवश्यक आहे.

३)दलित वस्तीच्या पूर्ण झालेल्या कामाबाबत काम पूर्णत्वाचा दाखला तसेच कामाची नोंद नमुना नंबर २५ व २६ ला घेतलेचा दाखला, उपयोगिता प्रमाणपत्र इत्यादी दप्तरी पहायला मिळाली नाही.

४) कामाचे मोजमाप पुस्तक नमुना नंबर २३ पहायला मिळाले नाही.

ब) १) ग्रामपंचायतींना रक्कम रुपये ६,८४,०००/- रक्कम वर्ग केलेल्या असून गटविकास अधिकारी यांचे आदेश क्र.४६९/-दिनांक ३१/०३/१२ अन्वये ग्रामपंचायतींना वरीलप्रमाणे रक्कम बँकेत ग्रामसेवक व गटविकास अधिकारी यांचे संयुक्त खाते काढून वर्ग केलेचा उल्लेख आहे. त्यानुसार संबंधीत ग्रामपंचायतीने बँकेत संयुक्त खाते काढलेचा दाखला देयकासोबत देणे आवश्यक असता ते दिल्याचे पहायला मिळाले नाही.

२) रक्कम मिळालेबाबत नमुना नंबर ७ ची पोच पावती देणे आवश्यक असता ती सोबत पहायला मिळाली नाही.

३) रक्कम रुपये १००/- च्या बाँडवर काम मुदतीत पूर्ण करत असलेचे करारपत्र ग्रामपंचायतीने देणे आवश्यक असतात.

क) १) दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत ग्रामपंचायत घाणंदला रक्कम रुपये ३,२६,४७५/- सिमेंट काँक्रीट रस्ता व गटार कामासाठीचा अंतिम हप्ता दिला असून ती रक्कम मिळालेबाबत नमुना नंबर ७ ची पावती पंचायत समितीकडे पहायला मिळाली नाही.

२) कामाचे मोजमाप पुस्तक पहायला मिळाले नाही.

३) अंतिम देयकातून २ टक्के आयकर ९,९२९/-, १० टक्के सरचार्ज रुपये ९९२/-, विमा रुपये ४,४६८/- सुरक्षा अनामत रुपये २४,८२३/- रॉयल्टी रुपये १७,५२७/- इत्यादी वसूल करून शासन खाती भरणा केलेची चलने पहायला मिळाली नाहीत.

४) कामाची नोंद नमुना नंबर २६ ला घेतलेचा दाखला नाही.

५) कामास वापरलेल्या साहित्याबाबत गुणनियंत्रक अधिकाऱ्यांचा तपासणी अवाल नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सांगली यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(अ) १ एकूण रद्द १८ कामांमध्ये विटा कडील ७, वाळवा-४, तासगाव-७ कामांचा समावेश असून सदरचे अनुदान रक्कम रुपये २६,७९,८००/-शासन सदरी भरणा केले असून चलने व त्याचे विवरणपत्र दप्तरी उपलब्ध आहेत.

(२) कामाच्या नस्तीमध्ये ७/१२ व ८ अ चे उतारे उपलब्ध आहेत. सदर कामे दलित वस्तीत झाली आहेत.

(३) कामाचे पूर्णत्वाचे दाखले दप्तरी उपलब्ध आहेत.

(४) पंचायत समिती स्तरावर सन ११-१२ मधील रक्कम खर्च झाली आहे. त्याबाबतचे गटविकास अधिकारी यांचे दाखले दप्तरी उपलब्ध आहेत.

५) अपूर्ण कामे २८२ नसून २५५ होती त्यापैकी २१० कामे पूर्ण झाली आहेत. पूर्णत्वाचे दाखले दप्तरी उपलब्ध आहेत. ४५ कामे रद्द करणेत आली आहेत. सदर कामाच्या रक्कमा शासनास चलनाने भरणेत आलेल्या आहेत. चलने व विवरणपत्र दप्तरी उपलब्ध आहेत.

(१) सदरचे रस्ता कामाकरिता प्रशासकीय मंजूरी रक्कम रुपये ३,६५,०००/- व गटर कामासाठी रक्कम रुपये १,३५,०००/- याप्रमाणे मंजूरी असून तांत्रिक मान्यता दोन्ही कामाकरीता एकत्रितपणे उप अंदाजपत्रके रस्ता कामाकरिता रक्कम रुपये ३,६२,७४२/- व गटर कामाकरिता रक्कम रुपये १,३४,६३३/- तसेच विमा कर रुपये २,४८७/- असे एकूण रक्कम रुपये ४,९९,८६२/- रुपये रकमेस तांत्रिक मान्यता देणेत आलेली आहे. प्रशासकीय मंजूर रकमेच्या अधिन राहून एकत्रित तांत्रिक मान्यता दिलेली आहे. व त्यास अनुसरून मोजमापे एकत्रित लिहिण्यात आली आहेत. प्रत्यक्ष मोजमाप पुस्तकानुसार रस्ता काँक्रीटीकरण कामाकरिता रक्कम रुपये ४,००,०००/-मर्यादित रक्कम रुपये ३,६९,०२४/- व गटर करिता रक्कम रुपये १,३०,९७६/- याप्रमाणे कामावर खर्च झालेला आहे.

(२) रस्ता काँक्रीटीकरणासाठी अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेश क्र.जिपसा/सकवि/दवसु/प्रशा. मंजूरी/६२९/१०-११ अन्वये रक्कम रुपये ३,६५,०००/- मंजूर असून तांत्रिक मंजूरी रक्कम रुपये ३,६२,७४२/- इतकी दिलेली आहे. पूर्ण कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ४,४६,१४५/- होती. निधी कमी उपलब्ध असल्याने रक्कम रुपये ३,६५,०००/- एवढी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

(३) अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ४,४६,१४५/- तांत्रिक मान्यता रक्कम रुपये ३,६२,७४२/- आहे. प्रशासकीय मान्यता रक्कम रुपये ३,६५,०००/- आहे. खर्च रक्कम रुपये ३,६५,०००/- आहे. खर्च रक्कम रुपये ३,६५,०००/- आहे. त्यामुळे अतिप्रदान झालेली नाही.

(४) अंदाजपत्रक करतेवेळी कमीत कमी अंतराकडून साहित्याचे अंतर धरलेले आहे. अंदाजपत्रकामध्ये ठिकाण नमूद करणेचे राहिलेले आहे. तथापि उप अभियंता (इवद) पंचायत समिती विटा यांचे प्रत्यक्ष अंतर पडताळणी प्रमाणपत्र उपलब्ध आहे.

(५) उप अभियंता (इवद) पंचायत समिती विटा यांच प्रत्यक्ष अंतर पडताळणी प्रमाणपत्र वापरलेल साहित्य खालीलप्रमाणे आहे.

| साहित्य | ठिकाण | अंतर (कि.मी.) |
|---|---|---|
| सिमेंट | वि.टा | १५ |
| वाळू | वाझर | १० |
| लोखंड ४० मि.मि. पेक्षा कमी | वाझर | ५ |
| लोखंड ४० मि.मि. पेक्षा कमी | सांडगेवाडी | १५ |
| HYSD स्टील | विटा | १५ |

सदर साहित्य कमीत कमी अंतरावरून खरेदी केले आहे.

(६) रस्ता काँक्रीट व गटर कामाची नोंद ग्रामपंचायतीच्या मालमत्ता नोंदवही नमुना नंबर २६ ला घेणेत आलेली असून त्याची प्रत उपलब्ध आहे.

(१) मंजूर कामामध्ये वापरलेल्या साहित्याचा तपासणी अहवाल दप्तरी उपलब्ध आहे.

(२) १ आयकर–ऐतवडे खु, रेठरेहरणाक्ष, येलूर, नेर्ले या ग्रामपंचायतीने भरलेले आहे. इतर ग्रामपंचायतीनी भरलेले नाही.

२ विमा-ऐतवडे खुर्द, रेठरेहरणाक्ष व शिरटे या ग्रामपंचायतने भरलेले आहे. इतर ग्रामपंचायतीने भरलेले नाही.

३ रॉयल्टी कोरेगाव, रेठरेहरणाक्ष, येलूर, शिरटे व वशी यांनी भरली आहे. इतर ग्रामपंचायतीने भरली आहे. इतर ग्रामपंचातीने भरली नाही. तसेच इतर ग्रामपंचायतींनी वसुलीच्या रकमा ग्रामनिधीत जमा केल्या आहेत. त्याबाबतचे प्रपत्र उपलब्ध आहे.

(३) वाळवा पं.स. इस्लामपूर कडील दलित वस्ती सुधार योजनेकडील ७४ कामापैकी ७३ कामे सद्यःस्थितीत पूर्ण झाली असून १ काम रद्द झाले आहे सदर कामास अदा केलेली रक्कम कामास अदा केलेली रक्कम वसूल करणेत आली आहे. काम पूर्णत्वाचे दाखले व चलनाची प्रत दप्तरी उपलब्ध आहे.

(४) रक्कम रुपये १६,४३,२००/- च्या कामास कार्यकारी अभियंता (इवद) यांची तांत्रिक मान्यता घेवूनच काम केले असून तांत्रिक मान्यता आदेश दप्तरी उपलब्ध आहे. लेखापरिक्षण कालावधीमधील एकूण ५२ कामांपैकी ४६ कामे पूर्ण झालेली असून ६ कामे रद्द केलेली आहेत रद्द कामाचे अनुदान वसूल करून शासन सदरी जमा केले आहे. त्याची चलने व कामाच्या पूर्णत्वाचे दाखले दप्तरी उपलब्ध आहेत.

(१) पंचायत समितीकडे करारनामे उपलब्ध नाहीत तथापि सद्यःस्थिती मध्ये करारनामे करण्यात येत आहेत.

(२) तांत्रिक मान्यता आदेश दप्तरी उपलब्ध आहेत.

(३) सदर कामांची पं.स. स्तरावर नोंदवही ठेवणेत आलेली आहे. तथापि नमुना नंबर २३ ठेवण्याची दक्षता घेत आहोत.

(४) सदर कामाची जागा जिल्हा परिषद, पंचायत समिती, व ग्रामपंचायत मालकीची असून चलने उपलब्ध आहेत. उर्वरित २३ कामे पूर्ण झाली असून त्याचे पूर्णत्वाचे दाखले उपलब्ध आहेत. पहिल्या हप्त्यांचे मूल्यांकन प्राप्त झालेनंतर दुसरा हप्ता दिला असून दिलेल्या रकमांचे मूल्यांकन दाखले दप्तरी उपलब्ध आहेत.

१) सदरची कामे पूर्ण झाली असून पूर्णत्वाचे दाखले दप्तरी उपलब्ध आहेत.

२) निमासोड- रॉयल्टी व आयकर भरले आहे. येतगाव डिपॉझीट व रॉयल्टी भरली आहे. शिवाजीनगर- रॉयल्टी व आयकर भरला आहे. बोंबळेवाडी- रॉयल्टी व आयकर भरला आहे. सदरची कागदपत्रे दप्तरी उपलब्ध आहेत.

(१) बुरूंगवाडी, माळवाडी, पलूस, तावदरवाडी मध्ये रस्ता क्रॉंक्रीटीकरण, रस्ता क्रॉंक्रीट व गटर, समाजमंदीर , रस्ता क्रॉंक्रीट व गटर या कामासाठी कामांना ग्रामपंचायतीला रक्कम प्राप्त झाल्याची नमुना नं.७ ची पावती दप्तरी उपलब्ध आहे.

(२) कामांची मोजमाप नोंदवही उपलब्ध आहे.

(१) ग्रामपंचायत कौठुळी, पिंपरी बुद्रुक व घाणंद यांचा वापरलेल्या साहित्याबाबतचा गुणनियंत्रक दाखला दप्तरी उपलब्ध आहे. सदर तालुक्यामध्ये माळवाडी गावाचा समावेश नाही.

(२) देयकातून डिपॉझीट वसूल करणेत आले आहे. कौठुळी, पिंपरी बुद्रुक व घाणंदचा आयकर घेणेत आला आहे. घाणंद ची रॉयल्टी घेतली आहे.

(३) पूर्णत्वाचे दाखले नमुना नं.२५,२६ ला नोंद घेतलेले दाखले तसेच उपयोगिता प्रमाणपत्र दप्तरी उपलब्ध आहेत.

(४) मोजमाप पुस्तीका दप्तरी उपलब्ध आहे.

(ब) (१) वलवण-१,२०,०००/- (२) बनपूरी-१,६०,०००/- (३) लिंगीवरे- १,०४,०००/- (४) लिंगीवरे-९६,०००/- (५) लेंगरेवाडी-४४,०००/- ६) हिवतड-१,६०,०००/- एकूण-६,८४,०००/- या ग्रामपंचायतींनी ग्रामसेवक व गटविकास अधिकारी यांचे नावे बँकेत संयुक्त खाते काढले असलेचे दाखले दप्तरी उपलब्ध आहेत.

(२) नमुना नं. ७ च्या पोहोच पावत्या दप्तरी उपलब्ध आहेत.

(३) काम मुदतीत पूर्ण करणेबाबतची रक्कम रुपये १००/- च्या बाँडवर करारपत्र संबंधित ग्रामपंचायतीकडून घेणेत आले आहेत. ते दप्तरी उपलब्ध आहे.

(क) (१) रक्कम मिळालेबाबतची नमुना नं ७ ची पावती दप्तरी उपलब्ध आहे.

(२) कामाचे मोजमाप पुस्तकाची प्रत दप्तरी उपलब्ध आहे.

(३) आयकर, सरचार्ज, विमा, व रॉयल्टी शासन खाती भरणा केलेली आहे. त्याची चलने दप्तरी उपलब्ध आहेत. सुरक्षा अनामत ठेव ठेवणेत आली होती ती मक्तेदारास परत देणेत आलेली आहे.

(४) कामाची नोंद नमुना नंबर २६ ला घेतलेचा दाखला घेणेत आलेला आहे. ते दप्तरी उपलब्ध आहे.

(५) साहित्याबाबत गुणनियंत्रक अधिकारी यांचा तपासणी अहवाल दप्तरी उपलब्ध आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

सांगली जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २२ नोव्हेंबर, २०१७ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, मुख्य लेखा व वित्त अधिकाऱ्यांनी मागील ५ वर्षांत दलित वस्ती सुधार योजनेचा किती निधी व्यपगत झाला किंवा शासन खाती भरण्यात आला याबाबतची माहिती समितीला सादर करतो असे अनौपचारिक बैठकीच्या वेळी सांगितले होते. त्यांनी याबाबत समितीला माहिती द्यावी.

यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी खुलासा केला की, विवरण तयार केलेले आहे. सन २०११-१२ मध्ये ५ कोटी ३५ लाख रुपये प्राप्त झाले होते. मागील शिल्लक शून्य होती. सन २०११-१२ मध्ये प्राप्त झालेल्या ५,३५,००,०००/- रुपयांपैकी ५,१६,१७,२४६/- रुपये खर्च झालेले आहेत. उर्वरित १८,८२,७५४/- रुपये शासन खाती भरणा केलेले आहेत. सन २०१२-१३ मध्ये ७,९९,००,०००/- रुपये प्राप्त झाले होते. त्यापैकी ७,९२,५३,०३३/- रुपये खर्च झालेले आहेत. उर्वरित ६,४६,९६७/- शासन खाती भरणा केलेले आहेत. सन २०१३-१४ मध्ये ६,५९,२७,०००/- रुपये प्राप्त झाले होते. त्यापैकी ५,२४,३०,४६५/- रुपये खर्च झालेले आहेत. सन २०१४-१५ मध्ये प्राप्त झालेले ७,६४,६५,०००/- रुपये व सन २०१३-१४ मधील अखर्चित १,३४,९६,५३५/- रुपये असे एकूण ८,९९,६१,५३५/- रुपये खर्च करण्यास उपलब्ध होते. त्यापैकी ६,०५,३६,०१२/- रुपये खर्च करण्यात आलेले आहेत. सन २०१५-१६ मध्ये प्राप्त झालेले १७,४७,४४,०९०/- रुपये व सन २०१४-१५ मधील अखर्चित २,९४,२५,५२३/- रुपये असे एकूण २०,४१,६९,६१३/- रुपये खर्च करण्यास उपलब्ध होते. त्यापैकी १६,२३,९३,२४०/- रुपये खर्च झालेले आहेत. सन २०१६-१७ मध्ये प्राप्त झालेले १७ कोटी व सन २०१५-१६ मधील अखर्चित ४,१७,७६,३७३/- असे एकूण २१,१७,७६,३७३/- खर्च करण्यास उपलब्ध होते. त्यापैकी १४,७७,११,६४२/- रुपये खर्च झालेले असून ६,४०,६४,७३१/- रुपये अखर्चित राहिलेले आहेत. सन २०१७-१८ मध्ये ६ कोटी ४० लाख रुपये प्राप्त झाले होते. मागणी प्रमाणे रक्कम खर्च करण्यात आली आहे. त्यापैकी २ कोटी ४६ लाख ८८ हजार ८५७ रुपये खर्च झाले आहेत.त १८ कोटी रुपयांचा नियतव्यय मंजूर आहे.

समितीने विचारणा केली की, २६,७९,८००/- रुपये शासनाकडे भरणा करण्यात आले आहे. सदर निधी अखर्चित राहण्यास कोण जबाबदार आहे. दलित वस्तीच्या कामाला प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर पंचायत समिती, गटविकास अधिकारी यांच्याकडे काम वर्ग करण्यात येते. गट विकास अधिकारी ग्रामसेवक यांचे जॉईंट अकाऊंट असते त्या अकाऊंटवर सदर पैसे वर्ग करण्यात येतात. त्यामुळे हा निधी अखर्चित राहण्यास कोण जबाबदार आहे. मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी विदित केले की, समाज कल्याण विभाग व ग्रामपंचायत विभागाने सदरर रक्कम खर्च करावयास पाहिजे होती. संबंधित गट विकास अधिकारी यास जबाबदार आहेत.

समितीने विचारणा केली की, गट विकास अधिकाऱ्यांच्या चुकीमुळे सदर पैसा खर्च करता आला नाही. दलित वस्तीमध्ये गरीब लोक राहतात, त्यांच्यासाठी आलेला निधी त्यांच्याच वस्तीमध्ये खर्च केला पाहिजे. सदर निधी इतरत्र खर्च केल्यामुळे दलित वस्तीतील लोक वंचित राहत आहेत. या कामासाठी खाते प्रमुख जबाबदार आहेत, मुख्य कार्यकारी अधिकारी जबाबदार नाही. दलित वस्तीसाठी निधी मिळत नाही म्हणून जिल्हापरिषदेचे

सभापती तक्रार करतात. या वर्षात जो निधी प्राप्त झाला आहे तो खर्च केला आहे काय ? या वित्तीय वर्षात फक्त पाच महिने बाकी आहेत, २ कोटी ४६ लक्ष रुपयांचा निधी का खर्च करण्यात आला नाही. सदर निधी लॅप्स झाला आहे काय ? निधी असताना योजना न करण्यास कोण अधिकारी जबाबदार आहे. जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी विदित केले की २ कोटी ४६ लक्ष रुपये शिल्लक होते, पुढील वर्षात ३ कोटी ९३ लक्ष ७५ हजार ८७४ रुपये मंजूर केले आहेत. तालुका स्तरावरील मंजूर कामाच्या १० टक्के रक्कम जिल्हा स्तरावर राखून ठेवण्यात येते.

यावर समितीने अशी विचारणा केली की, सदर १० टक्के निधी का राखून ठेवण्यात येतो. गट विकास अधिकारी यांच्याकडून १० टक्के रक्कम खर्च का करण्यात येत नाही. यावर गट विकास अधिकारी विटा/खानापूर यांनी विदित केले की, ९० टक्के रक्कम खर्च करण्यात आली आहे. शासन निर्णयाप्रमाणे प्रत्येक कामाची १० टक्के रक्कम जिल्हा स्तरावर राखून ठेवण्यात येते. तद्नंतर समितीने विचारणा केली की, करारनाम्यात तसा उल्लेख केलेला आहे काय ? मजुरांची मजुरी देण्यास विलंब होतो काय ? यावर जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी स्पष्ट केले की, १० टक्के रक्कम राखून ठेवण्याबाबत ५ डिसेंबर, २०११ चा शासन निर्णय आहे. समितीने अशी विचारणा केली की, १० टक्के रकमेचे काम शिल्लक ठेवण्यात येते काय, कामाच्या पूर्णत्वाचा दाखला दिल्यावर १० टक्के रक्कम रिलीज करण्यात येते काय ? कार्यकारी अभियंता कामाची सीसी देतात. कनिष्ठ अभियंता व उप अभियंता कामाची पाहणी करतात. १० टक्के रक्कम समाज कल्याण विभागाकडे थांबविण्यात येते. ९० टक्के काम झाले तरी १० टक्के रक्कम वितरित केली जात नाही. या वर्षाचे नियोजन आपण केले आहे काय ? ३१ मार्च संपण्यासाठी ३-४ महिन्यांचा कालावधी आहे. हा पैसा वेळेत खर्च होणे अपेक्षित आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, ३१ मार्चपर्यंत सर्व रक्कम खर्च करण्यात येईल. सर्व कामांना प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. १८ कोटी रुपयांचा नियतव्यय मंजूर केलेला आहे. समितीने विचारणा केली की, सन २०११-१२ वर्षातील १८ लाख ८२ हजार रुपये खर्च केले आहेत काय, मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी सांगितले की, १८ लाख ८२ हजार रुपये सन २०११-१२ या वर्षात खर्च करण्यात आले आहेत.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, १० टक्के रक्कम राखून ठेवण्याचा अधिकार राज्य सरकारला आहे. या कामासाठी गट विकास अधिकारी संपूर्ण जबाबदार आहेत. १० टक्के रक्कम ग्रामपंचायतीने प्रमाणपत्र दिल्यानंतर जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हापरिषद यांनी कामाची पाहणी करुन १०० टक्के काम पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र दिल्यानंतर रक्कम वितरित करण्यात येते. मागील दहा वर्षातील सर्व कामांची पाहणी समाज कल्याण अधिकारी यांनी केली आहे काय ? १० टक्के रक्कम राखून ठेवताना १०० टक्के कामांची पाहणी केली आहे काय. जिल्हा समाज कल्याण अधिकारी हा निधी राखून ठेवत आहेत. समाज कल्याण अधिकारी सर्व ठिकाणी भेटी दिल्या आहेत काय, तशा नोंदी ग्रामपंचायतीमध्ये आहे काय ? शासन निर्णयाचा चुकीचा अर्थ काढण्यात आलेला आहे. गेल्या ५ वर्षांत प्रत्येक कामाची १० टक्के रक्कम राखून ठेवली आहे. त्यामुळे ही १० टक्के रक्कम अखर्चित आहे.

यावर जिल्हा समाज कल्याण अधिकारी खुलासा केला की, मी जून महिन्यात पदभार स्वीकारला आहे. मी १३ कामांना भेटी दिल्या आहेत. १ एप्रिल, २०१३ पासून ११६ कामे पूर्ण झाली आहेत. त्या कामांना जनरल बॉडीने एनओसी दिली आहे. सर्व कामांना समाजकल्याण अधिकारी भेटी देऊ शकत नाही. समितीने अशी विचारणा केली की, २६,७९,८००/- रुपये शासनाकडे भरण्यात आले आहेत. सदर रक्कम दोन वर्षात खर्च न केल्यामुळे शासनाकडे परत करण्यात आली आहे. पैसा वर्ग करताना तो व्याजासह देण्यात येतो काय ?

यावर जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी विदित केले की, सन २०१०-११ मध्ये आलेला निधी १८ कामांसाठी होता. २६,७९,८००/- रुपये दोन वर्षात खर्च करता येतात.तततद्दनंतर समितीने विचरणा केली की, २६,७९,८००/- ही रक्कम दोन वर्षात खर्च न केल्यामुळे ती अखर्चित राहिली व त्यामुळे ती शासनाकडे जमा करावी लागली आहे काय. यावर जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी विदित केले की, सदर काम सन २००७-२००८ मधील होते. पाच ते सहा कामांची ही रक्कम होती. एकत्रित कामाचा निधी आला होता. पंचायत समितीकडील एक काम रद्द करण्यात आले आहे. १०० टक्के रक्कम अदा करण्यात आली होती. यावर समितीने अशी विचारणा केली की, १० टक्के रक्कम थांबवून ठेवलेली आहे काय. द्वयावर जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी विदित केले की, १८ कामांची १०० टक्के रक्कम शासनाकडे वर्ग करण्यात आली आहे.

यावर समितीने मत व्यक्त केले की, गट विकास अधिकाऱ्यांनी अकाऊंटमध्ये निधी जमा केला आहे. यासाठी गट विकास अधिकारी जबाबदार आहे ग्रामपंचायतीची अडचण होते, ई-टेंडर करण्याची गरज आहे. दलित वस्तीच्या अनुषंगाने ज्या कामांची मागणी करण्यात आली ती कामे वेळेत केली नाहीत व उर्वरित रक्कम शासनाकडे जमा केली यासाठी स्थानिक अधिकारी जबाबदार आहेत. तालुका अधिकारी, गट विकास अधिकारी समाज कल्याण अधिकारी हे या कामासाठी जबाबदार आहेत. जिल्हा परिषदेचे पदाधिकारी, सभापती सांगतात की, समाज कल्याण अधिकारी यांच्याकडून निधी मिळत नाही. आता जो निधी आहे तो तीन महिन्यात खर्च होणार आहे काय, १० टक्के रक्कम अडकवून ठेवणे योग्य नाही. परिपत्रकाप्रमाणे चुकीची कार्यवाही करण्यात येत आहे. हा विषय सचिवांच्या साक्षीला घेण्यात यावा.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी सन २०११-१२, सन २०१३-१४ व सन २०१५-१६ अखेरपर्यंतचा निधी कॅरिफॉरवर्ड केला आहे. मागील वर्षाचा शिल्लक निधी पुढील निधीला जोडण्यात आला आहे. मागील दोन वर्षांचा निधी अखर्चित राहतो. दरवर्षी जो निधी शिल्लक राहतो त्याची माहिती मिळाली पाहिजे. ज्यांनी चुका केल्या त्यांची चौकशी झाली पाहिजे.

यावर संचालक स्थानिक निधी यांनी सुचित केले की, अखर्चित रक्कम किती आहे याचा अभ्यास केलेला आहे. किती रक्कम मिळाली, किती खर्च झाली, किती शिल्लक राहिली ? पुढील वर्षी मिळालेली रक्कम आणि मागील वर्षाची शिल्लक रक्कम यापैकी कोणती रक्कम पुढील वर्षी खर्च केले हे समजू शकत नाही. उदाहरण सांगावयाचे झाले तर या वर्षी १०० रुपये मिळाले त्यापैकी ४० रुपये खर्च झाले म्हणजे ६० रुपये शिल्लक राहिले. पुढील वर्षी १०० रुपये मिळाले म्हणजे एकूण १६० रुपये जमा झाले. १६० रुपयांपैकी मागील वर्षीची शिल्लक रक्कम खर्च केली किंवा कसे हे कसे समजणार ?

समितीने अशी विचारणा केली की, पंचायत समिती कवठेमहांकाळ आणि जत बाबत आक्षेप घेण्यात आलेला आहे की, दलित वस्ती सुधार योजना शर्ती व अटीनुसार पंचायत समितीने ग्रामपंचायतीसोबत करारनामा करणे आवश्यक आहे. तथापि तसा करारनामा आढळून आला नाही. सद्यःस्थितीमध्ये करारनामे करण्यात येत आहेत त्यावेळचे काराारनामे आता करु शकतो काय ? यासंदर्भात गट विकास अधिकाऱ्यांना निलंबित केले पाहिजे.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, असे झालेले आहे. यापुढे असे होणार नाही याची दक्षता बाळगण्यात येईल. या प्रकरणामध्ये सविस्तर चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करण्यात येईल. यावर समितीने विचारणा केली की, करारनामे उपलब्ध नाहीत याचा अर्थ नियमांचा भंग केला आहे? जर नियमांचा भंग केला असेल तर संबंधितावर कारवाई केली पाहिजे, ती कारवाई करणार काय ? येथे ऑन रेकॉर्ड चर्चा करीत आहोत. परंतु प्रत्यक्षात कामे झाली आहेत काय, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले की, कामे झालेली आहेत. तशा काही तक्रारी नाहीत.

समितीने निदेश दिले की, दलित वस्ती सुधार योजनेत अनियमितता झालेली आहे. त्याबाबत फार मोठा लेखा आक्षेप आलेला आहे. जवळपास २६ लाख ७९ हजार ८०० रुपये खर्च केलेले नाहीत. कामात अनियमितता दिसत आहे. मोठ्या प्रमाणात निधी अखर्चित राहिलेला आहे. त्याशिवाय कामाचे दहा टक्के निधी राखून ठेवणे गैर आहे. दलित वस्ती सुधार योजनेचे काम अपूर्ण ठेवून निधी राखून ठेवणे योग्य नाही. अधिकाऱ्यांनी शासन निर्णयाचा उल्लेख केला, त्याचे समर्थन करता येत नाही. समाजकल्याण अधिकाऱ्यांनी सांगितले की, ते कोणत्याही कामावर भेट देऊ शकत नाही. याचा अर्थ जो शासन निर्णय काढलेला आहे त्याचे समर्थन करणे योग्य नाही. शासनाकडून प्राप्त झालेला निधी खर्च झाला नाही त्यास कोणकोण जबाबदार आहे याची चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करणे गरजेचे आहे. यामध्ये अनियमितता झालेली आहे. काम पूर्ण केलेले नाही. जादा दराने रक्कम अदा करण्यात आलेली आहे, लेखापरीक्षणाच्यावेळी कागदपत्रे उपलब्ध नव्हते असे आक्षेप आलेले आहेत. हा शिस्तभंग कारवाईचा विषय आहे. समिती येत आहे म्हणून आपण किरकोळ कारवाई करीत आहात हे योग्य नाही. करारनामे नसताना काम दाखविणे म्हणजे यात अनियमितता दिसते. तेव्हा या प्रकरणी सखोल चौकशी करावी. लेखापरीक्षणास अभिलेख उपलब्ध न करुन दिल्याबद्दल स्थानिक लेखा अधिनियमातील नियम ७ नुसार २५ हजार रुपये दंड वसूल करावा आणि संबंधितांची तात्पुरती वेतनवाढ रोखावी, त्यांच्या सेवापुस्तकामध्ये नोंद घ्यावी, संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन कारवाईसह दोन महिन्याच्या आत समितीला अहवाल सादर करावा. या प्रकरणी समिती सचिवांचीी साक्ष घेणार आहे.

समितीने अशी विचारणा केली की, तत्कालीन समाज कल्याण अधिकारी श्री.गोसावी यांच्यावर कारवाई झालेली आहे काय, उपायुक्त यांनी विदित केले की, त्यांचे प्रकरण २०१५ मध्ये आलेले आहे. त्यांना चौकशीसाठी दिलेल्या तारखांना ते उपस्थित राहिले नाहीत. तेव्हा त्यांना वन-वे कारवाई करण्यात येईल असे सांगितल्यावर ते चौकशीसाठी उपस्थित झाले. सादरकर्ता हे समाजकल्याण अधिकारी आहेत. गेल्या वर्षभरात दोन-तीन समाज कल्याण अधिकारी बदलून गेले. त्यामुळे प्रोसेस स्पीडअप झालेली नाही. समाज कल्याण अधिकारी एका तारखेला आले तर दुसऱ्या तारखेला आले नाहीत त्यामुळे पुढील कारवाई करता आली नाही. समितीने अशी विचारणा केली की, तत्कालिन समाज कल्याण अधिकारी सध्या कार्यरत आहेत काय, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, ते निलंबित आहेत.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

**दलित वस्ती सुधार योजनेतील अनियमितता** :- दलित वस्ती सुधार योजनेमध्ये जवळपास २६ लाख ७९ हजार ८०० रुपये खर्च केलेले नाहीत या कामात अनियमितता झाल्या प्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार याप्रकरणी संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून कोणती कारवाई करण्यात आली आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

दलित वस्ती सुधार योजनेमध्ये २६ लाख ७९ हजार ८०० इतकी रक्कम रद्द झालेल्या १८ कामांची आहे ती पुढीलप्रमाणे

| ग्रामपंचायतीचे नाव | कामाचे नाव |
|---|---|
| भिकवडी | समाजमंदिर |
| साळशिंगे | समाजमंदिर |
| लेंगरे | सा.शौचालय |
| वासुंबे | समाजमंदिर |
| साळशिंगे | रस्ता कॉक्रीट |
| रेवणगाव | समाजमंदिर |
| वलखड | रस्ता कॅाँक्रिटीकरण |
| लाडेगाव | सा.शौचालय |
| बहादुरवाडी | सा.शौचालय |
| तांबवे | समाजमंदिर |
| मसुचीवाडी | सा.शौचालय |
| ढवळी | समाजमंदिर |
| मोराळे(पेड) | पाणीपुरवठा योजना |
| खुजगाव | सरंक्षक भिंत |
| बोरगाव | समाजमंदिर |
| चिंचणी | रस्ता कॅाँक्रिटीकरण |
| डोंगरसोनी | समाजमंदिर |
| शिरगाव कवठे | गटर बांधकाम |

या रद्द कामांचा अखर्चित निधी शासन सदरी भरणा केलेला आहे. सदर प्रकरणाची उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राप) जिल्हा परिषद, सांगली यांचे मार्फत चौकशी करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने ज्या ग्रामसेवकांनी विहित वेळेत अखर्चित निधी परत न करता व कामे वेळेत रद्द न करता कोणतीही कारवाई न केल्याने संबधित वस्ती त्या कालावधीत लाभापासून वंचित राहिली आहे. यास जबाबदार असणाऱ्या दोषी ग्रामसेवकांना महाराष्ट्र जिल्हा परिषद (शिस्त व अपील) नियम, १९६४ मधील भाग ३ नियम ४ (२) अन्वये १ वेतनवाढ थांबविण्याची शास्ती करण्यात आली आहे. लेखापरीक्षणास आवश्यक अभिलेखे न दाखविल्याबद्दल तत्कालीन संबधित कर्मचारी यांचेविरुद्ध मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षण अधिनियम, १९३० मधील कलम ७ अन्वये विहित केल्याप्रमाणे दंडात्मक कारवाईच्या अनुषंगाने प्रकरण न्यायालयामध्ये दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे. करारनामे वेळेत न केलेबद्दल दोषी असणाऱ्या ग्रामसेवक व संबधित लिपिक यांचेविरुद्ध महाराष्ट्र जिल्हा परिषद (शिस्त व अपील) नियम, १९६४ मधील भाग ३ नियम ४ (२) अन्वये १ वेतनवाढ थांबविण्याची शास्ती करण्यात आली आहे. तसेच सदर प्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबधित तत्कालिन जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांचे विरुद्ध कारवाई करण्याचा प्रस्ताव मा. आयुक्त, समाजकल्याण विभाग, पुणे यांचेकडे प्रस्तावित केला आहे.

**मंत्रालय विभागाचा अभिप्राय**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय : यासंदर्भात** जिल्हा परिषद, सांगली यांनी संबंधित जबाबदार कर्मचाऱ्यावर कारवाई केली असल्याचे दिसते. जिल्हा परिषदेच्या कार्यवाहीस शासन सहमत आहे.

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे अभिप्राय :-** मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प., सांगली यांच्या अभिप्रायाशी सहमत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने सांगली जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या महितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १६ ऑटोबर, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, दलित वस्ती सुधार योजनेतील अनियमितता या बाबत कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदरहू कार्यवाही पुर्ण करण्यात आली आहे असे उत्तर दिले.

## अभिप्राय व शिफारशी

समाज कल्याण विभागास दलित वस्ती सुधार योजनेकरीता रुपये ५,३५,००,०००/- इतके अनुदान प्राप्त झाले होते. त्यापैकी रद्द झालेल्या १८ कामांचा अखर्चित निधी रुपये २६,७९,८००/- दोन वर्षात खर्च न केल्यामुळे शासन सदरी भरणा करावा लागला आहे. झालेल्या कामांचे पूर्णत्वाचे दाखले उपलब्ध झाले नाहीत. दलित वस्ती सुधार योजना शर्ती अटीनुसार पंचायत समितीने ग्रामपंचायतीसोबत करारनामा करणे आवश्यक असताना असे करारनामे केल्याचे आढळून आले नाही. जादा दराने रक्कम अदा करण्यात आली आहे. लेखापरिक्षणावेळी कागदपत्रे उपलब्ध करून देण्यात आली नाहीत असे अनेक आक्षेप आलेले आहेत.

दलित वस्तीच्या अनुषंगाने ज्या कामांची मागणी करण्यात आली ती कामे वेळेत केली नाहीत दलित वस्तीमध्ये गरीब लोक राहत असल्याने त्यांच्यासाठी आलेला निधी त्यांच्याच वस्तीमधील विकास कामांसाठी खर्च करणे आवश्यक होते. जिल्ह्यात दलित वस्ती सुधार योजनेतर्गत झालेल्या कामात अनियमितता झालेली असून या योजनेतील निधी अखर्चित राहिल्याबाबत चौकशी करून संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून कारवाई करावी असे निदेश समितीने दिले.

त्यानुषंगाने या प्रकरणाची उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राप) जिल्हा परिषद, सांगली यांचेमार्फत चौकशी करण्यात आली. त्यानुसार ज्या ग्रामसेवकांनी विहित वेळेत अखर्चित निधी परत न करता व कामे वेळेत रद्द न करता कोणतीही कार्यवाही न केल्याने संबंधित वस्ती त्या कालावधीत लाभापासून वंचित राहिली आहे. यास जबाबदार असणाऱ्या दोन ग्रामसेवकांची व करारनामे वेळेत न केलेबद्दल दोषी असणाऱ्या ग्रामसेवक व संबंधित लिपिक यांचेविरुद्ध एक वेतनवाढ थांबविण्याची शास्ती करण्यात आली आहे. तसेच लेखापरीक्षणास आवश्यक अभिलेखे न दाखविल्याबद्दल तत्कालीन संबधित कर्मचारी यांचेविरुद्ध दंडात्मक कारवाईच्या अनुषंगाने कार्यवाही सुरू आहे. त्याचप्रमाणे सदर प्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधित तत्कालीन जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांचेविरुद्ध कारवाई करण्याचा प्रस्ताव आयुक्त, समाजकल्याण विभाग, पुणे यांचेकडे प्रस्तावित केला आहे. या केलेल्या कारवाईबाबत समिती समाधान व्यक्त करीत आहे.

**तसेच दलित वस्ती सुधार योजनेतील अनियमितेस जबाबदार असणाऱ्या संबंधित तत्कालिन जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांच्याविरुद्ध प्रस्तावित करण्यात आलेली कार्यवाही तातडीने पूर्ण करून केलेल्या कारवाईची माहिती तीन महिन्याच्या आत समितीला सादर करण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

## प्रकरण आठ

## जिल्हा परिषद, सांगली

## थकित पाणीपट्टी वसुलीबाबत

**परिच्छेद क्र. ३.८०९(८)/४४७ (सन २०११-२०१२)**

जिल्हा परिषदा ह्या प्रादेशिक पाणीपुरवठ्याच्या योजना पूर्णपणे कार्यान्वित झाल्यावर त्या योजना ग्रामपंचायतीकडे हस्तांतरीत करून पिण्याच्या पाण्यासाठी व औद्योगिक विभागांसाठी वेगवेगळया दराने पाणीपट्टी वसूल करताना. पाणीपट्टीच्या रक्कमा ग्रामपंचायतीकडे थकित राहिल्याचे सन २०११-२०१२ या लेखापरिक्षणातून दिसून आले आहे. याबाबत उणिवा खालीलप्रमाणे आहेत.

(१) वसूलपात्र रकमांबाबत नोंदवह्या ग्रामपंचायती, पंचायत समित्या व जिल्हा परिषदा परीपूर्ण करीत नाहीत. त्यामुळे हिशेब तपासणीत अडचणी येतात. मागील थकबाकी, चालू मागणी व व्याज आणि एकूण थकित रकमा यांचा आढावा घेऊन रकमा वसुलात आणणे आवश्यक असताना याकडे विशेष लक्ष दिले जात नाही.

(२) काही जिल्हा परिषदांच्या लघुपाटबंधारे विभागाच्या स्वतंत्र योजना आहेत. तर ज्या ठिकाणी अशा योजना नाहीत त्या ठिकाणी महाराष्ट राज्य औद्योगिक विकास महामंडळामार्फत पाणीपुरवठा जिल्हा परिषद करतात. त्यांची रक्कम थकित राहिल्याने व्याजारहित व वर्षागणिक रक्कम वाढत आहे. वसुलीसाठी ठोस उपाययोजना जिल्हा परिषदा अंमलात आणत नाही.

(३) लघुपाटबंधारे विभागाने योजना राबविल्यानंतर त्या योजना जिल्हा परिषदांकडे हस्तांतरीत करण्यासाठी जास्त कालावधी लागतो. अशा योजनांची वसूली जास्त प्रमाणात जिल्हा परिषदांकडे थकित दिसते. तरी याबाबत योग्य उपाययोजना करून रकमा वसुलात आणणे आवश्यक आहे. सदर थकित रकमा कांही कोटी रूपयाहून जास्त आहेत. अशा जिल्हा परिषदांची माहिती उदाहरणादाखल पुढील तक्त्यात देण्यात येत आहे. तरी रक्कम रुपये ४७,६०,९४,८०४/- वसुलात आणणे आवश्यक आहे.

| अ. क्र. | जिल्हा परिषदेचे नांव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ८ | सांगली | ग्रामीण पाणी पुरवठा | १४ | ४,४८,२७,२५५/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सांगली यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) वसुलपात्र रक्कमा बाबत ग्रामपंचायत व पंचायत समिती पातळीवर अद्ययावत नोंदवहया ठेवण्यात आलेल्या आहेत. माहे मे २०१७ अखेर जिल्हा परिषद मार्फत चालविण्यात येणा-या प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांची थकित पाणीपट्टी रक्कम रुपये ७८१४१७७४/- असून यापैकी ग्रामपंचायतीकडून त्यांना उपलब्ध होणाऱ्या इतर अनुदानातून रक्कम रुपये ३३७६०८८/- पाणीपट्टीच्या थकबाकी पोटी वसूल केलेले आहेत. चालू मागणी व थकबाकी वसुलीची कार्यवाही सुरू असून थकबाकीदारांच्या नळ जोडण्या तोडण्यात येत आहेत.

(२) महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ मार्फत जिल्हा परिषदकडून कोणत्याही प्रादेशिक योजनेस पाणीपुरवठा केला जात नाही.

(३) माहे मार्च २०१६ अखेर एकूण वसूल रक्कम रुपये २,८५,०२,७३३/- असून थकबाकी रक्कम रुपये ८,८१,१८,२८५/- इतकी आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

सांगली जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २२ नोव्हेंबर, २०१७ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, थकीत पाणीपट्टी वसुलीच्या रक्कमा ग्रामपंचायतीला मिळणाऱ्या अनुदानामधून कपात केल्याने विकास कामांवर परिणाम झाला आहे काय ? जिल्हा परिषद स्तरावर थकित पाणीपट्टीबाबत नोंदवह्या अद्ययावत का ठेवण्यात आल्या नाहीत ? नोंदवह्या अद्ययावत नसल्याने मागणी कशाचे आधारे निश्चित केली जाते ? थकित रकमेच्या अधीन अत्यंत अल्प वसुली करण्यात आलेली आहे ? उर्वरित रकमेचे काय नियोजन करण्यात आले आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, ८ कोटी २५,८५,०१४ इतकी रक्कम थकीत असून १ कोटी ३६ लाख रुपये वसूल झाले आहेत.

समितीने विचारणा केली की, जिल्हा परिषदेमार्फत चालविण्यात येणाऱ्या प्रादेशिक नळपाणी पुरवठा योजनांची थकीत पाणीपट्टी वसुली जिल्हा परिषदेने करणे गरजेचे आहे. जिल्हा परिषदेच्या अखत्यारित या योजना ठेवायच्या असून त्यांचे हस्तांतरण ग्रामपंचायतीकडे करावयाचे नाही.

जिल्हा परिषदेने जबाबदारी न घेता ती ग्रामपंचायतीवर ढकलण्यात आली आहे. पाणीपट्टीच्या वसुलीसाठी ग्रामपंचायत सहाय्य करु शकते. जिल्हा परिषदेची सर्वस्वी जबाबदारी आहे.यावर प्रभारी कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांनी विदति केले की, जिल्हा परिषदेकडून पाणी पुरवठा योजना राबविण्यात येतात. योजना सुरु असताना पाणीपट्टीची वसुली जिल्हा परिषदेने करायची आहे. सदर योजनेची देखभाल व दुरुस्ती ग्रामपंचायत करते ८० टक्के रक्कम पाणीपट्टी जिल्हा परिषदेकडे येत असून २० टक्के रक्कम ग्रामपंचायतीकडे राहतो.

यावर समितीने विचारणा केले की, २२ गावांची एक योजना असेल त्यापैकी १० गावांची ८० टक्के रक्कम दिली व १० गावांनी ८० टक्के रक्कम दिली नाही तर त्या योजनेचे कनेक्शन बंद करता येईल काय, पाणीपट्टी वसुलीची जबाबदारी आपण ग्रामपंचायतीवर टाकली आहे. जिल्हा परिषदेने वसुली केली पाहिजे. सदर योजनांच्या देखभाल दुरुस्तीसाठी जिल्हा परिषद सेवा फंडातून २० टक्के निधी दिला पाहिजे. प्रभारी कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांनी विदित केले की, पाणीपट्टीची ८० टक्के रक्कम जिल्हा परिषदेने घ्यावी व २० टक्के रक्कम ग्रामपंचायतीने घ्यावी असा ८०-२० चा शासन निर्णय आहे. २० टक्के रकमेतून ग्रामपंचायत सदर योजनेची देखभाल दुरुस्ती करते.

यावर समितीने विचारणा केली की, ८० टक्के वसुली जिल्हा परिषद व २० टक्के वसुली ग्रामपंचायतीने करावी व देखभाल दुरुस्ती ग्रामपंचायतीने करावी. असे विभाजन कोणी केले आहे. तानस पाणी पुरवठा योजना जीवन प्राधिकरणाकडून चालविण्यात येत आहे, या योजनेबाबत अशा प्रकारचा निर्णय का घेण्यात येत नाही. प्रभारी कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांनी विदति केले की, ही योजना जिल्हापरिषदेअंतर्गत सुरु झालेली नाही. तानसा ही योजना जीवन प्राधिकरणामार्फत राबविण्यात येत आहे. सदर योजनेत आता काही त्रुटी निर्माण झाल्या आहेत. सदर योजना १० ते ११ वर्षापासून सुरु आहे. त्यामध्ये आताच का त्रुटी काढण्यात आल्या आहेत.

समितीने मत व्यक्त केले की, जीवन प्राधिकरणाच्या योजनेची संपूर्ण जबाबदारी जिल्हा परिषदेकडे आहे. २० टक्के पाणीपट्टीची रक्कम ग्रामपंचायत वसूल करते. १० गावांनी पैसे भरले व १० गावांनी पैसे भरले नाही तर ती योजना सुरु राहील काय, त्यासाठी या सर्व योजना जिल्हा परिषदेकडून चालविणे आवश्यक आहे. लोकांना पिण्याचे पाणी मिळाले पाहिजे. प्रादेशिक नळपाणीपुरवठा योजना चालविण्यास ग्रामपंचायतीला देण्याची गरज नाही. प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनांच्या पाणीपट्टी थकीतीबाबत अनेक गंभीर बाबी दिसून आल्या आहेत. यामध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याचे निदर्शनास येत आहे. हा प्रश्न राज्यस्तरावरील असला तरी यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तातडीने चौकशी केली पाहिजे. हा ठराव जिल्हापरिषदेने केला असेल तर तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तो ठराव रद्द करण्यासाठी आयुक्तांकडे पाठवावयास पाहिजे होता आणि तोपर्यंत कारवाई प्रलंबित ठेवावयास पाहिजे होती. परंतु असे काही झाले नाही आणि धोरणाच्या विरोधात कार्यवाही सुरु केली.

समितीने निदेश दिले की, अधिकाऱ्यांनी अभ्यास केलेला दिसत नाही त्यामुळे त्यांना उत्तर देता येत नाहीत. अधिकारी उत्तर देण्यापूर्वी मी चार महिन्यांपूर्वी रुजू झालो, मी दोन महिन्यांपूर्वी रुजू झालो असे सांगताना आपण पाहिले आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सर्व नियमांचा अभ्यास करावा लागेल. समितीने ज्या काही सूचना केलेल्या आहेत त्याचा अभ्यास करावा. आपण नियमावलीचे अध्ययन करावे. आम्ही अनेकदा पाहिले आहे की, खालच्या अधिकाऱ्यांकडून सचिवांना योग्य प्रकारे ब्रिफींग न झाल्यामुळे सचिवांना देखील व्यवस्थित उत्तरे देता येत नाहीत. तेव्हा विभागाच्या अधिकाऱ्यांनी चांगला अभ्यास करावा. या प्रकरणामध्ये जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करावी. या संदर्भात सचिवांची साक्ष घेण्यात येईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

**पाणी पट्टी थकित वसुली :-** जिल्हा परिषद, सांगली अंतर्गत ग्रामीण पाणीपुरवठा विभाग पाणीपुरवठा विभाग पाणीपट्टी थकित वसुलीप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार थकित वसुली प्रकरणी संबंधितावर जबाबदारी निश्चित करून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे.

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

प्रादेशिक नळपाणीपुरवठा योजनेंच्या थकित पाणीपट्टी वसुलीसंदर्भात चौकशी करण्यात आली. सद्या ११ प्रादेशिक योजना जिल्हा परिषदेमार्फत चालविण्यात येत आहेत.

सन २०११-१२ च्या एकूण रुपये ४,६८,९४,०२५/- पैकी रुपये १,७६,१४,२२३/- वसुली केली आहे. सन २०११-१२ वर्षात वसूल न झालेली रक्कम पुढील वर्षात थकबाकी म्हणून वसूल करण्यात आली आहे. सन २०११-१२ ते सन २०१७-१८ अखेर मागणी करून रुपये १५,३६,६३,९४९/- वसूल करण्यात आलेली आहे.

प्रादेशिक योजना या मुख्यतः दुष्काळी भागात असल्याने कमी प्रमाणात वसूली होत आहे. पाणी पट्टीचा दर रुपये १८००/- करण्यात आला आहे.

मार्च, २०१८ अखेर उर्वरित थकबाकी वसूल करण्यासाठी जिल्हा परिषद स्तरावर आढावा घेवून प्रयत्न केले आहेत. तसचे संबंधित गट विकास अधिकारी संबंधित गावचे सरपंच/ ग्रामसेवक यांची सभा घेवून आवाहन केले आहे.

**मंत्रालय विभागाचा अभिप्राय**

**पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे अभिप्राय :-** जिल्हा परिषदे मार्फत वसुलीची कार्यवाही सुरू आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

समितीने सांगली जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या महितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २७ जानेवारी, २०२१ रोजी विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, पाणीपट्टी थकित वसुली जिल्हा परिषद सांगली अंतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा विभाग आणि पाणीपट्टी थकित वसुलीप्रकरणी चौकशी करण्यात आलीीआहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार थकित वसुलीप्रकरणी संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन कोणती कार्यवाही करण्यात आली आहे ? उत्तर देताना असे सांगितले आहे की, १५ कोटी ३६ लक्ष ९४९ रुपये वसुल करण्यात आले आहेत. वसुलीचे प्रमाण चांगले आहे. उर्वरित वसुली किती बाकी आहे, यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, सन २०११-२०१२ ते २०२०-२०२१ पर्यंत **१४ कोटी २४ लाख ९१ हजार २४ रुपये थकित आहेत.** बऱ्यापैकी वसुली केलेली आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, वसुलीचे प्रमाण किती टक्के आहे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, वसुलीचे प्रमाण ६० टक्के इतके आहे.

**अभिप्राय व शिफारशी**

जिल्हा परिषद हया प्रादेशिक पाणीपुरवठ्याच्या योजना पूर्णपणे कार्यान्वित झाल्यावर त्या योजना ग्रामपंचायतीकडे हस्तांतरीत करून पिण्याच्या पाण्यासाठी व औद्योगिक विभागांसाठी वेगवेगळया दराने पाणीपट्टी वसूल करतात. पाणीपट्टीच्या रक्कमा ग्रामपंचायतीकडे थकित राहिल्याचे सन २०११-२०१२ या लेखापरिक्षणातून निदर्शनास आल्याने थकित पाणीपट्टी वसूल करण्याबाबतची जबाबदारी निश्चित करुन त्यासंदर्भात कार्यवाही करण्यात यावी असे निदेश समितीने दिले.

त्यानुषंगाने प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनेच्या थकीत पाणीपट्टी वसुलीसंदर्भात विभागाने चौकशी करून समितीच्या निदर्शनास आणले की, सद्यःस्थितीत ११ प्रादेशिक योजना जिल्हा परिषदेमार्फत चालविण्यात येत आहेत. सन २०११-१२ च्या एकूण रुपये ४,६८,९४,०२५/- पैकी रुपये १,७६,१४,२२३/- वसुली केली आहे. सन २०११-१२ ते सन २०१७-१८ अखेर रुपये १५,३६,६३,९४९/- वसूल करण्यात आलेली आहे. सन २०११-२०१२ ते २०२०-२०२१ पर्यंत १४,२४,९१,०२४/- रुपये थकीत आहे. सदरहू योजना या मुख्यतः दुष्काळी भागात असल्याने कमी प्रमाणात वसूली होत असून वसुलीचे प्रमाण ६० टक्के इतके आहे. विभागाकडून वसूली संदर्भात केलेल्या कार्यवाहीबाबत समिती समाधान व्यक्त करीत आहे.

**तथापि, लघुपाटबंधारे विभागाने योजना राबविल्यानंतर त्या योजना जिल्हा परिषदांकडे हस्तांतरीत करण्यासाठी जास्त कालावधी लागतो. अशा योजनांची वसूली जास्त प्रमाणात जिल्हा परिषदांकडे थकित असल्याचे दिसून येते. यासाठी योग्य त्या उपाययोजना करुन रक्कमा वसूल करणे आवश्यक आहे. तसेच थकित असलेली १४,२४,९१,०२४/- इतकी रक्कम वसूल करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात यावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती तीन महिन्याच्या आत समितीला सादर करण्यात यावी, अशी शिफारस समिती करीत आहे.**

## प्रकरण नऊ

## जिल्हा परिषद, सांगली

## उपकर निधीतून ताडपत्री खरेदीत झालेली अनियमितता

**परिच्छेद क्र. ४.२२९ (सन २०११-२०१२)**

पंचायत समिती मिरज कृषी विभागाने केंद्र शासनाच्या दर करारानुसार ५० टक्के अनुदानावर लाभार्थी शेतकरी यांना वाटप करण्यासाठी २३४ नगाची रक्कम रुपये ३४८४९८/-डेझी टेडींग मुंबई यांना अदा केलेली आहे. सदर योजनेची कागदपत्रे पाहून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) महाराष्ट्र शासनाच्या ताडपत्री खरेदीचा दरकरार उपलब्ध असतांना केंद्र शासनाच्या दरकराराप्रमाणे खरेदी केलेली आहे.

(२) केंद्र शासनाच्या दरकरारानुसार डेझी टेडींग कॉर्पोरेशनचा दर रक्कम रु. २८०८/- असून नवीन दरकरार रुपये ३२४०/- इतका असून त्या दराप्रमाणे अनुक्रमे १४२ व ९२ नग खरेदी केलेली आहे. परंतू सदर खरेदी करतांना केंद्र शासनाच्या अल्टेक्स प्लास्टीकोट प्रा.लि. यांचे दराचा विचार न केल्याने खरेदी योग्य दराने झालेली नाही. त्याप्रमाणे केंद्र शासनाच्या प्रत्यक्ष मागणी अधिकारी यादीत जिल्हा परिषदेचा समावेश नसतांना खरेदी केली आहे.

(३) लाभार्थीची मागणी नसतांना ताडपत्री खरेदी करून वाटप केलेले आहे.

(४) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्र.मागास/२००१/प्र.क्र. ७८/३४, दिनांक २०/०४/२००१ अन्वये लाभार्थी निवडीस पंचायत समितीची मान्यता घेतलेली नाही. महाराष्ट्र शासन परिपत्रक ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्र. पंरास/१०८४/सीआर/ १६३३/५७८ दिनांक १९/०१/१९९५ नुसार लाभार्थी हिस्सा वसूल करण्यापूर्वी खरेदी करून योजना राबविलेली आहे.

(५) पुरवठा केलेल्या साहित्याची महाराष्ट्र शासन उद्योग व ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.भांखस/१०८८/२५१२/उद्योग-६ दिनांक ०२/०१/१९९२ मधील तरतुदीनुसार मान्यता प्राप्त प्रयोग शाळेकडून तपासणी न करता पुरवठादारास अंतिम प्रदान केले आहे.

(६) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र.आखंस/१०९३/ प्र.क्र.१२३९/३४, दिनांक १/०९/१९९३ प्रमाणे लाभार्थीचे गावनिहाय मास्टर रजिस्टर ठेवलेले नाही. त्यामुळे लाभार्थींना दुबार लाभ दिल्याची पडताळणी करता आलेली नाही.

(७) सदर खरेदीच्या बिलातून आयकर रक्कम रुपये १५७४८/- कपात केलेली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सांगली यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) तत्कालिन परिस्थितीत दिनांक ०८/०२/२०११ रोजी केंद्र शासनाकडील मे. डेझी टेडींग कॉर्पोरेशनचा दरकरार प्राप्त झालेला आहे. सदर शासन निर्णयानुसार खरेदी प्रक्रीया सुरू करून दिनांक १४/०९/२०११ अखेर तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी घेण्यात आलेली होती. या दरम्यान दिनांक २४/११/११ रोजी राज्य शासनाचा दरकरार प्राप्त झाला परंतू त्यापूर्वी अलहिदा तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी घेण्यात आली असल्याने केंद्र शासनाकडील दरकरारानुसार खरेदी करण्यात आलेली आहे.

(२) पंचायत समिती मिरज कडील सभा दिनांक २३/११/२०११ च्या ठराव क्र. ५८१ अन्वये कॅनव्हास ताडपत्री खरेदी करण्याबाबतचा ठराव केलेला असून त्याप्रमाणे तांत्रिक व प्रशासकीय मान्यता घेण्यात आली आहे. शासन दरकरारानुसार अल्टेक्स प्लास्टीकोट प्रा.लि. यांचा कॅनव्हास ताडपत्रीचा दरकरार नसून केवळ प्लासिटक ताडपत्री खरेदीच्या अनुषंगाने सदरची खरेदी पुर्ववत डेझी कंपनीकडून करण्यात आलेली आहे.

(३) लाभार्थीचे प्रस्ताव घेऊनच शासनाच्या मार्गदर्शक सुचनानुसार पात्र लाभार्थींना सदर साहित्याचे वाटप करण्यात आलेले आहे.

(४) ही बाब खरी आहे तथापि पंचायत समिती सभा दिनांक ०४/०६/२०१६ मध्ये ठराव क्र. ६०९ अन्वये लाभार्थी यादीस कार्योत्तर मान्यता घेतलेली आहे. यापुढे लाभार्थी हिस्सा साहित्य खरेदीपूर्वी जमा करणेचे दक्षता घेणेत येत आहे.

(५) भारतीय मानक ब्युरो (बी.आय.एस.) मान्यताप्राप्त संस्थेकडून साहित्याचा चाचणी अहवाल दिनांक १२/०१/२०१२ अन्वये प्राप्त झाल्यानंतर देयकाची अंतिम अदाई प्रमाणक क्र. २ दिनांक १६/०१/२०१२ अन्वये करण्यात आलेली आहे. त्याची तपासणी अहवाल प्रत दप्तरी उपलब्ध आहे.

(६) पंचायत समिती स्तरावर मास्टर रजिस्टर ठेवणेत आलेले आहे. क्षेत्रीय अधिकारी यांनी स्थानिक चौकशीवरून दुबार लाभ झाले नसल्याची खात्री केलेली आहे.

(७) पुरवठादाराकडून सदर बिलाची आयकर रक्कम रु. १५७४८/- वसूली केलेली आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

सांगली जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २२ नोव्हेंबर, २०१७ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, मिरज तालुक्यासंबंधात समिती सदस्यांनी दोन महिन्यांपासून मुख्य कार्यकारी अधिकारी, गट विकास अधिकारी यांच्याकडे वारंवार तक्रारी केलेल्या आहेत. त्यासंबंधात अजून काहीही कारवाई करण्यात आलेली नाही. कवलापूर येथे रिलायन्स कंपनीने वायर टाकली आहे. त्यासाठी ९.०० लाख रुपये दिले आहेत. कवलापूर, एरंडोली, सलगर, मालगावची चार प्रकरणे दिलेली आहेत. त्यासंबंधात कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात आलेली नाही. तेव्हा या चार कामासंबंधी आपण काय केले आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, एरंडोली येथील चौकशी अहवाल आलेला आहे. आरोप सिद्ध झाला असून ग्रामसेवकांना निलंबित करण्यात आले असून विभागीय चौकशी सुरू आहे.

यावर समितीने अशी विचारणा केली की, प्रत्येक ठिकाणी ग्रामसेवकाला निलंबित करण्यात आले आहे. त्यावर सरपंचांच्या देखील सह्या आहेत. त्यांच्यावर आपण काय कारवाई केली आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस अशी माहिती दिली की, सलगर मध्ये अपील घेऊन सरपंचाना अपात्र ठरविण्यात आलेले आहे. कवलापूरच्या बाबतीत विभागीय आयुक्तांकडे नियम ३९ (१) चा प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, समिती सदस्य यांनी मिरज पंचायत समिती संबंधातील काही मुद्दे उपस्थित केले आहेत. या प्रकरणी ग्रामसेवकांना निलंबित करण्यात आले आहे. तेव्हा या प्रकरणी जे वरिष्ठ अधिकारी दोषी असतील त्यांची चौकशी करून कारवाई झाली पाहिजे व त्यासंदर्भातील अहवाल समितीला सादर करावा. तसेच सरपंचांच्या देखील सह्या आहेत. त्यांनी देखील अनियमितता केली असेल तर त्यांच्यावर कारवाई करावी व केलेल्या कारवाईचा संपूर्ण अहवाल समितीला पाठवून द्यावा. त्यांनी मिरज तालुक्यातील काही प्रश्न उपस्थित केलेले आहेत. तेव्हा त्यासंबंधात चौकशी करावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला पाठवून द्यावा. तसेच लेखा परीक्षणामध्ये अभिलेखे उपलब्ध करून दिलेले नाही. त्याची देखील पूर्ण चौकशी करावी. तसेच, लेखा परीक्षणाच्या वेळी अभिलेखे उपलब्ध करून न दिल्यामुळे संबंधितांविरूद्ध रुपये २५००० दंड आकारावा तसेच त्यांची एक वेतनवाढ एक वर्षासाठी रोखण्यात यावी व त्याची नोंद सेवा पुस्तिकेमध्ये घेऊन त्यासंबंधीचा अहवाल समितीला पाठवून द्यावा, असे निदेश समितीने दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

**उपकर निधीतून ताडपत्री खरेदीत झालेली अनियमितता :—** कवलापूर, एरोंडली, सलगरे, मालगाव येथील ग्रामपंचायती प्रकरणे मुख्य कार्यकारी अधिकारी, गट विकास अधिकारी यांच्याकडे दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने संबंधितांच्या विरूद्ध कोणती कार्यवाही करण्यात आली आहे. नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत.

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

पंचायत राज समितीच्या सांगली जिल्हा परिषद भेटीच्या दरम्यान उपस्थित करण्यात आलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(१) **सलगरे :—** ग्रामपंचायत सलगरे, ता.मिरज येथील अनियमितकामकाजाबाबत श्री. डी. एस. जोशी, ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत सलगरे, ता.मिरज यांची एक वेतनवाढ कायम स्वरूपी बंद केली होती परंतू सदर आदेश विरूद्ध त्यांनी मा. विभागीय आयुक्त पुणे यांचेकडे अपील केले होते सदर अपिलामध्ये अंशता बदल करून त्यांची एक वेतन वाढ तात्पुरती बंद करणेची शास्ती दिनांक १६/१२/२०१९ च्या आदेशान्वये दिली आहे त्याप्रमाणे दिनांक १५/०१/२०२० अन्वये आदेश संबंधिताना वर्ग करणेत आला आहे. तसेच श्री. तानाजी महादेव पाटील सरपंच सलगरे ता. मिरत, जि. सांगली यांना कर्तव्यात कसूर केलेबाबत महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मधील कलम ३९ नुसार सरपंच व सदस्य पदावरून काढण्यात आले होते त्यावर सरपंच यांनी मा.मंत्री (ग्रामविकास) यांचे न्यायालयात अपिल दाखल केले होते. त्यावर दिनांक ०७/०२/२०२० रोजीच्या पारित आदेशानुसार अपिलार्थी यांचे अपिल मान्य केले आहे. मा.विभागीय आयुक्त, पुणे यांचा दिनांक ०९/१२/२०१९ चा आदेश रद्द करणेत आला आहे.

(२) **मालगाव :—**श्री.एम.एस.धेंडे तत्कालीन ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत मालगाव, ता. मिरज येथील अनुसूचित जाती व नौवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास करणे, १४ वा वित्त आयोग एलईडी बल्ब खरेदी करणे यामध्ये अनियमितता केलेने त्यांना दिनांक १८/१२/२०२० रोजीच्या आदेशान्वये तीन वेतनवाढी कायम स्वरूपी का बंद करणेत येऊ नये अशी शास्ती पूर्व नोटीस देण्यात आली आहे. खुलासा प्राप्त होताच शास्ती अंतिम करणेत येत आहे.

(३) **कवलापूर :—**ग्रामपंचायत कवलापूर, ता. मिरज येथील अनियमित कामकाजाबाबत गट विकास अधिकारी पंचायत समिती तासगाव यांचे दिनांक १९/१२/२०१७ रोजीचे चौकशी अहवालास अनुसरुन श्री.एम.पी.कांबळे, श्री. ए. के. पाटील, श्री.ए.पी.माने, श्री. एम. एस. धेंडे व श्री. एस. एस. पाटील ग्रामविकास अधिकारी यांना दोषारोप पत्र बजावले होते सदर दोषारोपाचा खुलासा अमान्य करून विभागीय चौकशी प्रस्तावित करणेत आली आहे. मा. विभागीय आयुक्त, पुणे यांनी दिनांक १६/०६/२०२० च्या आदेशान्वये सरपंच, उपसरपंच व सदस्य ग्रामपंचायत कवलापूर ता. मिरज, जि.सांगली यांना कर्तव्यात कसूर बाबत ग्रामपंचायतीच्या उर्वरित कालावधी साठी सरपंच व सदस्य पदावरून काढून टाकण्यात आले होते. त्यावर सरपंच, उपसरपंच व सदस्य ग्रामपंचायत कवलापूर ता.मिरज जि.सांगली यांनी मा.मंत्री (ग्रामविकास) यांचे न्यायालयात अपिल दाखल केले होते त्यावर दिनांक १४/०७/२०२० रोजीच्या पत्रान्वये मा.विभागीय आयुक्त, पुणे यांच्या दिनांक १६/०६/२०२० रोजीच्या आदेशास स्थगिती देणेत आलेली आहे.

(४) **एरंडोली :—**श्री. उमेश कृष्णा नावाळे ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत एरंडोली ता. मिरज, जि. सांगली यांचे अनियमित कामकाजाबाबत दिनांक १७/०३/२०२० आदेशान्वये निम्न श्रेणीवर आणणेची कार्यवाही करणेत आली आहे. विभागीय चौकशी पूर्ण झाली आहे.

## मंत्रालय विभागाचा अभिप्राय

ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :—(पं.रा.(६) जिल्हा परिषदेच्या अभिप्रायाशी सहमत. मौजे कवलापूर ग्रांमपंचायती संदर्भात महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम ३९ (३) नुसार शासनाकडे प्रस्ताव प्राप्त झाल्यास यथोचित कार्यवाही करण्यात येईल.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने सांगली जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक सुस्पष्ट माहिती घेण्यासाठी दिनांक २७ जानेवारी, २०२१ रोजी विभागीय सचिवांची साक्ष आयोजित करण्यात आली होती. सदर साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, कवलापूर, एरंडोली, सलगरे, मालगाव येथील ग्रामपंचायती प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, गटविकास अधिकारी यांच्याकडे दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने संबधितांच्या विरूद्ध कोणती कार्यवाही करण्यात आली आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत, यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी समितीस विदित केले की, यासंदर्भात योग्य ती कार्यवाही केलेली आहे.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायत समिती, मिरज कृषी विभागाने ५० टक्के अनुदानावर लाभार्थी शेतकरी यांना कॅनव्हास ताडपत्री वाटप करण्यासाठी डेझी टेडींग कॉर्पोरेशन यांना महाराष्ट्र शासनाच्या ताडपत्री खरेदीचा दरकरार उपलब्ध असतांना केंद्र शासनाच्या दरकराराप्रमाणे रक्कम अदा केली आहे. तसेच कवलापूर, एरोंडली, सलगरे व मालगाव येथील ग्रामपंचायती प्रकरणे मुख्य कार्यकारी अधिकारी, गट विकास अधिकारी यांच्याकडे दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने या प्रकरणात झालेल्या अनियमिततेची चौकशी करून कारवाई करण्यात यावी असे निदेश समितीने दिले.

त्यानुसार सलगरे, ता.मिरज येथील अनियमित कामकाजाबाबत ग्रामविकास अधिकारी यांची एक वेतनवाढ कायमस्वरुपी बंद केली आहे. तसेच कवलापूर, ता.मिरज येथील अनियमित कामाकाजाबाबत गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तासगाव यांच्या चौकशी अहवालास अनुसरून ५ ग्रामविकास अधिकारी यांची विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे ग्रामपंचायत मालगाव, ता. मिरज येथील अनुसुचित जाती व नौवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास करणे, १४ वा वित्त आयोग एलईडी बल्ब खरेदी करणे यामध्ये अनियमितता केलेल्या तत्कालीन ग्रामविकास अधिकारी यांच्या तीन वेतन वाढी कायम स्वरूपी का बंद करण्यात येऊ नये अशी नोटीस देण्यात आली आहे. तसेच एरंडोली, ता. मिरज येथील अनियमित कामकाजाबाबत ग्रामविकास अधिकारी यांना निम्न श्रेणीवर आणण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. यासंदर्भातील विभागीय चौकशी पूर्ण झाली आहे. या प्रकरणांबाबत केलेल्या कारवाईवर समिती समाधान व्यक्त करत आहे.

**तसेच या प्रकरणांमधील प्रस्तावित विभागीय चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर केलेल्या कारवाईची माहिती तीन महिन्यांच्या आत समितीला सादर करावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

प्रकरण दहा

## जिल्हा परिषद, सांगली

## लेखापरिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून न दिल्याबाबत

**(१) परिच्छेद क्रमांक ३.२०/४० (सन २०११-२०१२)**

**सरपंच मानधन व सदस्य बैठक भत्ता व कर्मचारी किमान वेतन अनुदान वाटपाबाबत जिल्हा परिषद सांगली, सन २०११-१२ (परिच्छेद क्रमांक ४०).**

सामान्य प्रशासन विभाग, ग्रामपंचायत विभाग जिल्हा परिषद सांगलीचे सन २०११-१२ चे लेखापरिक्षणामध्ये जिल्ह्यातील ७०५ ग्रामपंचायतींना सरपंच मानधन व सदस्य बैठक भत्यापोटी रुपये ५१,७९,००० व कर्मचारी किमान वेतन अनुदानापोटी रुपये १,२३,६६,८२०/- इतकी रक्कम वाटप केलेली आहे याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

सरपंच मानधन व सदस्य बैठक भत्त्यापोटी प्राप्त अनुदानातुन खर्च वजा जाता रुपये २,७१,०५०/- इतकी रक्कम अखर्चित राहिलेली आहे. तसेच कर्मचारी किमान वेतनापोटी प्राप्त अनुदानातून खर्च वजा जाता रुपये ३,५४,१८०/- इतकी रक्कम अखर्चित राहिलेली आहे म्हणजे एकूण रुपये ६,२५,२३०/- इतकी रक्कम आवश्यकता नसताना कोषागारातून अहरित केली आहे.

लेखापरिक्षण कालावधीत कार्यरत असलेल्या सरपंचाची संख्या व सदस्यांची संख्या, पात्र व अपात्र सरपंच व सदस्य संख्या तसेच गैरहजर व मयत असल्यास ती संख्या तसेच एकूण मंजूर कर्मचारी संख्या व ग्रामपंचायतनिहाय प्रत्यक्षात असलेली कर्मचारी संख्या लेखापरिक्षणाचे अर्धसमास पत्र क्र २, दिनांक २८/०९/२०१२ अन्वये मागणी करूनही माहिती लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाही. त्यामुळे वाटप केलेले अनुदान योग्य असलेली खात्री करता आली नाही.

आर्थिक वर्ष संपलेनंतर अखर्चित अनुदान तत्काळ शासन निधीत भरणा करणे आवश्यक असताना मागील आर्थिक वर्षातील अखर्चित अनुदान विलंबाने भरणा केलेले आहे. विलंबाबाबतची कारणे स्पष्ट होणे आवश्यक आहे.

लेखापरिक्षणामध्ये पंचायत समितीनिहाय आढळुन आलेल्या उणिवा खालीलप्रमाणे आहेत.

**(१) पंचायत समिती, मिरज,—**

सरपंच मानधन व सदस्य बैठक भत्यापोटी रक्कम रुपये ५,१४,३५०/- ५४ ग्रामपंचायतींना वाटप करण्यात आले असून सदर ग्रामपंचयातींना एकूण ४८२ मासिक सभेसाठी रुपये २५/- दराने रुपये १२,०५०/- इतके जादा अनुदान वाटप झाले आहे. जादा वाटप केलेली रक्कम रुपये १२,०५०/- संबंधितांकडुन वसूल करून शासन निधीत भरणा करणे आवश्यक आहे.

**(२) पंचायत समिती, वाळवा,—**

सरपंच मानधन व सदस्य बैठक भत्यापोटी पंचायत समिती अंतर्गत ९४ ग्रामपंचायतींना रुपये ६,७६,९७५/- इतके अनुदान वाटप करणेत आलेले आहे.

(अ) सरपंच मानधन/ सदस्य बैठक भत्ता पोहोच झालेबाबत २६ ग्रामपंचायतींच्या नमुना नंबर ७ मधील पोहोच पावत्या घेतलेल्या नाहीत.

(ब) प्राप्त झालेल्या अनुदानाबाबत उपयोगिता प्रमाणपत्रे सादर केलेली नाहीत.

(क) ५०% कर्मचारी किमान वेतन अनुदानातील अखर्चित रक्कम रुपये ३५,६००/-शासन निधीमध्ये भरणा करणे आवश्यक आहे.

**(३) पंचायत समिती, कवठेमहांकाळ,—**

सरपंच मानधन व सदस्य बैठक भत्ता आणि ग्रामपंचायत कर्मचारी किमान वेतनापोटी रक्कम रुपये ११,६४,३००/- इतकी अदा केली आहे.

(अ) अनुदान प्राप्त झालेबाबत २९ ग्रामपंचायतींच्या नमुना नंबर ७ मधील पोहोच पावत्या घेतलेल्या नाहीत.

(ब) ग्रामपंचायत अलकुड एम यांना वितरित अनुदानात सदस्य बैठक भत्त्यामध्ये रक्कम रुपये ४५०/- व कर्मचारी किमान वेतन यामध्ये रक्कम रुपये ४५०/- कमी ची पोच दिली आहे.

**(४) पंचायत समिती, जत,—**

सरपंच मानधन व सदस्य बैठक भत्त्यापोटी रक्कम अनुक्रमे रुपये ५,१८,४००/- व २,७६,९००/- इतके अनुदान वाटप करणेत आले होते.

(अ) सरपंच मानधनासाठी वाटप केलेल्या रुपये ५,१८,४००/- बाबत ग्रामपंचायतकडून नमुना नंबर ७ मधील पोहोच पावत्या घेतलेल्या नाहीत.

(ब) सदस्य बैठक भत्याची रक्कम प्रत्यक्ष उपस्थितीच्या आधारे वाटप करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

(क) कर्मचारी किमान वेतन अनुदान वाटप आदेश अ.क्र. २१ ते ११७ मधील ग्रामपंचायतींना रुपये ४,३३,०००/- इतके अनुदान वाटप केलेले असून रक्कम प्राप्त झालेबद्दल ग्रामपंचायतकडून नमुना नंबर ७ मधील पोहोच पावत्या घेतलेल्या नाहीत.

**(५) खानापुर पंचायत समिती, विटा,—**

सदस्य बैठक भत्त्यापोटी पंचायत समिती अंतर्गत ६५ ग्रामपंचायतींना रुपये १,३६,६००/- अनुदान वाटप करणेत आलेले आहे

(अ) सदस्य बैठक भत्ता मिळालेबद्दल एकूण २१ ग्रामपंचायतीकडील नमुना नंबर ७ सामान्य पावती लेखापरिक्षणास उपलब्ध झाल्या नाहीत.

(ब) ग्रामपंचायतींच्या सभांना गैरहजर असतानाही ६ ग्रामपंचायतीच्या सदस्यांना एकूण रुपये १,१५०/- इतका सदस्य बैठक भत्ता अदा केलेला आहे. सदरची रक्कम वसुलात आणून शासन निधीत भरणा करणे आवश्यक आहे.

**(६) पंचायत समिती, पलुस,—**

सरपंच मानधनापोटी रक्कम रुपये १,६९,२००/- व कर्मचारी किमान वेतनापोटी रुपये ५,८०,८००/- इतकी रक्कम ३४ ग्रामपंचायतींना वाटप करणेत आलेली आहे.

(अ) ६ ग्रामपंचातींना सरपंच मानधानासाठी वाटप केलेल्या रुपये १३,२००/- बाबत ग्रामपंचायतकडून नमुना नं ७ मधील पोहोच पावत्या घेतलेल्या नाहीत.

(ब) कर्मचारी किमान वेतन अनुदान रुपये ७,२००/- प्राप्त झालेबाबत ग्रामपंचायत बुंरुगवाडीची नमुना नं ७ मधील पोहोच पावती घेतलेली नाही.

**(७) पंचायत समिती, तासगाव,—**

किमान वेतन अनुदानापोटी रुपये १२,९७,२००/- अदा केलेले आहेत व सदर रकमेतून पाणीपट्टीची रुपये. ४,६५,९००/- इतकी रक्कम कपात करून घेतलेली आहे. तसेच सरपंच मानधनापोटी रुपये ४,२२,३००/- इतके अनुदान अदा केलेले आहे.

(अ) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग शासन परिपत्रक क्र. व्हीपीएम २००९/प्र. क्र. १३९/ पंरा ३, दिनांक १४ जुलै, २००९ अन्वये उपस्थितीचे प्रमाणपत्र घेणे आवश्यक असताना तसे प्रमाणपत्र घेतलेले नाही.

(ब) किमान वेतनानुसार सर्व ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांची व ग्रामपंचायतीच्या हिश्श्याची रक्कम कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये जमा केल्याची खात्री केलेली नाही.

(क) ग्रामपंचायतीने स्वतःच्या उत्पन्नाचा विचार करून कर्मचारी नेमलेबाबत पंचायत समितीने खात्री केलेली नाही.

(ड) अनुदान प्राप्त झालेबाबत ग्रामपंचायतीकडून नमुना नं. ७ मधील पोहोच पावती घेतलेली नाही.

(ई) अनुदानातुन रक्कम रुपये ४,६५,९००/- एवढी पाणीपट्टी वसुलीपोटी कपात केली आहे. त्याची पावती ग्रामपंचायतींना देण्यात आलेली नाही. त्यामुळे ग्रामपंचायतींनी सदर रक्कम भरणा केलेबाबत लेखात नोंद घेतली नसल्याची शक्यता आहे.

(फ) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र.व्हीपीएम २००९/ प्र.क्र. १२५/परां-३, दिनांक २७ जुलै २००९ नुसार ग्रामपंचायतींनी अदा केलेल्या सरपंच मानधनाच्या ७५% इतके अनुदान देय आहे तथापि पंचायत समितीने ग्रामपंचायतींना १००% प्रमाणे अनुदान अदा केलेले आहे. त्यामुळे रुपये १,०५,५७५/- जादा अनुदान अदा झालेले आहे. जादा अदा केलेले अनुदान अंतिम अमान्य करण्यात येत आहे. सदर रक्कम शासन निधीमध्ये भरणा केलेचे दाखवावे तसेच उक्त शासन निर्णयाप्रमाणे रक्कम रुपये ४००, ६०० व ८०० प्रमाणे ग्रामपंचायतींनी सरपंचांना मानधन आदा केल्याबाबतची कागदपत्रे नाहीत. सदस्य सभेस उपस्थित असलेबाबतची उपस्थितीपत्रके प्राप्त करून न घेता बैठक भत्त्याची रक्कम वर्ग केली आहे.

**(८) पंचायत समिती, आटपाडी**

कर्मचारी किमान वेतनापोटी रुपये ८,७०,०००/- इतकी रक्कम ५६ ग्रामपंचायतींना वाटप करणेत आलेली आहे.

(अ) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक २३९९/प्र.क्र./२०६ (१)/ २१, दिनांक २१/११/२००० नुसार ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना किमान वेतन देणे बंधनकारक आहे. तथापी ग्रामपंचायतींनी कर्मचाऱ्याना किमान वेतन दिले आहे किंवा नाही दिले असल्यास त्याप्रमाणात शासनाकडे अनुदान मागणी केलेबाबत मागणी पत्रके उपलब्ध झाली नाहीत. त्यामुळे किमान वेतन अदा न होताच अनुदान दिले अगर कसे याबाबत खात्री पटत नाही.

(ब) अनुदान नोंदवही ठेवलेली नाही त्यामुळे येणे अनुदानाबाबत खात्री पटत नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सांगली यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) गट विकास अधिकारी पंचायत समिती (सर्व) यांचेकडून वर्षाच्या सुरुवातीस सर्व ग्रामपंचायत कर्मचारी, सरपंच, सदस्य हजर असलेप्रमाणे मागणी घेतली आहे. त्याप्रमाणे शासनाकडुन प्राप्त झालेले अनुदान कोषागारातुन आहरित केले गेले आहे. मात्र प्रत्यक्षात ग्रामपंचायतींना अनुदान अदा करताना कार्यरत ग्रामपंचायत कर्मचारी, उपस्थितीनुसार सरपंच व ग्रामपंचायत सदस्य यांचा विचार करुन अनुदान अदा केले जाते, त्यामुळे अनुदान कमी खर्ची पडते. त्यामुळे मागणी केलेनुसार कोषागारातून अनुदान आहरित केलेले आहे.

(२) गट विकास अधिकारी पंचायत समिती (सर्व) यांचेकडून आलेल्या मागणीनुसार अनुदान वर्ग केले आहे. गट विकास अधिकारी स्तरावरुन कार्यरत सरपंचांची संख्या व सदस्यांची संख्या, पात्र/अपात्र सरपंच व सदस्य संख्या, तसेच गैरहजर व मयत असल्यास ती संख्या, तसेच एकुण मंजुर कर्मचारी संख्या व ग्रामपंचायत निहाय प्रत्यक्षात असलेली संख्या विचारात घेऊनच अंतिम अनुदान वर्ग केले जाते. सदरचे दप्तर पंचायत समिती स्तरावर उपलब्ध आहे, त्यामुळे पंचायत समिती स्तरावरुन ग्रामपंचायतींना वाटप केलेले अनुदान योग्य आहे. तसेच याबाबत सर्व गट विकास अधिकारी यांचे प्रमाणपत्र घेणेत आलेले आहे.

(३) सन २०११-१२ हे आर्थिक वर्ष संपलेनंतर प्राप्त अनुदान व झालेला खर्च आणि शिल्लक अनुदानाचा ताळमेळ सर्व पंचायत समिती यांनी वित्त विभाग तसेच ग्रामपंचायत विभाग यांचेशी घेतलेनंतर अनुदान दिनांक १५/०२/२०१३ रोजी भरणा केलेले आहे.

(४) लेखापरिक्षणामध्ये पंचायत समितीनिहाय आढळून आलेल्या उणिवांची पूर्तता खालील प्रमाणे केलेली आहे.

**(१) पंचायत समिती, मिरज**

आक्षेपात नमुद केलेनुसार आदेश क्र. २३३ दि. ३१/०३/२०१२ अन्वये ग्रामपंचायतींस ९ महिन्यांचे मासिक सभेचे अनुदान अदा केले आहे. सदर आदेशामध्ये अंकली ग्रामपंचायतीसमोर ११ सदस्य नमुद करणे ऐवजी ८ सदस्य नमुद आहेत. त्यामुळे १४ सभा जादा दिसून येतात. तथापि, प्रत्यक्षात ११ सदस्य असलेमुळे १४ सभा जादा झालेल्या नाहीत. त्यामुळे १४ x २५= ३५० जादा झालेली नाहीत.

आदेश क्र. ७१२, दि. ३१/०३/२०१२ अन्वये ग्रामपंचायतींस माहे जानेवारी, २०१२ ते माहे मार्च, २०१२ असे ३ महिन्यांचे मासिक सभेचे अनुदान अदा केले आहे. परंतु आदेशामध्ये नजरचुकीने माहे फेब्रुवारी, २०१२ ते माहे मार्च, २०१२ असा उल्लेख झाला आहे. त्यामुळे ४६८ सदस्यांना बैठक भत्ता जादा अदाई झाल्याचे नमूद आहे पैकी माहे जानेवारी, २०१२ ते माहे मार्च, २०१२ असे ३ महिन्यांचे बैठक भत्ता मध्ये ३९१ सदस्यांचे सदस्य भत्त्याचे अनुदान वाटप बरोबर असून ग्रामपंचायत शिंदेवाडी-४ सदस्य, रसुलवाडी-१ सदस्य व बामणोली-४ सदस्य अशी एकूण ९ सदस्य संख्या आक्षेपात जादा नमूद असलेने एकूण ३९१+९=४०० सभा जादा झालेल्या नाहीत व वसुल पात्र जादा झालेल्या ६८ सदस्यांचे बैठक भत्ता प्रति सभा २५/- रुपये प्रमाणे ६८ x २५ = १७०० रुपये दिनांक ९ ऑगस्ट, २०१२ संबंधितांकडून वसूल करुन शासन सदरी भरणा केलेली आहे.

**(२) पंचायत समिती, वाळवा**

आक्षेपात नमुद केलेप्रमाणे

(अ) सरपंच मानधन सदस्य बैठक भत्ता पोहोच झालेबाबत २६ ग्रामपंचायतीच्या नमुना नंबर ७ च्या पावत्या घेणेत आलेल्या आहेत.

(ब) प्राप्त झालेले अनुदानाबाबत गट विकास अधिकारी पंचायत समिती यांचे उपयोगिता प्रमाणपत्र घेणे आलेले आहे.

(क) ५० % कर्मचारी किमान वेतन अनुदानातील अखर्चित रक्कम शासन निधीमध्ये भरणा केली आहे.

**(३) पंचायत समिती, कवठेमहांकाळ**

(अ) सरपंच मानधन व सदस्य बैठक भत्ता व कर्मचारी किमान वेतन अनुदान आदा केलेल्या आक्षेपात नमूना केलेप्रमाणे या गटाकडील ६० ग्रामपंचायतीची नमुना नंबर ७ पावत्या घेऊन दप्तरी ठेवणेत आलेल्या आहेत.

(ब) पंचायत समितीकडून ग्रामपंचायत अलकूड यांना सदस्य बैठक भत्यापोटी रक्कम रुपये २,४००/- व कर्मचारी किमान वेतनापोटी रक्कम रुपये ६,६००/- इतके अनुदान वर्ग केले असून त्यानुसार नमुना नंबर ७ च्या पावत्या प्राप्त झालेल्या आहेत. रक्कम रुपये ४५०/- ची कमी पोच प्राप्त झालेली नाही.

**(४) पंचायत समिती, जत**

(अ) सरपंच मानधनासाठी वाटप केलेल्या रक्कम रुपये ५,१८,४००/- बाबत सर्व ग्रामपंचायतीकडून नमुना नंबर ७ मधील पोहोच पावत्या घेवून पंचायत समिती दप्तरी ठेवणेत आलेल्या आहेत.

(ब) सदस्य बैठक भत्याची रक्कम ज्या ग्रामपंचायतींना अदा करणेत आलेले आहे त्या ग्रामपंचायतीकडून संबंधित सदस्यांचे उपस्थिती पत्रक घेवून त्याआधारे बैठक भत्ता वाटप करणेत आला आहे.

(क) अनुक्रमणिका क्रमांक २१ ते ११७ मधील ज्या ग्रामपंचायतींना कर्मचारी किमान वेतन अनुदान रक्कम रुपये ४,३३,०००/- वाटप केलेले आहे त्या सर्व ग्रामपंचायतीकडून नमुना नंबर ७ मधील पोहोच पावत्या घेऊन पंचायत समिती दप्तरी ठेवणेत आलेल्या आहेत.

**(५) खानापुर पंचायत समिती, विटा**

(अ) आक्षेपात नमूना केले नुसार सदस्य बैठक भत्ता मिळालेबद्दल एकूण २१ ग्रामपंचायतीसह नमुना नंबर ७ च्या सर्वच ६५ ग्रामपंचायतीच्या सामान्य पावत्या दप्तरी उपलब्ध आहेत.

(ब) ग्रामपंचायतींच्या सभांना गैरहजर असतानाही ६ ग्रापंचायतीच्या सदस्यांना अदा केलेला एकूण रुपये १,१५०/- इतका सदस्य बैठक भत्ता वसुलात आणून दिनांक १२/११/२०१३ रोजी शासनाकडे भरणा केला आहे.

**(६) पंचायत समिती, पलूस**

(अ) आक्षेपात नमूना केले नुसार सदस्य बैठक भत्ता मिळालेबद्दल एकूण ६ ग्रामपंचायतीकडील नमुना नंबर ७ च्या सर्व ३४ ग्रामपंचायतीच्या सामान्य पावत्या दप्तरी उपलब्ध आहेत.

(ब) कर्मचारी किमान वेतन अनुदान रुपये ७,२००/- प्राप्त झालेबाबत ग्रामपंचायत बुरुंगवाडी नमुना नं ७ मधील पोहोच पावती दप्तरी उपलब्ध आहे.

**(७) पंचायत समिती, तासगाव**

(अ) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग शासन परिपत्रक क्र. व्हीपीएस २००९/प्र.क्र. १३९/ पंरा-३ दिनांक १४ जुलै, २००९ अन्वये उपस्थिती प्रमाणपत्र ग्रामविकास अधिकारी/ ग्रामसेवक यांचेकडून घेवून दप्तरी दाखल करणेत आलले आहे.

(ब) ग्रामपंचायतींकडून ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांची व ग्रामपंचायतीच्या हिश्श्याची रक्कम कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये जमा केल्याची खात्री केलेबाबतचा दाखला घेणेत आलेला असून दप्तरी दाखल करणेत आलेला आहे व त्याची तपासणी विस्तार अधिकारी (पं.) यांनी केलेबाबतचे प्रमाणपत्र घेणेत आलेले आहे.

(क) ग्रामपंचायतीने स्वतःच्या उत्पन्नाचा विचार करून कर्मचारी नेमले बाबत पंचायत समितीने खात्री केलेली आहे. गट विकास अधिकारी यांचा अहवाल दप्तरी दाखल करणेत आलेला आहे.

(ड) अनुदान प्राप्त झालेबाबत ग्रामपंचायतीकडून नमुना नं. ७ मधील पोहोच पावती घेतलेली असून दप्तरी दाखल करणेत आलेल्या आहेत.

(इ) अनुदानातून रक्कम रुपये ४,६५,९००/- एवढी पाणीपट्टी वसुलीपोटी कपात केलेबाबतचा आदेश व सदर पाणीपट्टी वसुलीची रक्कम ग्रापापु विभागास भरलेल्या चलनाच्या प्रती सर्व संबंधित ग्रामपंचायतींना देणेत आलेल्या आहेत. त्याप्रमाणे ग्रामपंचायत लेख्यात नोंद घेतलेबाबतची तपासणी विस्तार अधिकारी (पं.) यांनी केलेली आहे.

(फ) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र. व्हीपीएम २००९/प्र.क्रं.१२५/पंरा-३/दिनांक २७ जुलै २००९ नुसार ग्रामपंचायतींनी अदा केलेल्या सरपंच मानधनाच्या ७५% इतके अनुदान देय आहे. तथापि पंचायत समितीने ग्रामपंचायतींना १००% प्रमाणे अनुदान अदा केलेले आहे. त्यामुळे रुपये १,०५,५७५/- जादा अनुदान अदा झालेले आहे. सदर रक्कम शासन निधीमध्ये दिनांक ०५/०५/२०१५ रोजी भरणा केली आहे. तसेच उक्त शासन निर्णयाप्रमाणे रक्कम रुपये ४००, ६०० व ८०० प्रमाणे ग्रामपंचायतींनी सरपंचांना मानधन आदा केल्याबाबतची कागदपत्रे ग्रामपंचार्तीकडून प्राप्त करून घेणेत आलेली आहेत. सदस्य बैठक भत्ता अदा केलेच्या रकमेची उपस्थिती प्रमाणपत्रे घेऊन दप्तरी ठेवणेत आलेली आहे. त्यानुसार भत्ता अदा केलेला आहे.

**(८) पंचायत समिती, आटपाडी**

(अ) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक २३९९/प्रक्र २०६(१) /२१ दिनांक २१/११/२००० नुसार ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना ग्रामपंचायतींनी कर्मचाऱ्यांना किमान वेतन दिले आहे. त्याप्रमाणात जिल्हा परिषद, सांगलीकडे मागणी नोंदविल्यानंतर जिल्हा परिषद, सांगलीने शासनाकडे अनुदान मागणी केली आहे.

(ब) अनुदान नोंदवही ठेवलेली असून सर्व नोंदी करणेत आलेल्या आहेत.

**(२) परिच्छेद क्रमांक ३.२३/४६ (सन २०११-२०१२)**

**जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत ग्रामीण तिर्थक्षेत्र/यात्रा स्थळ विकास योजनांची अंमलबजावणी उशिरा केल्यामुळे खर्चात झालेल्या वाढीबाबत**

सन २०११-१२ जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत ग्रामीण भागातील क वर्ग तिर्थक्षेत्र/यात्रा स्थळ विकास आराखड्यासाठी रुपये २,५०,००,०००/- इतका निधी जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली यांचेकडून दिनांक १८/७/२०११ अन्वये मंजूर झालेनंतर पहिल्या टप्प्यामध्ये दिनांक २०/७/२०११ अन्वये रुपये १,८७,५०,०००/- इतका व दुसऱ्या टप्प्यामध्ये रुपये ६२,५०,०००/- इतका निधी उपलब्ध करून दिला. सदर उपलब्ध अनुदान विभागाने खाली नमूद केलेप्रमाणे कोषागारातून आहरीत केलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांनी दिनांक २४/२/२०१२ अन्वये सर्व गट विकास अधिकाऱ्यांना तिर्थक्षेत्र विकास योजनेचे सन २०११-१२ चे प्रस्ताव दिनांक २९-२-२०१२ पर्यंत ग्रामपंचायत विभागास पाठविणेस सुचित केले आहे. ग्रामीण भागातील क वर्ग तिर्थक्षेत्रे/यात्रा स्थळ विकास योजना ह्या जिल्हा वार्षिक योजना २०११-१२ मध्ये मंजूर झाली असताना व सदर योजनांसाठी निधी दिनांक २०/७/२०११ रोजी उपलब्ध केल्यानंतर तात्काळ सदरचे अनुदान कोषागारातून आहरीत करून योजनांना तांत्रिक मंजूरी देऊन मंजूर झालेले अनुदान वर्ग करणे आवश्यक होते. अनुदान वितरीत केले असताना वर नमुद केलेप्रमाणे खात्याने विलंबाने अनुदान कोषागारातून आहरीत केलेला आहे. म्हणजेच निधी उपलब्ध असताना केवळ विलंबाने योजना राबविलेली आहे. सदर योजनेमधून घेण्यात आलेल्या कामाची यादी, त्यास दिलेली प्रशासकीय मान्यतेचा तपशिल व तांत्रिक मंजुरीचा तपशिल लेखा परिक्षणास उपलब्ध झाला नाही. त्यामुळे संबंधित कामांची अंदाजपत्रके कोणत्या जिल्हा दरसूचीच्या आधारे बनविली याबाबत खात्री करता आली नाही.

अनुदान उपलब्ध असताना केवळ उशिराने मंजुरी दिल्यामुळे खर्चात झालेली वाढ परिगणीत करून त्याची वसुली संबंधितांकडून करून शासन निधीत भरणा केलेचे दाखविणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सांगली यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत ग्रामीण तिर्थक्षेत्र/यात्रास्थळी विकास योजनांमधील कामासाठी जिल्हा नियोजन समिती, सांगली यांचेकडून दिनांक १८/७/२०११ व दिनांक २०/७/२०११ अन्वये निधी उपलब्ध करून दिलेनंतर या योजनेतील कामांच्या याद्या मंजुरीसाठी त्वरित कार्यवाही केलेली होती. परंतु मा. अध्यक्ष, जिल्हा नियोजन समिती यांचकडून दिनांक २१/२/२०१२ अन्वये मंजूरी दिलेली होती. त्यामुळे सदर कामांचे प्रशासकीय आदेश देणेस विलंब झालेला आहे. मा. अध्यक्ष, जिल्हा नियोजन समिती, सांगली यांनी मंजूर केलेल्या तिर्थक्षेत्र/यात्रास्थळे विकास योजनांच्या कामाचे सर्व गटविकास अधिकारी यांचेकडून प्रस्ताव मागणी दिनांक २४/०२/२०१२ अन्वये केलेली होती. त्यानुसार गटविकास अधिकारी यांचेकडून कामाचे प्रस्ताव, अंदाजपत्रक व तांत्रिक मंजूरी प्राप्त झालेनंतर मान्यता आदेश व अनुदान वाटप केलेले आहे. सदर अंदाजपत्रके सन २०११-१२ मधील दरसुचिनुसार केलेली आहेत.

सन २०११-१२ मध्ये मंजूरी दिलेल्या कामाची यादी, गटविकास अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेले प्रस्ताव तसेच कार्यकारी अभियंता (इ.व.द) जिल्हा परिषद, सांगली यांचे तांत्रिक मंजूरी आदेशासह कामाचे अंदाजपत्रके व प्रशासकीय मान्यता आदेश दप्तरी ठेवण्यात आलेले आहेत.

**(३) परिच्छेद क्रमांक ३.१०२/८१ (सन २०११-२०१२)**

**अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना मोफत गणवेश वाटप**

(अ) शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परिषद, सांगली सन २०११-२०१२ अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना मोफत गणवेश वाटप योजनेतर्गत रक्कम रुपये ३०,०६,२००/- एवढे अनुदान प्राप्त झाले असून रक्कम रुपये ३०,०५,६००/- एवढे अनुदान तालुकास्तरावर वर्ग केले आहे. त्यापैकी रक्कम रुपये २९,६०,४००/- एवढा खर्च झाला आहे.

(१) रक्कम रुपये २९,६०,४००/- विवरणपत्राप्रमाणे खर्च असून नमुना नंबर १४ व २० ला तो रक्कम रुपये ३०,४१,०८५/- नमूद केला आहे.

(२) एकूण विद्यार्थी संख्या ७,५१४ असताना ८,१३६ विद्यार्थीसाठी पुरवठा आदेश दिला आहे. रक्कम रुपये २,४८,८००/- एवढा जादा खर्च झाला आहे. विद्यार्थ्यांच्या नावानुसार यादी उपलब्ध झाली नाही.

(३) सन २०११-१२ मध्ये योजना न राबवल्याने यावर्षीच्या चौथीच्या विद्यार्थ्यांना लाभ झालेला नाही.

(४) पंचायत समिती, तासगाव शिक्षण विभाग सदर योजनेसाठी ३१/३/२०१२ रोजी प्राप्त झालेल्या रक्कम रुपये २,५०,८००/- केंद्र प्रमुखांना वाटप केले आहे. परंतु त्याची कागदपत्रे लेखापरिक्षणास उपलब्ध झाली.

(५) पंचायत समिती मिरज यांना प्राप्त झालेल्या अनुदानाची रकम रुपये ६,६८,८००/- केंद्र प्रमुखांना वाटप् केले आहे. परंतू त्याची कागदपत्रे लेखा परिक्षणास उपलब्ध झाली नाहीत.

(६) पंचायत समिती, पलूस यांनी अल्पसंख्याक गणवेश अनुदानाची रक्क्म रुपये ६,१६१/- शासनास जमा केल्याचे दिसते त्यापैकी ८ केंद्र प्रमुखांना रक्कम रुपये ४,९२७/- प्रमाणे परत भरणा करताना मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सांगली यांची मान्यता घेतलेली नाही.

(७) पंचायत समिती खानापूर यांना केंद्र प्रमुख शाळेना रक्कम रुपये १,७०,४००/- व नगरपालिका, विटा यांना रक्कम रुपये ५४,०००/- एकूण मुले २९२ मुली २६९ प्रमाणे ४००/- रुपये अदा केलेले आहे. तथापि पात्र विद्यार्थ्यांची सदर रक्कम अदा केल्याबाबतची पोहोच व उपयोगिता प्रमाणपत्र नाही. तसचे नगरपालिका, विटा साठी अदा केलेल्या ५४,०००/- ची कागदपत्रे नाहीत.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद सांगली यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) रक्कम रुपये २९,६०,४००/- विवरणपत्राप्रमाणे खर्च असून नमुना १४ व २० ला रक्कम रुपये २९,६०,४००/- नमूद केलेला आहे. अनुदान खर्चाचा ताळमेळ पत्रक व रक्कम भरणा दिनांक ३०/०१/२०१३ रोजी केली असून चलन दप्तरी उपलब्ध आहे.

(२) अल्पसंख्याक व प्रौढ शिक्षण, संचालनालय पुणे यांचेकडील क्र.अप्रोशि/मो.ग./१०-११/१२-१२. का-२०१२ करिता रक्कम रुपये ३०,०६,२००/- चा धनादेश क्रमांक ६०८६९६ प्राप्त झालेला आहे. सदर आदेशातील सुचनानुसार लाभार्थी संख्या प्राधान्यक्रम (१) खाजगी अनुदानित (२) विना अनुदानित शाळा (३) शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील लाभार्थी या निकषाप्रमाणे या कार्यालयाकडील दिनांक ३०/०३/२०१२ चे पत्रान्वये ३० सप्टेंबर, २०११ चे पटनिश्चितीनुसार यु-डायस वरील लाभार्थी संख्या ७५१४ धरून या कार्यालयाकडून एकूण रुपये ३०,०५,६००/- तालुकास्तरावर वितरीत करणेत आलेले असून सदर पत्रातून सर्व गटशिक्षणाधिकारी यांना कापडाचा रंग व कापडाची आवश्यकता (मिटर मध्ये) या कार्यालयाकडे सादर करणेबाबत सुचित केलेले होते. त्यानुसार सर्व तालुकास्तरावरून प्राप्त झालेली एकूण लाभार्थी संख्या ८१३६ इतकी अंतिम धरून या कार्यालयाकडील दिनांक १६/८/२०१२ च्या आदेशानुसार मे.महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्या., मुंबई यांना ८१३६ लाभार्थीकरिता फक्त कापड पुरवठा करणेबाबत आदेशित केलेले होते. मे.महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्या., मुंबई यांनी एकूण २९४६ लाभार्थीकरिता कापड पुरवठा केलेला असून उर्वरित लाभार्थींना विहित वेळेत कापड पुरवठा करता आला नाही. त्यामुळे गणवेशाचे कापड अप्राप्त असलेल्या शाळांनी एकूण ३९३३ लाभार्थीकरिता स्थानिक पातळीवरून गणवेशाचे कापड अप्राप्त असलेल्या शाळांनी एकूण ३९३३ लाभार्थीकरीता स्थानिक पातळीवरून गणवेश वाटपाची अंमलबजावणी केलेली आहे.

अशारीतीने सन २०१२-१३ मधील २९४६ व ३९३३ असे एकूण ६८७९ पात्र लाभार्थीना प्रत्यक्ष लाभ देण्यात आलेला आहे. शिल्लक अनुदान रक्कम रुपये ४५,८००/- चलन दिनांक ३०/०१/२०१३ अन्वये व रक्कम रुपये ९७,६००/- चलन दिनांक १८/०३/२०१३ अन्वये असे एकूण रक्कम रुपये १,४३,४००/- इतकी रक्कम शासनास भरणा केलेली आहे. तरी सदर योजनेअंतर्गत कोणत्याही प्रकारचा जादा खर्च झालेला नाही. याबाबत सर्व गटांचे अहवाल दप्तरी उपलब्ध आहेत.

(३) सन २०११-२०१२ मधील अल्पसंख्याक गणवेश अनुदान हे दिनांक २२/३/२०१२ रोजीचे आदेशान्वये प्राप्त झालेले असून सदरचे अनुदान दिनांक २९/३/२०१२ रोजी पत्रान्वये तालुकास्तरावर वर्ग केलेले आहे. त्यामुळे सदरचे अनुदानातून सन २०१२-२०१३ मधील इयत्ता १ ते ४ थी च्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना गणवेश लाभ दिलेला आहे.

(४) पंचायत समिती, तासगांव कडून रक्कम रुपये २,५०,८००/- केंद्र प्रमुखांना वाटप केलेची आणि विद्यार्थ्यांना लाभ दिलेची पोहोच दप्तरी उपलब्ध आहे.

(५) पंचायत समिती, मिरज शिक्षण विभागाने रक्कम रुपये ६,६८,८००/- केंद्र प्रमुखांना वाटप केले असून विद्यार्थ्यांना लाभ दिलेची पोहोच दप्तरी उपलब्ध आहे.

(६) पंचायत समिती, पलूस यांनी सन २००९-२०१० मध्ये अल्पसंख्याक गणवेशांचे अनुदान केंद्र प्रमुखांना वाटप केलेले होते. त्यातील ८ केंद्रप्रमुखांनी त्याचेकडे अखर्चित शिल्लक राहिलेली रक्कम रुपये ६,१६१/- प्रमाणे रक्कम रुपये ४९,२८८/- गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, पलूस यांची चलनावर स्वाक्षरी घेऊन शासनास रक्कम भरणा दिनांक १३/९/२०११, ११/११/२०११, ४/१/२०१२, ६/०१/२०१२, १८/०१/२०१२, २०/१/२०१२, २१/१/२०१२, २७/१/२०१२, रक्कम भरणा केलेली आहे. भरणा केलेल्या चलनाची प्रत दप्तरी उपलब्ध आहे.

(७) पंचायत समिती, खानापूर शिक्षण विभागाने केंद्रप्रमुखांना रक्कम रुपये १,७०,४००/- व नगरपालिका, विटा यांना रक्कम रुपये ५४,०००/- अदा केलेले असून अदा केलेबाबतची पोहोच व उपयोगिता प्रमाणपत्र दप्तरी उपलब्ध आहेत.

**(४) परिच्छेद क्रमांक ३.१०४/८२, ८३ (सन २०११-२०१२)**

**शालेय पोषण आहार खर्चाबाबत.**

सदर योजनेतर्गत धान्य खरेदीसाठी रक्कम रुपये २६,६४,१७,९३६/- इतका खर्च झालेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना पुरवठादाराला किती किलो धान्य पुरवावयाचे आहे, याबाबत निश्चित असा पुरवठा आदेश दिलेला नाही.

(२) महाराष्ट्र शासन, परिपत्रक क्र.शापोआ २००९/प्र.क्र.३८३/प्रा.शि./४/दिनांक २६/२/२०१० मुद्दा क्र. ८ (अ) नुसार गटशिक्षणाधिकारी यांनी पुरवठा आदेश देण्यापूर्वी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची पुर्वपरवानगी घेणे आवश्यक असताना तशी परवानगी घेतलेली नाही.

(३) पंचायत समिती निहाय व शाळानिहाय शिल्लक धान्याच्या अहवाल घेतलेला नाही.

(४) महाराष्ट्र शासन, परिपत्रक दिनांक २६/२/२०१० अन्वये महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या लेखासंहिता, १९६८ नियम क्र. ९१ अन्वये नमुना नं. ३३ मध्ये मुख्याध्यापकांनी साठानोंदवही ठेवणे आवश्यक आहे. तसेच लेखासंहिता नियम क्र. ९८ अन्वये वार्षिक तपासणी करून दरवर्षी जून महिन्यात तसे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असताना तसे केलेले नाही.

(५) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. शापोआ २०१०/प्र.क्र.१८/प्राशि४/२ फेब्रुवारी, २०११ अन्वये सदर खर्चामध्ये केंद्र हिस्सा व राज्य हिस्सा खर्चाचे प्रमाण ७५.२५% राखलेले नाही.

(६) दिनांक ३१/१०/२०११ रोजीच्या करारनाम्याप्रमाणे तेलाचा किलो प्रमाणे दर निश्चीत केलेला असताना रक्कम लिटरप्रमाणे अदा केलेली आहे.

(७) धान्य उशिराने प्राप्त झाल्याने करारनाम्याप्रमाणे बिलातून दंड कपात करणे आवश्यक असताना परस्पर दंड करून देयक सादर केले असताना त्याप्रमाणे वित्त विभागाने रक्कम अदा केल्याने दंडाची रक्कम रुपये २,७१,५३९/- च्या २% प्रमाणे रक्कम रुपये ५,४३१/- इतका आयकर कमी कपात केला गेला आहे. तरी आयकराची रक्कम वसूल करून शासन निधीत भरणा करणे आवश्यक आहे.

(८) मुलांच्या पटसंख्येच्या व खर्च मर्यादेचा विचार करता उशीरा पुरवठयाबाबत रक्कम रुपये १७,४१,२१,४५६/- इतका खर्च होणे आवश्यक असताना रक्कम रुपये २६,६४,१७,९३६/- इतका खर्च झालेला आहे. म्हणजेच रक्कम रुपये ९,२२,९६,४८०/- इतका जादा खर्चाबाबत पूर्तता होणे आवश्यक आहे.

(९) उपयोगीता प्रपत्रानुसार ७,४४६ टन इतका तांदूळ शाळांना प्राप्त झाला असुन तांदुळ उचल वाटप अहवालामध्ये ७,६४२ टन वाटप दर्शविले आहे. त्यानुसार शाळा स्तरावर ९६९ टन तांदुळ शिल्लक असणे आवश्यक आहे व ई प्रपत्रानुसार ७७४ टन तांदुळ शिल्लक आहे.

(१०) दंडाची रक्कम रुपये २,७१,५३९/- शासन भरणा केलेली नाही.

(११) प्रत्यक्ष पटसंख्या व नियतन आदेशातील पटसंख्या यामध्ये तफावत असून प्रत्यक्ष पटसंख्ये ऐवजी नियतनाप्रमाणे जादा तांदुळ प्राप्त झालेला आहे. याबाबतचा अहवाल शिक्षण संचालनालयास कळवणे आवश्यक असताना शिक्षणाधिकारी यांनी त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

(१२) इ.१ ली ते ५ वी साठी शिक्षक निश्चितीच्या पटसंख्येनुसार धान्य खरेदी करणे आवश्यक असताना प्रत्यक्षात ५६,१३६.९८५ किलो ऐवढे जादा धान्य खरेदी केलेले आहे. तसेच इयत्ता ६ वी ते ८ वी साठी १,५१,४१४.६० किलो इतके कमी धान्य खरेदी केलेले आहे. आवश्यकतेपेक्षा जादा व कमी खरेदीबाबत पूर्तता करणे आवश्यक आहे.

(१३) इ. ६ वी ते ८ वी मधील विद्यार्थ्यांना सदर योजनेतून लाभ दिलेला असून जिल्हा परिषद शाळेतील इ. ८ वी मधील पटसंख्या विभागाकडे उपलब्ध नाही. तसेच सदर पटसंख्या ही शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी प्रमाणित केलेली नाही.

(१४) महानगरपालिकेकडील पोषण आहारासाठी पटसंख्येच्या प्रमाणात खर्चाकरीता तरतूद करणे आवश्यक असताना महानगरपालिकेने त्यापेक्षा कमी रकमेची मागणी केलेली आहे व त्यापेक्षा कमी रक्कम विभागाने वर्ग केलेली आहे. याबाबत खुलासा करणे आवश्यक आहे. तसेच खर्चाचे विनियोग दाखले घेतलेले नाहीत.

(१५) विभागाकडील साठा नोंदवही अपूर्ण असल्याने प्राप्त तांदुळ वाटप व शिल्लक योग्य असल्याची खात्री पटत नाही.

(१६) दिनांक ३१/०३/२०१२ रोजी पुरवठादाराकडे २२,१४०२.८० किलो तांदूळ असताना पुरवठादाराने आवश्यकता नसताना तेवढा तांदूळ उचलल्याचे दिसते.

(१७) विभागाला किती तांदुळ साठा मंजुर झाला याबाबत तपशिल उपलब्ध झाला नाही. पुरवठा विभागाकडून एकुण २७.१२ क्विंटल तांदुळ प्राप्त झाला आहे. अद्याप किती तांदुळ येणे बाकी आहे हे स्पष्ट होत नाही.

(१८) इ. १ ली ते ५ वी ची पटसंख्या १,३१,१२५ इतकी असून इ. ६ वी ते ८ वी ची पटसंख्या १,०८,२७८ इतकी आहे. २११ इतक्या शैक्षणिक दिवसासाठी विहीत दराप्रमाणे एकूण रक्कम रुपये १,४०,५९,३११/- इतका जादा खर्च झालेला आहे.

(१९) अर्धसमास पत्र क्र १६ दिनांक २२/१०/२०१२ अन्वये पटपडताळणीचा अहवाल मागणी करूनही उपलब्ध झाला नाही. त्यामुळे पटसंख्येप्रमाणे पात्र लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळालेबद्दल खात्री पटत नाही. तरी सदर अहवाल सादर करून खात्री पटविणे आवश्यक आहे व अपात्र लाभार्थ्यांना लाभ दिलेला असल्यास लाभाची रक्कम वसूल करून शासन भरणा करणेत यावी.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सांगली यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन परिपत्रक २६ फेब्रुवारी, २०१० मधील मुददा क्रमांक अ-७, अ-८ आणि क-२ नुसार तालुकास्तरावरून म्हणजेच गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती यांनी शाळानिहाय धान्याची मागणी (पुरवठा आदेश) पुरवठा धारक यांचेकडे करावयाची आहे. त्यानुसार आवश्यक धान्याची निश्चित मागणी पुरवठाधारकाकडे केली जाते. त्याची एक प्रत या कार्यालयास सादर केली जाते. त्यानुसार कार्यवाही केलेली आहे.

(२) तांदूळ आणि धान्यादी मालाचा शाळास्तरावर पुरवठा करणेसाठी मा. शिक्षण संचालक (प्राथ.) पुणे आणि दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटीव्ह मार्केटींग फेडरेशन लि., मुंबई यांचेमधील दिनांक २३/१०/२००९ चा करार आणि त्या पुढील मुदतवाढ, कालावधी आणि या कार्यालयाकडून गटशिक्षणाधिकारी यांना बाबत देण्यात आलेली परवानगी याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. (१) | शिक्षण संचालक (प्राथ.) पुणे यांचेकडील पत्र दिनांक (२) | कालावधी (३) | परवानगी पत्र क्रमांक व दिनांक (४) |
|---|---|---|---|
| १ | २५/५/२०१० | जुलै, २०१० ते जून २०११ | क्र. २९६७ दिनांक २०/६/२०१० |
| २ | ७/६/२०११ | जुलै, २०११ | क्र. २३९४ दिनांक १०/६/२०११ |
| ३ | ४/८/२०११ | ऑगस्ट, २०११ | क्र. ३२७५ दिनांक ६/८/२०११ |
| ४ | ८/९/२०११ | सप्टेंबर, २०११ | क्र. ३७४५ दिनांक १२/९/२०११ |
| ५ | ३०/९/२०११ | ऑक्टोंबर, २०११ | क्र. ४३०९ दिनांक १०/१०/२०११ |
| ६ | १/११/२०११ | नोव्हेंबर, २०११ ते ऑक्टोंबर, २०१२ | क्र. ४६२१ दिनांक ५/११/२०११ |

दिनांक २६ फेब्रुवारी, २०१० च्या शासन निर्णयामधील मद्दा क्रमांक ८(अ) नुसार गटशिक्षणाधिकारी यांनी पुरवठा आदेश देण्यापुर्वी शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांची पुर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे, परंतु शाळांना तात्काळ तांदुळ पुरवठा होणेसाठी, सदर कार्यवाहीसाठी लागणारा कालावधी टाळणेसाठी गटशिक्षणाधिकारी यांना मा. शिक्षण संचालक, पुणे यांचे कार्यालयाकडील पत्रानुसार तात्काळ तांदुळ आणि धान्याची मालाची मागणी जिल्हा मार्केटींग कार्यालयाकडे करणेबाबत सुरुवातीलाच परवानगी दिलेली आहे व मागणीची एक प्रत मुद्दा क्रमांक क-२ नुसार शिक्षणाधिकारी कार्यालयास सादर केलेली आहे.

(३) शाळांचा केंद्रस्तरावर, केंद्राचा तालुकास्तरावर आणि तालुक्यांचा जिल्हास्तरावर शिल्लक धान्याचा अहवाल उपलब्ध आहे. नमुना दाखला एका तालुक्याचा शाळांचा शिल्लक धान्याचा अहवाल उपलब्ध आहे.

(४) शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत तांदळाची वाहतुक आणि धान्यादी मालाचा पुरवठा करणेबाबत शासन परिपत्रक दिनांक २६ फेब्रुवारी, २०१० नुसार सुधारीत अंमलबजावणी सुरू आहे. या परिपत्रकातील ‘ग’ नुसार शाळेमध्ये प्राथमिक शिक्षण संचालनालयाने विहीत केलेला साठा नोंदवही ठेवण्याचे सूचना आहेत. वार्षिक तपासणी करून दरवर्षी प्रमाणपत्र सादर करणेबाबत परिपत्रकात नमुद केलेले नाही. त्यानुसार शासनस्तरावरुन शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत साठा नोंदवह्या शाळास्तरावर वितरीत केलेल्या आहेत. शाळास्तरावर साठा नोंदवह्या ठेवलेल्या आहेत. प्रत्येक तालुक्यातील २ शाळांच्या शालेय पोषण आहार साठा नोंदवह्या दप्तरी उपलब्ध आहे. सर्व तालुक्यांचे उपयोगिता प्रमाणपत्र अहवाल दप्तरी उपलब्ध आहे.

(५) शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत सन २०११-१२ चा खर्च अहवाल उपलब्ध आहे. अहवालातील अनुक्रमांक ७ आणि ८ रकाना ‘ड’ नुसार केंद्र हिश्श्याचे रक्कम रुपये २२,३०,५१,७९२/- व राज्य हिश्श्याचे रक्कम रुपये ६,६७,०९,८१२/- निधी उपलब्ध असून त्याचे प्रमाण ७७.२३ असे आहे. त्यानुसार खर्च विवरणपत्र रकाना ई मध्ये खर्च केंद्र हिस्सा रक्कम रुपये २०,३०,०८,०४०/- व राज्य हिस्सा रक्कम रुपये ६,३४,०९,८९६/- इतका झालेला आहे. त्याचे केंद्र हिस्सा प्रमाण ७६.२०:२३.८०% असे असून उपलब्ध निधीनुसार प्रमाणत खर्च झालेला आहे.

(६) मा.शिक्षण संचालक (प्राथ.), पुणे आणि दिनांक महाराष्ट्र स्टेट को- ऑपरेटीव्ह मार्केटींग फेडरेशन लि. यांचेकडील दिनांक २३ ऑक्टोबर, २००९ चा करार हा माहे जुलै २०१० ते माहे ऑक्टोबर, २०११ अखेर होता. सदर शासनाचे करारनाम्यातील मंजूर दरानुसार सोयाबीन तेल प्रति किलो रुपये ६८/- प्रमाणे असल्याने परिगणना किलोप्रमाणे करून देयके अदा केलेली आहे. पुढील दिनांक ३१/१०/२०११ च्या शासनाचे करारानुसार सोयाबीन तेलाचे करारनाम्यातील मंजूर दर प्रतिलिटर ९२/- प्रमाणे असल्याने त्याप्रमाणे देयके अदा केलेली आहेत. दोन्ही कालावधीतील देयके दप्तरी उपलब्ध आहेत.

(७) आयकराची रक्कम रुपये ५,४३१/- पुरवठाधारकाकडून (दि महाराष्ट्र स्टेट को- ऑपरेटीव्ह मार्केटींग फेडरेशन लि.) वसूल करून दिनांक २२/६/२०१६ रोजी शासन लेखार्शिषकी भरणा केलेला आहे. भरणा केलेले चलन दप्तरी उपलब्ध आहे.

(८) शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत सन २०११-१२ मध्ये खर्चाचे विवरणपत्र उपलब्ध आहे. त्यातील रकाना नं. इ नुसार एकुण खर्च रुपये २६,६४,१७,९३६/- इतका झालेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे :—

| अ. क्र. (१) | बाब (२) | रक्कम रुपये (३) | खर्च मर्यादा/निकष (४) |
|---|---|---|---|
| (१) | अन्न शिजविणे १-५ व ६-८ केंद्र हिस्सा | १६,४२,२४,०२४ | प्रति लाभार्थी प्रति दिन विहीत दर या निकषानुसार एकूण खर्च रुपये |
| | | २१,३२,८०,००८ | |
| (२) | अन्न शिजविणे १-५ व ६-८ केंद्र हिस्सा | ४,९०,५५,९८४ | |
| (३) | स्वयंपाकी मानधन केंद्र हिस्सा | ३,८०,६३,९३३ | वरीलप्रमाणे निकष नाही. एकूण खर्च रुपये ५,३१,३७,९२८ |
| (४) | स्वंयपाकी मानधन केंद्र हिस्सा | १,२७,२०,९१२ | |
| (५) | व्य.खर्च (डेटा एन्ट्री ऑपरेटरमानधन, कार्यालयीन खर्च) केंद्र | ७,२०,०८३ | |
| (६) | मुख्याध्यापक मानधन राज्य | १६,३३,००० | |
| (७) | एकूण | २६,६४,१७,९३६ | |
| | रुपये २६,६४,१७,९३६/- रुपये ५,३१,३७,९२८/- | | २१,३२,८०,००८/- |

करिता एकूण खर्च रुपये २६,६४,१७,९३६/- मधून अंक क्र. ३ ते ७ चा खर्च वजा करता रुपये २१,३२,८०,००८/- इतका खर्च प्रति विद्यार्थी विहित दर या निकषानुसार झालेला आहे. मा. शिक्षण संचालक (प्राथ.) पुणे यांचेकडील दिनांक ९/६/२०११ च्या पत्रानुसार मंजूर लाभार्थी, मंजूर दर, शालेय दिवस प्रमाणे खर्चाची मर्यादा आणि झालेला खर्च याचा तपशील खालीलप्रमाणे आहे :—

**इयत्ता १ ली ते ५ वी** **रक्कम रुपयांत**

| कालावधी | मंजूर लाभार्थी | शालेय दिवस | मंजूर दर | खर्चाची मर्यादा |
|---|---|---|---|---|
| एप्रिल-ऑक्टो. | १९८१४१ | १०५ | २.६० | ५,४०,९२,४९३/- |
| नोव्हेंबर-मार्च | १९८१४१ | ११५ | २.८० | ६,३८,०१,४०२/- |
| एकूण | १९८२४१ | २२० | | ११,७८,९३,८९४/- |

**इयत्ता ६ वी ते ८ वी** **रक्कम रुपयांत**

| कालावधी | मंजूर लाभार्थी | शालेय दिवस | मंजूर दर | खर्चाची मर्यादा |
|---|---|---|---|---|
| एप्रिल-ऑक्टो. | ११२२४८ | १०५ | ३.८५ | ४,५३,७६,२५४ |
| नोव्हेंबर-मार्च | १९८१४१ | ११५ | २.८० | ५,३५,७०,३५८/- |
| एकूण | ११२२४८ | २२० | ४.१५ | ९,८९,४६,६१२/- |

एकूण इ.१ ली ते ५ वी आणि इ.६ वी ते ८ वी मिळून ११,७८,९३,८९ + ९,८९,४६,६१२ = २१,६८,४०,५०७/- विद्यार्थी संख्या, प्रति लाभार्थी खर्च मर्यादा, शालेय दिवस वरीलप्रमाणे एकूण रुपये २१,६८,४०,५०७/- इतकी खर्च मर्यादा असून रुपये २१,३२,००,००८/- इतका खर्च झालेला आहे. विहीत मर्यादेत खर्च झालेला आहे.

(९) लेखापरिक्षणावेळी तांदूळ उचल-वाटप प्राथमिक अहवाल सादर करण्यात आलेला होता. त्यानुसार आक्षेप घेण्यात आलेला आहे. सर्व तालुक्यांशी ताळमेळ घेतल्यानंतर सुधारीत अंतिम उचल-वाटप अहवाल इ. १ ली ते ५ वी व इ.६ वी ते ८ वी उपलब्ध आहे. सुधारीत अहवालानुसार शाळांकडील शिल्लक तांदुळ ८८३.६८१ टन इतका आहे. तांदूळ वाहतूकीच्या देयकानुसार शिल्लक तांदूळ ९६०.७३८ टन इतका शिल्लक आहे. दोन्ही शिल्लकेतील तफावत ७७.०६ टन इतकी आहे. तफावतीची कारणे पुढीलप्रमाणे आहेत :—

**आकडे-मेट्रीक टनामध्ये**

| इयत्ता | तांदूळ वाहतूकीच्या देयकाप्रमाणे प्राप्त तांदूळ | तांदूळ उचल-वाटप अहवालानूसार प्राप्त तांदुळ | तफावत |
|---|---|---|---|
| १-५ | ३,९९८.३३० | ३९५६.९३० | ४१.४० |
| ६-८ | ३६४४.४६८ | ३६०८.८११ | ३५.६६ |
| एकूण | ७६४२.७९८ | ७५६५.७४१ | ७७.०६ |

| इयत्ता | तफावतीचे कारण |
|---|---|
| १-५ | (१) वाळवा कडील १२.२७५ टन तांदूळ एप्रिल १२ मध्ये प्राप्त झालेला आहे. (+१२.२७५)<br>(२) जत कडील काही शाळांचा ३०.८३३ टन तांदूळ एप्रिल १२ मध्ये प्राप्त झालेला आहे. (+३०.८३३)<br>(३) मिरज गटाकडील अहवालानूसार १.७०७८टन तांदूळ काही कारणांमूळे अतिरिक्त आहे. सोबत तपशील जोडलेला आहे. (-१.७०७८)<br>एकूण तफावत :- (१२.२७५+३०.८३३-१.७०७८)=४१.४० टन |

| इयत्ता | तफावतीचे कारण |
|---|---|
| ६-८ | (१) वाळवा कडील काही ११.२१५ टन तांदूळ सन १२-१३ मध्ये प्राप्त झालेला आहे. (+११.२१५)<br>(२) जत कडील काही शाळांचा २४.५८४ टन<br>(३) मिरज गटाकडील अहवालानुसार ०.१४२२ टन तांदूळ काही कारणांमुळे अतिरिक्त आहे. सोबत तपशील जोडलेला आहे. (०.१४२२)<br>एकूण तफावत :- (११.२१५+२४.५८४-०.१४२२)=३५.६६ टन |

तांदूळ वाटप झालेनंतर शाळांकडील पोहोच पावतीनुसार गटाकडे संकलित करून या कार्यालयामार्फत देयके संचालनालयास सादर केली जातात.

शाळांकडील उचल-वाटप अहवालामध्ये तांदूळ ज्या महिन्यामध्ये आकडेवारी समाविष्ट असते. त्यामुळे वर नमूद केलेप्रमाणे इ.१ ली ते ५ वी. चा ४१.४० टन आणि इ.६वी ते ८ वी चा ३५.६६ टन तांदूळ असा एकूण ७७.०६ टन तांदूळ माहे मार्च १२ च्या देयकात समाविष्ट आहे, प्रत्यक्षात शाळांना सदर तांदूळ एप्रिल १२ मध्ये मिळाला आहे. त्यामुळे दोन्ही प्रकारे माहिती संकलित करून ताळमेळ घेतला जातो. दोन्ही प्रकारे तालुकानिहाय ताळमेळ पत्रक उपलब्ध आहे.

(१०) सन २०११-१२ मध्ये इयत्ता १ ली ते ५ वी अंतर्गत रक्कम रुपये २,७१,५३९/- आणि इयत्ता ६ वी ते ८ वी अंतर्गत रुपये २,३१,६४८/- इतक्या दंडाची रक्कम पुरवठाधारकास देय रक्कमेतून वजा करुनच निव्वळ देय रक्कम अदा केलेली आहे. देयके दप्तरी उपलब्ध आहेत.

दंडाची रक्कम शिल्लक निधीमध्ये समाविष्ट असून सन २०११-१२ मधील शिल्लक निधी शासनास दिनांक ३०/०१/२०१३ रोजी चलनाने भरणा केली आहे. चलनाची प्रत उपलब्ध आहे.

(११) लेखापरिक्षणामध्ये इयत्ता १ ली ते ५ वी चा पट १,३१,१२५ आणि ६ वी ८ वी पट १,०८,२०८ इतका दाखविणेत आलेला आहे. प्रत्यक्षामध्ये U-Dise नुसार इयत्ता १ ली ते ५ वी चा पट २,१४,१७८ आणि इयत्ता ६ वी ते ८ वी ची विदयार्थी संख्या १,३८,२४५ इतकी आहे. त्यास अनुसरून मा. शिक्षण संचालक (प्राथ.) पुणे यांचेकडून दिनांक ९/६/२०२१ च्या पत्रान्वये इयत्ता १ ली ते ५ वी साठी १,९८,१४१ आणि इयत्ता ६ वी ते ८ वी साठी १,१२,२४८ इतकी लाभार्थी संख्या मंजूर केलेली आहे. मा. शिक्षण संचालक (प्राथ) पुणे यांचेकडील अंतिम मंजूर तांदूळ नियतनाची प्रत दप्तरी उपलब्ध आहे.

(१२) शालेय शासन निर्णय २ फेब्रुवारी २०११ नुसार पाककृती नुसार खालीलप्रमाणे धान्य आणि धान्यादी माल पुढीलप्रमाणे वापरावयाचे आहे.

| धान्य | १-५ | ६-८ |
|---|---|---|
| डाळी | २० ग्रॅम | ३० ग्रॅम |
| तेल | ५ ग्रॅम | ७.५ ग्रॅम |
| मसाल्याचे पदार्थ | २ ते ५ ग्रॅम | ३ ते ७ ग्रॅम |
| एकूण कमाल | ३० ग्रॅम | ४४.५ ग्रॅम |
| आक्षेपात दाखविलेले प्रमाण | ३५ ग्रॅम | ४५ ग्रॅम |
| शिक्षक निश्‍चिती नुसार आक्षेपात दाखविलेली पटसंख्या | १,३१,१२५ | १,०८,२७८ |
| आक्षेपानुसार खरेदी मर्यादा किलोमध्ये | ९,६८,३५८.१२५ | १,०२,७९९.६१ |
| मा. शिक्षण संचालक (प्रा) पुणे यांचेकडून मंजूर विद्यार्थी संख्या | १,९८,१४१ | १,१२,२४८ |
| शालेय दिवस | २२० | २२० |
| एकूण धान्य खरेदी मर्यादा किलो | १३,०७,७३०.६० | १०,९८,९०७.९२ |
| प्रत्यक्षात खरेदी केलेले धान्य किलो | १०,२४,४९५.११ | ८,७६,६८५.१ |

आक्षेपामध्ये धान्याचे प्रमाण जास्त दर्शविलेली आहे. शिक्षक निश्‍चितीप्रमाणे विद्यार्थी संख्या घेतलेली आहे. शिक्षक निश्‍चितीमध्ये फक्त जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थी संख्येचा समावेश आहे. मंजूर लाभार्थी संख्या, शासन निर्णय दिनांक फेब्रुवारी, २०११ मधील डाळी, तेल, मसाल्याचे पदार्थ याचे प्रमाण, शालेय दिवस नुसार धान्य खरेदी मर्यादा इयत्ता १ ली ते ५ वी साठी १३०७७३०.६० किलो आणि इयत्ता ६ वी ते ८ वी साठी १०९८९०७.९२ किलो इतकी आहे. त्यानुसार प्रत्यक्षात १ ली ते ५ वी साठी १०२४४९५.११ किलो आणि ८७६६८५.१०किलो इतके धान्य खरेदी केलेले आहे. विद्यार्थ्यांच्या उपस्थिती आणि प्रमाणानुसार धान्य खर्च होते. जादा धान्य खरेदी केलेले नसून आवश्यतेनुसार खरेदी केलेले आहे.

(१३) U-DIse वर शाळांकडून विद्यार्थी संख्येची माहिती भरली जाते. U-Dise नुसार सन २०११-१२ ची इयत्ता १ ली ते ५ वी ची विद्यार्थी संख्या २,१४,१७८/- इतकी असून इयत्ता ६ वी ते ८ वी विद्यार्थी संख्येमध्ये जिल्हा परिषद शाळा, नगरपालिका - महानगरपालिका, खाजगी अनुदानित - अशंतः अनुदानित प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमधील इयत्ता १ लीते ८ वी च्या विद्यार्थी संख्येचा समावेश आहे. U-Dise वरील

विद्यार्थी संख्या ग्राह्य धरणेत येत असल्याने स्वतंत्ररित्या शिक्षणाधिकारी (माध्य.) यांचेकडून ८ वी च्या विद्यार्थी संख्या प्रमाणित करून घेतलेली नाही. तसेच संख्या प्रमाणित करून घेणेबाबत सुचना नाहीत.

(१४) शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत पटसंख्येनुसार तरतूद खर्च न होता प्रत्यक्ष लाभार्थीच्या प्रमाणात खर्च होते. मनपा शिक्षण मंडळ सांगली (शहरी) आणि मिरज तालुका (ग्रामीण) या दोन्ही गटासाठी लागणारे अनुदान पंचायत समिती मिरज येथे वितरत केले जाते. पंचायत समिती मिरजकडे शिल्लक अनुदान असल्याने आवश्यक तेवढेच अनुदान वितरीत केलेले आहे. सन २०११-१२ मधील मनाप सांगली आणि मिरज ग्रामीण कडील कोणत्याही शाळांची देयके प्रलंबित नाहीत. मनपा कडील खर्चाचे विनियोग दाखले घेण्यात आलेले असून दप्तरी उपलब्ध आहे.

(१५) साठा नोंदवही अद्यावत केलेली असून उपलब्ध आहे. सन २०११-१२ मध्ये मंजूर नियतन, १ एप्रिल २०११ चा शिल्लक तांदूळ, उचल केलेला तांदूळ, वाटप केलेला तांदूळ आणि ३१ मार्च २०१२ अखेरचा शिल्लक तांदूळ यांचे पत्रक उपलब्ध आहे. शिल्लक तांदळाचा अहवाल मा. शिक्षण संचालक (प्राथ.) यांना सादर केला आहे.

(१६) भारतीय अन्न महामंडळ पुणे यांचेकडून सन २०११-१२ या कालावधीतील (माहे जानेवारी २०१२ - मार्च २०१२) मंजूर तांदुळ नियतन उचल करणेसाठी २५ मार्च २०१२ ही अंतिम मुदत असल्याने व तो मुदतीत न उचललयास व्यपगत होत असल्याने २५ मार्च २०१२ पूर्वी शासकीय वेअर हाऊस मिरज येथून तांदूळ उचल करण्यात आलेला आहे. त्यामुळेप पुरवठादाराकडे २२,१४०२.८० किलो तांदूळ शिल्लक दिसत आहे.

माहे एप्रिल २०१२ या कालावधीसाठी प्राथमिक शिक्षण संचालनालय, पुणे यांचेकडून दिनांक ०९/०३/२०१२ अन्वये नियतन मंजूर करण्यात आलेले आहे. सदर मंजूर नियतनाची प्रत ई-मेल वरुन दिनांक २१/०३/२०१२ रोजी या कार्यालयास प्राप्त झालेली आहे. मंजूर नियतनानुसार भारतीय अन्न महामंडळ पुणे यांचेकडून रिलीज ऑर्डर प्राप्त करून शाळांना तांदूळ वितरीत करणेस विलंब होणार असल्याने सदरचा शिल्लक २२१४०२.८० किलो तांदूळ माहे मार्च १२ पूर्वी उचल करून माहे एप्रिल १२ साठी शाळांना वितरत केलेला आहे.

(१७) शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत सन २०११-१२ मध्ये मा. शिक्षण संचालक (प्राथ.) पुणे यांचेकडुन इयत्ता १ ली ते ५ वी साठी ३८७८९९० आणि इयत्ता ६ वी ते ८ वी साठी ३५८४७१० किलो तांदुळ मंजुर झालेला आहे.

जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हा पुरवठा विभाग, सांगली यांचे कार्यालयाशी शिल्लक तांदुळ वर्ग करणेबाबत या कार्यालयाकडुन दिनांक १/२/२०११, ३/२/२०११, १९/४/२०११, १/७/२०११, २३/२/२०१२ अन्वये पुरवठा विभागाशी पत्रव्यवहार करणेत आलेला आहे.

मा. जिल्हाधिकारी सांगली यांचेकडील दिनांक १७/७/२०१५ रोजीच्या पत्रानुसार पुरवठा विभागाकडून ४०१३.५७६ क्विंटल तांदुळ येणे बाकी आहे. पुरवठा विभागाकडील तालुकानिहाय शिल्लक तांदुळाची आकडेवारी उपलब्ध आहे. याबाबत मा. शिक्षण संचालक (प्राथ.) महाराष्ट्र राज्य पुणे तसेच मा. जिल्हाधिकारी यांचेकडे पाठपुरावा केलेला आहे. त्यानुसार जिल्हा पुरवठा अधिकारी सांगली यांनी दिनांक१९/०३/२०१६ रोजीच्या पत्रान्वये संबंधित सर्व तहसिलदार यांना तांदुळ वर्ग करणेबाबत कळविलेले आहे.

(१८) U-Dise वर शाळांकडून विदयार्थी संख्येची माहिती भरली जाते. U-Dise नुसार सन २०११-१२ ची इयत्ता १ ली ते ५ वी ची विद्यार्थी संख्या २,१४,१७८ इतकी असून इयत्ता ६ वी ते ८ वी विद्यार्थी संख्या १,३८,२४५ इतकी आहे.

सन २०११-१२ साठी मा. शिक्षण संचालक (प्राथ.) पुणे यांचेकडून इयत्ता १ ली ते ५ वी साठी १,९८,१४१ आणि इ. ६ वी ते ८ वी साठी १,१२,२४८ इतकी मंजुर आहे लेखापरिच्छेदामध्ये दर्शविलेली विद्यार्थी संख्या ही शिक्षक पटनिश्चिती अहवालावरुन घेतलेली आहे. त्यामध्ये केवळ जिल्हा परिषद शाळांची विदयार्थी संख्या असते. खाजगी शाळांमधील विदयार्थी संख्येचा समावेश नसतो.

शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत मंजुर लाभार्थी संख्येनुसार अपेक्षित खर्च आणि झालेला खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे,

(१९) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन परिपत्रक दिनांक १९/९/२०११ अन्वये प्राथमिक/ माध्यमिक/ उच्च माध्यमिक शाळांमधील विदयार्थी उपस्थितीबबाबत दिनांक ३/१०/२०११ ते दिनांक५/१०/२०११ दरम्यान विशेष पटपडताळणी मोहीम राबविण्यात आली. सांगली जिल्ह्यामध्ये खालील ६ शाळांची विदयार्थी अनुपस्थिती ५० % किंवा त्यापेक्षा जास्त आढळून आलेली आहे

(१) लोकनायक जयप्रकाश नारायण कन्नड प्राथमिक शाळा बागेळी वस्ती (संख) ता.जत.
(२) श्री संत गाडगेबाबा कन्नड प्राथमिक शाळा लिंगपुर वस्ती पांडोझरी ता. जत.
(३) डॅफोडियल इंग्लिश मेडीयम स्कुल उमइ ता. जत.
(४) श्री. मल्लिकार्जुन प्रायमरी न्यु इंग्लिश स्कुल तिकोंडी ता. जत.
(५) प्रोग्रेसिव्ह इंग्लिश मेडियम स्कुल मिरज.
(६) अल बमीन इंग्लिश स्कुल प्रायमरी स्कुल सांगली.

वरील ६ शाळांपैकी २ खाजगी अनुदानिक व ४ खाजगी विनाअनुदानित आहेत त्या सर्व शाळांना या कार्यालयाकडून दिनांक ६/१०/२०१२ आणि दिनांक ९/१०/२०१२ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावणेत आलेली आहे सदर नोटीसींचा खुलासा प्राप्त झालेनंतर सर्व शाळांची शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचकडे दिनांक ४/२/२०१३ व ५/२/२०१३ रोजी सुनावणी ठेवणेत आलेली होती. तदनंतर शासन निर्णय दिनांक १८/०४/२०१३ अन्वये एक समिती गठीत करून त्या समितीमार्फत ६ खाजगी प्राथमिक शाळांची फेरतपासणी घेणेत आलेली आहे. सदर समितीने त्यांचा तपासणी अहवाल या कार्यालयास दिनांक १७/७/२०१३ अन्वये सादर केलेला आहे.

अहवालामध्ये समितीने आर. टी. ई २००९ मधील तरतुदी व विशेष पटपडताळणी बाबत शासन निर्णय दिनांक २/५/२०१२ नुसार शाळेच्या मान्यतेबाबत नोटीसीत नमुद केल्यानुसार पुढील अनुषंगिक कारवाई करणेबाबत अभिप्राय दिलेला आहे. त्यानुसार ६ खाजगी प्राथमिक शाळांची मान्यता काढणेबाबत या कार्यालयाकडुन दिनांक २९/८/२०१३ रोजीच्या पत्रानुसार मा. शिक्षण संचालक (प्राथ.) पुणे यांचेकडे प्रस्ताव सादर करणेत आलेला असुन उपलब्ध आहे.

**इयत्ता १ ली ते ५ वी** **रक्कम रुपयामध्ये**

| कालावधी | मंजूर लाभार्थी | शालेय दिवस | मंजूर दर | अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|
| एप्रिल-ऑक्टोबर | १९८१४१ | १०५ | २.६० | ५,४०,९२,४९३ |
| नोव्हेंबर-मार्च | १९८१४१ | ११५ | २.८० | ६,३८,०१,४०२ |
| एकूण | १९८१४१ | २२० | | ११,७८,९३,८९५ |

**इयत्ता ६ वी ते ८ वी** **रक्कम रुपयामध्ये**

| कालावधी | मंजूर लाभार्थी | शालेय दिवस | मंजूर दर | अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|
| एप्रिल-ऑक्टोबर | ११२२४८ | १०५ | ३.८५ | ४,५३,७६,२५४/- |
| नोव्हेंबर-मार्च | ११२२४८ | ११५ | ४.१५ | ५,३५,७०,३५८/- |
| एकूण | ११२२४८ | २२० | | ९,८९,४६,६१२ |

एकुण इ. १ ली ते ५ ची आणि इ. ६ वी ते ८ वी मिळुन ११,७८,९३,८९+ ९,८९,४६,६१२ = २१,६८,४०,५०७/- विद्यार्थी संख्या, प्रति लाभार्थी खर्च मर्यादा, शालेय दिवस वरीलप्रमाणे एकूण रुपये २१,६८,४०,५०७/- इतकी खर्च मर्यादा असून रुपये २१,६८,४०,५०७/- इतका खर्च झालेला आहे त्यामुळे परिच्छेदात नमुद प्रमाणे जादा खर्च करणेत आलेला नाही.

**(५) परिच्छेद क्रमांक ३.१०५/८३ (सन २०११-२०१२)**

**प्रमाणकांच्या झेरॉक्स प्रतीवर देयक पारीत केलेबाबत**

शिक्षण विभाग (प्राथमिक) यांनी प्रमाणक क्रमांक १०१४ दिनांक ३१/०३/२०१२ रक्कम रुपये ३,४९,३४७/- चे कार्यालयीन खर्च स्टेशनरीचे देयक अदा केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) प्रमाणकाच्या झेरॉक्स प्रतिवर देयक लेखा विभागाकडून पारीत केले असल्याने सदरची रक्कम दुबार आदा झाली नसल्याची खात्री करता आली नाही.

(२) झेरॉक्स प्रतिवर खरेदी केलेल्या स्टेशनरी व इतर साहित्याची नोंद महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहिता १९६८ चे नियम ९१ अन्वये नमुना नं.३३ मध्ये घेणे आवश्यक आहे. व प्राप्त स्टेशनरी/साहित्याचा विनियोग काय केला याबाबत संबधिताच्या स्वाक्षरीसह विनियोग दाखविणे आवश्यक आहे. परंतू शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परिषदेने खरेदी केलेल्या साहित्याच्या नोंदी व विनियोगब केलेला नाही. सन २००३-२००४ पासूनच्या साठा नोंदवह्या मागुनही उपलब्ध केलेल्या नाहीत. त्यामुळे विना नोंद व विना विनियोग केलेला खर्च रक्कम रुपये ३,४९,३४७/- लेखा परिक्षणास मान्य करता येत नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सांगली यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) सन २०११-२०१२ मध्ये जिल्हा परिषद, सांगली कडील वित्त विभागकडील भांडार विभागाची स्टेशनरी साहित्याचे अनुदान अभावी सन २००३-०४ पासूनची प्रलंबित देयके अदा केलेली आहेत. सादील अनुदान ३१/०३/२०१२ रोजी प्राप्त झाले परंतु सदरची देयके संबधित मेजच्या कर्मचाऱ्याकडून मूळ प्रती गहाळ झालेले होते. वित्त विभागाकडून स्टेशनरी देयके अदा करणेबाबत वारंवार सुचित केलेमुळे अनुदान प्राप्त होताच दिनांक ३१/०३/२०१२ रोजी वित्त विभागाकडील स्थळ प्रतिवरून प्रलंबित बिलाची छायांकित प्रतिनुसार वित्त विभागास रक्कम अदा केलेली आहे. याबाबत सदर देयके दुबार अदा झाली नसलेची खात्री केली आहे.

(२) सदरील नोंदवही नमुना नं.३३ विहीत नमुन्यात ठेवणेत आलेली असून झेरॉक्स प्रतिवर खरेदी केलेल्या स्टेशनरी व इतर साहित्याचा विनियोग कार्यालयीन कामकाजासाठी करणेत आलेला आहे. सदर साहित्याचे संबधिताना वाटप करणेत आलेले आहे. परंतू संबधिताची साहित्य वाटपावर स्वाक्षरी घेणेत आलेली नाही. या कामकाजामध्ये निष्काळजीपणा केलेने श्री. व्हरकल लिपिक यांना मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांचेकडील आदेश क्र.प्रत्र जा.क्र.साप्रवि/आस्था-५/वशी/२८३/२०१०, दिनांक १५/०३/२०१० अन्वये श्री.एस.जे.व्हरकल, कनिष्ठ सहाय्यक यांचेवर जोडपत्र क्र.२ अन्वये आरोप पत्र क्र.३ (बाब क्र.(१) नुसार कार्यविवरण नोंदवही, सादील नोंदवही, नमुना नं.३०, जडसंग्रह नमुना नं.३२, साठा नोंदवही नमुना नं.३३ व प्रमाणकाच्या स्थळप्रती इत्यादी विविध बाबीच्या खरेदी नस्त्या कागदपत्रे अद्यावत नोंदीसह परिपूर्ण ठेवलेली नाहीत या कारणास्तव श्री.व्हरकल यांना दिनांक १५/०३/२०१० पासून निलंबित करणेत आलेले आहे. कारवाईची कागदपत्रे दप्तरी उपलब्ध आहेत.

**(६) परिच्छेद क्रमांक ३.१०७/८४, ८५ (सन २०११-२०१२)**

**१ ली ते ४ थी च्या अनूसूचित जाती व जमाती, भटक्या जाती विमुक्त जमातीतील दारिद्रय रेषेखालील विद्यार्थीनींना उपस्थिती भत्ता देणेबाबत एकूण अनुदान खर्च रक्कम रुपये ४,४६,६००/-**

जिल्हा परिषद सांगली, सन २०११-२०१२ (परिच्छेद क्रमांक ६२) - एकूण प्राप्त अनुदान ५,५४,०००/- रुपये पैकी २०३० विद्यार्थिनीसाठी वर्ग केली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) अखर्चित रक्कम रु. १,०८,०००/- एवढी शासनास भरणा केलेली नाही.

(२) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. पी. आर. इ./१०९१(९६१४) प्राशि-१ दिनांक १८/०२/९३ नुसार दारिद्रय रेषेखालील विद्यार्थी असेल तर दारिद्रय रेषेचा खालील कुटुंबाच्या यादीतील अनुक्रमांक प्रमाणपत्रामध्ये नमुद करणे आवश्यक आहे. २०३० विद्यार्थीनींपैकी काही विद्यार्थिनींचा दारिद्रय रेषेखालील यादीतील नंबर नमूद नाही.

(३) गट शिक्षणाधिकारी कडेगांव व वाळवा यांनी विद्यार्थीनींच्या याद्या प्रमाणित केलेल्या नाहीत.

(४) पंचायत समितीने सादर केलेल्या यादीत विद्यार्थीनी कोणत्या जाती जमातीमधील आहेत याचा उल्लेख नाही.

(५) १० तालुक्याच्या गट शिक्षण अधिकारी यांनी सदर विद्यार्थीनी किती दिवस उपस्थित होत्या व त्याप्रमाणे रक्कम अदा केल्या असल्याचा अहवाल उपलब्ध झाला नाही.

(६) महाराष्ट्र शासन, शिक्षण व सेवायोजन विभाग पीआरई १०९१/(९६१४)/प्रा.शि.१ दिनांक १० जानेवारी १९९२ नुसार झालेल्या मुख्याध्यापकांनी ३ महिन्याचा उपस्थिती अहवाल विस्तार अधिकारी यांच्याकडे, विस्तार अधिकारी यांनी गट शिक्षण अधिकाऱ्याकडे व त्यांनी शिक्षण अधिकाऱ्यांकडे पाठविल्यानंतर उपस्थिती प्रमाणे रक्कम वितरीत करण्याचे असताना तसा अहवाल उपलब्ध झाला नाही.

(७) पंचायत समिती जतने उपस्थिती भत्ता माहे एप्रिल व मे मध्येही अदा केल्याने रक्कम रुपये ४,८९२/- ची जादा अदाई केली आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सांगली यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) सन २०११-१२ मध्ये उपस्थिती भत्याकरीता एकूण ५,५४,०००/- इतके अनुदान प्राप्त झाले होते. परंतु प्रत्यक्षात कोषागार कार्यालयातून रक्कम रुपये ४,४६,६००/- इतकीच रक्कम काढणेत येऊन त्यापैकी रक्कम रुपये ४,४५,२८०/- एवढा खर्च झालेला उर्वरीत रक्कम रुपये १३२०/- ही चलनाने शासनास भरणा करणेत आलेली आहे. याबाबतचे चलन व कमी अधिक खर्चाचे विवरणपत्र दप्तरी उपलब्ध आहेत. तसेच उर्वरीत रक्कम रुपये १,०७,४००/- ही माहे २०१२ मध्ये शासनास सर्मपित केलेबाबत चलन दप्तरी उपलब्ध आहे.

(२) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र.पी.आर.इ./१०९१ (९६१४) प्राशि-१ दिनांक १८/०२/९३ नुसार आक्षेपामध्ये नमूद केलेनुसार लाभ दिलेल्या विद्यार्थीनींच्या यादीमध्ये दारिद्रय रेषा यादीमधील अनुक्रमांक नमूद केलेल्या याद्या दप्तरी उपलब्ध आहेत.

(३) आक्षेपात नमूद केलेनुसार गट शिक्षणाधिकारी कडेगांव व वाळवा यांचेकडून विद्यार्थीनींच्या याद्या प्रमाणित केलेबाबत दप्तरी उपलब्ध आहेत.

(४) आक्षेपामध्ये नमूद केलेनुसार पंचायत समितीने सादर केलेल्या यादीत विद्यार्थीनींचा जात प्रवर्ग नमूद करून दप्तरी उपलब्ध ठेवल्या आहेत.

(५) आक्षेपात सुचित केलेप्रमाणे १० तालुक्याच्या गट शिक्षणाधिकारी यांचेकडून विद्यार्थिनींच्या उपस्थितीबाबत व रक्कम अदा केलेबाबतचा अहवाल दप्तरी उपलब्ध आहे.

(६) महाराष्ट्र शासन, शिक्षण व सेवायोजन विभाग पीआरई १०९१/(९६१४)/प्रा.शि.१, दिनांक १० जानेवारी १९९२ नुसार झालेल्या मुख्याध्यापकांचा ३ महिन्याचा उपस्थिती अहवाल दप्तरी उपलब्ध आहे.

(७) जत तालुक्यामध्ये वाटप करणेत आलेली उपस्थित भत्याची रक्कम ही माहे जून, २०११ ते मार्च, २०१२ अखेर म्हणजे एकूण १० महिन्यांचीच अदा करणेत आलेली आहे. त्यामुळे जादा अदाई झालेली नसून याबाबतचे देयक दप्तरी उपलब्ध आहे.

**(७) परिच्छेद क्रमांक ३.१०८/८५, ८६ (सन २०११-२०१२)**

**शालेय पोषणआहार तालुकास्तरावर अनियमितता.**

जिल्हा परिषद सांगलीचे लेखापरीक्षण करताना पंचायत स्तरावर शालेय पोषण आहार योजनेत पुढील अनियमितता आढळल्या आहेत.

(१) पंचायत समिती पलूस कडील शालेय पोषण आहार योजनेतून प्रिंटर खरेदी केलेली असून शासन दर करार असताना स्थानिक खरेदी केली आहे व जडसंग्रह नोंदवहीत नोंद केलेली नाही.

(२) पंचायत समिती शिराळा कडील मुख्याध्यापक सदगुरु माध्यमिक आश्रम शाळा शिराळा इ. १ ते ४ थी साठी खर्च ७३,५८१/- जमा खर्च रोजकिर्द उपलब्ध नाही तसेच त्यांनी अध्यक्ष गोरखनाथ महिला बचत गट शिराळा यांना रक्कम रुपये ७९,५५७/- अदा केली आहेत. त्यांची संबधित कागदपत्रे उपलब्ध नाहीत तसेच साठा नोंदवही उपलब्ध झाली नाही. स्वयंपाकी किंवा मदतनीस यांना मानधन अदा करणे आवश्यक असताना नियमबाह्य मानधन प्रदान रक्कम रुपये ७,३९,१४२/- वसूल करून शासन भरणा करणे आवश्यक आहे .

(३) पंचायत समिती शिराळा कडील स्वयंपाकी व मदतनीस मानधनावर रक्कम रुपये ३२,१६,९०६/- इतका जादा खर्च कोणत्या निधीतून केला आहे हे समजून येत नाही.

(४) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्रं. शापोअ/ २०१०/प्र.क्र.१८/प्रशि/४, दिनांक २/२/२०११ नुसार अन्न शिजविण्याचे काम करण्यासाठी स्वयंपाकी किंवा मदतनीस यांना मानधन अदा करणे आवश्यक असताना नियमबाह्य मानधन प्रदान रक्कम रुपये ७,३९,१४२/- वसूल करून शासन भरणा करणे आवश्यक आहे.

(५) पंचायत समिती शिराळा कडील १९५ शाळांनी शिजवलेल्या अन्नासाठी १९,५०,०००/- खर्च होणे आवश्यक असता ४०,५७,९०६/- खर्च झालेला आहे. याबाबतची परिगणीत आकडेवारीच्या आधारे खात्री पटवावी अन्यथा अवाजवी खर्च वसुल करणे आवश्यक आहे.

(६) केंद्राकडुन प्राप्त खर्चाचे मासिक उपयोगिता प्रमाणपत्र ड नुसार खर्चाचा प्रदान रक्कमेशी मेळ घेता निवड महिन्यात ६,०६७/- जादा अदाई झाली आहे. ती रक्कम व उर्वरित महिन्यातील जादा अदाई परिगणीत करून वसूल करणे आवश्यक आहे.

(७) केंद्र प्रमुख मेणी यांचे फेब्रुवारी २०१२ मध्ये २३,७०० कि.ग्रॅ. तांदळावर जादा खर्च झालेला आहे. त्याची वसुली करणे आवश्यक आहे.

(८) पंचायत समिती तासगांव केंद्र प्रमुख वायफळे यांना जादा अदा झालेली रक्कम रुपये १,०००/- वसूल करून शासन निधीत जमा करणे आवश्यक आहे.

(९) पंचायत समिती पलूस अंतर्गत बुर्ली शाळा नंबर २ मध्ये दिनांक २१/८/११ ते ७/९/११ अखेर पोषणआहार दिलेला नाही. पोषण आहारापासुन विद्यार्थ्यांना वंचीत ठेवण्याचे प्रयोजन स्पष्ट करणे आवश्यक आहे. तसेच सदर कालावधीत मदतनीस मानधनासाठी रक्कमही अदा केली आहे. सदर महिन्यात मदतनिस यांनी काय कामकाज केले याबाबत खात्री पटविणे आवश्यक आहे.

(१०) पाच शाळाकडील योजनेचे कोणतेही अभिलेखे उपलब्ध झाले नाही. अभिलेख सादर करून खर्चाची पूर्तता दर्शविणे आवश्यक आहे.

(११) रामानंदनगर जिल्हा परिषद शाळा क्रं. १, २, व ३ कडील मक्तेदार यांचेबरोबर केलेला करारनामा उपलब्ध झाला नाही.

(१२) जिल्हा परिषद शाळा रामानंदनगर यांनी प्रमाणका शिवाय रक्कम रुपये ४४,२५९/- इतका खर्च नोंदवलेला आहे. याबाबत खर्चाची खात्री पटविणे. अन्यथा रक्कम वसूल करणे आवश्यक आहे.

(१३) जिल्हा परिषद शाळा क्रं-३ रामानंदनगर यांनी दिनांक ९/७/११ रोजी बँकेतून १,०००/- काढलेले असून त्याबाबतची जमा खर्चाची नोंद किर्दीला नाही. सदर रक्कम वसुल करणे आवश्यक आहे.

(१४) पंचायत समिती कवठेमहांकाळ मानधन ६४५/- जादा अदा झाले आहेत. रक्कम रुपये ६४५/- वसूल करणे आवश्यक आहे.

(१५) जत तालूक्यातील लेखापरीक्षण कालावधीत महाराष्ट्र शासन निर्णय व शालेय पोषण आहार २००४/२४६/०४ प्रा.शि. शालेय क्रिडा विभाग दिनांक ३१/३/०५ अन्वये ८० टक्के मासिक उपस्थिती लाभार्थी माहिती पत्रकानुसार इ.१ ते ५ वी लाभार्थी पटसंख्या ३,२०८ म्हणजेच वर्षाचे लाभार्थी ७०,५८,९२० आहे. म्हणजेच प्रत्यक्ष लाभ घेतलेले लाभार्थी संख्या ३१,१३२ वर्षाचे लाभार्थी ६८,४९,०४० आहेत. म्हणजेच २,०९,०८० लाभार्थी वंचित राहिले आहेत.

(१६) पंचायत समिती कडेगांव कडील शाळांचे मिळून रक्कम रुपये ८७,९७३/- एवढी रक्कम शाळास्तरावर अखर्चित राहिल्याचे आढळून आले.

(१७) पंचायत समिती कडेगांव व वाळवा कडील शाळांकडील पोषण आहार साहित्य अप्राप्त असल्यामूळे खंड कालावधी दिसून येतो. शालेय पोषण आहारा पासून वंचित रहावे लागले आहे. शिवाजी हायस्कुल चिंचणी अंबक शाळेने एप्रिल, २०१२ मध्ये हरभराडाळींची सुरुवातीची शिल्लक ९.५८ किलोने कमी घेतल्याने रक्कम रुपये ४०२/- वसूल करणे आवश्यक आहे.

(१८) पंचायत समिती वाळवा कडील खर्चित रक्कम रुपये ३,४२,९१७.१७ शासनास भरणा करणे आवश्यक आहे.

(१९) पंचायत समिती आटपाडी कडील केंद्र माडगूळे या शाळेच्या रोखवहीत १,०१०/- रक्कम देण्याचे प्रलंबित दिसते. तसेच शिक्षण विभागाकडील केंद्र माडगुळे कडील विद्यार्थ्यांना तांदुळ पुरवठा न झाल्याने पोषण आहारापासुन विद्यार्थी वंचित राहिले आहेत.

(२०) तालुक्यातील एकूण १७ शाळेतील मुलांना पोषण आहारापासून वंचीत ठेवलेले आहे.

(२१) (अ) पंचायत समिती आटपाडी तु.बु.मळा शेटफळे, शेटफळे क्रं १ व दिघंची क्रं.३ या शाळेतील साठा नोंदवही डेडस्टॉक करारनामा उपलब्ध झाला नाही. जिल्हा परिषद शाळा पळसखेड यांची एप्रिल, २०११ मध्ये १५ व जून, २०११ मध्ये ६ दिवस तांदूळ, डाळ, वरण, आमटी विना शिजवून आहार ११९.३०० ग्रॅम कमी दिला आहे.

(ब) जिल्हा परिषद, शाळा क्रं. १ यांनी नोव्हेंबर, २०११ मध्ये ७ दिवस १३९.७०० ग्रॅम तांदूळ, डाळ, वरण, उसळ, आमटी विना शिजवून कमी आहार दिलेला आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सांगली यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) पंचायत समिती पलूस कडील शिक्षण विभागाकडे ३ संगणक उपलब्ध आहेत. तथापी कामाची निकड पाहता प्रिंटरची आवश्यकता असलेले प्रिंटर खरेदी करताना शासन दर करार उपलब्ध नसल्याने व अनावधानाने पाहिला गेला नसलेने व शालेय पोषण आहाराचे कामकाज तातडीचे करणेचे आवश्यक असलेले स्थानिक दरपत्रक मागणी करून कमी दरपत्रक असणाऱ्या समेद इलेक्ट्रॉनिक्स कुंडल, यांचेकडून रक्कम रुपये ८९९९/- दराने प्रिंटरची खरेदी केली आहे. सदर प्रिंटरची नोंद ही साठा रजिस्टर पान क्र.६५ वर घेतलेली आहे. सदर नोंदीची प्रत उपलब्ध आहे. सदरचा प्रिंटर हा शालेय पोषण आहार योजनेच्या कामकाजाकरिता वापरला जात आहे.

(२) मुख्याध्यापक सदगुरु माध्यमिक आश्रमशाळा यांचे शालेय पोषण आहर कीर्द उपलब्ध असून सन २०११-१२ मध्ये इ.१ ली ते ४ थी साठी खर्च रक्कम रुपये ७३,५८१/- झाला असून लेखापरिक्षणावेळी सदर शाळेचे लिपीक वैद्यकीय रजेवर असल्याने रेकॉर्ड उपलब्ध झाले नाही. त्यामुळे लेखापरिक्षणास दाखविता आले नाही. सदर खर्चाच्या नोंदवही वरील रक्कम रुपये ७३,५८१/- खर्च प्रत्यक्ष पडताळणी करून झालेला खर्च याबाबत खर्चाच्या नोंदवह्या, रोजकीर्द व बँक पासबूकच्या सत्य प्रती, देयके दप्तरी उपलब्ध आहेत. गोरखनाथ महिला बचत गट शिराळा यांना रक्कम रुपये ७३,५८१/- अदा करणेत आली असून त्याबाबतचे बचत गटाचे खातेवर रक्कम जमा केलेच्या पासबूकच्या सत्यप्रती, देयके दप्तरी उपलब्ध आहेत. वर्षातील १० महिन्यांसाठी मानधन मंजूर आहे.

लेखापरिक्षण अहवालामध्ये सन २०११-१२ मध्ये फेब्रुवारी, २०११ ते मार्च, २०११ असे १३ महिने मानधन अदा केले त्यामुळे खालील ३ महिन्यांचे मानधन अनुज्ञेय ठरत नाही, असा आक्षेप आहे.

| | |
|---|---|
| फेब्रुवारी, २०११ | रुपये १,८५,०७२/- |
| मार्च, २०११ | रुपये १,६८,०७०/- |
| मार्च, २०१२ | रुपये ३,८६,०००/- |
| एकूण | रुपये ७,३९,१४२/- |

शासन निर्णय २ फेब्रुवारी २०११ नुसार फेब्रुवारी, २०११ पासून स्वयंपाकी तथा मदतनीस मानधन लागू करण्यात आलेले आहे. फेब्रुवारी, २०११ व मार्च, २०११ चे अनुदान पुढीलवर्षी म्हणजेच सन २०११-१२ मध्ये प्राप्त झालेले आहे. त्यानुसार फेब्रुवारी, २०११ व मार्च, २०११ चे स्वयंपाकी व मदतनीस मानधन अनुदान अदा करणेत आलेले आहे. सन २०११-१२ मध्ये १० महिन्यांचेच मानधन अदा केलेले आहे. याबाबत विवरणपत्र उपलब्ध आहेत. त्यामुळे शासन निर्णयानुसार मानधन अदा केलेले आहे.

(३) लेखापरीक्षण अहवालानुसार स्वयंपाकी तथा मदतनीस मानधनासाठी प्राप्त अनुदान रुपये ८,४१,०००/- इतके दर्शवून झालेला खर्च रुपये ४०,५७,९०६/- विचारात घेता रुपये ३२,१६,९०६/- इतका खर्च जादा झालेबाबत आक्षेप घेणेत आलेला आहे. प्रत्यक्षात सन २०११-१२ मध्ये जिल्हा परिषदेकडून प्राप्त अनुदान व खर्च खालीलप्रमाणे आहे :—

| प्राप्त अनुदान रुपये | खर्च अनुदान रुपये |
|---|---|
| ४०,६८,२०० | ४०,५७,९०६ |

वरीलप्रमाणे शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत स्वयंपाकी तथा मदतनीस या बाबीखाली जिल्हा परिषदेकडून प्राप्त अनुदानमधून विहित मर्यादेत खर्च झालेला आहे. एकूण प्राप्त अनुदानाचे व खर्चाचे विवरण पत्र, उपयोगिता प्रमाणपत्र उपलब्ध आहेत.

(४) महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्र.शापोआ/२०१०/ दिनांक २/२/२०११ नुसार अन्न शिजविण्याचे काम करण्यासाठी स्वयंपाकी तथा मदतनीस यांना वर्षातील १० महिन्यांसाठी मानधन मंजूर आहे.

लेखापरिक्षण अहवालामध्ये सन २०११-१२ मध्ये फेब्रुवारी, २०११ ते मार्च, २०११ असे १३ महिने मानधन अदा केले त्यामुळे खालील ३ महिन्यांचे मानधन अनुज्ञेय ठरत नाही, असा आक्षेप आहे.

| | |
|---|---|
| फेब्रुवारी, २०११ | रुपये १,८५,०७२/- |
| मार्च, २०११ | रुपये १,६८,०७०/- |
| मार्च, २०१२ | रुपये ३,८६,०००/- |
| **एकूण . .** | **रुपये ७,३९,१४२/-** |

शासन निर्णय २ फेब्रुवारी, २०११ नुसार फेब्रुवारी, २०११ पासून स्वयंपाकी तथा मदतनीस मानधन लागू करण्यात आलेले आहे. फेब्रुवारी, २०११ व मार्च, २०११ चे अनुदान पुढीलवर्षी म्हणजेच सन २०११-१२ मध्ये प्राप्त झालेले आहे. त्यानुसार फेब्रुवारी, २०११ व मार्च, २०११ चे स्वयंपाकी व मदतनीस मानधन अनुदान अदा करणेत आलेले आहे. सन २०११-१२ मध्ये १० महिन्यांचेच मानधन अदा केलेले आहे. याबाबत विवरणपत्र उपलब्ध आहेत. त्यामुळे शासन निर्णयानुसार मानधन अदा केलेले आहे.

(५) लेखापरिक्षण अहवालानुसार पंचायत समिती शिराळा कडील १९५ शाळांचा स्वयंपाकी/मदतनीस मानधनाचा खर्च प्रतिमहिना रुपये १०००/- प्रमाणे १० महिन्यांसाठी रुपये १९,५०,०००/- इतका खर्च होणे आवश्यक असताना रुपये ४०,५७,९०६/- इतका खर्च झालेचे अभिप्राय नोंदविलेला आहे.

शासन निर्णय २ फेब्रुवारी २०११ मधील मुद्दा क्रमांक ८ नुसार खालीलप्रमाणे स्वयंपाकी मानधन अदा करणेचे निकष आहेत :—

| अ.क्र. | लाभार्थी संख्या | प्रतिमहिना मानधन १० महिन्यांसाठी रुपयामध्ये |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | १ ते २५ | १००० |
| २ | २६ ते १९९ | २००० |
| ३ | २०० ते २९९ | ३००० |

| (१) | (२) | (३) |
| --- | --- | --- |
| ४ | ३०० ते ३९९ | ४००० |
| ५ | ४०० ते ४९९ | ५००० |
| ६ | ५०० ते ५९९ | ६००० |
| ७ | ६०० ते ६९९ | ७००० |
| ८ | ७०० ते ७९९ | ८००० |
| ९ | ८०० ते ८९९ | ९००० |
| १० | ९०० पेक्षा अधिक | १०००० |

वरीलप्रमाणे प्रत्येक शाळेसाठी रुपये १०००/- मानधन नसून शाळेच्या विद्यार्थी संख्येनुसार मानधनाची रक्कम वेगवेगळी निश्चित होते. वरील निकषानुसार १९५ शाळांचे प्रत्येक मानधन निश्चित करून मानधन अदा केलेले आहे. खर्चाची देयके उपलब्ध आहेत.

(६) पंचायत समिती, शिराळा गटाकडील केंद्राना देयकानुसार प्रदान केलेले अनुदान व केंन्द्रप्रमुखांनी सादर केलेल्या ड उपयोगिता प्रमाणपत्रामधील खर्च यांचा ताळमेळ घेणेत आलेला असून ताळमेळपत्रक उपलब्ध आहेत. केंद्रप्रमुखांकडील ड उपयोगिता प्रमाणपत्रामध्ये काही ठिकाणी लाभार्थी संख्येप्रमाणे खर्च नोंदविलेला नाही, काही ठिकाणी बेरजा चुकलेल्या आहेत, त्यामुळे तालुकास्तरावरुन प्रदान केलेल्या रकमा व केंद्राकडील ड उपयोगिता प्रमाणपत्रातील खर्च यामध्ये तफावत दिसून येते. ताळमेळ पत्रकामध्ये याबाबत तपशील व तफावतीची कारणे नमूद केलेली आहेत. जादा खर्च झालेला नाही.

(७) लेखापरिक्षण अहवालामध्ये केंद्र मेणी मध्ये फेब्रुवारी, २०१२ मध्ये एकूण ११६७१ लाभार्थी संख्या धरून प्रतिलाभार्थी १०० ग्रॅम प्रमाणे ११६७१०० ग्रॅम तांदूळ खर्च अपेक्षित असताना ११,९०,८०० ग्रॅम तांदुळ खर्च दाखविला असल्याने २३.७० किलोग्रॅम ज्यादा खर्च झालेले आक्षेप नमूद केलेले आहे. केंद्रप्रमुख मेणी यांचेकडील फेब्रुवारी, २०१२ मधील ड प्रपत्रकामध्ये शाळानिहाय लाभार्थीची बेरीज चुकलेने तफावत दिसून येत आहे. प्रत्यक्षात ड प्रत्रकानुसार केंद्र मेणी मधील शाळांचे ११९०८ लाभार्थी असून १०० ग्रॅम प्रमाणे ११९०८०० इतका तांदूळ प्रत्यक्ष खर्च झालेला असून त्याबाबतचे ड प्रपत्र उपलब्ध आहे.

(८) लेखापरिक्षण अहवालामध्ये नमूद केलेनुसार केंद्रप्रमुख वायफळे यांना मार्च, २०१२ चे स्वयंपाकी तथा मदतनीस यांचे मानधन रु.२०००/- होते. तथापि वायफळे केंद्रप्रमुखांच्या एकत्रित मागणीमध्ये सदर बिरणवाडी शाळेची रक्कम रु.३०००/- मागणी चुकीने रक्कम रु.१०००/- चे जादा अनुदान मागणी नोंदवली आहे. जादा अदाई झालेली रक्कम रु.१०००/- संबंधितांकडून वसूल करून दिनांक १४/२/२०१३ रोजी शासन निधीत भरणा केलेली असून चलन उपलब्ध आहे.

(९) जि.प.शाळा बुर्ली नं.२ मध्ये दिनांक २०/८/११ रोजी शिल्लक तांदूळ ५.६०० कि. ग्रॅम होता, त्यानंतर माहे ऑगस्ट, २०११ चा पावती क्र.७५५१५ नुसार दिनांक ७/९/११ रोजी ५०.०० कि.ग्रॅ.तांदुळ प्राप्त झालेला आहे. तसेच माहे सप्टेंबर २०११ चा पावती क्र.७८२६९ नुसार दिनांक २७/९/२०११ रोजी २००.०० कि.ग्रॅम तांदुळ प्राप्त झालेला आहे. असे एकूण माहे सप्टेंबर, २०११ मध्ये २५५.६०० कि.ग्रॅम इतका तांदूळ शाळा स्तरावर आहे. दिनांक २१/०८/२०११ ते दिनांक ७/०९/२०११ या कालावधीत वरीलप्रमाणे तांदूळ उशिरा प्राप्त झालेने विद्यार्थी संख्येनुसार आवश्यक तांदूळ उपलब्ध नसलेने पोषण आहार दिला गेला नाही. तसेच दिनांक २१/०८/२०११ ते ७/०९/२०११ या कालावधीमध्ये दिलेले मानधन माहे ऑगस्ट, २०११ मधील ८ दिवस व माहे सप्टेंबर, २०११ मधील ५ दिवस असे एकूण १३ दिवसांचे मदतनीसस मानधन रक्कम रु.५८१/- वसुल करून शासनास भरणा केली आहे. चलन क्रमांक ८ दिनांक १४/१२/२०१५ उपलब्ध आहे.

(१०) पलूस गटाकडील (१) जिल्हा परिषद शाळा नं.२ रामानंद नगर (२) जिल्हा परिषद शाळा नं.२ विठ्ठलनगर अमणापूर (३) जिल्हा परिषद शाळा नं.२ घोगाव (४) जिल्हा परिषद शाळा नं.३ कुंडल (५) जिल्हा परिषद शाळा नं.१ रामानंदनगर या पाच शाळाकडील योजनेचे अभिलेख लेखा परिक्षणाच्या वेळी सादर केली होती. त्यातील पोषण आहर किर्द, सादील किर्द मानधन पेडपत्रक, इ.अभिलेख पाहिलेली आहेत. उर्वरित अभिलेख तपासून मिळणेसाठी पंचायत समिती पलूस कडून जा.क्र.१४१२ दिनांक ३०/१२/२०१५ अन्वये कळविले आहे. अभिलेख तपासणीसाठी उपलब्ध आहेत.

(११) आक्षेपात नमूद केलेप्रमाणे रामानंदनगर जिल्हा परिषद, शाळा नं. १,२, व ३ कडील मक्तेदार यांचेबरोबर केलेला करारनामा उपलब्ध आहे.

(१२) जिल्हा परिषद, शाळा रामानंदनगर कडील पुढीलप्रमाणे प्रमाणके नुसार खर्च नोंदवलेला आहे :—

| अ. नं. | प्रमाणक दिनांक | रक्कम रुपये | अनुदान आदा केलेले तपशील |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | १३-४-११ | ३१४४ | सिद्धकला बचत गट |
| २ | ६-८-११ | ७९८४ | जयश्री चं. शिंत्रे |
| ३ | १७-९-११ | ३०४३ | जयश्री चं. शिंत्रे |
| ४ | २२-१०-११ | ६४०८ | जयश्री चं. शिंत्रे |
| ५ | ९-१-१२ | ३३२१ | जयश्री चं. शिंत्रे |
| ६ | ९-१-१२ | ६००० | मुख्याध्यापक मानधन |
| ७ | १४-३-१२ | ८३५९ | सिद्धकला बचत गट |
| ८ | १४-३-१२ | ६००० | मुख्याध्यापक मानधन |
| | **एकूण** | **४४२५९** | |

वरीलप्रमाणे अ.क्र. १ ते ८ नुसार रुपये ४४,२५९/- ची देयके उपलब्ध आहेत.

(१३) रामानंदनगर जिल्हा परिषद, शाळा क्र. ३ यांनी दिनांक ९/७/२०११ रोजी मदतनीस मानधनाची रक्कम बँकेतून रुपये १,०००/- काढलेली असून त्याबाबतची जमा खर्चाची नोंद किर्दीला घेणेत आली आहे, प्रत उपलब्ध आहे.

(१४) शालेय पोषण आहार मानधन ६४५/- जादा आदा झालेली रक्कम सुल करून शासन सदरी दिनांक २८/८/२०१२ रोजी भरणा करणेत आलेली असून, त्याचे चलन उपलब्ध आहे.

(१५) जत तालुक्यात सन २०११-१२ यावर्षी इयत्ता १ ली ते ५ वी ची पटसंख्या ३२,०८६ असून पोषण आहाराचे वार्षिक लाभार्थी ७०,५८,९२० इतके होते प्रत्यक्षात सरासरी लाभार्थी ३१,१३२ असून वर्षाचे लाभार्थी ६८,४९,०४० इते आहेत म्हणजेच २,०९,०८० लाभार्थी वंचित राहिले आहेत असा आक्षेप आहे. सन २०११-१२ मधील इयत्ता १ ली ते ५ वी चे लाभार्थ्यांचा गोषवारा पुढीलप्रमाणे आहे :—

| अ. नं. | १ली ते ५वीची एकूण पटसंख्या | २०११-१२ मधील शालेय कामकाजाचे दिवस | पटसंख्येनुसार लाभार्थी (२ x ३) |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | ३२०८६ | २२० | ७०५८९२० |

| एकूण पटसंख्येपैकी प्रत्यक्ष विद्यार्थी उपस्थिती | उपस्थितीनुसार एकूण लाभार्थी (३ x ५) | उपस्थितीची टक्केवारी (३ x ५) |
|---|---|---|
| (५) | (६) | (७) |
| ३११३२ | ६८४९०४० | ९७.०२% |

शालेय पोषण आहार योजनेंतर्गत दियार्थ्यांना दिला जाणरा आहार विद्यार्थ्यांचा दैनिक उपस्थितीनुसार दिला जातो. तयानुसार इयत्ता इयत्ता १ ली ते ५ वी ची एकूण पटसंख्या ३२,०८६ असली तरी वार्षिक सरासरी उपस्थिती ३१,१३२ इतकी आहे. म्हणजे एकूण पटसंख्येच्या सरासरी ९७.०२% उपस्थिती प्रत्यक्षात होती व त्यानुसार २०११-१२ मधील लाभार्थीची संख्या ६८,४९,०४० इतकी होते आणि दैनिक उपस्थितीनुसार ६८,४९,०४० लाभार्थ्यांना आहार शिजवून देण्यात आलेला आहे. शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत उपस्थित लाभार्थ्यानुसार आहार दिलेला आहे :—

(१६) पंचायत समिती, कडेगाव कडील खालील शाळांचे मिळून रक्कम रुपये ८७,९७३/- इतकी रक्कम शाळास्तरावर अखर्चित राहिलेबाबत आक्षेप घेण्यात आलेला आहे.

याबाबत झालेला खर्च व शिल्लक रक्कम भरणा केलेबाबत माहिती पुढीलप्रमाणे आहे :—

| अ.क्र. (१) | शाळा (२) | आक्षेप रक्कम रु. (३) | खर्च रुपये (४) | चलन भरणा रु. (५) |
|---|---|---|---|---|
| १ | ढाणेवाडी | १२२७२ | ० | १२२७२ |
| २ | तूपेवाडी | २१९२ | ११७३ | १०१९ |
| ३ | येतगाव | १३३१२ | ७४६८ | ५८४४ |
| ४ | खेराडी वांगी | १६३३१ | ० | १६३३१ |
| ५ | उपाळे वांगी | ३१४१ | १६४४ | १४९७ |
| ६ | कान्हर वाडी | ८५१० | ० | ८५१० |
| ७ | हिंगणगाव | २७९७५ | ० | २७९७५ |
| ८ | सोनकिरे | ४२३९ | ० | ४२३९ |
| | **एकूण** | **८७९७२** | **१०२८५** | **७७६८७** |

मागे दर्शविले प्रमाणे रुपये ८७,९७२/- पैकी रुपये १०,२८५/- इतक्या खर्चाची देयके व अखर्चित रक्कम रुपये ७७,६८७/- शासन निधीत परत भरणा दिनांक १०/१२/२०१५ व दिनांक ११/१२/२०१५ रोजी केली आहे सोबत चलन उपलब्ध आहे.

(१७) पंचायत समिती, कडेगांव व वाळवा कडील शालेय पोषण आहार तांदुळ आणि धान्यदी मालाचा पुरवठा करणेसाठी शासनस्तरावरुन दिनांक महाराष्ट्र स्टेट को. ऑपरेटीव्ह मार्केटिंग फेडरेशन लि. यांची नियुक्ती करणेत आलेली होती. मार्केटिंग फेडरेशन यांचे बरोबर कराराची मुदत दिनांक ३०/०६/२०११ रोजी संपलेली आहे. तसेच मा. शिक्षण संचालक पुणे यांचेकडील पत्र क्र. २३९४ दिनांक १०/०६/२०११ अन्वये जुलै २०११ साठी पत्र क्र. ३२७५ तसेच दिनांक ०६/०८/२०११ अन्वये माहे ऑगस्ट २०११ साठी पत्र क्र. ३७४५, दिनांक १२-०९-२०११ अन्वये माहे सप्टेंबर २०११ साठी पत्र क्र, ४३०९, दिनांक १०/१०/२०११ अन्वये माहे- आक्टोंबर २०११ साठी पुढील मुदतवाढ टप्याटप्याने प्राप्त झाली असलेने मुदतवाढ मिळालेनंतर जिल्हा मार्केटिंग कार्यालयकडे मागणी नोंदवली आहे. तदनंतर जिल्हा मार्केटिंग कार्यालयाकडुन मागणी नुसार पुरवठा झालेला आहे. मुदतवाढ उशिरा मिळालेमुळे जिल्हा मार्केटिंग कार्यालयाकडुन तांदुळ पुरवठा उशिरा झालेले शालेय पोषण आहारामध्ये खंड पडलेला आहे. तसेच श्री शिवाजी हायस्कूल चिंचणी अंबक यांना माहे मार्च २०१२ व एप्रिल, २०१२ मधील हरभरा डाळ कमी नोंद केलेची रक्कम रुपये ४०२/- चलनाने दिनांक ०९/१०/२०१२ रोजी भरणा केलेले आहे. चलन दप्तरी उपलब्ध आहे.

(१८) पंचायत समिती, वाळवा कडील सन २०११-२०१२ चे लेखा परिक्षणामध्ये शालेय पोषण आहाराची एकूण रुपये ३,४२,९१७.१७ इतकी रक्कम अखर्चित असलेबाबत आक्षेप आहे.

सदरची रक्कम दिनांक ३१/०३/२०१२ रोजी तालुकास्तरावरुन शाळांना प्रत्यक्ष माहे एप्रिल, २०१२ मध्ये प्राप्त झालेल्या आहेत व सदर रक्कमा पुढीलप्रमाणे खर्च झालेला आहेत :—

| अ. क्र. (१) | शाळेचे नाव (२) | खर्च दिनांक (३) | रक्कम रुपये (४) |
|---|---|---|---|
| १ | पेठ नं.२ | ९/४/१२ | ४६५८०.४५ |
| २ | पेठ गोसावीवस्ती | ४/४/१२ | ३८०७८ |
| ३ | महादेववाडी | १८/४/१२ | २६३७०.२९ |
| ४ | गोळेवाडी | ३/४/१२ | १९६१७.४३ |
| ५ | भाटवाडी | १०/४/१२ | ५५६१४ |
| ६ | नेर्ले केंन्द्र शाळा नं.१ | १३/४/१२ | ४९५७४.२५ |
| ७ | नेर्ले शाळा नं.३ | १४/४/१२ | १७१७८ |
| ८ | येवलेवाडी | ७/५/१२ | १५८०१ |
| ९ | नेर्ले नं.२ | ११/४/१२ | ४५१९०.७५ |
| १० | नवेखेडे | १२/४/१२ | २८९१३ |
| | | **एकुण** | **३४२९१७.१७** |

सदरचा खर्च हा सन २०११-१२ या कालावधीतील देयकांचाच असून सदरची रक्कम माहे एप्रिल, २०१२ मध्ये अदा झाली असल्याने अखर्चित नाही. याबाबत शाळांचे देयके उपलब्ध आहेत.

(१९) पंचायत समिती, आटपाडीकडील केंद्र माडगुळे यांचेकडून नजरचुकीने ग. दी. मा. हायस्कुल माडगुळे या शाळेल रक्म रुपये १,०१०/- अदा करण्याऐवजी जिल्हा परिषद शाळा य.पा.वाडी यांना अदा केली यास्तव सदरची रक्कम जिल्हा परिषद शाळा य.पा.वाडी यांचेकडे शिल्ल्क दिसून आली. तथापी सदरची रक्कम ग.दी.मा.हायस्कुल माडगुळे यांची असलेने जिल्हा परिषद शाळा य.पा.वाडी कडुन धनादेश क्रं.२१०३८० दिनांक १३/०९/२०१२ रोजी ग.दी.मा. हायस्कुल, माडगुळे यांचे बॅक खातेवर वर्ग केलेली आहे.

केंद्र माडगुळेकडील शाळांमध्ये पोषण आहारामध्ये खंड पडला असा आक्षेप आहे. याबाबत केंद्रातील काही शाळांच्या मुख्याध्यापकांचा खुलासा उपलब्ध करून घेतलेल्या आहे. त्यांचे अहवालानुसार सदर कालावधीमध्ये तांदूळ व धान्यादी मालाची मागणी विहित मुदतीत केंद्रप्रमुखामार्फत पंचायत समितीकडे केलेली आहे. तथापि पुरवठाकडून माल विलंबाने मिळाल्याने सदर कालावधीमध्ये आहारामध्ये खंड पडलेला आहे. तसेच शासन स्तरावरुन जिल्हा मार्केटिंग फेडरेशन यांचे बरोबर कराराची मुदत दिनांक ३०-०६-२०११ रोजी संपलेली आहे. तद्नंतर त्यांना वेळोवेळी एक-एक महिन्याच्या मुदतवाढी टप्याटप्याने दिल्या असल्यामुळे त्या दरम्यान मालाचा पुरवठा विलंबाने झालेला असल्याने पोषण आहार उपलब्ध करून दिलेला नाही. धान्यादी माल पुरवठा होताच आहार नियमितपणे दिलेला आहे.

(२०) जिल्हा मार्केटींग फेडरेशन सांगली व मा.शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जि.प.सांगली यांचेशी पत्रव्यवहार करून तांदुळ व धान्यादी माल पुरवठा करून घेतला जातो.

आटपाडी तालुक्यातील एकूण १७ शाळांमध्ये विविध कालावधीमध्ये पोषण आहाराचा खंड पडले बाबत आक्षेप घेतलेला आहे. याबाबत संबंधित सर्व मुख्याध्यापकांचे अहवाल उपलब्ध आहेत. यामध्ये शालेय पोषण आहारातील खंड कालावधी व त्या कालावधीसाठी प्रत्यक्ष धान्यादी मालाची मागणी केलेला दिनांक व सदर कालावधीचा तांदूळ प्रत्यक्ष प्राप्त झालेचा दिनांक याबाबत माहिती अहवालामध्ये नोंदविलेली आहे. त्यांचे अहवालानुसार सदर कालावधीमध्ये तांदूळ व धान्यादी मालाची मागणी विहीत मुदतीत केंद्रप्रमुखामार्फत पंचायत समिती कडे केलेली आहे. तथापि पुरवठादाराकडुन माल विलंबाने मिळाल्याने सदर कालावधीमध्ये आहारामध्ये खंड पडलेला आहे.

तसेच शासन स्तरावरुन जिल्हा मार्केटिंग फेडरेशन यांचे बरोबर कराराची मुदत दिनांक ३०-६-२०११ रोजी संपलेली आहे. तद्नंतर त्यांना वेळोवेळी एक-एक महिन्याच्या मुदतवाढी पुढीलप्रमाणे देणेत आलेल्या आहेत :—

| अ. क्र. (१) | शि.सं.पुणे यांचे पत्र दिनांक (२) | कालावधी (३) |
|---|---|---|
| २ | ७/६/२०११ | जून-जुलै ११ |
| ३ | ४/८/२०११ | ऑगस्ट, २०११ |
| ४ | ८/९/२०११ | सप्टेंबर, २०११ |
| ५ | ३०/९/२०११ | ऑक्टोबर, २०११ |
| ६ | १/११/२०२१ | नोव्हेंबर, २०११ ते ऑक्टोबर, २०१२ |

वरीलप्रमाणे पुढील मुदतवाढ टप्याटप्याने प्राप्त झाली असलेने मुदतवाढ मिळालेनंतर जिल्हा मार्केटिंग कार्यालयाकडे मागणी नोंदवली आहे.त्यानुसार त्यांनी पुरवठा केलेला आहे. मालाचा पुरवठा झालेनंतर नियमितपणे आहार दिलेला आहे.

(२१) (अ) पंचायत समिती आटपाडी तु.बु.मळा शेटफळे, शेटफळे क्रं. १ व दिघंची क्रं.३ या शाळेतील साठा नोंदवही डेडस्टॉक करारनामा दप्तरी उपलब्ध आहेत. इयत्ता १ ते ५ साठी प्रति विदयार्थी रुपये १.००/- व इ. ६वी ते ८ वी साठी १.३०/- पैसे मानधन होते.

तसेच मुख्याध्यापक मानधनप्रति महिना रक्कम रुपये १००/- प्रमाणे आहे. जिल्हा परिषद, शाळा पळसखेल यांचे शालेय पोषण माहे एप्रिल २०११ व माहे जून, २०११ मध्ये तांदळाची पोषण आहार शिजविण्याची मानधनाची रक्कम वसुल करून रुपये २४००/- दिनांक १२/११/२०१३ रोजी चलनाने शासनास भरणा केलेली आहे. चलन दप्तरी उपलब्ध आहे.

(ब) जिल्हा परिषद शाळा आटपाडी क्रं. १ यांचे शालेय पोषण आहार माहे नोव्हेंबर २०११ मध्ये पोषण आहार शिजविण्याच्या मानधनाची व मुख्याध्यापक मानधनाची रक्कम रुपये ८६५/- दिनांक १२/११/२०१३ रोजी वसुल करून शासनास भरणा केलेली आहे. सोबत चलन उपलब्ध आहे.

**(८) परिच्छेद क्रमांक ३.१०९/८६, ८७ (सन २०११-२०१२)**

**प्राथमिक शिक्षक सेवापुस्तकातील त्रुटीबाबत.**

शिक्षण विभाग जिल्हा परिषद सांगली अंतर्गत तालुक्यातील सेवा पुस्तकात पुढील त्रुटी आढळून आलेल्या आहेत :—

**(१) पंचायत समिती कवठेमहांकाळ—**

(१) सारिका अण्णासो पाटील जि.प.शाळा मौजे गर्जेवाडी यांच्या जन्मातारीख अक्षरी अंकी फरक आहे. जन्मतारीख पडताळणी नाही. जात पडताळणी नोंद नाही.

(२) कोंडीबा आण्णासो कोळेकर रानमळा यांचे सेवा पुस्तकातील वेतन व वेतन देयकातील वेतनात फरक आहे.

(३) विश्वनाथ सुबराव काशिद केरेवाडी वेतनवाढ सेवा पुस्तकात नोंद न करताच वेतन आदा केले आहे.

**(२) पंचायत समिती आटपाडी—**

(१) जीवन आकाराम सावंत गोमेवाडी केंद्र करगणी वैद्यकीय प्रमाणपत्र नाही. कर्मचाऱ्याची वेतन वाढीवर सही नाही. गट विमा नोंद नाही.

(२) अंकुश नामदेव माळी माळेवाडी केंद्र करगणी वैद्यकीय प्रमाणपत्र नाही. गटविमा र. रु.१२०/- ची नोंद नाही. गट विकास अधिकारी यांच्या सह्या नाहीत.

(३) तेली अश्विनी रमेश लक्ष्मीनगर वेतनवाढीवर कर्मचारी सही नाही.

(४) शिवाजी ज्योती खताळ उपशिक्षिका वडाचा कोंड वैद्यकीय प्रमाणपत्र साक्षंकित नाहीत. रजा लेखे अपूर्ण आहेत.

(५) मुकुंद पोपट कारंडे, उपशिक्षक कुंभारगाव शैक्षणिक दाखला व जातीचा दाखला नाही. वेतनवाढीवर कर्मचाऱ्यांची सही नाही.

(६) श्रीमती. माया विष्णू पिंजारी उपशिक्षिका केंद्र करगणी रजा लेखे व सेवा पडताळणी अभिलेखे अपुर्ण आहेत. वैद्यकीय दाखला व जातीचा दाखला नाही. वेतनवाढीवर कर्मचाऱ्याची सही नाही.

**(३) पंचायत समिती जत—**

(१) सिताराम बाबासाो यादव २००८-०९ ते ११-१२ पर्यंत सेवा पडताळणी नाही. रजा अभिलेखे अपुर्ण आहे.

(२) श्रावनकुमार सेवापुस्तकात संगणक परीक्षा पास झाल्याची नोंद नाही.

(३) पाडवी नरोत्तम शिबल्या शिक्षणसेवक ६ वा वेतन निश्चिती केल्याची व संगणक परीक्षा पास नाही.

(४) पल्लवी भारत भालशंकर शिक्षणसेवक यांचे सेवा पुस्तकात जात व जन्मदिनांक प्रमाणपत्रावरुन प्रमाणित केले नाही.

(५) श्री. शशिकांत वसंतराव कुलकर्णी रक्कम रु.१०००/- अपंग भत्ता दिलेली आहे. अपंग असण्याची नोंद नाही व अपंगाचे प्रमाणपत्र नाही. सर्वच शिक्षकांची ६ वा वेतन आयोगाप्रमाणे वेतन निश्चिती करुन वेतन आदा केले आहे वेतन निश्चितीचे पडताळणी होणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सांगली यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—**

**पंचायत समिती, कवठेमहांकाळ—**

(१) सारिका आण्णासाो पाटील जि.प.शाळा मौजे गर्जेवाडी यांच्या जन्मातारखेत अक्षरीमध्ये गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती, कवठेमहांकाळ यांचे स्वाक्षरीने दुरुस्त केली असून जन्म तारखेची पडताळणी शाळा सोडलेच्या दाखल्यावरुन केलेली आहे. तसेच जात पडताळणीची नोंद गट शिक्षणाधिकारी यांचे स्वाक्षरीने सेवापुस्तकात घेणेत आलेली आहे.

(२) कोंडीबा आण्णासाो कोळेकर मौजे रानमळा यांना वेतन देयकामध्ये आदा केलेले वेतन बरोबर असलेची खात्री गट शिक्षणाधिकारी यांनी केली असून सोबत सत्य प्रत दप्तरी उपलब्ध आहे.

(३) विश्वनाथ सुबराव काशिद मौजे केरेवाडी यांचे वेतनवाढीची सेवापुस्तकात नोंद गट शिक्षण अधिकारी यांचे स्वाक्षरीने घेणेत आलेली आहे. सत्यप्रत दप्तरी उपलब्ध आहे.

**(२) पंचायत समिती, आटपाडी—**

(१) जीवन आकाराम सावंत, गोमेवाडी केंद्र करगणी यांचे सेवापुस्तकात वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र, करगणी यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र उपलब्ध आहे. वेतनवाढ नोंदी पुढे कर्मचारी यांची सही घेतली आहे. गटविमा रक्कम रु.१२० ची नोंद गट शिक्षण अधिकारी यांचे स्वाक्षरीने घेतली आहे. सत्य प्रत दप्तरी उपलब्ध आहे.

(२) अंकुश नामदेव माळी माळेवाडी केंद्र करगणी यांचे सेवापुस्तकात वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, करगणी यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र जोडलेले आहे. गटविमा रु.१२० ची नोंद गट शिक्षण अधिकारी यांचे स्वाक्षरीने घेतली आहे. सोबत सत्यप्रत उपलब्ध आहे.

(३) तेली अश्विनी रमेश लक्ष्मीनगर वेतनवाढीवर नोंदी पुढे सदर कर्मचाऱ्याची सही घेतली आहे. सोबत सत्यप्रत दप्तरी उपलब्ध आहे.

(४) शिवाजी ज्योती खताळ उपशिक्षिका वडाचा कोंड यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र गट शिक्षण अधिकारी यांनी साक्षांकित केलेले आहे. रजा लेखे गट शिक्षण अधिकारी यांचे स्वाक्षरीने पुर्ण केलेले आहेत. सत्यप्रती दप्तरी उपलब्ध आहेत.

(५) मुकुंद पोपट कारंडे उपशिक्षक, कुंभारगाव यांचे शैक्षणीक दाखले व जातीचा दाखला उपलब्ध आहे. वेतनवाढीवर कर्मचाऱ्याची सही घेतली आहे. सत्यप्रती दप्तरी उपलब्ध आहेत.

(६) श्रीमती. माया विष्णू पिंजारी उपशिक्षक केंद्र करगणी यांचे रजा लेखे व सेवा पडताळणी अभिलेख पूर्ण केले आहेत. वैद्यकीय दाखला व जातीचा दाखला सेवा पुस्तकामध्ये उपलब्ध आहे. वेतनवाढीवर कर्मचाऱ्याची सही घेतली आहे. सत्यप्रती दप्तरी उपलब्ध आहेत.

**(३) पंचायत समिती, जत—**

(१) श्री. सिताराम बाबासाो यादव यांचे सेवापुस्तकात सन २००८-०९ ते २०११-१२ अखेर सेवा पडताळणी गट शिक्षण अधिकारी पंचायत समिती, जत यांनी केलेली आहे. तसेच रजा अभिलेख गट शिक्षण अधिकारी यांचे स्वाक्षरीने पूर्ण केले आहेत. सत्यप्रती दप्तरी उपलब्ध आहेत.

(२) श्री. साजवकुमार कोरे यांचे सेवापुस्तकात संगणक परीक्षा पास झालेची नोंद गट शिक्षण अधिकारी यांचे स्वाक्षरीने घेणेत आली आहे. सोबत सत्यप्रत दप्तरी उपलब्ध आहे.

(३) श्री. पाडवी यांना उपशिक्षक यांना मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांचे कडील आदेश क्र. प्राशिवि/आस्था/१/शिक्षणसेवक/भरती ८०/२००५, दि. ०२/०७/२००५ अन्वये शिक्षण सेवक म्हणून नेमणूक देणेत आलेली आहे. त्याना नियमित सहाय्यक शिक्षक सेवक म्हणून मा. मु.का.अ. जि.प. सांगली यांचेकडील आदेश जा.क्रं. प्राशिवि/वशि/ आस्था- १/शिक्षण सेवक नियमित १३३९/२०११ अन्वये श्री.पाडवी यांची ३ वर्षे शिक्षण सेवक म्हणून सेवा पुर्ण झालेने दिनांक २९/०१/२०११ पासून सेवेत नियमित केले आहे, त्यामुळे ६ व्या वेतन आयोगाची वेतननिश्चिती केलेली नाही तसेच संगणक परीक्षा माहे, मार्च २००५ मध्ये पास झालेची नोंद मुळ सेवा पुस्तकात घेतलेली आहे, सत्य प्रति दप्तरी उपलब्ध आहेत.

(४) श्रीमती पल्लवी भारत भालशंकर यांचे सेवापुस्तकामध्ये जात वैधता प्रमाणपत्रावरुन जातीची पडताळणी केली असुन जन्मतारखेची पडताळणी गट शिक्षण अधिकारी यांनी शाळा सोडलेच्या दाखल्यावरुन केली आहे. साक्षंकित प्रत दप्तरी उपलब्ध आहे.

(५) श्री. कुलकर्णी यांचे सेवापुस्तकात अपंग असलेबाबातची नोंद गट शिक्षण अधिकारी यांचे स्वाक्षरीने घेणेत आलेली असून सोबत प्रमाणपत्र उपलब्ध आहे. तसेच सर्व शिक्षकांची ६ वा वेतन आयोगाप्रमाणे वेतन निश्चिती केलेल्या सेवा पुस्तकांची पडताळणी करणेत आलेली आहे. सोबत सत्यप्रती दप्तरी उपलब्ध आहेत.

**(९) परिच्छेद क्रमांक ३.३२३ (सन २०११-२०१२)**

**कोल्हापूर पद्धतीचा बंधारा मिटकी (घुटूगडे) ता.आटपाडी बांधकामात झालेल्या अनियमितताबाबत.**

प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेच्या आधिन राहून ठेव कामे या शिर्षामधून उपरोक्त कामावर रुपये ४६,८०,६४३/- इतका खर्च करणेत आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत :—

(१) बंधाऱ्याचे पायामध्ये १:३:६ प्रमाणात सिमेंट कॉंकिट टाकणे या बाबीमध्ये देय परिमाणापेक्षा जादा २१.६३ घनमीटर साठी रुपये २२९३.६५/- दराप्रमाणे रुपये २८,१४३/- जादा अदा झालेले आहेत. जादा अदा रक्कम वसूल करून शासनास भरणा करणे आवश्यक आहे.

(२) चॅनल बसविणे या बाबीमध्ये देय परिमाणापेक्षा ०.१९ जादा रनिंग मीटर दर रुपये ६६५/- प्रमाणे १२६/- जादा अदा झाले आहे. सदर रक्कम वसूल करून शासनास भरणा करणे आवश्यक आहे.

(३) मोजमाप पुस्तकातील बाब क्र.५, ८, १० व ११ स्टील पुरवठा फॉर्म वर्क्स व भराव करणे या कामाची असून त्यांची संदर्भ मापे (रेकॉर्ड एन्ट्री) मोजमाप पुस्तक क्र.४३२ मध्ये नोंदविलेली आहेत. सदरचे मोजमाप पुस्तक लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

(४) बाब क्र.८ नुसार बंधाऱ्याचेकडेला भराव केला असून त्याच्या परिमाणानुसार स्टँडर्ड स्पेसिफिकेशन प्रमाणे २ टक्के दबाई घट परिणाम २४.६३ घनमीटर वजा केले नाही. त्यामुळे दर रुपये ७९.३५/- प्रमाणे रुपये १९५५/- चे जादा प्रदान झाले आहे. जादा प्रदानाची वसूली करणेत यावी.

(५) रॉयल्टीसाठी रुपये ८३,०५४/- इतकी रक्कम चलनाने भरणा केली आहे. सदर चलनावर ठेकेदाराचे नाव नाही. तरी ठेकेदाराने भरणा केलेले मुळ चलन अथवा कागदपत्रे उपलब्ध करून देण्यात यावीत.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सांगली यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—**

(१) मोजमाप पुस्तक क्र.८०४ पान क्र.९८६/८७ चे अवलोकन केले असता, शाखा अभियंता यांनी केलेली परिगणना तपासले असता प्रत्येक साखळी क्रमांकावर काटछेदाची उंची वेगवेगळी असलेने परिगणना योग्य आहे. त्यामुळे जादा अदायगी झालेली नाही.

(२) बाब क्र.४ चॅनल बसवणे मोजमाप पुस्तक नंबर ८०४ पान नंबर ९८८(ब) वर नोंदविले आहे व शाखा अभियंता यांनी केलेली परिगणना योग्य आहे. त्यामुळे रुपये १२६/- जादा अदा झालेली नाही.

(३) आक्षेपात नमूद केलेले मोजमाप पुस्तक क्र.४३२ उपलब्ध असून या कार्यालयाचे पत्र क्र.लसिं/जसंवि/ले-४/३४३२/दिनांक १०/१२/२०१५ रोजीच्या पत्रान्वये अभिलेखे उपलब्ध असल्याचे स्थानिक निधी लेखा विभागास कळविणेत आलेले आहे.

(४) सदर बाबीचे परिमाण मोजमाप पुस्तक नंबर ८०४ पान नंबर ९१ प्रमाणे ३५८.०७ घ.मी. इतके आहे. ५३८.०७ × २ टक्के दबाई घट परिमाण एकूण ७.१६ घ.मी.परिमाण येते. ७.१६ घ.मी. × ७९.३५ निविदा दर = ५६८.१४ रक्कम येते. नमुना १४ सार्वजनिक बांधकाम ५३२ खाते बदल नोंद आदेश (T.E.B.I.NO-1 FOR १२/२०१५) नुसार समायोजित करून वसुल केले आहे. सदरचे नोंद आदेश दप्तरी उपलब्ध आहेत.

(५) सदर कंत्राटदाराच्या जमा असलेल्या अनामत रक्कमेतून रुपये ८३,०५४/- मात्र वसूली करून ती ०८५३ गौणखनिज या लेखाशिर्षाखाली नमुना १४ सार्वजनिक बांधकाम ५३२ खाते बदल नोंद आदेश (T.E.B.I.NO-1 FOR १२/२०१५) नुसार समायोजित करून वसूल केले आहे. सदरचे नोंद आदेश दप्तरी उपलब्ध आहेत.

**(१०) परिच्छेद क्रमांक ३.३२४ (सन २०११-२०१२)**

**निवड महिन्यातील रनिंग बिलाचे कागदपत्रे उपलब्ध न झाल्याबाबत.**

सन २०११-१२ चे लेखापरिक्षणामध्ये सप्टेंबर, २०११ व मार्च, २०१२ चा निवड महिन्यामध्ये १५ अपूर्ण कामावर १,१५,९७,३७८/- इतका खर्च करणेत आलेला आहे. खर्च पडलेल्या रनिंग बिलासाठी संबधित कामाचे प्राकलन व नोंदवहया उपलब्ध करून देण्याबाबत मागणी करूनही खालील कामांचे संबधित अभिलेखे उपलब्ध झाले नाहीत. उपरोक्त खर्च योग्य झाल्याची खात्री होत नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सांगली यांचेकडून खालीलप्रमाणे खुलासा कळविण्यात आला.**

१३ पुर्ण झाली असून त्यावर रु. ३,९४,०१,१८०/- इतके खर्च झालेले आहेत. पुर्ण झालेल्या कामाचे स्थानिक निधी लेखा परिक्षण सन २०१२-१३ व २०१३-१४ या वर्षामध्ये झालेले आहे.

**(११) परिच्छेद क्रमांक ३.४०८ (सन २०११-२०१२)**

**खर्च प्रमाणके व अनुषंगीक अभिलेख नसताना झालेल्या खर्चाबाबत.**

ग्रामीण पाणी पुरवठा विभागाने सन २०११-१२ मध्ये वित्त विभागाकडे नमुना नंबर १४ मध्ये नोंदविलेल्या खर्चापैकी जिल्हा वार्षिक योजना रक्कम रुपये १२,९०,७८,३०५/- विशेष घटक योजना रक्कम रुपये २१,०७,९६५/- तिर्थक्षेत्र विकास कार्यक्रम रक्कम रुपये १,४१,५८१/- देखभाल दुरूस्ती निधी रक्कम रुपये १०,७९,७७,०४०/- पाणी टंचाई रक्कम रुपये १,१२,७९,०८०/- एकूण रक्कम रुपये २५,०५,८३,९७१/- खर्च लेखा परिक्षणास उपलब्ध झालेला नाही.

(१) सहाय्यक संचालक स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालयाने लेखापरिक्षण सुरू करण्यापूर्वी कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा यांचे कार्यालयाकडे जा.क्र.स्था/१८/ब/जिपलेप/सन १०-११/सांगली ४४०/दिनांक ०४/०७/२०१२ च्या पत्रान्वये लेखाशीर्ष निहाय खर्च व पूर्ण अपूर्ण कामांची यादी मागविली होती. तसेच अर्धसमास पत्र क्र.२ दिनांक ०५/११/२०१२, अर्धसमास पत्र क्र.३, दिनांक ०६/११/२०१२, अर्धसमास पत्र क्र.४, दिनांक ०७/११/२०१२, अर्धसमास पत्र क्र.५, दिनांक ०९/११/२०१२ अन्वये माहिती मागूनही उपलब्ध झाली नाही.

(२) सदर बाब मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, सांगली यांना सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा सांगली यांनी त्यांच्या दिनांक ३०/१०/२०१२ च्या पत्रान्वये निदर्शनास आणून दिलेली होती.

(३) मा.आयुक्त, पुणे विभाग पुणे यांना सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा सांगली यांनी जा.क्र.स्था/१८/ब/ग्रापापू/जिपसां/२०११-१२/दंड/सांगली, दिनांक २४/०१/२०१३ च्या पत्रान्वये मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा सुधारित अधिनियम, २०११ कलम ७ अन्वये कारवाई साठी प्रस्ताव सादर केला आहे. कागदपत्रे उपलब्ध नसलेने रक्कम रुपये २५,०५,८३,९७१/- योग्य पद्धतीने खर्च झालेची खात्री होत नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सांगली यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने सन २०११-१२ मध्ये वित्त विभागाकडे नमुना नंबर १४ मध्ये नोंदविलेल्या खर्चापैकी जिल्हा वार्षिक योजना रक्कम रुपये १२,९०,७८,३०५/- विशेष घटक योजना रक्कम रुपये २१,०७,९६५/- तिर्थक्षेत्र विकास कार्यक्रम रक्कम रुपये १,४१,५८१/- देखभाल दुरूस्ती निधी रक्कम रुपये १०,७९,७७,०४०/- पाणी टंचाई रक्कम रुपये १,१२,७९,०८०/- एकूण रक्कम रुपये २५,०५,८३,९७१/- इतक्या खर्चाची प्रमाणके व अनुषंगीक अभिलेखे आता उपलब्ध केलेले आहेत.

तरी सदर माहिती उपलब्ध असून स्थानिक निधी लेखाकडून तपासणी होऊन मिळणेस या कार्यालयाकडील पत्र क्र.जिपसां/ग्रापापू/पंरास/ऑडीट/३२१२/२०१५, दिनांक १४-१८/१२/२०१५ अन्वये कळविणेत आले आहे.

(१) सन २०११-२०१२ अखेर एकूण अपूर्ण कामे १६३ त्यामधून ९५ कामे पूर्ण असून रद्द कामे ५ आहेत. मार्च, २०१५ अखेर ६३ कामे अपूर्ण आहेत.

(२) लेखापरीक्षणास माहिती विहित कालावधीमध्ये उपलब्ध न केलेने तत्कालीन संबंधित कर्मचारी व अधिकारी यांचेवर नियमांनुसार दंडाची कार्यवाही करणेत येत आहे.

(३) लेखा परिक्षणास माहिती विहित कालावधीमध्ये उपलब्ध न केलेने तत्कालीन संबंधित कर्मचारी व अधिकारी यांचेवर नियमांनुसार दंडाची कार्यवाही करणेत येत आहे. या कार्यालयाकडील पत्र क्र.जि.सा.ग्रापापु/पंरास/ऑडिट/३२१२/२०१५, दिनांक १८/१२/२०१५ अन्वये रक्कम रुपये २५,०५,८३,९७१/- इतक्या खर्चाची प्रमाणके व अनुषंगीक अभिलेखे तपासणी करून मिळणाबाबत कळविण्यात आले आहे.

**(१२) परिच्छेद क्रमांक ३.५०० (सन २०११-२०१(२)**

**स्वीय निधीतून ५० टक्के अनुदानावर ताडपत्री पुरविणे योजनेत झालेल्या अनियमितेतबाबत**

जिल्हा परिषद स्वीयनिधीतून ५० टक्के अनुदानावर ७६४ नग ताडपत्री पुरविणेसाठी मे.डेझी ट्रेंडिंग कंपनीला महाराष्ट्र शासन दर करारानुसार प्रती नग रुपये २,६१५/- प्रमाणे ७६४ नगांची पुरवठा आदेश क्र.कृषी/स्विय निधी/वशी/२८९८/११, दिनांक ८/७/२०११ ने खरेदी केली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत :—

(१) आटपाडी, कवठेमहंकाळ, जत, मिरज, विटा पंचायत समितीनी लाभार्थी हिस्सा भरल्याची कागदपत्रे जिल्हा परिषद स्तरावर उपलब्ध झाली नाहीत.

(२) पंचायत समिती मिरज डिलीव्हरी चलन व पोहोच नुसार ३ नग कमी प्राप्त झाल्याने ३ नगाची किंमत रक्कम रुपये ७,८४५/- संबंधितांकडून वसूल करणे आवश्यक आहे.

(३) महाराष्ट्र शासन मार्गदर्शक सूचना क्र.झेडपी ९-२००८/प्र.क्र.४४६/वित्त-९, दिनांक २०.०६.२००८ परिशिष्ठ (ई) नुसार वेळापत्रकाचे पालन केलेले नाही. तसेच मागणी पुर्वी लाभार्थी निश्चीत न करता केल्याने अनावश्यक खरेदी केल्याचे दिसते.

(४) पुरवठा व वाटप उशिरा होऊनसुद्धा दंडात्मक कारवाई केली नाही.

(५) उपयोगिता प्रमाणपत्र व फलश्रुती अहवाल घेतलेला नाही.

(६) लेखापरिक्षण कालावधीअखेर ५७८ नगाचे वाटप नव्हते. त्यात रक्कम रुपये ७,८०,३००/- रक्कम गुंतून पडली होती. त्यावर १८ टक्के व्याज वसूल करणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सांगली यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१. आटपाडी, कवठेमहंकाळ, जत, मिरज व विटा पंचायत समितीकडील शिल्लक ताडपत्रीचे वाटप लाभार्थीचे मागणीप्रमाणे वाटप पुर्ण करणेत आलेले आहे. त्याबाबतची चलने / नोंदवहीच्या छायांकीत प्रति जिल्हा परिषद स्तरावर उपलब्ध करून ठेवणेत आली आहे.

| अ.क्र. | तालुका | लाभार्थी संख्या व नग | जमा लाभार्थी हिसा |
|---|---|---|---|
| १ | आटपाडी | १३ x १३५० | १७५५० |
| २ | कवठेमहंकाळ | १५ x १३५० | २०२५० |
| ३ | जत | ३२ x १३५० | ४३२०० |
| ४ | मिरज | २५ x १३५० | ३३७५० |
| ५ | विटा | १६ x १३५० | २१६०० |
| | एकूण | | १३६३५० |

२. पुरवठा आदेशाप्रमाणे गटविकास अधिकारी मिरज यांना ताडपत्री पुरवठा आदेश क्र.कृषी/स्वियनिधी/वशी/२८९८/११, दिनांक८/७/२०११ अन्वये ताडपत्री १०८ नगांचा पुरवठा करणेत आलेला आहे. गटविकास अधिकारी यांची डिलीव्हरी चलनावर पोहोच असून संबंधित क्लार्कने नजरचुकीने साठा नोंदवहीमध्ये पान नं.१९ वर १०५ नगांची नोंद घेणेत आलेली होती. जिल्हास्तरावरून पडताळणी केली असता साठा नोंदवही पान नं.१९ वर १०८ नगाची दुरूस्ती करणेत येऊन १०८ लाभार्थ्यांना वाटप करणेत आलेले आहे. त्यामुळे तफावत आढळून आलेली नसून ३ नगांची रक्कम रुपये ७८४५/- वसुली करणेची आवश्यकता नाही.

३. तालुकास्तरावर लाभार्थींची निवड करून गटविकास अधिकारी यांचेकडून ताडपत्रीची मागणी करणेत आलेली आहे व मागणीप्रमाणे तालुकास्तरावर पुरवठा करणेत आलेला आहे व संबंधीत लाभार्थींना वाटप केले आहे.

४. पुरवठा आदेश दिनांक ८.७.२०११ रोजीचा असून सदरच्या कंपनीने पुरवठा केलेल्या डिलीव्हरी चलनावरील पोहोच व साठा रजिस्टर वरील नोंदीनुसार दिनांक २.८.२०११ रोजी विहित मुदतीत (म्हणजे ४५ दिवसांची मुदत) पुरवठा केलेला आहे. त्यामुळे दंडात्मक कारवाई करणेची आवश्यकता नाही.

५. उपयोगिता प्रमाणपत्र व फलश्रुती अहवाल लाभार्थीकडून तालुकास्तरावर घेणेत आलेले आहेत. तसेच गटविकास अधिकारी यांचेकडून उपयोगिता प्रमाणपत्र व फलश्रुती अहवाल घेणेत आलेले असून त्याची प्रत दप्तरी ठेवणेत आलेली आहे.

६. सन २०११-१२ मध्ये ताडपत्रीचे दोन वेगवेगळे आदेश देणेत आलेले होते. त्यामध्ये पहिला पुरवठा आदेश क्र.१. कृषि/स्वियनिधी/वशी/२८९८/११, दिनांक८/७/२०११ ने ७६४ नग खालीलप्रमाणे वाटप करण्यात आलेले आहेत.

| अ.क्र. | गटाचे नाव | पुरवठा संख्या | ताडपत्री वाटप कालावधी |
|---|---|---|---|
| १ | मिरज | १०८ | दिनांक १०.१०.२०११ ते दिनांक २१.१२.२०११ |
| २ | विटा | ६१ | दिनांक २३.०९.२०११ ते दिनांक १९.११.२०११ |
| ३ | कडेगांव | ५४ | दिनांक १४.०९.२०११ ते दिनांक ११.१०.२०११ |
| ४ | वाळवा | १०८ | दिनांक १९.१०.२०११ ते दिनांक १५.१२.२०११ |
| ५ | तासगांव | ७२ | दिनांक १४.१०.२०११ ते दिनांक १८.०६.२०१२ |
| ६ | पलूस | ६३ | दिनांक २८.०९.२०११ ते दिनांक ०२.१२.२०११ |
| ७ | शिराळा | ६३ | दिनांक १६.०९.२०११ ते दिनांक २१.१०.२०११ |
| ८ | आटपाडी | ५४ | दिनांक ११.१०.२०११ ते दिनांक २८.०२.२०११ |
| ९ | कवठेमहांकाळ | ६३ | दिनांक २३.०९.२०११ ते दिनांक २५.१०.२०११ |
| १० | जत | ११८ | दिनांक १३.१०.२०११ ते दिनांक १८.०५.२०१२ |
| | एकूण | ७६४ | |

व पुरवठा आदेश क्र. २. कृषि/स्वियनिधी/वशी/४८०८/११, दि. ९/१२/२०११ ने १८६ नग खालीलप्रमाणे वाटप करण्यात आले.

| अ.क्र. | गटाचे नाव | पुरवठा संख्या | ताडपत्री वाटप कालावधी |
|---|---|---|---|
| १ | मिरज | २५ | दि. १२.०४.२०११ ते दि. १६.०७.२०१२ |
| २ | विटा | १६ | दि. ३०.०३.२०१२ अखेर |
| ३ | कडेगांव | १३ | दि. ३०.०४.२०१२ |
| ४ | वाळवा | २५ | दि. ०३.०३.२०१२ ते दि. २०.०३.२०१२ |
| ५ | तासगांव | १७ | दि. ०५.०३.२०१२ ते दि. ०५.०५.२०१२ |
| ६ | पलूस | १५ | दि. २९.०२.२०१२ |
| ७ | शिराळा | १५ | दि. २०.०३.२०१२ ते दि. ०१.०८.२०१२ |
| ८ | आटपाडी | १३ | दि. २८.०२.२०१२ ते दि. १८.०५.२०१२ |
| ९ | कवठेमहांकाळ | १५ | दि. १६.०४.२०१२ ते दि. २६.०६.२०१२ |
| १० | जत | ३२ | दि. ३१.०३.२०१२ ते दि. १८.०५.२०१२ |
| | एकूण | १८६ | |

तरी लेखापरिक्षणामध्ये पुरवठा आदेश वेगवेगळे असताना एकूण पुरवठा आदेश क्र.१ एकूण ७६४ नगामूधन पुरवठा आदेश क्र.२ एकूण १८६ नग वजा करून शिल्लक ताडपत्री दाखविणे आलेले असलेने ५७८ नगांची तफावत दिसून येते. दोनही आदेश वेगवेगळे असून दोनही आदेशाप्रमाणे ताडपत्री वाटप केलेची नोंद साठा नोंदवहीत असून त्याची छायांकित प्रत या कार्यालयाकडे दप्तरी ठेवणेत आलेली आहे. त्यामुळे १८ टक्के व्याज वसूल करणेची आवश्यकता नाही.

**(१३) परिच्छेद क्रमांक ३.५४३ (सन २०११-२०१२)**

**राष्ट्रीय कृषी विकास योजना अंतर्गत मिनी हँचर मशिन खरेदी.**

पशुसंवर्धन विभागाचे राष्ट्रीय कृषी विकास योजनेतून प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेच्या अधिन राहून दर करारावर पुरवठा आदेशाने तिरूपती ट्रेड लिंक हैद्राबाद यांचेकडून रक्कम रुपये २७,७२,०००/-इतक्या रक्कमेचे एकूण १८ मिनी हँचर मशीन खरेदी केले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) दर कराराची मूळ प्रत लेखा परिक्षणास उपलब्ध झाली नाही.

(२) कुक्कुट पालन व्यवसाय प्रशिक्षण झालेल्या लाभार्थ्यांची निवड केली नाही.

(३) पुरवठा आदेशातील अटी व शर्तीनुसार प्रत्येक लाभार्थीस पोहोच करण्याचे आदेश असताना एकत्रीतपणे भिलवडी कुक्कुट पालन केंद्रावर पोहोच केल्या आहेत.

(अ) तिरूपती ट्रेडलिंक हैद्राबाद यांचेकडून प्राप्त साहित्य रक्कम रुपये २६,१७,२००/- चे असता कंपनीला आयकरासह रक्कम रुपये २७,७२,०००/- प्रदान केले आहे. त्यामुळे जादा अदाई रक्कम रुपये १,५४,८००/- संबंधिताकडून वसूल करणे आवश्यक आहे.

(ब) आयुक्त पशुसंवर्धन पुणे यांचेकडील मार्गदर्शक सुचनेनुसार मशिनबाबत वर्तमान पेपर मध्ये जाहिरात देऊन लाभार्थ्यांची निवड केलेली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सांगली यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) मे तिरुपती ट्रेडलिंग नागपूर यांचा मा. आयुक्त पशुसंवर्धन यांचेशी दर करार झालेला असून आयुक्त पशुसंवर्धन पुणे यांचेकडून (जा.क्र. कुक्कुट-२/५५६/भाग-६/१००१७४/२०१२/पस १३, दि. ६/१/१२) नुसार प्राप्त असून सोबत जोडला आहे.

(२) निवड समिती मध्ये मा.अति मुख्य कार्यकारी अधिकारी अध्यक्ष असून जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी हे सदस्य सचिव आहेत. जिल्हा पशुसंवर्धन उप आयुक्त, प्रकल्प संचालक ग्रामीण विकास यंत्रणा, पशुसंवर्धन विकास अधिकारी (कुक्कुट) पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांचा समावेश असून १८ लाभार्थीची निवड केली असून सदर लाभार्थीना हँचर मशीन प्राप्त झालेनंतर प्रशिक्षण दिलेले आहे. १८ लाभार्थी यांची यादी सोबत सादर केली. प्राप्त अर्जामधून निवड समितीने लाभार्थीची निवड केली आहे. तसेच निवडीचे नियमामध्ये लाभार्थीने कुक्कुट पालन प्रशिक्षण पुर्ण केलेले असणे/पुर्ण करणे आवश्यक राहील असे म्हटले आहे. त्यामुळे त्यांना निवडीनंतर आवश्यक ते प्रशिक्षण दिले आहे.

(३) सर्व हॅचर भिलवडी येथील प्रक्षेत्रावर जागा उपलब्ध असलेने व सर्व मशीनची चाचणी एकाच वेळी घेणे शक्य असलेने आवश्यक तपासणी व चाचणी घेऊन हॅचर मशीन सुस्थीतीत असलेची खात्री केलेनंतर पुरवठा धारकांने सर्व लाभार्थीना त्याचे पत्यावर मशीन पोहच करून बसवून चालू करून दिलेले आहे. लाभार्थीची पोहच सोबत जोडली आहे.

(अ) मे तिरुपती ट्रेडलिंग हैद्राबाद यांचेकडून साहित्य खरेदी केलेले रक्कम रु. २७,७२,०००/- असून त्या संपूर्ण रक्कमे मधून २ टक्के प्रमाणे TDS कपात करून रु. ५५४४०/- घेणेत आला आहे. उर्वरित रक्कम हॅचबेलीटीचा अहवाल प्राप्त झालेनंतर ज्या प्रमाणात प्राप्त झाले नुसार टप्याटप्याने (१) र.रु. १५०९२००/- दिनांक २९-५-२०१२ (२) ६०३६८०/-दिनांक २५-६-२०१२ (३) ६०३६८० दि. २६-७-२०१२ याप्रमाणे एकूण रक्कम २६१६५६०/- रुपये अदा केलेले आहेत त्यामुळे नियमा नुसार व पुरवठा आदेशा नुसार रक्कम अदा केलेले आहे. त्यामुळे जादा रक्कम अदा केलेले नाही.

(ब) सदर योजनें मध्ये निवड समितीत प्रकल्प संचालक ग्रामीण विकास यंत्रणा हे सदस्य असून त्याचे महिला बचत गटाशी संपर्क जादा असलेने व पशुधन विकास अधिकारी तालुकास्तर व ग्रामीण स्तरावरील संस्था यांचे मार्फत तालुकास्तरावरील सभा, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा व स्थानिक संस्था मार्फत गावामध्ये आवश्यक ती प्रसिद्धी देणेत आली आहे. त्यामुळे कोणीही लाभार्थी वंचीत राहीला नाही. संस्थेमार्फत आवश्यक ती प्रसिद्धी देण्यात आली आहे.

**(१४) परिच्छेद क्रमांक ३.५४४ (सन २०११-२०१२)**

**जिल्हा वार्षिक योजनेतून वैरण व पशुखाद्य विकास कार्यक्रम अंतर्गत झालेली अनियमितता.**

पशुसंवर्धन विभागाचे उपरोक्त योजना अंतर्गत कार्यक्रमासाठी प्रशासकीय तांत्रिक मान्यतेच्या अधिन राहून मका बियाना वाटपासाठी एकूण रक्कम रुपये २९,९९,६८६/- इतका खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहे.

(१) महाराष्ट्र शासन उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखस. १०८८/(२५१२)/उद्योग -६ दिनांक ०२/०१/१९९२ अन्वये बियाण्यांच्या खरेदीसाठी किती दर पत्रके प्राप्त झाली व किती पुरवठादार निविदा उघडतेवेळी हजर होते याची कागदपत्रे उपलब्ध झाली नाहीत. त्यामुळे स्पर्धात्मक दराचा लाभ झाल्याची पुर्तता दर्शवावी.

(२) एकूण रक्कम रुपये ५,५५,९४६/- इतक्या रक्कमेचे साहीत्य ६९ दिवस उशीराने मिळाल्याबद्दल पुरवठादाराकडून कमी वसुल केलेली दंडाची रक्कम रु. ६८५/- वसूल करणे आवश्यक आहे.

(३) शासकीय प्रयोग शाळेतून बियाणे तपासणी केलेची तपासणी अहवाल नाही. त्यामुळे योग्य दर्जाचा माल प्राप्त झाल्याची पुर्तता दर्शवावी.

(४) पुरवठा आदेशानुसार प्रत्येक तालुक्यास मका बियाणे पोहच केलेची डिलीव्हरी चलने आवश्यकत्या शेऱ्यासह उपलब्ध नाहीत त्यामुळे योग्य दर्जाचा माल प्राप्त झाल्याची खात्री करता आली नाही.

(५) नवलखा सिडस पुणे व युनायटेड फॉस्परस पुणे यांचेकडून आयकर रक्कम रुपये ४७,४६१/- वसूल करणे आवश्यक आहे.

(६) बियाणे लाभार्थींना वाटप केल्याची पोहच नाहीत. त्यामुळे योग्य विनीयोग झाल्याची पुर्तता दर्शवावी.

(७) आयुक्त, पशुसंवर्धन विभाग,पुणे यांचेकडील मार्गदर्शक सूचनेनुसार फलश्रुती अहवाल घेतलेला नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सांगली यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) तीन दरपत्रके प्राप्त झाली. पुरवठाधारांना उपस्थित राहणेबाबत कळविणेत आले होते. परंतू एकही पुरवठादार हजर नव्हता. स्पर्धात्मक दराचा लाभ झाल्याचा तुलनात्मक दरपत्रक तक्ता दप्तरी उपलब्ध आहे.

(२) उशिरा प्राप्त झालेल्या बियाणांची दंडाची होणारी रक्कम रु. १३७०/- वसूल करणेत आली आहे. सोबत संबधीतांना रुपये १३७०/- वजा जाता रक्कम अदा केलेचे बीलाची झेरॉक्स प्रत उपलब्ध आहे.

(३) Seed Testing Bord Pune Letter no. ४३४/४५१, दिनांक १६/६/२०११ या शासकीय प्रयोगशाळेचा बियाणे तपासणीचा अहवाल प्राप्त झाला आहे. त्याची प्रत उपलब्ध आहे.

(४) पुरवठा आदेशानुसार पुरवठा करावयाचे मका बियाणे जिल्हा स्तरावर पुरवठा करणेबाबत सुचित केलेनुसार व त्यानुसार पुरवठा झाला आहे त्याच्या पोहोच पावत्या उपलब्ध आहे.

(५) देयकातून नियमानुसार २ टक्के रक्कम रु. ४९, ८६३/- आयकर कपात करणेत आली आहे.सोबत T.G.S.FORM No. १६ ची प्रत उपलब्ध आहे.

(६) तालुकास्तरावर व दवाखानास्तरावर बियाणे लाभार्थींना वाटपाचे कार्यक्रम घेण्यात आले असून बियाणे लाभार्थ्यांना वाटप केलेची पोहोच नस्ती दप्तरी उपलब्ध आहे.

(७) आयुक्त, पशुसंवर्धन विभाग, पुणे यांचेकडील मार्गदर्शक सुचनेनुसार लाभार्थ्यांचा फलश्रृती अहवाल दप्तरी उपलब्ध आहेत.

**(१५) परिच्छेद क्रमांक ३.५४५ (सन २०११-२०१२)**

**कामधेनू दत्तक ग्राम योजना.**

पशुसंवर्धन विभागाचे उपरोक्त योजना अंतर्गत कार्यक्रमासाठी प्रशासकीय तांत्रिक मान्यतेच्या अधिन राहून तालुक्याना वित्तप्रेशन रक्कम रुपये ३,८०,०००/- व रक्कम रुपये ११,४३,४४४/- कंपनीचे नांवे अशी एकूण रक्कम रुपये १५,२३,४४४/- इतकी रक्कम वाटप केली आहे याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहे.

(१) पशुपालक मंडळे स्थापन केल्याची कागदपत्रे जोडलेली नाहीत.

(२) आयुक्त यांचे मार्गदर्शक सुचना नुसार एका गावात ३०० पेक्षा जास्त पैदासक्षम जनावरे असल्यास अहवाल नाही.

(३) बिलासोबत डिलीव्हरी चलने नाहीत. त्यामुळे माल प्राप्त झाल्याची खात्री करता आली नाही.

(४) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ मधील नियम २२ नुसार बिलासोबत आगावू पोहच पावती नाही.

(अ) महाराष्ट्र शासन , निर्णय दिनांक०२/०१/१९९२ नुसार शासन मान्य संस्थेकडून चाचणी तपासणी केलेचे तपासणी अहवाल नाही.

(ब) वित्त प्रेषण रक्कम रुपये ३,८०,०००/- तालुक्यांना दिलेल्या खर्चाचे अहवाल जिल्हास्तरावर उपलब्ध नाहीत.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सांगली यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) मा.आयुक्त यांचे मार्गदर्शक सुचनेनुसार निवड झालेल्या प्रत्येक गावांमध्ये पशुपालक मंडळे स्थापन करण्यात आली आहेत त्यांचे अहवाल तालुकास्तरावर संकलित करून त्याच्या झेरॉक्स प्रती उपलब्ध आहे.

(२) मा.आयुक्त यांचे मार्गदर्शक सुचनेनुसार निवडलेल्या प्रत्येक गावात ३०० पेक्षा जास्त पैदासक्षम जनावरे असलेचा पशुगणनेचा अहवाल दप्तरी उपलब्ध आहे.

(३) Delivery challan दप्तरी उपलब्ध आहे.

(४) देयकासोबत आगावू पोहच पावती उपलब्ध आहे.

(अ) Ana Labortories Mumbai या शासन मान्यता असलेल्या प्रयोगशाळेकडून सर्व औषधीचे नमुने तपासणेत आले असून औषधी योग्य दर्जाची असलेचा अहवाल प्राप्त आहे. औषधीचे नमुने तपासणी अहवाल अवलोकनार्थ उपलब्ध आहे.

(ब) वित्तप्रेषणाद्वारे प्रति पंचायत समिती रक्कम रुपये ३८,०००/- प्रमाणे १० पंचायत समितींना एकूण रक्कम रुपये ३,८०,०००/- वितरीत केले आहे. संबधीत पंचायत समितीचे खर्चाचे अहवाल, देयकांच्या सत्यप्रती उपलब्ध केले आहेत.

**(१६) परिच्छेद क्रमांक ३.६११ (सन २०११-२०१२)**

**दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत धानवड येथील रस्ता क्राँक्रीटीकरण / खडीकरण.**

खानापूर पंचायत समितीने धानवड येथील रस्ता क्राँक्रीटीकरण व खडीकरण योजनेसाठी रक्कम रुपये ५,००,०००/- खर्च केला आहे. याबाबत खालील अभिप्राय आहेत.

(१) सदर कामाचे मंजूर अंदाजपत्रक लेखा परिक्षणास उपलब्ध झाले नाही.

(२) सदर कामातून आयकर / रॉयल्टी/ विमा/लेबर सेस कपात करणे आवश्यक असता त्या वसूल न केलेने शासनाचे नूकसान झालेले आहे.

(३) ग्रामपंचायत नमुना नंबर २६ मध्ये सदर रस्त्याची लांबी ३४१ मीटर दर्शवली आहे. मोजमाप पुस्तकाप्रमाणे रस्ता २१९.८५ मीटर लांब तफावतीबाबत पूर्तता होणे आवश्यक आहे.

(४) सदर देयकामध्ये देयकाचे बाब क्रमांक ३,४,८,९,१०,११,१२,१३,१४ ची कामे केलेली नसल्याचे दिसते. तरी कामावर मंजूर अंदाजपत्रकाप्रमाणे खर्च झालेला आहे. वाढीव खर्च योग्य व संयुक्तीक असलेबाबत पूर्तता दर्शविणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सांगली यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) सदर कामाचे अंदाजपत्रक दप्तरी उपलब्ध आहे.

(२) सदर कामातून आयकर/रॉयल्टी/विमा/लेबरसेस कपात करणेत आली आहे. ती खालीलप्रमाणे आहेत.

(१) आयकर - रक्कम रुपये ३६५०/-

(२) रॉयल्टी - रक्कम रुपये १३,७६५/-

(३) शासकीय विमा - रक्कम रुपये ७३००/-

(४) लेबरसेस रक्कम रुपये ३६५०/-

एकूण रक्कम रुपये -२८३६५/-

सदरच्या रकमा शासन सदरी चलनाने भरणा केल्या आहेत. चलने दप्तरी उपलब्ध आहेत.

(३) उपलब्ध निधी व मंजूर अंदाजपत्रकाप्रमाणे काम पूर्ण केलेले असलेने तफावत नाही. प्रत्यक्ष मोजमापपुस्तकाप्रमाणे रस्त्याचे खडीकरण १३५ मीटर लांबीचे व रस्ता क्राँक्रीटकरण १४७ मीटर लांबीचे करणेत आलेले आहे.

(४) देयकामध्ये फक्त बाब क्र.१०,११,१२ चे काम केलेले नाही. बाब क्र.३ चे काम करणेत आले आहे. सीसी १:२:४ ५५.७५ घनमीटर बाब क्र.४ चे काम करणेत आलेले आहे-६० मीमी खडी-८९.८६ घनमीटर, बाब क्र.८ चे काम करणेत आलेले आहे. दबाई करणे ४४५.७५ चौरसमीटर, बाब क्र. ९ चे काम करणेत आलेले आहे. रस्त्याच्या बाजूपट्टया दबाई करणे ७२ चौरस मीटर, बाब क्र. १० नुसार ४५० मीमी पाईप २.५० मीटर लांबीकरिता तरतूद होती व तथापि प्रत्यक्ष काम करतेवेळी स्थानिक ग्रामस्थांनी पाईप न बसविणेबाबत मागणी केलेने व गटरचे पाणी दुसऱ्या बाजूने वळविले या बाबींची बचत झाली आहे, बाब क्र. ११ नुसार ३०० मीटर सीकाँची पाईप १.५० मीटर लांबी करीता तरतूद होती. बाब क्र. १२ सपाटीकरणाकरीता खुदाई केलेला मुरुम/माती वाहतूक करून टाकणेची तरतूद आहे. परंतू तो नगण्य प्रमाणात असलेने (३.०४ घनमीटर) रस्त्याकडेस आवश्यकतेनुसार पसरणेत आला त्यामुळे बचत झाली आहे. सदर कामावर मंजूर अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा ज्यादा खर्च झालेला नाही. ( खर्च रक्कम रुपये ३६५०००/- लक्ष)

**(१७) परिच्छेद क्रमांक ३.७७१ (सन २०११-२०१२)**

**अंगणवाड्या बांधकामाबाबत.**

बालकल्याण विभाग जिल्हा परिषद सांगलीचे लेखा परीक्षणामध्ये १६१ नवीन अंगणवाड्या बांधकामांना प्रशासकीय मान्यता देवून अनुदान उपलब्ध करून दिले आहे. यावर लेखापरीक्षणात याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) अर्धसमास पत्र क्र २ दिनांक १२/०९/२०१० ने प्रशासकीय मान्यता पूर्ण/अपूर्ण कामाची माहीती तसेच बांधकामावरील एकूण कामाची माहीती मागणी करुनही उपलब्ध झाली नाही. त्यामुळे विहीत कालावधीत कामे पूर्ण झाली किंवा नाही. याची खात्री करता आली नाही.

(२) अंगणवाडींची कामे विहीत वेळेत पूर्ण न झाल्याने ३२९ अंगणवाड्या खाजगी इमारतीत भरवाव्या लागत होत्या. त्यावर भाड्यापोटी झालेला रक्कम रुपये ८,०८,३०९/- इतका खर्च विनाकारण झाल्याचे दिसून येते.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सांगली यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांनी सन २०११-२०१२ मध्ये १५१ इतक्या अंगणवाडी बांधकामाच्या कामांना जा.नं.बाक/आस्था/वशि/७२९/२०११ दिनांक ०६/०९/२०११ रोजीच्या आदेशान्वये प्रशासकीय मान्यता दिली आहे व १३ वा वित्त आयोगातंर्गत १० अंगणवाडी बांधकामांना प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. प्रशासकीय मंजूरी दिलेल्या कामाची सद्यःस्थिती खालीलप्रमाणे आहे :—

| क्र. | प्रकल्पाचे नांव | मंजूर अंगणवाड्या | पूर्ण अंगणवाड्या | रद्द अंगणवाड्या |
|---|---|---|---|---|
| १ | शिराळा | १३ | ७ | ६ |
| २ | वाळवा १ | १६+२ | १५+१ | १+१ |
| ३ | वाळवा २ | | | |
| ४ | सांगली ग्रा | १४ | ७ | ७ |
| ५ | मिरज | | | |
| ६ | कवठेमहांकाळ | ११+१ | ९+१ | २ |
| ७ | जत | ४७+२ | ३३+१ | १४+१ |
| ८ | उमदी | | | |
| ९ | तासगांव | १८+२ | १२+१ | ६+१ |
| १० | पलूस | १ | १ | - |
| ११ | आटपाडी | १८+१ | १७+१ | १ |
| १२ | कडेगांव | ७+२ | ४ | ३+२ |
| १३ | खानापूर | ६ | ६ | - |
| | **एकूण** | **१५१+१०** | १११+५ | ४०+५ |

बांधकामावरील एकूण खर्च रक्कम खालीलप्रमाणे झालेला आहे :—

| वर्ष | मंजूर अंगणवाड्या | चालू अंगणवाड्या | पूर्ण अंगणवाड्या | रद्द अंगणवाड्या | प्रति अंगणवाडी रक्कम (लक्ष) | एकूण खर्च रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| २००८-०९ | १५३ | ० | १४२ | ११ | २.५१ | १९९९३१३० |
| २००९-१० | २५३ | ० | २०५ | ४८ | २.५१ | ४२१२९८३५ |
| २०१०-११ | ३५१ | ० | २६० | ९१ | ४.०० | ८९७४५९७१ |
| २०११-१२ | १५१ | ० | १११ | ४० | ४.५० | ६३१८३०५२ |
| **एकूण** | **९०८** | **०** | **७१८** | **१९०** | | **२१५०५१९८८** |

(२) भाडेच्या ठिकाणी भरलेल्या अंगणवाडी इमारतीसाठी जागा उपलब्ध होत नाही. त्यामुळे इमारत बांधकाम मंजूर करता येत नाही. जागेबाबत खात्री केलेली आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

सांगली जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २२ नोव्हेंबर, २०१७ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने असे निदेश दिले की, सन २०११-१२ या वर्षाच्या लेखापरीक्षा पुर्नविलोकन अहवालातील परिच्छेद क्रमांक ३.२०/४०, ३.२३, ३.१०२/३०, ३.१०४, ३.१०५, ३.१०७, ३.१०८, ३.१०९, ३.३२३, ३.३२४, ३.४०८, ३.५००, ३.५४३, ३.५४४, ३.५४५, ३.६११ व ३.७७१ हे सर्व परिच्छेद लेखापरिक्षणास अभिलेखे सादर न करण्यासंदर्भातील आहेत. त्यामुळे या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस अहवाल सादर करावा व यासंदर्भात मुंबई स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ अन्वये २५ हजार रुपये दंड आकारावयाचा असून सेवापुस्तिकेत नोंदही घ्यावयाची आहे. तसेच वेतनवाढ रोखण्यासंदर्भात देखील तरतूद आहे, ही सर्व कार्यवाही मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आपल्या स्तरावर करावी व समितीला एक महिन्याच्या आत अहवाल सादर करवा. त्यानंतर विभागीय सचिवांची साक्ष आयोजित करण्यात येईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

(१) सन २०११-१२ या अहवाल वर्षात लेखा परिक्षणास कागदपत्र उपलब्ध करून दिले नसल्याप्रकरणी संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर समितीच्या निर्देशानुसार महाराष्ट्र स्थानिक लेखापरिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ अनुसार दंडाची व एक वेतनवाढ रोखून तशी नोंद संबंधिताचे सेवा पुस्तिकेमध्ये घेण्याची कारवाई केली आहे काय, त्यानुसार प्रकरण व परिच्छेद निहाय अहवाल वर्षांची माहिती समितीस सादर करण्यात यावी ?

(२) भविष्यात लेखा परिक्षणास अभिलेख उपलब्ध न करून देणे असे आक्षेप वारंवार उपस्थित होवून नयेत याबाबत काटेकोर अंमलबजावणी करण्यासंभर्रात मंत्रालयीन विभागाकडून कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

(१) सदर परिच्छेदामधील लेखापरिक्षणास अभिलेख (कागदपत्रे) उपलब्ध करून न देण्यास एकूण ६९ अधिकारी कर्मचारी जबाबदार आहेत. या ६९ पैकी ५७ कर्मचाऱ्यांची एक वार्षिक वेतनवाढ बंद करण्यात आली आहे. उर्वरित १२ अधिकारी कर्मचारी हे अन्य कार्यालयीन आस्थापनेवर असल्याने त्यांच्याविरुद्ध प्रशासकीय कार्यवाही करणेबाबतचे प्रस्ताव संबंधित कार्यालयांना पाठविणेत आलेले आहेत.

मुंबई स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ मधील तरतुदींनुसार उक्त ६९ पैकी २४ अधिकारी/कर्मचारी यांच्या प्रकरणी न्यायालयात दावा दाखल करण्यासाठी मा.विभागीय आयुक्त, पुणे यांची मंजूरी प्राप्त झाली असून त्यापैकी ०६ प्रकरणे प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी यांचे न्यायालयात दाखल करणेत आली आहेत तर उर्वरित मंजूरीप्राप्त १८ प्रकरणांपैकी ९ प्रकरणे प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात दाखल करण्याची कार्यवाही सुरू आहे. तसेच उर्वरित ९ प्रकरणांपैकी ८ प्रकरणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांची आणि १ प्रकरण पशुसंवर्धन विभागाच्या आस्थापनेवरील अधिकाऱ्यांचे असल्याने संबंधित आस्थापनांकडे दंडात्मक कार्यवाही करण्यासाठी पाठविण्यात आले आहे.

त्याचप्रमाणे ६९ पैकी ४४ अधिकारी कर्मचारी यांचेविरुद्ध न्यायिक कार्यवाही सुरू करण्यासाठी मा.विभागीय आयुक्त, पुणे यांचे मान्यतेसाठी जि.प.कडून प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत. मा.विभागीय आयुक्त, पुणे यांचे मान्यतेनंतर त्यांचेविरुद्ध न्यायिक कार्यवाही सुरू करण्यात येईल. लेखापरीक्षण आक्षेप क्र.३.३२३ संदर्भात लघुसिंचन विभागाकडील १ कर्मचारी श्री.मोहिते यांनी रुपये २५,०००/- दंडाची रक्कम शासकीय लेखाशीर्षामध्ये भरणा केली आहे. याबाबतचा सविस्तर तपशिल सोबतच्या तत्क्यात जोडला आहे. **(परिशिष्ट क्र.१०.१)**

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :—** (वित्त-७) जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी सहमत आहे.

**कृषि व पदुम विभागाचे अभिप्राय (पदुम) :—**मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांनी विभागीय आयुक्त, पुणे यांना मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० मधील कलम ७ नुसार तत्कालिन जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांची न्यायिक चौकशी करून रुपये २५,०००/- दंड करण्याचा प्रस्ताव सादर केला होता. तथापि, मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० मधील कलम ७ च्या परंतुकानुसार विभागीय आयुक्त, पुणे यांनी डॉ. बनसोडे यांच्यावर दंडात्मक कारवाई का मंजूर करण्यात येऊ नये याबाबत डॉ. बनसोडे यांना कारणे दाखवा नोटीस बजावल्याचे उपलब्ध कागदपत्रावरून दिसून येत नाही. त्यामुळे तत्कालिन जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. बनसोडे यांचेवर दंडात्मक कारवाई करण्याच्या प्रकियेत नैर्सगिक न्यायाच्या तत्वानुसार त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आली होती किंवा नाही हे उपलब्ध कागदपत्रावरुन स्पष्ट होत नाही. करीता विभागीय आयुक्त, पुणे यांच्या स्तरावरून करण्यात आलेल्या कार्यवाहीची पूर्ण माहिती घेतल्यानंतर गुणवत्तेवर आधारित कार्यवाही शासन स्तरावरून करण्यात येईल.

स्थानिक लेखापरिक्षणाचे वेळी लेखापरीक्षा पथकाला आवश्यकते सर्व अभिलेख उपलब्ध करून देणे, यामध्ये कोणतीही दिरंगाई होणार नाही याची दक्षता घेणे याबाबत सर्वक्षेत्रीय कार्यालयांना आयुक्त पशुसंवर्धन, पुणे कार्यालयाकडून दिनांक ०४/१०/२०१८ रोजी परिपत्रक पाठवण्यात आलेले आहे.

**पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे अभिप्राय :-** संबंधित कर्मचारी हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे कर्मचारी आहेत. या कर्मचाऱ्यांविरुद्ध प्रशाकीय कार्यवाही करण्यास प्राधिकरण सक्षम असून, यासंदर्भात प्राधिकरणामार्फत झालेल्या कार्यवाहीचा अहवाल मागविण्यात आला आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने सांगली जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या महितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १६ ऑक्टोबर, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, लेखा परीक्षणात कागदपत्रे उपलब्ध करून न देणे याबाबत त्यांचे असे म्हणणे आहे की, आम्ही नंतर कागदपत्रे उपलब्ध करून दिली आहेत. या सर्व बाबींची तपासणी करण्यात यावी. विनाकारण ज्या व्यक्तीचा दोष नाही त्यांच्यावर कारवाई व्हायला नको. ज्या अधिकाऱ्यांवर दोष निश्चित करण्यात आलेला आहे त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी. तसेच ६९ पैकी ४४ अधिकारी व कर्मचारी यांच्याविरोधात कारवाई सुरू करण्याबाबत विभागीय आयुक्त, पुणे यांच्या मान्यतेसाठी जिल्हा परिषदेकडून प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. यामध्ये कर्मचाऱ्यांना दोषी धरण्यात आले आहेत. कर्मचाऱ्यांना दोषी धरणे आम्हाला अपेक्षित नाही. कार्यालय प्रमुखांच्या कस्टडीमध्ये अभिलेखे असतात. समितीची भावना आयुक्त कार्यालयास कळविण्यात यावी. लेखापरीक्षणास कागदपत्रे उपलब्ध न करून देणे हा विषय आहे. जिल्हापरिषदेचे लेखापरीक्षण होणार आहे असे पत्र लेखापरीक्षक मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पाठवितात आणि मुख्य कार्यकारी अधिकारी आपल्या खाते प्रमुखांना तसे कळवितात. तेव्हा लेखापरीक्षणा संदर्भातील जबाबदारी खाते प्रमुखांची आहे असे असताना आपण कर्मचाऱ्यांवर कारवाई का करता ? आपण स्पष्टीकरणात एकूण ६९ पैकी ४४ अधिकारी आणि कर्मचारी यांचे विरुद्ध कारवाई प्रस्ताव सादर करण्यात आल्याचे नमूद केलेले आहे. ४४ मध्ये अधिकारी किती आहेत आणि कर्मचारी किती हे नमूद केलेले नाही यांमध्ये कार्यालयीन प्रमूख कोण आहे ? समितीसमोर हा विषय वारंवार उपस्थित होत असतो. लेखापरीक्षणासाठी सादर करावयाची कागदपत्रे लिपिकाच्या ताब्यात असतील, परंतु त्यांच्या वरच्या अधिकाऱ्यांना देखील या सर्व बाबींची माहिती असते आणि त्यांनी करून घेणे आवश्यक आहे, परंतु आपण खालच्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करता हे बरोबर नाही. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीला पुढीलप्रमाणे खुलासा केला की, प्रत्येक नस्तीची काळजी घेणारा कोणीतरी एक कर्मचारी असतो. त्यानुसार त्या कार्यालयातील मुख्य लिपिक किंवा लिपिक यांच्या कस्टडीत ती नस्ती असते. जेव्हा ते दुसऱ्या कर्मचाऱ्याकडे कार्यभार देतात तेव्हा ते नस्तीच्या यादीसह कार्यभार देतात. कार्यालयीन प्रमुख कस्टोडीयन असणार नाही. अंतिमतः शेवटच्या कर्मचाऱ्याच्या ताब्यात फाईल असते. समजा त्यांनी फाईल मूव्ह केली, ती फाईल माझ्याकडे आली म्हणजे ती माझ्या ऑफिसच्या कस्टडीत आहे. माझी फाईलवर सही झाल्यानंतर ती फाईल पुन्हा खालच्या कर्मचाऱ्यांकडे जाईल. म्हणजे ती फाईल त्यांच्या कस्टडीत आहे. कायद्यानुसार प्रत्येक विभागाचे कस्टोडियन कोण आहे ते जाहीर करणे आम्हाला बंधनकारक आहे. कार्यालयीन नियमाप्रमाणे दुसऱ्या कर्मचाऱ्यांकडे कार्यालयीन कार्यभार हस्तांतरित करताना तो नस्तीच्या यादीसह करणे आवश्यक आहे. ज्या कर्मचाऱ्याने

फाईल दाखविली नाही, ती फाईल कोणाच्या ताब्यात असणे आवश्यक आहे त्या कर्मचाऱ्यांवर कारवाई होईल. कार्यालयीन प्रमुख किंवा खाते प्रमुखांवर कारवाई होणे तसे कमी आहे. यावर समितीने आक्षेप घेत विचारणा केली की, या संदर्भात जिल्हापरिषदेचे लेखापरीक्षण होणार आहे असे पत्र मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पाठविण्यात येते आणि मुख्य कार्यकारी अधिकारी ती माहिती खाते प्रमुखांना देतात. खाते प्रमुख आपल्या खालच्या कर्मचाऱ्यांना सूचना देतात की, आपला रेकॉर्ड अपडेट ठेवावा आणि तो वेळेवर उपलब्ध करून द्यावा. समजा एखाद्या कर्मचाऱ्याने रेकॉर्ड वेळेवर उपलब्ध करून दिला नाही तर त्या कर्मचाऱ्यावर निश्चित करण्याची जबाबदारी खातेप्रमुखांची आहे. कागदपत्रे सादर करण्याबाबत तीन वेळा संधी देऊनही त्यांनी ती सादर केली नाही तर आपण त्यांच्यावर कारवाई करतो. तरी ज्या कर्मचाऱ्याने रेकॉर्ड उपलब्ध करून दिला नाही त्याच्याकडून रेकॉर्ड उपलब्ध करून घेण्याची जबाबदारी खाते प्रमुखांची नाही काय, लेखापरीक्षणाच्यावेळी कागदपत्रे उपलब्ध करून दिली नाही तेव्हा खाते प्रमुखांनी त्यांच्यावर कारवाई का केली नाही, त्याच वेळी त्या कर्मचाऱ्यास कारणे दाखवा नोटीस का दिली नाही, पंचायत समितीने वर्ग-३ च्या कर्मचाऱ्यावर कारवाई करण्याबाबत शिफारस करणे अपेक्षितच नाही. खाते प्रमुखांनी त्यांचे काम बरोबर केले किंवा कसे हे पाहण्याचे काम पंचायती राज समितीचे आहे. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीला विदित केले की, आपण म्हणता तशी वस्तुस्थिती आहे. लेखापरीक्षणाच्या वेळी ही बाब नजरेस आणून दिल्यानंतर खाते प्रमुखांनी समितीच्या आदेशाची वाट न पाहता संबंधित कर्मचाऱ्यावर तातडीने कारवाई करणे अपेक्षित आहे. त्यांनी ती कारवाई केली नाही तर तो त्यांचा हलगर्जीपणा म्हणता येईल. हे खरे आहे की, खाते प्रमुखांनी समितीच्या येण्याची वाट पाहणे आणि समितीने आदेश दिल्यानंतर कारवाई करणे हे अपेक्षित नाही. आमच्याकडे देखील ऑडीट टीम येते. क्लोझर करण्यापूर्वी ते आम्हाला येऊन भेटतात. त्यावेळी त्यांनी ही बाब लक्षात आणून दिली की इतकी कागदपत्रे मिळाली नाहीत तर समितीच्या आदेशाची वाट न पाहता संबंधितांवर कारवाई करण्यात येईल.

तद्नंतर समितीने मत व्यक्त करून पुढीलप्रमाणे निदेश दिले की, आम्हाला बऱ्याच वेळेला असा अनुभव आलेला आहे. अनेक प्रकरणांमध्ये खालच्या कर्मचाऱ्यावर कारवाई होते. नैसर्गिक न्यायतत्वानुसार त्यांना काही बाबींसाठी सवड मिळणे आवश्यक आहे. यासंदर्भात संचालकांचे मत घेऊन जबाबदारी निश्चित करावी. यामध्ये अवास्तव कारवाई होत असेल तर ते बरोबर नाही. आम्ही बऱ्याच जिल्हापरिषदांमध्ये पाहिलेले आहे की, अनेक अधिकाऱ्यांकडे प्रभारी म्हणून कार्यभार दिलेला आहे. आपण अशाप्रकारे कारवाई केल्यामुळे चांगला मेसेज जाणार नाही. खालच्या कर्मचाऱ्यावर सर्व जबाबदारी टाकण्यात येत असेल तर खाते प्रमुख व्यवस्था कशाला पाहिजे अशी नाराजी व्यक्त केली.

**अभिप्राय व शिफारशी**

सांगली जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या समवेत झालेल्या साक्षीदरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, सन २०११-१२ च्या स्थानिक निधी लेखापरिक्षणाच्या वेळी लेखा परिक्षकांस ते तपासणी करीत असताना त्यांनी मागितलेली काही प्रकरणांची कागदपत्रे संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी उपलब्ध करून दिलेली नाहीत. त्याअनुषंगाने अशा एकूण १७ परिच्छेदांच्या प्रकरणांमध्ये संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार कार्यवाही करण्याबाबत समितीने निदेश दिले.

**त्यानुसार ज्या प्रकरणातील संबंधित/कर्मचारी यांच्यावर महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार रुपये २५,०००/- दंडाची शास्ती व एक वेतनवाढ रोखण्याची कारवाई करून तशी नोंद संबंधितांची सेवापुस्तिकेमध्ये घेण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे. याबाबत समिती समाधान व्यक्त करीत आहे.**

तथापि, समितीने निदेश दिलेले असतानाही ज्या प्रकरणांमध्ये अद्याप **महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही. याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत असून अशा प्रकरणांमध्ये तात्काळ कार्यवाही करण्यात यावी तसेच सदर वसुली प्रकरणी झालेल्या विलंबास जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवरही जबाबदारी निश्चित करून संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यात यावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती तीन महिन्याच्या आत समितीस सादर करण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

प्रकरण अकरा

## जिल्हा परिषद, सांगली

## सर्वसाधारण शिफारशी

**(१) गैरव्यवहार/अपहार/अखर्चित रकमा जमा करण्याबाबत :—**

समितीने राज्यातील जिल्हा परिषदांना भेटी दिल्या असता विशेषतः सांगली जिल्हा परिषदेत गैरव्यवहार व अपहाराच्या रकमा वसुलीविना प्रलंबित आहेत. अशी प्रकरणे समितीसमोर तपासणीसाठी आली असता समितीने या प्रकरणात सदरच्या रकमा शासन खाती जमा करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निर्देशित केले आहे. सदर गैरव्यवहाराची/अपहाराची अनेक प्रकरणे असून ती जुनी आहेत. जिल्हा परिषदांनी ती वेळीच कार्यवाही केली असती तर शासनाचा कोट्यवधी रुपयांचा निधी या प्रकरणांमध्ये अडकून पडला नसता व तो वेळीच वसूल झाला असता. जिल्हा परिषदांनी सदरच्या रकमा संबंधितांवर प्रशासकीय कारवाई करून वसूल केल्या असत्या तर या रकमा केंव्हाच शासन खाती जमा झाल्या असत्या, शासनाचा विविध योजनांवरील निधी हा गैरव्यवहाराने जेव्हा हडपला जातो तेव्हा त्या त्या योजना राबविताना त्यात निश्चितच मोठ्या प्रमाणावर अनियमितता होऊन योजनेच्या फलनिष्पत्तीवर त्याचा विपरीत परिणाम होतो असे समितीला आढळून आले आहे. जिल्हा परिषदांकडून त्यांच्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात विलंब होत असल्यामुळे जिल्हा परिषदा अशा कर्मचाऱ्यांना पाठीशी घालत असून त्यांचेवरील संभाव्य कार्यवाहीस पुढे ढकलण्याचा प्रयत्न करताना दिसतात. त्याद्वारे एकप्रकारे शासनाचा निधी वेळीच वसूल होत नसल्यामुळे याबाबत मोठ्या प्रमाणात प्रशासकीय अनियमितता होत असल्याचे समितीला आढळून आले आहे. **याप्रकरणी समिती अशी शिफारस करीत आहे की, जिल्हा परिषदेची योजना राबविताना संबंधित योजनेत एखादा गैरव्यवहार अथवा अपहार उघडकीस आला असल्यास त्या गैरव्यवहारासंदर्भात कोणत्याही परिस्थितीत तीन महिन्यात दोषारोप पत्र दाखल करून अशा प्रकरणात सहा महिन्यात निकाली काढण्यासंदर्भात शासनाने निश्चित अशी भूमिका घ्यावी व असे विभाग प्रमुख गैरव्यवहाराच्या अथवा अपहाराच्या रकमा सहा महिन्यात शासन खाती जमा करण्यात अयशस्वी झाल्यास त्यांचेविरुद्ध जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर त्या प्रकरणी शिस्तभंगाची कार्यवाही करण्याबाबत विभागाने ठोस भूमिका घ्यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

शासनाकडून एखादी योजना राबविताना कोट्यवधी रुपयांचा निधी तरतूद करून मिळविला जातो व असा निधी वेळेत खर्च केला जात नाही व तो शासन खाती जमादेखील केला जात नाही. त्यामुळे वित्तीय बाबीत मोठ्या प्रमाणावर अनियमितता होत असून संबंधित अधिकाऱ्यांकडून रकमा वेळीच खर्च करण्याबाबत कमालीचा हलगर्जीपणा करण्यात येतो. कोट्यवधी रुपये अखर्चित ठेवल्यामुळे शासनाला असा निधी आवश्यक असणाऱ्या अत्यंत महत्त्वाच्या योजनांवर खर्च करता येत नाही. पर्यायाने विविध भौगोलिक भागातील निधी वाटपातील असंतोष वाढतो. खर्चाच्या बाबतीतील अनियमितता व योजना राबविण्याच्या कामातील अधिकाऱ्यांद्वारे होत असलेला हलगर्जीपणा हा प्रशासकीयदृष्ट्या अत्यंत गंभीर असून त्यामुळे अखर्चित निधी राहून तो दुसऱ्या महत्त्वाच्या योजनांवर खर्च केला जात नाही. **म्हणून एखाद्या योजनेसाठी मागितलेला निधी त्या योजनेची उपयुक्तता तसेच जनसामान्यांच्या हिताचा विचार करून राबविणे आवश्यक आहे. जनतेला देय असलेल्या सुविधा योजना राबवून वेळीच मिळत नसल्याने जनतेत शासनाविषयी नाराजी व संतापाच्या भावना वाढीस लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता अखर्चित रकमांवर बंधन टाकण्यासंदर्भात शासनाने यासंदर्भात कडक धोरण आखून त्याची अंमलबजावणी करण्यासंदर्भात जिल्हा परिषदांना एका परिपत्रकाद्वारे कळविण्यात यावे, अशी समितीची शिफारस आहे.**

**गैरव्यवहार/अपहार/अखर्चित रकमा जमा करण्यासंदर्भात समितीने उपरोक्तप्रमाणे केलेल्या शिफारशीनुसार यासंदर्भात शीघ्रतेने कार्यवाही करून सांगली जिल्हा परिषदेमधील रकमा शासन खाती जमा करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी व पंचायती राज समितीने तपासणी केलेल्या अहवालासंदर्भात एकूण किती रकमेची शासन खाती वसुली केली याबाबीची माहिती समितीला कळविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

**(२) लेखापरीक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून न देणे :—**

समितीने सांगली जिल्हा परिषदेला भेट दिली असता अनेक लेखा परिच्छेदांमध्ये लेखापरीक्षकांना संबंधित लेख्यांवरील कागदपत्रे उपलब्ध करून दिली नसल्याने त्याबाबतचा अंतिम अभिप्राय लेखापरीक्षकांस व्यक्त करता आला नाही. याबाबत समितीने असे लेखे विचारात घेतले असता अनेक प्रकरणात लेखापरीक्षणाच्या वेळी कागदपत्रे उपलब्ध नव्हती आता उपलब्ध आहेत असे समितीला सांगण्यात आले. लेखापरीक्षणास कागदपत्रे उपलब्ध नव्हती त्याची कारणे काय या शोधात समितीला अनेक गंभीर बाबी निदर्शनास आल्या. **मुळात कागदपत्रे उपलब्ध असतानाही ते लेखापरीक्षणास न दाखविणे ही गंभीर बाब आहे. तो सरळ शिस्तभंगाचा प्रकार आहे. लेखापरीक्षक सुरुवातीला कागदपत्रे उपलब्ध**

**करून देण्यासाठी चार महिन्यांचा वेळ देतात व त्यानंतर पुन्हा दोन महिन्यांचा कालावधी संबंधितांना दिला जातो. असे असूनदेखील संबंधित अधिकारी लेखापरीक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून देत नाहीत. मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ मध्ये सन २०११ पूर्वी लेखापरीक्षणास कागदपत्रे उपलब्ध न करून देणाऱ्या अधिकाऱ्यास केवळ १००/- रूपयांचा दंड आकारण्यात येत असे. कदाचित त्यामुळे लेखापरीक्षणास कागदपत्रे उपलब्ध होत नसतील अशी समितीने भावना व्यक्त केल्यानंतर शासनाने सन २०११ मध्ये उक्त अधिनियमाच्या कलम ७ मध्ये सुमारे २५,०००/- रुपये (पंचवीस हजार रुपये) दंडाच्या रकमेची तरतूद केली आहे. समितीने या प्रकरणी जिल्हा परिषदांना ज्या कोणी लेखापरीक्षणाचे वेळी लेखापरीक्षकांस कागदपत्रे उपलब्ध करून दिली नाहीत अशा जबाबदार असणाऱ्या सर्व संबंधितांना अधिनियमातील तरतुदीनुसार रुपये २५०००/- इतका दंड आकारण्याची शास्ती करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार सांगली जिल्हा परिषदेमध्ये अशा किती व्यक्तींना प्रत्येक प्रकरणी दंड करण्यात आला व एकूण किती रक्कम शासन खाती जमा करण्यात आली याची संपूर्ण माहिती प्रकरणनिहाय समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

**(३) नियमानुसार व नैसर्गिक न्याय तत्वाला अनुसरून दोषीतांवर कारवाई करण्याबाबतः-**

संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीततेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, प्रभावी व अर्थपूर्ण असे नियंत्रण व देखरेख ठेवण्याची अत्यंतिक गरज आहे म्हणून कार्यकारी प्रशासन राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी, त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी पंचायती राज समितीची रचना करण्यात आली. समितीला अधिकार मिळाल्यावरून समितीने अनेक प्रकरणात दोषीतांवर कार्यवाही करण्याबाबत शासनाला निर्देश दिले आहेत. असे निर्देश देत असताना समितीने एखाद्या अधिकारी/कर्मचाऱ्याची प्रथमदर्शनी चूक आढळून देखील संबंधित दोषींविरूद्ध जाणीवपूर्वक निलंबनाची कारवाई प्रस्तावित केली जात नाही. भारतीय संविधानाने प्रत्येकाला समान संधी देण्याची धोरण अंगिकारल्याने कारवाई करतानादेखील दोषीताने तो निर्दोष असल्याचे अभिकथन करणे आवश्यक आहे असे समितीला प्रकर्षाने वाटते. कोणत्याही निर्दोष व्यक्तीवर दोष लादले जाणे हे नैसर्गिक न्याय तत्वाला अनुसरुन नाही असे समितीला वाटते. म्हणून प्रशासनाने कार्यवाही करताना कोणत्याही निर्दोष व्यक्तीला शास्ती करू नये आणि दोषी व्यक्तीला कोणत्याही परिस्थितीत शास्तीविना सोडू नये असे समितीला वाटते. भेटीच्या वेळी संबंधित प्रकरणाची निःपक्षपातीपणे चौकशी करून चौकशी अहवालामध्ये दोषींविरूद्ध कार्यवाही करून त्याच शिक्षा करणे योग्य आहे. **तथापि, एखाद्या निर्दोष व्यक्तीवर कार्यवाही केल्यास ती समितीच्या सूचनेनुसार कार्यवाही केली असे म्हणणे ही बाब समाजाची लोकशाही व्यवस्थेवरील विश्वास उडवणारी आहे. जनमानसात समितीची भूमिका ही प्रशासनाने केलेल्या चांगल्या व वाईट बाबींना शोधून काढून त्यातून जनतेप्रती महत्त्वाची कामे कशी केली जातील याबाबतची प्रतिमा उभी करणे हे संसदीय लोकशाहीने दिलेले एक कर्तव्य आहे. समितीची नाहक बदनामी काही कर्तव्यपारायणवत व सचोटी नसलेले अधिकारी निर्माण करतात आणि जाणीवपूर्वक वैयक्तिक द्वेषापोटी, हेवेदाव्यापाटी निर्दोष व्यक्तीवर कार्यवाही करून समितीची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करतात. याबाबत मुख्य कार्यकारी यांनी सतर्क राहणे आवश्यक असून एखादा गुन्हेगार सुटत असताना त्यास नैसर्गिक न्याय मिळेल. परंतू एखाद्या निर्दोष व्यक्तीला शिक्षा होता कामा नये ही समितीची भूमिका असल्यामुळे समितीने ज्या ज्या प्रकरणांमध्ये चौकशी करण्याचे निर्देश दिलेले आहेत अशा सर्व प्रकरणांमध्ये दोषारोपांची चौकशी करताना सर्व संबंधित व्यक्तींना नैसर्गिक न्याय तत्वानुसार तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार संपूर्ण वस्तुस्थिती विचारात घेतल्यानंतरच निःपक्षपातीपणे कार्यवाही करून दोषींना शास्ती तर निर्दोषींना मुक्ती या तत्वानुसार कारवाई करण्यात यावी, अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

# परिशिष्ट "अ"

## शासनाचे आदेश व परिपत्रके

परिशिष्ट क्रमांक १.१

जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत मोठया
ग्रामपंचायतीला नागरी सुविधासाठी
विशेष अनुदान (विद्युतीकरणासह)

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास व जल संधारण विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक - व्हीपीएम-२६१०/प्र.क.१२९/पंरा-४.**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२**
**दिनांक :- १६ सप्टेंबर,२०१०**

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्रात एकूण २७,९२० ग्रामपंचायती आहेत, २००१ च्या जणगणनेनुसार त्यापैकी सरासरी ३८९ ग्रामपंचायतींची लोकसंख्या १०,००० पेक्षा जास्त आहे. यापैकी काही ग्रामपंचायतींची लोकसंख्या ५०,००० पर्यंत आहे. याशिवाय सुमारे १३२६ ग्रामपंचायतींची लोकसंख्या ५००० ते १०,००० च्या दरम्यान आहे. अशा प्रकारे, ५००० लोकसंख्येच्या वर १७१५ इतक्या ग्रामपंचायती आहेत. या गावांची लोकसंख्या जास्त असूनही नागरी स्थानिक स्वराज्य संस्था अकृषिक रोजगार व वाणिज्यिक व्यवहाराची टक्केवारी कमी असल्याने स्थापन होऊ शकत नाही. यासाठी या मोठया ग्रामपंचायतींचा आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक , औद्योगिक, कृषी औद्योगिक आणि वाणिज्यिक विकास करावा लागेल. त्यासाठी प्राधान्याने व प्राथम्याने येथील राहणीमान दर्जेदार होण्यासाठी शहराच्या तोडीच्या मुलभूत सुविधा व रोजगार संधी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्यामुळे अशा मोठया ग्रामपंचायतीसाठी नगर रचना आराखडयाच्या धर्तीवर ग्रामविकास आराखडा तयार करुन जमीन वापराचे व बांधकामाचे निकष, जमीन विकासाचे निकष, जमीनीचे झोनिंग व विकास नियंत्रण नियमावली आदी नियमन सुध्दा नियोजनबध्द विकासाचे दृष्टीने आवश्यक आहे. त्यादृष्टीने अशा गावांचा स्वतंत्र विचार करुन समर्पक धोरण ठरविणे आवश्यक आहे. त्यामुळे सन २०१०-११ वर्षापासून मोठया ग्रामपंचायतीला नागरी सुविधासाठी विशेष अनुदान (विद्युतीकरणासह) देण्याची नवीन योजना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

**शासन निर्णय :-**

५००० लोकसंख्येच्यावर आर्जामतीस १७१५ इतक्या ग्रामपंचायती आहेत. या ग्रामपंचायतींचा नियोजनबध्द विकास करुन या गावांना विकास केंद्र म्हणून विकसीत करताना, ग्रामविकास व पर्यावरण विकास आराखडा तयार करुन त्याच्या अंमलबजावणीसाठी तसेच, खालील अतिरिक्त सुविधा या योजनेअंतर्गत देणे आवश्यक आहे.

१.१ **नियोजनबध्द विकास :-**

ग्रामविकास आराखडा व पर्यावरण विकास आराखडा तयार करणे, यासाठी तज्ञ सेवा उपलब्ध करुन घेणे, सदर विकास आराखडे तयार झाल्यावर, व सक्षम (Competent) प्राधिकाऱ्यांची मान्यता प्राप्त केल्यावर त्यामधील विविध सार्वजनिक सुविधांसाठी जागा संपादित करणे किंवा विकत घेणे. त्या सुविधेचा सुनियोजन विकास करणे, यासाठी तात्पुरते प्रकल्प निगडीत प्रशासकीय व तांत्रिक पाठबळ उपलब्ध करुन घेणे, यासाठी आवश्यक असणारा निधी या योजनेतून देण्यात येईल.

१.२ **बाजारपेठ विकास :-**

ग्रामीण भागात मोठया गावांना विकास केंद्र म्हणून विकसीत करतांना या गावाची अद्ययावत व सुसज्ज बाजारपेठ विकसीत करणे आवश्यक आहे. बाजारपेठेचा विकास झाल्यास औद्योगिक, कृषि औद्योगिक व वाणिज्यिक विकास होण्यास मदत होईल. यासाठी बाजारपेठांचे नियोजन व बांधकाम करणे, त्यासाठी जागा अधिग्रहीत करणे / विकत घेणे, त्यांचा विकास करणे, विक्रेत्यांसाठी आवश्यक असणारे बाजार कट्टयाचे बांधकाम करणे, दिवाबत्तीची, पिण्याचे पाणी, इत्यादी सर्व सुविधांचा यात समावेश करुन यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देणे.

१.३ **सार्वजनिक दिवाबत्तीची सोय :-**

दिवाबत्तीची सोय करण्यासाठी जादा विद्युतखांब आवश्यक असलेस विद्युत मंडळाकडे त्यासाठी रक्कम भरणे ही ग्रामपंचायतीची जबाबदारी आहे. यास्तव, अशा ग्रामपंचायतींना अनुदान अदा करण्यासाठी देता येईल. ग्रामपंचायतींना इतर प्रकारच्या अपारंपाकि उर्जा वापराच्या दिव्यांसाठी (सौरदिवे, एल ई डी दिवे), वायरिंग व त्या अनुषंगीक खर्चासाठी हे अनुदान वापरण्यात यावे.

१.४ **बागबगीचे, उद्याने तयार करणे** :-

ग्रामपंचायतींना शासनाच्या विविध योजनांतून ग्रामविकासाची कामे करण्यासाठी निधी उपलब्ध होत असला तरी. गावात बागबगीचे व उद्यान, गावातील चौकांचे सुशोभिकरण करण्यासाठी निधी उपलब्ध होत नाही. यास्तव, बागबगीचे व उद्याने, चौकांचे सुशोभिकरण करण्यासाठी या योजनेतून अनुदान देण्यात यावे.

१.५ **अभ्यास केंद्र :-**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अभ्यास करण्यासाठी कुठलीही व्यवस्था नसते. त्यासाठी मोठया गावातील विद्यार्थ्यांसाठी अभ्यास केंद्राचे बांधकाम करणे, टेबल व खुर्च्यांची व्यवस्था

करणे, दिवाबत्तीची व्यवस्था करणे इत्यादी सुविधा पुरविता येतील. यासाठी या योजनेतून अनुदान देण्यात यावे.

**२) निधी उपलब्धता :-**

२.१ या कामासाठी प्रत्येक मोठया ग्रामपंचायतीला प्रथम ग्रामविकास आराखडा व पर्यावरण विकास आराखडा तयार करणेसाठी निधी या योजनेतून देण्यात यावा. यासाठी प्रथम प्रस्तावास मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांची मान्यता घेण्यात यावी व त्यानंतर निधी उपलब्ध करुन देण्यात यावा. हा निधी कमाल दहा लाखांपर्यंत देण्यात यावा. त्यापेक्षा जास्त लागणारा निधी ग्रामपंचायतीला इतर स्त्रोतातून व स्वनिधीतून उपलब्ध करुन घ्यावा लागेल.

२.२ परिच्छेद क्र. १.१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे शासकीय जागांशिवाय इतर खाजगी जमीनी बाजारभावाने खरेदी करणे, किंवा संपादित करण्यासाठी एकूण रक्कमेच्या ७५ टक्के रक्कम, परंतु, कमाल रुपये दहा लाखापर्यंत उपलब्ध करुन देण्यात यावी.

२.३ परिच्छेद क्र. १.२ ते १.५ मधील कामांसाठी २५ टक्के निधी ग्रामपंचायतींनी स्वनिधी किंवा इतर स्त्रोतातून उभारावा. उर्वरित, ७५ टक्के निधी या योजनेतून उपलब्ध करुन देण्यात यावा. मात्र, क्र. १.२ (बाजारपेठ विकास ) करीता शासन निधीची कमाल मर्यादा रुपये २५ लाख, क्र. १.३ (दिवाबत्ती) करीता रुपये १० लाख, क्र.१.४ करीता (बागबगीचे, उद्याने ) रुपये १५ लाख व अभ्यास केंद्राकरीता रुपये ७ लाख राहिल. एका वर्षात कोणत्याही ग्रामपंचायतीला सर्व कामांसाठी मिळून एकूण निधी २५ लाख रुपये व पाच वर्षाच्या प्रकल्पकाळात रुपये १ कोटी पेक्षा जास्त देता येणार नाही. उपलब्ध निधीचा विचार करुन जिल्हयातील ग्रामपंचायतींचा प्राधान्यक्रम ठरविण्याचा अधिकार जिल्हा नियोजन मंडळाकडे असेल. मात्र ज्या ग्रामपंचायती पर्यावरण संतुलित समृध्द ग्राम योजनेत सहभागी होऊन त्या योजनेच्या निकषाची पूर्तता केली असेल त्यामधूनच जिल्हा नियोजन मंडळ प्राधान्यक्रम ठरवील.

**३) अंमलबजावणी :-**

**३.१** **प्रशासकीय मान्यता :-** या योजनेसाठी ग्रामपंचायतीने आराखडा तयार करुन त्यास ग्रामसभेची प्रशासकीय मान्यता घ्यावी. त्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांची या प्रस्तावास मान्यता घेण्यात यावी.

**<u>तांत्रिक मान्यता :-</u>** ग्रामपंचायतींनी तयार केलेल्या आराखडयास कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद यांची तांत्रिक मान्यता घेण्यात यावी.

हा शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असुन त्यांचा संगणकीय संकेतांक २०१००९१६२०१५५४००१ असा आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.**

**(डॉ. मल्लीनाथ कलशेट्टी)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. माननीय राज्यपालांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव
४. मा. मंत्री व मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
५. मा. विधान सभा व विधान परिषद सदस्य (सर्व)
६. मा. मुख्य सचिव
७. सर्व मंत्रालयीन विभाग
८. विधी मंडळ ग्रंथालय, विधान भवन मुंबई (१० प्रती)
९. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई (५ प्रती प्रसिध्दीसाठी)
१०. सर्व विभागीय आयुक्त
११. सर्व जिल्हाधिकारी
१२. महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई (लेखा व अनुज्ञेयता)
१३. महालेखापाल, महाराष्ट्र -१ नागपूर (लेखा व परिक्षा अनुज्ञेयता)
१४. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
१५. ग्राम विकास विभागातील सर्व उप सचिव
१६. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
१७. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी
१८. संचालक, भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई
१९. ग्रामविकास विभागातील सर्व कार्यासने व रोखशाखा
२०. निवडनस्ती, कार्यासन, पं. रा.-४(२२), ग्राम विकास व जलसंधारण विभाग.

परिशिष्ट क्रमांक २.१

**जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षकांचे समायोजन करुन त्यांना इतरत्र बदली देऊन त्यांना सेवेमध्ये समायोजित करण्यासंदर्भात.**

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास व जलसंधारण विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक :-जिपब-५११/प्र.क्र.५४/ आ-१४**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**
**दि. १२/५/ २०११**
18

**वाचा**

१. शासन परिपत्रक, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्रमांक : जिपब-९०८/प्र.क्र.१३६/आस्था-१४, दि.६ ऑक्टोबर, २००८.

**प्रस्तावना :** दरवर्षी दि.३० सप्टेंबर अखेर जिल्हा परिषदेच्या शाळांतील विद्यार्थ्यांची पटसंख्या निश्चित केल्यानंतर त्याआधारे अनुज्ञेय असलेल्या शिक्षकांच्या संख्येपेक्षा जास्त प्राथमिक शिक्षकांच्या समायोजनाने बदल्या करण्याचे अधिकार जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत. प्रत्यक्षात कार्यवाही करित असताना अनेक जिल्हा परिषदांकडून शासन परिपत्रकात काही त्रुटी असल्याबाबत काही सूचना व तक्रारी करण्यात आल्या होत्या. शासन परिपत्रकात सुधारणा करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते. तसेच वरील वाचा मधील समायोजन संबंधाने असलेला संदर्भ १ अधिक्रमीत करुन (रद्द करुन) पुढीलप्रमाणे आदेश देण्याचाही प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

## शासन निर्णय

दरवर्षी दि.३० सप्टेंबर अखेर जिल्हा परिषदेच्या शाळांतील विद्यार्थ्यांची पटसंख्या निश्चित केल्यानंतर त्याआधारे अनुज्ञेय असलेल्या शिक्षकांच्या संख्येपेक्षा जास्त प्राथमिक शिक्षकांच्या समायोजनाने बदल्या करण्याचे अधिकार जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात येत आहेत. तसेच सर्व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दरवर्षी खालील मार्गदर्शक तत्त्वानुसार प्राथमिक शिक्षकांचे समायोजन करावे:-

१. दि.३० सप्टेंबर रोजी निश्चित केलेल्या पटसंख्येनुसार अनुज्ञेय असलेल्या शिक्षकांच्या संख्येपेक्षा जास्त शिक्षक असलेल्या शाळांमधून अनुज्ञेय असलेल्या शिक्षकांच्या संख्येपेक्षा कमी शिक्षक असलेल्या शाळांवर शिक्षकांचे समायोजन करण्यात यावे.

२. असे समायोजन करित असताना तालुक्यातच जर अनुज्ञेय असलेल्या शिक्षकांच्या संख्येपेक्षा कमी शिक्षक असलेल्या शाळा असतील तर प्रथमतः तालुक्यातील अशा शाळांमधून समायोजन करण्यात यावेत. (जर ते अन्यथा तालुक्याबाहेर बदलीस पात्र नसतील तरच)

३. एखादया शाळेत पटसंख्या निश्चिती नंतर अनुज्ञेय असलेल्या शिक्षकांच्या संख्येपेक्षा जास्त शिक्षक झाले असतील तर जे शिक्षक त्या शाळेत जास्त काळ (ज्येष्ठत्तम) कार्यरत असतील, अशा शिक्षकांचे समायोजन करावे. असे अतिरिक्त शिक्षक निश्चित करतांना मुख्याध्यापकांच्या व पदवीधर शिक्षकांच्या जागी जर सहाय्यक शिक्षकांना तात्पुरती नियुक्ती दिली असेल तर अशी पदे समायोजनाची संख्या निश्चित करतांना वगळावी.

असे करत असताना शक्यतो खालील शिक्षकांची समायोजनासाठी निवड करण्यात येऊ नये.

अ. जिल्हास्तरीय मान्यताप्राप्त शिक्षक संघटनांचे पदाधिकारी यांच्या पैकी संघटनांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष.

ब. ज्या शिक्षकांच्या समायोजन दिनांकापासून (३० सप्टेंबर पासून) सेवानिवृत्तीस ५ वर्षे कालावधी शिल्लक राहिलेला असल्यास (तरीसुध्दा समायोजनाद्वारे शाळेत अतिरिक्त ठरत असल्यास त्यांच्या विनंती प्रमाणे त्याच तालुक्यात इतर शाळेत प्राधान्याने समायोजन करण्यात यावे.)

४. समायोजन करत असताना विधवा, परितक्त्या / कुमारिका, अपंग शिक्षक तसेच एकत्र कार्यरत पती-पत्नी अतिरिक्त ठरत असल्यास त्यांचे समायोजन तालुकांतर्गत प्राधान्याने करावे.

५.	एखाद्या तालुक्यात मंजूर पदांपेक्षा जास्त शिक्षक अतिरिक्त ठरत असल्यास वरील मुद्दा क्र.३ प्रमाणे अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांची तालुक्यातील जास्तीत जास्त सेवा झालेल्या शिक्षकांतून उतरत्या क्रमाने वास्तव्य ज्येष्ठता यादी तयार करुन जे शिक्षक त्या तालुक्यात सलग जास्त काळ कार्यरत असतील त्यांचे समायोजन जिल्हा स्तरावरुन करण्यात यावे. मात्र असे समायोजनाद्वारे बदली करताना जिल्हयातील त्यांच्या मूळ तालुक्याच्या शेजारच्या तालुक्यात बदली मागितल्यास प्राधान्य द्यावे.

६.	तालुकांतर्गत किंवा जिल्हास्तरावरुन अतिरिक्त शिक्षकांच्या बदल्या समुपदेशनाने कराव्यात. समुपदेशन करताना अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांना खालील प्राधान्य क्रमाने पदस्थापना देण्यात यावी.

अ.	विधवा
ब.	परित्यक्त्या / कुमारिका
क.	अपंग कर्मचारी (अस्थिव्यंग, अल्पदृष्टी व इत्तर)
ड.	स्वतः गंभीर आजाराने त्रस्त कर्मचारी (जिल्हा शल्यचिकित्सक यांचे प्रमाणपत्र / प्रति स्वाक्षरी केलेले प्रमाणपत्र आवश्यक)
इ.	सैनिक व अर्ध सैनिक जवानांच्या पत्नी
ई.	पती- पत्नी एकत्रिकीकरण
फ.	तालुका वास्तव्य ज्येष्ठतेनुसार ज्येष्ठ असलेले

समायोजनाची कार्यवाही करत असताना सर्व रिक्त पदे जाहीररित्या दाखविणे अनिवार्य राहील.

७.	तालुक्यामध्ये समायोजन करत असताना कोणत्याही द्विशिक्षकी किंवा तीन शिक्षकी शाळेत पद रिक्त राहणार नाही अशा रितीने समुपदेशनाने पदस्थापना देण्यात यावी. ***(उदा. जर तालुक्यामध्ये १५ पदे रिक्त आहेत आणि फक्त १० शिक्षकांचे समायोजन करावयाचे आहे तर सर्व १५ रिक्त पदे दाखविण्यात यावीत. परंतु १५ मध्ये जर तीन द्विशिक्षकी किंवा तीन शिक्षकी शाळा असतील तर प्राधान्य क्रमानुसार ७ शिक्षकांना पदस्थापना दिल्यानंतर ३ शिक्षकांना द्विशिक्षकी किंवा ३ शिक्षकी शाळेत पद रिक्त राहिल्यास प्राधान्यक्रमाने पदस्थापना द्यावी.)***

८.	शिक्षकांचे समायोजनापूर्वी पदोन्नतीची कार्यवाही पूर्ण करणे आवश्यक आहे. जिल्हास्तरावरुन ३१ जुलै पर्यंत पदोन्नतीची कार्यवाही करणे बंधनकारक राहील. पदोन्नती दिल्यानंतर सर्व संबधितांना ३१ ऑगस्टपर्यंत रुजु होणे आवश्यक राहील.

पदोन्नतीसाठी किमान ५०% प्रतिक्षा यादी तयार करण्यात यावी, जेणेकरुन रूजू न होणाऱ्या व पदोन्नती नाकारणाऱ्या शिक्षकांच्या जागी पदस्थापना देणे सोईस्कर होईल. पदोन्नती दिल्यानंतर त्यांच्या नियुक्तीबाबत समुपदेशन पध्दतीचा अवलंब करावा व त्यासाठी प्राधान्यक्रम वरील अ.क्र.६ मध्ये दर्शविल्याप्रमाणे अ ते ई पर्यंत तसेच फ- सेवाज्येष्ठतेनुसार ज्येष्ठ असा राहील. जेणेकरुन जास्तीत जास्त शिक्षक पदोन्नतीच्या पदावर रुजू होतील. नियमित पदोन्नत्या त्याच्या नंतरसुध्दा करता येतील.

९. समायोजन करताना दरवर्षी ३० सप्टेंबर ही तारीख विचारात घेऊन प्रचलित नियमानुसार पटसंख्या व शिक्षक संख्या निश्चित करावी. त्याअनुषंगाने २० ऑक्टोंबरपर्यंत विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी मान्यतेची कार्यवाही पूर्ण करणे आवश्यक राहील. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मुदतीत प्रस्ताव सादर करुनही जर विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी प्रस्तावाला २५ ऑक्टोबर पर्यंत कोणताही निर्णय कळविला नाही. तर त्यांची मान्यता गृहीत धरुन कोणत्याही परिस्थितीत ३० सप्टेंबर पर्यंत पटसंख्या व शिक्षक संख्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निश्चित करावी. तसेच जिल्हयातील समायोजनाचे काम ३१ ऑक्टोंबर पर्यंत पूर्ण करावे.

१०. समायोजनाद्वारे अतिरिक्त ठरवून इतरत्र झालेल्या बदल्यांच्या अनुषंगाने काही कर्मचाऱ्यांच्या तक्रारी असल्यास दि.१५ नोव्हेंबर पर्यंत विभागीय आयुक्त यांचेकडे करण्यात याव्यात. विभागीय आयुक्त यांनी तक्रार प्राप्त झाल्यानंतर आवश्यक ती कार्यवाही करुन दि.२५ नोव्हेंबर पर्यंत निर्णय द्यावा व दि.३० नोव्हेंबर पर्यंत संबधित जिल्हयाने त्याची अंमलबजावणी करावी. विभागीय आयुक्त यांचा निर्णय अंतिम राहील. विभागीय आयुक्त यांना अशा तक्रारींची दखल घेता यावी म्हणून त्यांना तक्रार निवारण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

११. काही शिक्षक परस्पर समायोजनाबाबत शासनाकडे तक्रारी करतात, असे शिक्षक प्रशासकीय कारवाईस पात्र राहतील. अशा तक्रारींची दखल घेतली जाणार नाही.

१२. समायोजनासाठी विहित कालावधी ठरवून दिलेला असल्याने ज्या जिल्हयात सदरची कार्यवाही विहित कालावधीत होणार नाही त्या जिल्हा परिषदांचे मुख्य

कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना जबाबदार धरण्यात येईल. जिल्हा परिषद शिक्षकांच्या समायोजनांतर्गत बदल्यांबाबत तक्रारी प्राप्त होतात. त्यामध्ये शासनाने निश्चित केलेल्या निकषांचे पालन न करता समायोजन केल्याच्या बहुतांश तक्रारींचा अंतर्भाव असतो, त्यामुळे अनेक प्रशासकीय अडचणी व न्यायालयीन प्रकरणे उद्भवतात. हे सर्व टाळण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

अ. शिक्षकांच्या समायोजनामध्ये पारदर्शकता राहावी यासाठी विहीत केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोरपणे पालन करुन समुपदेशाद्वारे समायोजनांतर्गत बदल्या करण्याची दक्षता सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी घ्यावी.

ब. कोणत्याही प्रकारच्या अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या संबधितांविरुध्द नियमानुसार आवश्यक ती कारवाई करावी.

क. समायोजन करताना निवडणूक आचारसंहितेचा भंग होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

वरीलप्रमाणे प्राथमिक शिक्षकांचे समायोजन करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनाकडे माहितीस्तव वेळोवेळी पाठविण्यात यावा.

सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०११-२०१२ पासून पुढे होणाऱ्या समायोजनांसाठी लागू राहील.

सदर शासन निर्णय संगणक संकेतांक क्र.२०११०५१३१७१२५०००१ अन्वये महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सुधीर ठाकरे)
सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव.
४. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग.
५. सर्व विभागीय आयुक्त.
६. सर्व जिल्हाधिकारी.
७. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
८. महालेखापाल -१ /२ , मुंबई / नागपूर
९. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१०. सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
११. संचालक, शालेय शिक्षण, पुणे.
१२. सर्व उपसंचालक, शालेय शिक्षण.
१३. मा. मंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव.
१४. मा. राज्यमंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव.
१५. ग्राम विकास व जलसंधारण विभागातील सर्व कार्यासने.
१६. निवडनस्ती.

**परिशिष्ट क्रमांक २.२**

पदनिर्मीती, पदभरती व पदांचे पुनरुज्जीवन याबाबतचे निर्बंध व आनुषंगिक आढावे आणि अतिरिक्त संवर्ग योजनांतर्गत कक्षाची स्थापना व त्याचे व्यवस्थापन

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय,क्रमांक-असंक-१००१/प्र.क्र.२९/२००१/ वित्तीय सुधारणा
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२**
**दिनांक : १० सप्टेंबर २००१**

**संदर्भ :-** (१) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक:बीजीटी २५८६/प्र.क्र.४/ आर.इ.एस.५, दिनांक १४ मे १९८६
(२) शासन निर्णय, वित्त विभाग,क्रमांक:बीजीटी २५८६/प्र.क्र.७/ आर.एस.५, दिनांक २८ मे १९८६
(३) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: आयएस १०८५/प्र.क्र.२७/ अर्थसंकल्प-१९,दिनांक ०४ सप्टेंबर १९८६
(४) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक:झेडबीबी १०८६/सी.आर.८४/ अर्थसंकल्प-१९, दिनांक २७ ऑक्टोबर १९८६
(५) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: बीजीटी-२५८६/११९/ अर्थसंकल्प-१९, दिनांक ०९ डिसेंबर १९८६
(६) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:एससीसी १९८७/६७/सीआर-४/१६ अ, दिनांक १० मार्च १९८७
(७) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: एससीसी १०८७/ ६७/सीआर-४/१६ अ, दिनांक ०८ मे १९८७
(८) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: एससीसी १०८७/ ६७/सीआर-४/१६ अ, दिनांक ०९ मार्च १९८९
(९) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक: डीबीबी १०८९/प्र.क्र.९०/ अर्थसंकल्प-१९, दिनांक ११ एप्रिल १९८९
(१०) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक:बीजीटी १०९७/प्र.क्र.१७/ अर्थसंकल्प-१९, दिनांक ०७ जुलै १९९७
(११) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: बीजीटी-१०९७/ प्र.क्र.१७/ अर्थसंकल्प-१९, दिनांक ३० सप्टेंबर १९९७
(१२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: बीजीटी-१०९७/ प्र.क्र.२४अ/ अर्थसंकल्प-१९, दिनांक ०२ जून १९९८
(१३) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: बीजीटी-२५९८/ प्र.क्र.२८/ अर्थसंकल्प-१९, दिनांक १७ ऑक्टोबर १९९८
(१४) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: बीजीटी-१०९७/प्र.क्र.२४-अ/ अर्थसंकल्प-१९, दिनांक १५ डिसेंबर १९९८
(१५) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-एससीसी १०९९/ प्र.क्र.२९/ ९९/ १६-अ, दिनांक ०१ नोव्हेंबर, १९९९
(१६) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांक: बीजीटी-१०.००/ प्र.क्र.१३/ २०००/ अर्थसंकल्प-१९, दिनांक १ मार्च २०००
(१७) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: बीजीटी-१०.००/प्र.क्र.१३/ २०००/अर्थसंकल्प-१९, दिनांक २९ जून २०००
(१८) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक-आस्था ११.००/प्र.क्र.३/ २०००(पदे ) १९-अ, दिनांक १० ऑक्टोबर, २०००
(१९)अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-१००१/प्र.क्र.१/ २००१/१८ (र.व का.), दिनांक ११.१.२००१
(२०) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक:बीजीटी १०.०१/प्र.क्र.१७/ २००१/ अर्थसंकल्प-१९, दिनांक ७ एप्रिल २००१

## प्रस्तावना

राज्य शासनाच्या महसूली जमेच्या तुलनेत आस्थापनेवरील खर्च वाढला असल्यामुळे राज्याच्या विकासाच्या कामावर याचा विपरीत परिणाम होत आहे व राज्याच्या विकासाच्या/ जनकल्याणाच्या योजना राबविण्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध होऊ शकत नाही. याबाबत उपाययोजना म्हणून वरील संदर्भाधीन दिनांक १५ डिसेंबर १९९८ च्या शासन निर्णयान्वये सर्व मंत्रालयीन विभाग व त्यांच्या नियंत्रणाखालील विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांच्या कार्यालयात अस्तित्वात असलेल्या सर्व पदांचा आढावा घेण्याचे व त्याबाबतचा अहवाल सर्व मंत्रालयीन विभागानी

वित्त विभागास सहमतीसाठी पाठविण्याचे आदेश आहेत. मंत्रालयीन प्रशासनिक विभाग व त्यांच्या नियंत्रणाखालील विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांच्या कार्यालयात अस्तित्वात असलेल्या पदांचा संबंधित प्रशासनिक विभागांनी विहित कालमर्यादेत आढावा पूर्ण करावयाचा आहे. या आढाव्याच्या माध्यमातून-

(अ) अनिवार्य व अतिरिक्त पदे ठरविणे;

(ब) अनिवार्य पदांच्या बाबतीत त्यांच्या वापरासंबंधी विभागांना स्वातंत्र्य देणे; आणि

(क) अतिरिक्त पदांच्याबाबतीत जी रिक्त पदे असतील ती नष्ट करणे आणि जी भरलेली पदे असतील त्या पदावरील कर्मचा-यांना, अधिसंख्य पद निर्माण करुन, अतिरिक्त संवर्ग कक्षाकडे वर्ग करणे आणि मूळ पद नष्ट करणे या कार्यवाही पूर्ण कराव्या लागणार असल्याने, याबाबतची एक सर्वकष पध्दती विहित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्या अनुषंगाने शासनाने पुढीलप्रमाणे योजना विहित करण्याचा निर्णय घेतलेला आहे:

## शासन निर्णय

### १. पदांचा आढावा

१.१ सर्व मंत्रालयीन प्रशासनिक विभागांनी त्यांच्या मंत्रालयीन विभागातील तसेच त्यांच्या नियंत्रणाखालील विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांच्या कार्यालयात अस्तित्वात असलेल्या सर्व (योजनेतर किंवा योजनांतर्गत) पदांचा आढावा (परिच्छेद १.२ व १.३ प्रमाणे) घ्यावा व त्याबाबतचा अहवाल पुनर्विलोकन व संमतीसाठी प्रधान सचिव/ सचिव (प्र.सु. व र.का.), सामान्य प्रशासन विभाग व प्रधान सचिव/ सचिव (व्यय), वित्त विभाग यांच्या संयुक्त समितीकडे पाठवावा. आढाव्याअंती अतिरिक्त ठरणारा अधिकारी / कर्मचारीवृंद वित्त विभागात कार्यरत असलेल्या अतिरिक्त संवर्ग कक्षाकडे पदनिहाय व संवर्गनिहाय वर्ग करावा.

१.२.१ सर्व मंत्रालयीन प्रशासनिक विभागांनी त्यांच्या नियंत्रणाखालील कार्यालयांचा आढावा तसेच ते राबवीत असलेल्या योजना व कार्यक्रमांचा आढावा दिनांक ३१ ऑक्टोबर २००१ पर्यंत पूर्ण करावा. सदर आढावा घेत असताना खालील बाबी सर्वसाधारणपणे विचारात घेतल्या जाव्यात:

(अ) काही योजना/कार्यक्रम/कामे संपत आलेली असतील तर त्यासाठीच्या कर्मचा-यांचा विचार करावा.

(ब) कालबाहय झालेल्या योजना बंद कराव्यात.

(क) ज्या योजना/कार्यक्रम यांची उद्दिष्टे समान आहेत त्या योजना/ कार्यक्रमाचे एकत्रीकरण करुन कमीत कमी मनुष्यबळात योजना/कार्यक्रम राबवावे.

(ड) शासकीय विभाग/कार्यालयांच्या आधुनिकीकरण व संगणकीकरणाच्या पार्श्वभूमीवर संरचनात्मक बदल करणे शक्य झाले असल्याने तेही विचारात घेऊन पदांची जुनी मानके पुनर्विलोकित करावी व त्या प्रमाणे अधिकारी/ कर्मचारी यांची संख्या नियोजित करावी.

१.२.२ योजना व कार्यक्रमांच्या आढाव्यामधून प्रामुख्याने वेतन व भत्त्याच्या चालू वर्षीच्या खर्चामध्ये ३.५ टक्के बचत होईल अशी अपेक्षा असून ही बाब मध्यवर्ती धरुन आढावा घेतला जावा.

१.२.३ प्रशासनिक विभागांनी त्यांचा व त्यांच्या नियंत्रणाखालील कार्यालयातील पदांचा आढावा घेतल्यानंतर संबंधित प्रशासनिक विभागाच्या प्रभारी मंत्र्यांची त्यास मान्यता घेऊन उच्चस्तरीय सचिव समितीसमोर ठेवण्यासाठी वित्त विभागास सादर करावा.

१.३ (अ) प्रशासनिक विभागांनी महागाई भत्त्याची रक्कम सोडून वेतनावरील खर्चात सन २००१-२००२ च्या मंजूर (पुरवणी मागण्यांसह) तरतुदीमध्ये आढाव्याअंती १.५ टक्के बचत दर्शविल्यास सदर बचतीसह सादर केलेला आढावा पुढील परिच्छेद- २.५ अन्वये स्थापित केलेल्या उच्चस्तरीय सचिव समितीसमोर केवळ सहमतीसाठी ठेवण्यात येईल.

(ब) या आढाव्यास उच्चस्तरीय सचिव समितीच्या सहमतीनंतर सन २००१-०२ या संपूर्ण वर्षभरात पदस्थापना, पदोन्नत्या किंवा आवश्यक तेथे कर्मचा-यांचे मुख्यालय बदलून सेवा वापरण्याबाबत प्रशासनिक विभागांना पूर्ण स्वातंत्र्य राहील.

(क) त्यानंतर याच पध्दतीनुसार दरवर्षी दि. ३१ ऑक्टोबर पूर्वी आढावा घेण्यात यावा.

१.४ जर वरील परिच्छेद १.३ प्रमाणे स्वत:हून आढावा घेऊन १.५ टक्के बचतीसह काही प्रशासनिक विभाग पुढे आले नाहीत तर सन २००१-०२ मध्ये महागाई भत्ता सोडून वेतनासाठी जेवढी तरतूद देण्यात आलेली आहे त्यामध्ये २००२-०३ साठी पुढील वर्षी सेवानिवृत्तीमुळे जी वेतनात बचत होईल, ती वगळून तरतूद देण्यात येईल आणि त्या मर्यादेतच खर्च भागविणे संबंधित प्रशासनिक विभागावर बंधनकारक राहील. त्यातून कर्मचा-यांना पगार न मिळणे इत्यादीसारख्या बाबी आणि आनुषंगिक प्रश्न निर्माण झाल्यास त्याबाबतची संपूर्ण जबाबदारी संबंधित प्रशासनिक विभागाची राहील.

१.५ (अ) प्रशासनिक विभागांनी वरील परिच्छेद १.३ प्रमाणे आढावा घेऊन, बचतीसह प्रस्ताव न आणल्यास वरील परिच्छेद १.४ मध्ये विहित केलेली कार्यवाही करण्याबरोबरच प्रशासनिक विभागांसह त्यांच्या नियंत्रणाखालील सर्व कार्यालये व आस्थापनांचा आढावा त्या प्रशासनिक विभागामार्फत परिच्छेद १.१ आणि १.३ (क) अनुसार करुन घेतला जाईल.

(ब) सदर आढावा ज्या प्रशासनिक विभागात वेतनावर जास्तीत जास्त खर्च होतो त्यांचा प्रथम अशारितीने उतरत्या क्रमाने घेण्यात येईल.

## २. नवीन पदे निर्माण करण्यावरील व पदे भरण्यावरील निर्बंध

२.१ विनिर्दिष्टपणे मंत्रिमंडळाची मान्यता मिळालेल्या योजनांच्या बाबतीतील प्रकरणे वगळता, नवीन पदे (अंशकालीन पदांसह) निर्माण करण्यावर निर्बंध राहतील.

२.२ **आस्थापनांचा व योजनांचा सर्वकष आढावा (परिच्छेद १.३ ते १.५ अन्वये) घेऊन तो उपरोक्त समितीकडून मान्य झाल्यानंतरच** अत्यावश्यक असल्यास नवीन पदनिर्मितीचे प्रस्ताव (यासोबत जोडलेल्या परिशिष्ट-एक मधील तपशीलांसह) संबंधित प्रशासनिक विभागांनी सचिवांचे स्तरावर मान्यता घेऊन वित्त विभागास सादर करावेत.

२.३ सर्व प्रशासनिक विभागांनी योजनांतर्गत योजनेखाली नवीन पदे निर्माण करण्याच्या प्रस्तावास प्रथम नियोजन विभागाची व नंतर वित्त विभागाची संमती घ्यावी. तसेच योजनेतर शीर्षाखाली नवीन पदे निर्माण करण्याच्या प्रस्तावास फक्त वित्त विभागाचे अभिप्राय मिळवावे. त्यानंतरच सदरहू प्रस्ताव या करिता गठित केलेल्या उच्चस्तरीय सचिव समितीच्या विचारार्थ सादर करण्यात येईल.

२.४ नवीन पदनिर्मितीच्या प्रस्तावास वित्त विभागाने छाननी अंती संमती दिल्यानंतर संबंधित धारिका विभागास परत करण्यात येईल. तद्नंतर नवीन पदनिर्मितीचे असे प्रस्ताव पुढील परिच्छेद ३ व ४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे पद पुनरुज्जीवन व पदभरतीस मान्यता मिळविण्यासाठीचे प्रस्ताव पुढील परिच्छेद- २.५ मध्ये नमूद केलेल्या उच्चस्तरीय सचिव समितीसमोर निर्णयार्थ ठेवले जातील. नवीन पदनिर्मिती व पदांच्या पुनरुज्जीवनाच्या प्रस्तावासंबंधी माहिती सोबत जोडलेल्या विवरणपत्र-१ मध्ये ***व पदभरतीच्या प्रस्तावासंबंधी माहिती सोबत जोडलेल्या परिशिष्ट-२ मध्ये*** संबंधित प्रशासनिक विभागाकडून संकलित करुन प्राप्त झाल्यावर असे प्रस्ताव उच्चस्तरीय सचिव समितीसमोर वित्त विभागाद्वारे ठेवण्यात येतील.

२.५ नवीन पदनिर्मीतीच्या संदर्भात दिनांक ७ जुलै १९९७ च्या निर्णयाद्वारे मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात आलेल्या सचिव समितीमध्ये सुधारणा करुन पुढीलप्रमाणे उच्चस्तरीय सचिव समिती पुनर्गठित करण्यात येत आहे:

| | |
|---|---|
| मुख्य सचिव | अध्यक्ष |
| अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग | सदस्य |
| अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग | सदस्य |
| प्रधान सचिव (नियोजन), नियोजन विभाग | सदस्य |
| प्रधान सचिव / सचिव (प्र.सु. र.व का), सामान्य प्रशासन विभाग | सदस्य |
| प्रधान सचिव (वित्त), वित्त विभाग | सदस्य |
| प्रधान सचिव/ सचिव (व्यय), वित्त विभाग | सदस्य |
| संबंधित प्रशासनिक विभागाचे अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव | सदस्य |
| अवर/उप/ सह सचिव (वित्तीय सुधारणा), वित्त विभाग | समिती सचिव |

सदर समिती नवीन पदनिर्मिती, व्यपगत झालेल्या पदांचे पुनरुज्जीवन करणे व या आदेशाच्या दिनांकास रिक्त असलेली सर्व पदे आणि या पुढे कोणत्याही कारणामुळे रिक्त होणारी पदे भरतीस मान्यता देईल. वरील परिच्छेद १.३ मध्ये विहित केल्याप्रमाणे बचत होते किंवा नाही याचा आढावा त्याचबरोबर अतिरिक्त संवर्ग कक्षाच्या कामकाजाचा नियतकालिक आढावा घेईल.

२.६ उच्चस्तरीय सचिव समितीने मान्यता दिल्यानंतर सर्व प्रस्तावास मंत्रिमंडळाची मान्यता घेण्याची आवश्यकता नाही. फक्त रुपये १२०००-१६५०० व त्यावरील वेतनश्रेणीची नवीन पदे निर्माण करण्याच्या प्रस्तावास मंत्रिमंडळाची मान्यता घेण्यात यावी. रुपये १२०००-१६५०० व त्यावरील वेतन श्रेणीची पदे, तसेच त्यापेक्षा खालील वेतनश्रेणीची पदे निर्माण करण्याचा संयुक्त प्रस्ताव असेल तर या प्रस्तावासही मंत्रिमंडळाची मान्यता घेण्यात यावी.

२.७ नवीन पदनिर्मितीस उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता मिळाल्याखेरीज अर्थसंकल्पीय तरतूदीसाठी प्रस्ताव व्यय अग्रक्रम समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येऊ नयेत.

२.८ नवीन पदनिर्मितीमुळे वार्षिक आवर्ती खर्च रुपये २ लक्ष पेक्षा जास्त असल्यास अर्थसंकल्पीय नियमानुसार हा खर्च "खर्चाची नवीन बाब" ठरते. म्हणून त्यावरील खर्च विधान मंडळाची मान्यता घेतल्याशिवाय करता येत नाही. तरी अशा प्रसंगी पदनिर्मितीबाबत नवीन बाबीचा/ पूरक मागणीचा प्रस्ताव विधानमंडळाने मान्य केल्याशिवाय पदनिर्मितीचे आदेश निर्गमित करु नयेत. तथापि आकस्मिकता निधीतून अग्रिम घेतले असल्यास तसेच मूळच्याच योजनेचा वाढीव भाग म्हणून मंजूर अनुदानातून खर्च भागविला जाणार असल्यास लाक्षणिक पूरक मागणी मान्य होण्याची वाट न पाहता खर्चास अनुज्ञेयता राहील.

२.९ कधी कधी प्रशासनिक विभागांना न्यायालयाच्या आदेशामुळे काही अधिसंख्य पदे आणि इतर पदे निर्माण करावी लागतात. न्यायालयाच्या आदेशामुळे जी पदे निर्माण करावी लागतात अशा बाबतीत मंत्रिमंडळाच्या मान्यतेची आवश्यकता नाही. तथापि, उच्चस्तरीय सचिव समितीची संमती व अर्थसंकल्पीय तरतुदीसाठी व्यय अग्रक्रम समितीची मान्यता घेण्यात यावी.

## हंगामी आस्थापना

२.१० सध्या विशिष्ट प्रकारच्या कामांसाठी काही विभागांमध्ये अल्पावधीसाठी हंगामी जागा वेळोवेळी निर्माण केल्या जातात. उदाहरणार्थ :-

(१) टंचाई / अवर्षणग्रस्त जिल्हयांसाठी जिल्हाधिका-यांनी, विभागीय आयुक्तांच्या अनुज्ञेने मृदसंधारण कामासाठी रोजगार हमी योजनेखाली निर्माण करावयाची आस्थापना.

(२) शासकीय बीज गुणन प्रक्षेत्रावर (सीड फार्म) हंगामी शेतीकामासाठी नेमलेले कामगार.

(३) वनीकरणाच्या कामावर नेमलेली हंगामी आस्थापना.

या पुढे हंगामी पदे निर्माण करु नयेत व ती भरण्यात येऊ नयेत. हंगामी स्वरुपाची कामे ज्या विभागांमध्ये सध्या केली जातात ती यापुढे कंत्राटीपध्दतीवर करुन घेण्यात यावीत. हंगामी व रोजंदारी कर्मचारी नेमण्यात येवू नयेत.

## रोजगार हमी योजने- खालील कामांसाठी कार्यव्ययी आस्थापना

२.११ (अ) रोजगार हमी योजनेखालील विविध कामांसाठी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणांकडूनच कर्मचाऱ्यांची गरज भागवावी.

(ब) टंचाई किंवा टंचाईसदृश्य परिस्थिती जाहीर झाल्यावर मोठया प्रमाणावर रोजगार हमी योजना, पाणी पुरवठा योजना, इत्यादी ची कामे घ्यावी लागली तरी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणांनी त्यांचेकडील आस्थापनेकडूनच कामकाज करुन घ्यावे.

(क) शासन निर्णय नियोजन विभाग क्रमांक :हसका-१०९२/प्र.क्र.२६२/रोहयो-३, दिनांक २६ मे, १९९३ मधील निर्णय क्रमांक ३ प्रमाणे रोजगार हमी योजनेअंतर्गत कामावर हजेरी सहाय्यक नियुक्त करण्यात येवू नयेत. निर्णय क्रमांक ४ प्रमाणे हजेरी सहाय्यकाऐवजी रोजगार हमी योजनेतंर्गत कामावरील मजूरांपैकी जो शिक्षित असेल त्या मजूराला रोजगार हमी योजनेचे हजेरीपट सांभाळणे तसेच मजूरांना मजूरी देतेवेळी मजूरांची ओळख पटविणे व तद्अनुषंगिक कामेच फक्त देण्यात यावी. तसेच निर्णय क्रमांक ६ प्रमाणे शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक : रोहयो-११८८/प्र.१७/इएमपी-१२, दिनांक १.२.८८ मध्ये नमूद केलेल्या परिमंडळानुसार मजूरांना देय असलेली मजूरी अधिक रुपये ५ दैनिक मजूरी सदर मजूरास देण्यात यावी. दिनांक २६ मे, ९३ च्या शासन निर्णयातील इतर निर्णयांचाही काटेकोर अवलंब करण्यात यावा.

## रोजंदारी व कार्यव्ययी आस्थापनेवर मजूर घेणे

२.१२ ज्या अधिका-यांना, त्यांनी प्रशासित केलेल्या योजनांची यशस्वीपणे अंमलबजावणी करण्याकरिता रोजंदारीवरील कर्मचारी घेण्याचे किंवा नैमित्तिक कामगार कामावर लावण्याचे अधिकार देण्यात आले आहेत ते अधिकार याद्वारे रद्द करण्यात येत आहेत.

२.१३ कोणत्याही विभागाने रोजंदारीवर किंवा हंगामी तत्वावर कर्मचा-यांची नियुक्ती करु नये. रोजंदारी हंगामी तत्वावर कर्मचा-यांची नेमणूक केल्यास प्रशासनिक विभागाने संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांचेवर खातेनिहाय चौकशी करुन शिस्तभंगाची कारवाई करावी.

२.१४ शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक : संकीर्ण-१०८८/१५/(२)/सेवा-१०, दिनांक ६.२.१९८९ अन्वये राज्य शासनाची विनिर्दिष्ट पूर्वसंमती घेतल्याशिवाय कोणत्याही विभागाला कार्यव्ययी आस्थापनेवर पदे निर्माण करण्यास अनुज्ञेयता नाही. यापुढे कार्यव्ययी आस्थापनेवर शासन मान्यतेनेसुध्दा पदे निर्माण करता येणार नाहीत. कार्यव्ययी आस्थापना निर्माण करुन जी कामे केली जात होती ती यापुढे कंत्राटी पध्दतीने करण्यात यावीत. काम/प्रकल्प/कार्यक्रम निहाय कंत्राटी पध्दतीने करुन घ्यावयाच्या कामास संबंधित प्रशासनिक विभागाची पूर्वमान्यता घेण्यात यावी.

२.१५ पाटबंधारे विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग व ग्रामविकास आणि जलसंधारण विभाग यांना कालेलकर कराराच्या तरतुदी लागू आहेत. त्या विभागांनी देखील रोजंदारीवर तसेच कार्यव्ययी आस्थापनेवर कर्मचा-यांची नियुक्ती करु नये. नियुक्ती केल्यास प्रशासनिक विभागाने संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांचेवर खातेनिहाय चौकशी करुन शिस्तभंगाची कारवाई करावी.

## ३. पदांचे व्यपगत होणे व पुनरुज्जीवन करणे

३.१ सहा महिन्यांपेक्षा अधिक काळ रिक्त असलेली पदे व्यपगत होतात. जी पदे रिक्त झालेली आहेत व ज्यांचा अतिरिक्त कार्यभार इतर अधिकारी/ कर्मचाऱ्यांस दिला आहे ती पदे रिक्त झाल्याच्या दिनांकापासून ६ महिन्यात नियमित स्वरुपात न भरल्यास व्यपगत झाली असे समजण्यात यावे. अशी पदे पुनरुज्जीवित करणे आवश्यक असल्यास प्रशासनिक विभागाने सदरहू पदे कोणत्या दिनांकापासून रिक्त आहेत, या पदास शेवटची मुदतवाढ कोणत्या आदेशान्वये किती कालावधीपर्यंत दिली आहे, तसेच या पदाची आवश्यकता का आहे याबाबत योग्य ते समर्थन देऊन प्रस्ताव वित्त विभागाकडे अभिप्रायासाठी पाठवावा. वित्त विभागाने सहमती दिल्यानंतर प्रस्तावास उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता घ्यावी.

३.२ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग आणि विमुक्त जाती व भटक्या जमाती या सामाजिक घटकांना जे घटनादत्त आरक्षण आहे त्या आरक्षणाप्रमाणे अनुशेषांतर्गत असलेली पदे ६ महिन्यांपेक्षा जास्त कालावधीसाठी रिक्त राहिली तरी ती व्यपगत होणार नाहीत आणि ही पदे भरण्यासाठी उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता आवश्यक असणार नाही.

३.३ एक शिक्षकी शाळेतील शिक्षकांची वैधानिक पदे व विभाग प्रमुख/ प्रादेशिक विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुखांची पदे सहा महिन्यांपेक्षा जास्त काळ रिक्त राहिली तरी व्यपगत होणार नाहीत.

३.४ कृषि व अकृषि विद्यापीठांतर्गत महाविद्यालयातील, केंद्रीय/ राज्य शासनाच्या परिषदा, संस्था, इत्यादिंची मान्यता लागणाऱ्या अभ्यासक्रमासाठीची अध्यापकीय पदे तसेच राज्य शासनाने मान्य केलेल्या आकृतीबंधातील

अध्यापकीय पदे सहा महिन्यांपेक्षा जास्त काळ रिक्त राहिली तरी ती व्यपगत होणार नाहीत. त्या खेरीज इतर अध्यापकीय पदे सहा महिन्यांपेक्षा जास्त काळ रिक्त राहिली तर व्यपगत होतील.

३.५ पद रिक्त झाल्यापासून सहा महिन्यांचे आत पद भरतीस मान्यता मागणारा प्रस्ताव वित्त विभागास सादर झाला तर त्या प्रस्तावातील पद/ पदे व्यपगत होणार नाहीत. मात्र असे प्रस्ताव सहा महिने पूर्ण होण्यापूर्वी किमान एक महिना अगोदर संबंधित प्रशासनिक विभागांनी वित्त विभागास सादर करावयास पाहिजे.

३.६ उच्चस्तरीय सचिव समितीने पदे भरण्यास मान्यता दिल्यानंतर अशी पदे भरतांना स्वातंत्र्य सैनिकांचे वारस व सन १९९१ चे कार्यमुक्त जनगणना कर्मचारी, अंशकालीन कर्मचारी, सेवानिवृत्त चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांचे वारस यांच्या संदर्भात व अनुकंपा तत्वावर नियुक्ती संदर्भात सामान्य प्रशासन विभागाने व सफाई कामगारांच्या बाबतीत लाड समितीच्या शिफारशीवर नगर विकास विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचना तसेच अपंग, महिला, प्रकल्पग्रस्त यांच्या नियुक्त्यांबाबत सर्वसाधारण सूचना लागू राहतील.

३.७ प्रशासनिक विभागाच्या नियंत्रणाखालील काही कार्यालयामध्ये ६ महिन्यापेक्षा जास्त कालावधीसाठी रिक्त असलेली पदे पुनरुज्जीवित न करता भरण्यात येतात व त्यामुळे त्यांची वेतन देयके कोषागार कार्यालयाकडून पारित केली जात नाहीत. त्यावेळेस प्रशासनिक विभागाकडून त्या अधिकारी / कर्मचारी यांचा दोष नसल्यामुळे तसेच त्यांना वेतन मिळण्यास अडचण येऊ नये असे समर्थन देऊन अशी पदे पुनरुज्जीवित करण्याचा प्रस्ताव वित्त विभागाच्या संमतीसाठी सादर केले जातात. पदावर काम करीत असलेल्या अधिका-यास / कर्मचा-यास वेतन मिळणे आवश्यक असल्यामुळे अशा प्रस्तावास नाईलाजाने मान्यता द्यावी लागते. <u>यावर आळा घालण्यासाठी ६ महिन्यांपेक्षा जास्त कालावधीसाठी रिक्त असलेली पदे पुनरुज्जीवित न करता भरण्यात आल्यास ज्या अधिका-याने ती भरण्याची कार्यवाही केली आहे त्याचेवर योग्य ती जबाबदारी निश्चित करुन प्रथम शिस्तभंगाची कारवाई केल्याशिवाय पदे पुनरुज्जीवित करण्याचा प्रस्ताव वित्त विभागाच्या संमतीसाठी पाठविता येणार नाही.</u>

## ४. <u>नवीन निर्माण केलेली, पुनरुज्जीवित केलेली व रिक्त पदे भरणे</u>

४.१ उच्चस्तरीय सचिव समितीने पद भरतीस मान्यता दिलेली पदे वगळता रिक्त पदे भरता येणार नाहीत.

४.२ योजनांतर्गत किंवा योजनेतर प्रयोजनांसाठी नवीन पदे निर्माण केल्यावर अंमलबजावणीच्या सर्व प्राथमिक बाबी पूर्ण झाल्याशिवाय पदे भरण्यात येऊ नयेत.

४.३ (अ) ज्या अभ्यासक्रमांना केंद्रीय तसेच राज्य शासनाच्या परिषदा, संस्था, इत्यादिंची सध्या मान्यता आहे परंतु विहित शैक्षणिक पदे भरलेली नाहीत म्हणून अभ्यासक्रमाची मान्यता काढली जाण्याची शक्यता आहे अशी पदे उच्चस्तरीय सचिव समितीच्या मान्यतेने नियमित स्वरुपात भरता येतील. <u>असे पदनिर्मितीचे प्रस्ताव सादर करीत असतांना मान्यता नसलेले अभ्यासक्रम जर सुरु असतील तर ते रद्द केल्याचे प्रमाणपत्र अनिवार्य राहील.</u>

(ब) वरील (अ) येथील अभ्यासक्रम वगळून सर्व महाविद्यालये, शिक्षण व प्रशिक्षण संस्थांमध्ये प्रपाठक, अधिव्याख्याता व शिक्षक वर्ग, इत्यादि शैक्षणिक व्याख्याने देण्याचे काम करणा-या पदावर नियमित स्वरुपाची नियुक्ती न करता मानसेवी प्रपाठक, सहयोगी प्राध्यापक, अधिव्याख्याता व शिक्षक वर्ग यांची नियुक्ती करावी. त्यांना पूर्णवेळ नियुक्त करु नये. त्यांना व्याख्यानांच्या संख्येच्या आधारे मानधन द्यावे किंवा कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करावी.

४.४ ४५ दिवस किंवा त्याहून कमी दिवस रजा असल्यास त्या रजेच्या मुदतीत त्या पदावर पदोन्नती देण्यात येऊ नये.

४.५ सेवानिवृत्तीच्या कारणामुळे रिक्त होणा-या तसेच सरळसेवा प्रवेशाने भरावयाच्या पदांबाबतचे नियोजन किमान १ वर्ष अगोदर प्रत्येक विभागाने निश्चित करावे व तसे त्यांच्या नियंत्रणाखालील कार्यालयांकडून प्रस्ताव मागवून पदे भरण्याबाबतचे प्रस्ताव उच्चस्तरीय सचिव समितीस सादर करावेत.

४.६ उच्चस्तरीय सचिव समितीच्या मान्यतेनंतर पदोन्नती, बदली , प्रतिनियुक्ती, इत्यादि द्वारे पदे भरावयाची असल्यास ती भरण्याची कार्यवाही पद रिक्त झाल्यापासून ६ महिन्यांचे आत करावी.

४.७ विभागाने रिक्त झालेले पद न भरावयाचे ठरविल्यास ते पद रद्द करण्याबाबतचे आदेश त्वरित निर्गमित करावेत.

४.८ हे आदेश निर्गमित करावयाच्या तारखेपूर्वी सेवा प्रवेशासाठी उमेदवारांची लेखी परीक्षा घेणे, मुलाखती घेणे, उमेदवारांच्या अंतिम निवड यादया तयार करणे, उमेदवारांच्या शिफारशी/ नियुक्त्या करणे अशा प्रकारची आगाऊ कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे अशा प्रकरणात वरील निर्बंध लागू राहणार नाहीत.

## ५. <u>अतिरिक्त संवर्ग कक्ष</u>

५.१ आढाव्याअंती अधिकारी/ कर्मचारी अतिरिक्त म्हणून घोषित करतेवेळी कार्यालयाने संबंधित संवर्गातील कनिष्ठापासून सुरुवात करावी व कनिष्ठतम कर्मचारी प्रथम अतिरिक्त ठरवावे. आढाव्याअंती जी पदे अतिरिक्त ठरतील अशी पदे रद्द करण्यासंबधीचा शासन निर्णय प्रशासनिक विभागाने निर्गमित करावा. अतिरिक्त ठरणाऱ्या कर्मच्याऱ्यांचा तपशील प्रशासनिक विभागाने वित्त विभागाकडे सोबतच्या <u>परिशिष्ट-३ अ व परिशिष्ट-३ ब</u> मध्ये पाठवावा.

५.२ अतिरिक्त ठरलेल्या (योजनांतर्गत/ योजनेतर) पदांपैकी ज्या पदावर कर्मचारी कार्यरत आहेत अशा कर्मचाऱ्यांनी धारण केलेली पदे सुध्दा रद्द करण्यात यावीत. तथापि त्यांच्या वेतनाची व्यवस्था व्हावी या दृष्टीने त्यांचेसाठी त्यांना अतिरिक्त ठरविल्याच्या दिनांकापासून इतर पदावर सामावून घेईपर्यंतच्या कालावधीसाठी अधिसंख्य पदे निर्माण करण्याचा प्रस्ताव वित्त विभागाकडे सादर करावा. <u>अतिरिक्त ठरलेल्या कर्मचाऱ्यांसाठी अधिसंख्य पदे निर्माण करण्याच्या प्रस्तावास उच्चस्तरीय सचिव समितीच्या मान्यतेची आवश्यकता राहणार नाही. अतिरिक्त ठरलेल्या अधिकारी/ कर्मचारी यांना समकक्ष पदावर सामावून घेईपर्यंत ते त्यांच्या मूळ विभागात/ कार्यालयात राहतील आणि त्यांचे वेतन व भत्ते त्या कार्यालयाच्या लेखा शीर्षाखाली त्याच कार्यालयाकडून काढले जातील.</u>

५.३ (अ) <u>अतिरिक्त ठरलेल्या राज्यस्तरीय संवर्गातील अधिकारी/ कर्मचारी यांना सामावून घेण्यासाठी केंद्रीय अतिरिक्त संवर्ग कक्ष वित्त विभागात कार्यरत राहील.</u> सदर कक्षाकडे राज्यस्तरीय संवर्ग व महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अधिकार कक्षेतील वर्ग-३ संवर्गासंबंधी माहिती पाठविण्यात यावी.

(ब) <u>विभागीय संवर्गातील व जिल्हा संवर्गातील अतिरिक्त ठरलेल्या वर्ग-"क" व वर्ग-"ड" मधील कर्मचाऱ्यांना सामावून घेण्यासाठी विभागीय स्तरावर अतिरिक्त संवर्ग कक्ष स्थापन करण्यात येतील. विभागीय अतिरिक्त संवर्ग कक्ष संबंधित विभागीय आयुक्त यांच्या कार्यालयातील उपविभागीय आयुक्त (सर्वसाधारण) यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली कार्यरत राहतील.</u>

(क) ज्या विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांच्या कार्यालयातील विभाग/ जिल्हा संवर्गातील पदे अतिरिक्त ठरतील त्यांनी त्यांच्या कार्यालयांची या अतिरिक्त पदांची माहिती विभागीय अतिरिक्त संवर्ग कक्ष व वित्त विभागातील

केंद्रीय अतिरिक्त संवर्ग कक्ष यांचेकडे सादर करावी. वित्त विभागातील केंद्रीय अतिरिक्त संवर्ग कक्ष व विभागीय अतिरिक्त संवर्ग कक्ष यांची कार्यकक्षा/ अधिकार व कार्यपध्दती सोबतच्या परिशिष्ट-३ ड मध्ये दर्शविण्यात आली आहे. वित्त विभागातील केंद्रीय अतिरिक्त संवर्ग कक्ष व विभागीय अतिरिक्त संवर्ग कक्ष सध्या अस्तित्वात असलेल्या कार्यरत कर्मचाऱ्यांमधून समायोजनाने उपलब्ध करुन कार्यान्वित करण्यात येतील. वित्त विभागाकडून सदर क्षेत्रीय विभागीय स्तरावरील अतिरिक्त संवर्ग कक्ष कार्यान्वित करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

५.४ अतिरिक्त ठरलेल्या अधिकाऱ्यांना / कर्मचाऱ्यांना समकक्ष/ समतुल्य पदावर सामावून घेण्याबाबतची योजना सोबतच्या परिशिष्ट-तीन मध्ये दर्शविण्यात आलेली आहे.

५.५ न्यायालयीन प्रकरणामध्ये न्याय निर्णयाच्या अनुषंगाने (रोजगार हमी योजनेखालील हजेरी सहाय्यकांसह) कर्मचारी सामावून घेण्यास अतिरिक्त संवर्ग योजनेमध्ये सर्व प्राधान्य राहील.

६. पदांच्या आढाव्याच्या धोरणाच्या अंमलबजावणीत आलेला अनुभव लक्षात घेऊन त्यात तपशीलवार स्वरुपाच्या सुधारणा करण्यासाठी मंत्रिमंडळाने मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय सचिव समितीस प्राधिकृत केले आहे

७. हे आदेश सर्व शासकीय/जिल्हा परिषदा कार्यालये, राज्य शासनाकडून अनुदानित स्वायत्त संस्था व इतर संस्था, इत्यादिंना लागू राहतील..

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

(अनुपम दासगुप्ता)
**शासनाचे प्रधान सचिव**

प्रति

* १. प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र,मुंबई ४०० ०२०
* २. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई ४०० ०२०
* ३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर
* ४. महालेखापाल (लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर
५. राज्यपालांचे सचिव
६. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
७. उप मुख्य मंत्र्यांचे प्रधान सचिव
८. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक
९. मंत्रालयातील सर्व प्रशासनिक विभागांचे अतिरिक्त मुख्य सचिव /प्रधान सचिव/ सचिव
१०. अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे(पूर्व), मुंबई ४०० ०५१
११. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१२. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१३. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
१४. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकणभवन, नवी मुंबई *
१५. प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई
* १६. प्रबंधक, उच्च न्यायालय, (अपील शाखा), मुंबई
* १७. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, कुटीर क्र.३ व ४, अधिदान व लेखा कार्यालय आवार, मुंबई
* १८. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई

* १९. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई

* २०. प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मादाम कामा रोड, मुंबई

* २१. प्रमुख न्यायाधीश, कुटुंब न्यायालय, नागपूर/मुंबई, वांद्रे, मुंबई ४०० ०५१

२२. उप संचालक, लेखा व कोषागारे, कोकण विभाग,कोकण भवन, नवी मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/ नाशिक/अमरावती

२३. उप मुख्य लेखा परीक्षक (वरिष्ठ), स्थानिक निधी लेखा,कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई/ पुणे/ नागपूर/ औरंगाबाद/ नाशिक/ अमरावती

२४. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी

२५. सर्व उप कोषागार अधिकारी

२६. मंत्रालयाच्या सर्व प्रशासनिक विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख, प्रादेशिक कार्यालय प्रमुख आणि कार्यालय प्रमुख

२७. सहकार व वस्त्रोद्योग विभाग( कार्यासन -हाऊसिंग सेल ,१९ -सी ),मंत्रालय, मुंबई:३२

२८. सर्व विभागीय आयुक्त

२९. परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई

३०. सर्व जिल्हाधिकारी

३१. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी

३२. सर्व जिल्हा परिषदांचे अर्थ विभागातील मुख्य लेखा व वित्त अधिकारी

३३. विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली ११० ००१

३४. संचालक (माहिती), महाराष्ट्र परिचय केंद्र, अ-८, स्टेट एम्पोरिया इमारत, बाबा खरकसिंग मार्ग, नवी दिल्ली ११०००१

३५. वित्त विभागातील सर्व कार्यासने

३६. निवड नस्ती,वित्तीय सुधारणा, वित्त विभाग

* पत्राद्वारे.

# परिशिष्ट क्रमांक १०.१

| अ.क्र. | जि.प. विभागाचे नाव | परिच्छेद क्र | कर्मचाऱ्यांचे नाव | केलेली कार्यवाही |
|---|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत विभाग | ३.२० / ४० | १. श्री जयवंत साळुंखे व.स<br>२. श्री वी आर शिंदे क.स<br>३. श्री वजरंग संकपाळ व.स<br>४. श्रीमती मनीषा अवघडे व.स<br>५. श्रीमती आशा माने व.स<br>६. श्री ए पी शिंदे व.स<br>७. श्री डी एल पवार क.स | १) संबंधित जबाबदार ८ कर्मचाऱ्यांची एक वेतनवाढ रोखून ठेवण्याची शास्ती करणेत आलेली असून त्याची नोंद संबंधितांच्या सेवा पुस्तिकेमध्ये घेणेत आलेली आहे.<br>२) संबंधित ८ कर्मचारी यांचेविरुद्ध मुंबई लेखा परिक्षा अधिनियम १९३० चे कलम - ७ नुसार दंडात्मक कारवाई करणेसाठी पुर्वमान्यता मिळणेस्तव मा. विभागीय आयुक्त कार्यालय पुणे येथे प्रस्ताव सादर करणेत आलेला असून या बाबतची प्रक्रिया मा. विभागीय आयुक्त कार्यालय स्तरावर सुरु आहे. |
| २ | | ३.२३ | १.श्री एम एन वद्दिकर क.स | |
| ३ | प्राथमिक शिक्षण विभाग | ३.१०२ / ३० | १) श्री. रघुनाथ शिवाजी कांवळे केंद्र प्रमुख मणेराजुरी<br>२) श्री. सुर्यकांत यशवंत पाटील केंद्र प्रमुख (सेवानिवृत्त) चिंचणी<br>३) श्री. बाळासाहेब जाधव केंद्र प्रमुख येळावी<br>४) श्री. बाळासाहेब जाधव केंद्र प्रमुख बोरगाव | १) संबंधित जबाबदार २३ कर्मचाऱ्यांची एक वेतनवाढ रोखून ठेवण्याची शास्ती करणेत आलेली असून त्याची नोंद संबंधितांच्या सेवा पुस्तिकेमध्ये घेणेत आलेली आहे.<br>२) संबंधित २३ कर्मचारी यांचेविरुद्ध मुंबई लेखा परिक्षा अधिनियम १९३० चे कलम ७ नुसार दंडात्मक कारवाई करणेसाठी पुर्वमान्यता मिळणेस्तव मा. विभागीय आयुक्त कार्यालय पुणे येथे या कार्यालयाचे दिनांक-२१.०९.२०१८ रोजीचे पत्रान्वये प्रस्ताव सादर करणेत आलेला असून या बाबतची प्रक्रिया मा. विभागीय आयुक्त कार्यालय स्तरावर सुरु आहे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | ५) श्री. श्रीपाद बाळकृष्ण कुलकर्णी केंद्र प्रमुख (सेवानिवृत्त) मांजर्डे<br>६) श्री. सुरेश वळवंत कुंभार केंद्र प्रमुख<br>(सेवानिवृत्त) पेड<br>७) श्री. मालोजी समाधान काळे केंद्र प्रमुख (सेवानिवृत्त) विसापूर<br>८) श्री. बबन दत्तू भोरे केंद्र प्रमुख कवठेएकंद<br>९) श्री. गजानन निवृत्ती पाटील केंद्र प्रमुख (सेवानिवृत्त) अंजनी<br>१०) श्री. प्रभाकर नारायण तांदळे केंद्र प्रमुख (सेवानिवृत्त) सावळज<br>११) श्री. उल्हास वसंत सानप केंद्र प्रमुख आरग<br>१२) श्री. दादासो संतु होवाळे केंद्र प्रमुख एरंडोली<br>१३) श्री. भास्कर गंभीरे केंद्र प्रमुख खटाव<br>१४) श्री. प्रदीप पाटील केंद्र प्रमुख कवठेपिरान (मयत)<br>१५) श्रीम. सुनिता संपत वाघमारे केंद्र प्रमुख माधवनगर<br>१६) श्री. रामचंद्र पांडुरंग जाधव केंद्र प्रमुख (सेवानिवृत्त) माधवनगर | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | १७) श्री. सुरेश कृष्णा नवाळे केंद्र प्रमुख नांद्रे<br>१८) श्रीम. कमल सज्जन पाटील केंद्र प्रमुख (सेवानिवृत्त) कवलापूर<br>१९) श्री.के.के. पाटील केंद्र प्रमुख कुपवाड<br>२०) श्री. धोंडीराम मच्छिंद्र कोप्टी केंद्र प्रमुख (सेवानिवृत्त) खंडेराजुरी<br>२१) श्री. ए. बी. जकाते केंद्र प्रमुख मालगाव<br>२२) श्री. डी. वी. खोत केंद्र प्रमुख (सेवानिवृत्त) म्हैशाळ<br>२३) श्री. विजय सिद्राम नागरगोजे केंद्र प्रमुख बेडग | |
| ४ | **प्राथमिक शिक्षण विभाग** | ३.१०४ | श्री. आर.एम. पाटील क.सहाय्यक पंचायत समिती मिरज | १) संबंधित जबाबदार कर्मचाऱ्यांची एक वेतनवाढ रोखून ठेवण्याची शास्ती करणेत आलेली असून त्याची नोंद संबंधितांच्या सेवा पुस्तिकेमध्ये घेणेत आलेली आहे.<br>२) संबंधित कर्मचारी यांचेविरुद्ध मुंबई लेखा परिक्षा अधिनियम १९३० चे कलम ७ नुसार दंडात्मक कारवाई करणेसाठी पुर्वमान्यता मिळणेस्तव मा. विभागीय आयुक्त कार्यालय पुणे येथे या कार्यालयाचे दिनांक-२१.०९.२०१८ रोजीचे पत्रान्वये प्रस्ताव सादर करणेत आलेला असून या बाबतची प्रक्रिया मा. विभागीय आयुक्त कार्यालय स्तरावर सुरु आहे. |
| ५ | **प्राथमिक शिक्षण विभाग** | ३.१०५ | श्री. एस. बी. सोनावले, वरिष्ठ सहाय्यक, बांधकाम विभाग, पं, स, तासगाव | १) संबंधित जबाबदार कर्मचाऱ्यांची एक वेतनवाढ रोखून ठेवण्याची शास्ती करणेत आलेली असून त्याची नोंद संबंधितांच्या सेवा पुस्तिकेमध्ये घेणेत आलेली आहे.<br>२) संबंधित कर्मचारी यांचेविरुद्ध मुंबई लेखा परिक्षा अधिनियम १९३० चे कलम ७ नुसार दंडात्मक कारवाई करणेसाठी पुर्वमान्यता मिळणेस्तव मा. विभागीय आयुक्त कार्यालय पुणे येथे या कार्यालयाचे दिनांक-०३.१०.२०१८ रोजीचे पत्रान्वये प्रस्ताव सादर करणेत आलेला असून या बाबतची प्रक्रिया मा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | विभागीय आयुक्त कार्यालय स्तरावर सुरु आहे. |
| ६ | प्राथमिक शिक्षण विभाग | ३.१०७ | निरंक | प्रस्तुत प्रकरणी करण्यात आलेल्या चौकशीमध्ये जे अभिलेख कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध होते, ते सर्व अभिलेख लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करून देण्यात आले होते, असे निदर्शनास आले आहे. |
| ७ | प्राथमिक शिक्षण विभाग | ३.१०८ | १) श्रीम. मंगल सर्जेराव लाड मुख्याध्यापक जि. प. शाळा घोगाव<br>२) श्रीम. विद्या दिनकर शिंदे मुख्याध्यापक जि. प. शाळा नं. ३ कुंडल<br>३) श्रीम. उज्वला रमेश पाटील मुख्याध्यापक जि. प. शाळा नं. १ रामानंदनगर<br>४) श्रीम. सिधू बाळकृष्ण चोपडे मुख्याध्यापक जि. प. शाळा नं.२ बांबवडे<br>५) श्रीम. नसीम दिलावर मुख्याध्यापक जि. प. शाळा नं.२ रामानंदनगर | १) संबंधित जबाबदार ५ कर्मचाऱ्यांची एक वेतनवाढ रोखून ठेवण्याची शास्ती करणेत आलेली असून त्याची नोंद संबंधितांच्या सेवा पुस्तिकेमध्ये घेणेत आलेली आहे.<br>२) संबंधित ५ कर्मचारी यांचेविरुद्ध मुंबई लेखा परिक्षा अधिनियम १९३० चे कलम ७ नुसार दंडात्मक कारवाई करणेसाठीचा मा. विभागीय आयुक्त कार्यालय पुणे यांचेकडून पुर्वमान्यतेचा प्रस्ताव प्राप्त झाला असून प्रथम न्यायदंडाधिकारी यांचेकडे सदरचे प्रकरण दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे. |
| ८ | प्राथमिक शिक्षण विभाग | ३.१०९ | निरंक | प्रस्तुत मुद्द्यामध्ये लेखा परीक्षणास अभिलेख उपलब्ध करून न दिल्याबाबत आक्षेप नाही. त्यामुळे पुढील कार्यवाही करणेत आलेली नाही. |
| ९ | ल.पा. (स्थानिक स्तर) | ३.३२३ | श्री. एस. ए. मोहिते, शाखा अभियंता | संबंधित कर्मचारी यांनी दंडाची रक्कम र.रु.२५,०००/- पावती क्रमांक-००६९७० दिनांक-२४.०९.२०१८ रोजी शासन खाती भरणा केली आहे. |
| १० | छो.पा. वि. | ३.३२४ | १) श्री. एस. एम. पाटील, | १) संबंधित जबाबदार ६ पैकी अ.क्र.३ ते ६ या ४ कर्मचाऱ्यांची एक वेतनवाढ रोखून ठेवण्याची शास्ती |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | सहाय्यक अभियंता<br>२) श्री. एस.ए. पाटील, सहाय्यक अभियंता<br>३) श्री. वी. बी. हुक्केरी, शा. अ.<br>४) श्री. आर. एन. मोमीन, शा. अ.<br>५) श्री. एस. एम. सावंत, शा. अ.<br>६) श्री. एस. डी. कांबळे, शा. अ. | करणेत आलेली असून त्याची नोंद संबंधितांच्या सेवा पुस्तिकेमध्ये घेणेत आलेली आहे. अ.क्र. १ व २ वरील अधिकाऱ्यांची जिल्हा परिषद, सांगली येथून बदली झाली असलेने त्यांचे कार्यरत कार्यालयाकडे ( अनुक्रमे जि.प. सातारा व जि. प. कोल्हापूर ) प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे.<br>२) संबंधित अ.क्र.१ ते ६ अधिकारी/कर्मचारी यांचेविरुद्ध मुंबई लेखा परिक्षा अधिनियम १९३० चे कलम ७ नुसार दंडात्मक कारवाई करणेसाठी न्यायिक कार्यावाहीस्तव प्रकरण मा. प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी यांचे न्यायालयात दाखल करणेत आले आहे. |
| ११ | ग्रापापू | ३.४०८ | १.श्री एन.बी.मोरे का.अ. (सेवानिवृत्त)<br>२.श्री एस.जि.सदिगले का.अ.<br>३.श्री.पी.बी.पाटील उप अभियंता<br>४.श्री एन.व्ही.खाडे व.स.<br>५.श्री डी.ए.जोशी स.ले.अ.<br>६.श्री.ए.डी.तडवळकर व.स.<br>७.श्री पी.एम.बिराजदार व.स.<br>८.श्री पी.ए.वरणे व.स. | संबंधित अनु.क्र. १ ते ८ मधील अधिकारी कर्मचारी यांचे विरुद्ध दंडात्मक कारवाई करणेस मा. विभागीय आयुक्त यांनी पूर्वमंजुरी दिलेली असून संबंधित कर्मचारी यांची मूळ आस्थापना हि महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ सांगली या कार्यालयाकडे असल्याने पुढील न्यायिक कारवाई व प्रशासकीय कार्यवाही बाबतचा प्रस्ताव सदर कार्यालयास या कार्यालयाचे पत्र दि.१८/५/२०१८ अन्वये पाठविण्यात आला आहे. |
| १२ | कृषी | ३.५०० | १. श्री उदय खांडेकर, क.सहा पं.स.मिरज<br>२. श्री.एस. ए. गायकवाड क. सहा. पं. स. कवठे महांकाळ<br>३. श्री. दिलीप वळवी, क. सहा., पं. स. जत | १) संबंधित जबाबदार ८ कर्मचाऱ्यांची एक वेतनवाढ रोखून ठेवण्याची शास्ती करणेत आलेली असून त्याची नोंद संबंधितांच्या सेवा पुस्तिकेमध्ये घेणेत आलेली आहे.<br>२) संबंधित ८ कर्मचारी यांचेविरुद्ध मुंबई लेखा परिक्षा अधिनियम १९३० चे कलम ७ नुसार दंडात्मक कारवाई करणेसाठी पुर्वमान्यता मिळणेस्तव मा. विभागीय आयुक्त कार्यालय पुणे येथे या कार्यालयाचे दिनांक-२३.०८.२०१८ रोजीचे पत्रान्वये प्रस्ताव सादर करणेत आलेला असून या बाबतची प्रक्रिया सुरु आहे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | ४. श्री . सचिन भोसले, कृषी अधिकारी, पं. स. मिरज<br>५. श्री. ए. टी. खर्जे, विस्तार अधिकारी (कृ.) पं. स. आटपाडी<br>६.श्री. डी. वी. बामणे, विस्तार अधिकारी (कृ.) पं. स. कवठे महांकाळ<br>७. श्री. हृषीकेश कुंभार विस्तार अधिकारी (पं.), पं. स. जत<br>८. श्री. ए. एस. जाधव, कृषी अधिकारी पं. स. विटा | |
| १३ | पशुसंवर्धन विभाग | ३.५४३ | डॉ. बनसोडे तत्कालीन जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जि.पं.सांगली | संबंधित जबाबदार अधिकारी यांचे विरुद्ध प्रशासकीय कार्यवाहीचा प्रस्ताव जा.क्र.पशुसं/आस्था-२/वशी १९५७-५८/१८ दि.२९/९/२०१८ अन्वये.मा.आयुक्त (पशुसंवर्धन) पशुसंवर्धन आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य पुणे-६७ यांचेकडे सादर करणेत आला आहे. |
| १४ | | ३.५४४ | | |
| १५ | | ३.५४५ | | |
| १६ | समाज कल्याण विभाग | ३.६११ /८ | १.श्री. बबन दिगंबर जाधव, ग्रामसेवक. ग्रा. पं. घानवड<br>२.श्रीम. शाईन नुरमहमद मुल्ला, ग्रामसेवक, | १) संबंधित जबावदार ५ कर्मचाऱ्यांची एक वेतनवाढ रोखून ठेवण्याची शास्ती करणेत आलेली असून त्याची नोंद संबंधितांच्या सेवा पुस्तिकेमध्ये घेणेत आलेली आहे.<br>२) संबंधित ५ पैकी १ ते ४ कर्मचारी यांचेविरुद्ध मुंबई लेखा परिक्षा अधिनियम १९३० चे कलम ७ नुसार दंडात्मक कारवाई करणेसाठी मा. विभागीय आयुक्त कार्यालय पुणे यांचेकडून पुर्वमान्यता प्राप्त झाली असून न्यायिक कार्यावाहीस्तव प्रकरण मा. प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी यांचे न्यायालयात दाखल |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | ग्रा. पं., बलवडी (खा)<br>३. श्री. आर. डी. इरळे, वरि.सहा.<br>पं.स., कवठेमहांकाळ<br>४.श्री. अभिजित पवार, क.सहा., पं.स., जत<br>५.श्री. समीर मुल्ला, वरि.सहा., खानापूर पं.स., विटा. | करणेची कार्यवाही सुरु आहे. अ. क्र. ५ समोरील कर्मचाऱ्याच्या संदर्भात पूर्व मान्यतेच्या प्रस्तावावर मा. विभागीय आयुक्त कार्यालयात कार्यवाही सुरु आहे. |
| **१७** | **मबाक** | **३.७७१** | १) श्री. सतीश कदम, अधीक्षक, पं. स. वाळवा<br>२) श्रीम. डी. जी. परनारकर, राहाय्यक बालविकास अधिकारी, पं.स. विटा | १) संबंधित जबाबदार २ कर्मचाऱ्यांची एक वेतनवाढ रोखून ठेवण्याची शास्ती करणेत आलेली असून त्यावी नोंद संबंधितांच्या सेवा पुस्तिकेमध्ये घेणेत आलेली आहे.<br>२) सदर २ कर्मचाऱ्याच्या संदर्भात न्यायिक कार्यवाहीसाठीचे पूर्व मान्यतेच्या प्रस्तावावर मा. विभागीय आयुक्त कार्यालयात कार्यवाही सुरु आहे. |

# परिशिष्ट “ब”

## समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त

**बुधवार, दिनांक २२ नोव्हेंबर, २०१७**

स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, सांगली

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि. स. स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. चरण वाघमारे, वि. स. स.

(३) श्री. रणधीर सावरकर, वि. स. स.

(४) डॉ. देवराव होळी, वि. स. स.

(५) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि. स. स.

(६) श्री. सुधाकर कोहळे, वि. स. स.

(७) श्री. भरतशेठ गोगावले, वि. स. स.

(८) श्री. किशोर पाटील, वि. स. स.

(९) श्री. राहुल बोंद्रे, वि. स. स.

(१०) श्री. भारत भालके, वि. स. स.

(११) प्रा. विरेंद्र जगताप, वि. स. स.

(१२) श्री. राहुल मोटे, वि. स. स.

(१३) श्री. प्रविण दरेकर, वि. प. स.

(१४) श्री. विक्रम काळे, वि. प. स.

(१५) श्री. अमरनाथ राजूरकर, वि. प. स.

**निमंत्रित सदस्य :**

(१) श्री. दत्तात्रय सावंत, वि. प. स.

**जिल्हा परिषद पदाधिकारी :**

(१) श्री. संग्रामसिंह देशमुख, अध्यक्ष, जि. प. सांगली

(२) श्री. सुहास बाबर, उपाध्यक्ष, जि. प. सांगली

(३) श्री. तम्मनगौडा ई. रवि पाटील, सभापती, शिक्षण व आरोग्य, जि. प. सांगली

(४) श्री. ब्रम्हदेव पडळकर, सभापती, समाजकल्याण, जि. प. सांगली

(५) प्रा. डॉ. सुषमा नायकवडी, सभापती, महिला व बालकल्याण, जि. प. सांगली

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखा :**

श्री. प्रताप मोहिते, संचालक, स्थानिक निधी लेखा

**ग्रामविकास विभाग, मंत्रालय :**

श्री. संजय बनकर, उप सचिव

**जिल्हा परिषद, सांगली :—**

(१) श्री. अभिजीत राऊत, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्री. अजयकुमार माने, प्रकल्प संचालक तथा प्रभारी अति. मुख्य कार्यकारी अधिकारी

(३) श्री. राजेंद्र गाडेकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(४) श्रीमती रश्मी खांडेकर, उपायुक्त (प्रभारी)

(५) श्री. संजय माळी, कार्यकारी अभियंता, इमारत व दळणवळण

(६) श्री. एम. एस. कुलकर्णी, कार्यकारी अभियंता, पंतप्रधान ग्रामसडक योजना

(७) श्री. जे. बी. लांडे, उप अभियंता, यांत्रिक

(८) श्री. शार्दुल पाटील, उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(९) श्री. विवेक कुंभार, कृषि विकास अधिकारी

(१०) श्री. महेश चोथे, शिक्षणाधिकारी

(११) श्रीमती शिल्पा पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बालकल्याण

(१२) श्रीमती दिपाली पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

(१३) श्री. एस. एस. बारटक्के, प्रभारी कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग

(१४) श्री. रविकांत अडसूळ, उप मुख्य कार्यकारी, ग्रामपंचायत विभाग

(१५) श्री. रमेश जोशी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, साप्रवि

(१६) डॉ. विजय सावंत, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

(१७) श्रीमती नि. ब. वाघमोडे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(१८) श्री. राधाकिसन देवढे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी

(१९) डॉ. मिलींद पोरे, अति. जिल्हा आरोग्य अधिकारी

(२०) श्रीमती अरुणा हसबे, लेखाधिकारी, शालेय पोषण आहार (प्राथमिक)

(२१) श्री. सुभाष माने, गटविकास अधिकारी, पं. स. कवठेमहाकाळ

(२२) श्री. संजय चिल्लाळ, गटविकास अधिकारी, पं. स. पलूस

(२३) श्री. मिलींद टोणपे, गटविकास अधिकारी, पं. स. जत

(२४) श्री. कृष्णा माळी, प्रभारी गटविकास अधिकारी, शिराळा

(२५) श्री. राहुल गावडे, गटविकास अधिकारी, पं. स. वाळवा

(२६) श्री. राहुल देसाई, गटविकास अधिकारी, पं. स. कडेगांव

(२७) श्री. संतोष जोशी, गटविकास अधिकारी, पं. स. खानापूर

(२८) श्री. राहुल रोकडे, गटविकास अधिकारी, पं. स. मिरज

(२९) श्री. अरुण जाधव, गटविकास अधिकारी, पं. स. तासगांव

(३०) श्रीमती मीना साळुंखे, गटविकास अधिकारी, पं. स. आटपाडी

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने सांगली जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांची सन २०११-२०१२ च्या लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालातील सांगली जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

**गुरुवार, दिनांक २३ नोव्हेंबर, २०१७**

स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, सांगली

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि. स. स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. चरण वाघमारे, वि. स. स.
(३) श्री. रणधीर सावरकर, वि. स. स.
(४) डॉ. देवराव होळी, वि. स. स.
(५) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि. स. स.
(६) श्री. सुधाकर कोहळे, वि. स. स.
(७) श्री. भरतशेठ गोगावले, वि. स. स.
(८) श्री. किशोर पाटील, वि. स. स.
(९) श्री. राहुल बोंद्रे, वि. स. स.
(१०) प्रा. विरेंद्र जगताप, वि. स. स.
(११) श्री. दिलीप सोपल, वि. स. स.
(१२) श्री. राहुल मोटे, वि. स. स.
(१३) श्री. दिपक चव्हाण, वि. स. स.
(१४) श्री. प्रविण दरेकर, वि. प. स.
(१५) श्री. विक्रम काळे, वि. प. स.
(१६) श्री. अमरनाथ राजूरकर, वि. प. स.

**निमंत्रित सदस्य :**

(१) श्री. बाळाराम पाटील, वि. प. स.
(२) श्री. दत्तात्रय सावंत, वि. प. स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव
(२) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

**ग्रामविकास विभाग, मंत्रालय :**

श्री. संजय बनकर, उप सचिव, ग्रामविकास विभाग

**जिल्हा परिषद, सांगली :**

(१) श्री. अभिजित राऊत, मुख्य कार्यकारी अधिकारी
(२) श्री. अजयकुमार माने, प्रकल्प संचालक तथा प्रभारी अति. मुख्य कार्यकारी अधिकारी
(३) श्री. राजेंद्र गाडेकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी
(४) श्री. महेश चोथे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
(५) डॉ. रामचंद्र हंकारे, जिल्हा आरोग्य अधिकारी

(६) श्री. संजय माळी, कार्यकारी अभियंता, इमारत व दळणवळण (बांधकाम) विभाग

(७) श्रीमती शिल्पा पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बालकल्याण

(८) श्रीमती दिपाली पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

(९) श्री. रविकांत आडसूळ, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रामपंचायत विभाग

(१०) श्री. एस. एस. बारटक्के, प्रभारी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग

(११) श्री. सुशिलकुमार गायकवाड, का. अ. छे. पा. वि.

(१२) श्री. विवेक कुंभार, कृषि विकास अधिकारी

(१३) श्रीमती नि. ब. वाघमोडे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(१४) डॉ. विजय सावंत, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

(१५) श्रीमती नं. अी. पट्टणशेट्टी, प्रभारी निरंतर शिक्षणाधिकारी

(१६) श्री. एस. एस. कुलकर्णी, कार्यकारी अभियंता, पंतप्रधान ग्रामसडक योजना

(१७) श्री. राधाकिसन देवढे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी

(१८) श्री. सुभाष माने, गटविकास अधिकारी, पं. स. कवठेमहाकाळ

(१९) श्री. संजय चिल्लाळ, गटविकास अधिकारी, पं. स. पलूस

(२०) श्री. मिलींद टोणपे, गटविकास अधिकारी, पं. स. जत

(२१) श्री. राहुल रोकडे, गटविकास अधिकारी, पं. स. मिरज

(२२) श्री. संतोष जोशी, गटविकास अधिकारी, पं. स. विटा/खानापूर

(२३) श्री. राहुल देसाई, गटविकास अधिकारी, पं. स. कडेगांव

(२४) श्री. अरुण जाधव, गटविकास अधिकारी, पं. स. तासगांव

(२५) श्री. राहुल गावडे, गटविकास अधिकारी, पं. स. वाळवा

(२६) श्रीमती मीना साळुंखे, गटविकास अधिकारी, पं. स. आटपाडी

(२७) श्री. के. जी. माळी, गटविकास अधिकारी, पं. स. शिराळा

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने सांगली जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी तसेच गटविकास अधिकारी यांची सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालावरील प्रश्नावली क्रमांक -२ संदर्भात सांगली जिल्हा परिषदेच्या पंचायत समितीनिहाय संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

**शुक्रवार, दिनांक २४ नोव्हेंबर, २०१७**

स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, सांगली

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि. स. स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. चरण वाघमारे, वि. स. स.

(३) डॉ. देवराव होळी, वि. स. स.

(४) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि. स. स.

(५) श्री. सुधाकर कोहळे, वि. स. स.

(६) श्री. भरतशेठ गोगावले, वि. स. स.

(७) श्री. किशोर पाटील, वि. स. स.

(८) श्री. राहुल बोंद्रे, वि. स. स.

(९) श्री. भारत भालके, वि. स. स.

(१०) श्री. दिलीप सोपल, वि. स. स.

(११) श्री. राहुल मोटे, वि. स. स.

(१२) श्री. प्रविण दरेकर, वि. प. स.

(१३) श्री. विक्रम काळे, वि. प. स.

**निमंत्रित सदस्य :**

(१) श्री. श्रीकांत देशपांडे, वि. प. स.

(२) श्री. दत्तात्रय सावंत, वि. प. स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी.

**स्थानिक निधी लेखा :**

श्री. प्रताप मोहिते, संचालक, स्थानिक निधी लेखा

**ग्रामविकास विभाग, मंत्रालय :**

श्री. संजय बनकर, उप सचिव, ग्रामविकास विभाग.

**जिल्हा परिषद, सांगली :**

(१) श्री. अभिजीत राऊत, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्री. अजयकुमार माने, प्रकल्प संचालक तथा प्रभारी अति. मुख्य कार्यकारी अधिकारी

(३) श्री. राजेंद्र गाडेकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(४) श्रीमती रश्मी खांडेकर, उपायुक्त (प्रभारी)

(५) श्री. संजय माळी, कार्यकारी अभियंता, इमारत व दळणवळण

(शा. म.मु.) एचबी १७६५—१८ (१५०—१२—२०२१)

(६) श्री. एम. एस. कुलकर्णी, कार्यकारी अभियंता, पंतप्रधान ग्रामसडक योजना

(७) श्री. जे. बी. लांडे, उप अभियंता, यांत्रिक

(८) श्री. शार्दुल पाटील, उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(९) श्री. विवेक कुंभार, कृषि विकास अधिकारी

(१०) श्री. महेश चोथे, शिक्षणाधिकारी

(११) श्रीमती शिल्पा पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बालकल्याण

(१२) श्रीमती दिपाली पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

(१३) श्री. एस. एस. बारटक्के, प्रभारी कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग

(१४) श्री. रविकांत अडसूळ, उप मुख्य कार्यकारी, ग्रामपंचायत विभाग

(१५) श्री. रमेश जोशी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, साप्रवि

(१६) डॉ. विजय सावंत, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

(१७) श्रीमती नि. ब. वाघमोडे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(१८) श्री. राधाकिसन देवढे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी

(१९) डॉ. मिलींद पोरे, अति. जिल्हा आरोग्य अधिकारी

(२०) श्रीमती अरुणा हसबे, लेखाधिकारी, शालेय पोषण आहार (प्राथमिक)

(२१) श्री. सुभाष माने, गटविकास अधिकारी, पं. स. कवठे महाकाळ

(२२) श्री. संजय चिल्लाळ, गटविकास अधिकारी, पं. स. पलूस

(२३) श्री. मिलींद टोणपे, गटविकास अधिकारी, पं. स. जत

(२४) श्री. कृष्णा माळी, प्रभारी गटविकास अधिकारी, शिराळा

(२५) श्री. राहुल गावडे, गटविकास अधिकारी, पं. स. वाळवा

(२६) श्री. राहुल देसाई, गटविकास अधिकारी, पं. स. कडेगांव

(२७) श्री. संतोष जोशी, गटविकास अधिकारी, पं. स. खानापूर

(२८) श्री. राहुल रोकडे, गटविकास अधिकारी, पं. स. मिरज

(२९) श्री. अरुण जाधव, गटविकास अधिकारी, पं. स. तासगांव

(३०) श्रीमती मीना साळुंखे, गटविकास अधिकारी, पं. स. आटपाडी

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने सांगली जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांची सन २०११-२०१२ च्या लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालातील व सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील सांगली जिल्हा परिषदेशी सबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक १६ ऑक्टोबर, २०१८**

स्थळ : विधान भवन, मुंबई

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि. स. स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. बाबुराव पाचर्णे, वि. स. स.
(३) श्री. चरण वाघमारे, वि. स. स.
(४) श्री. रणधीर सावरकर, वि. स. स.
(५) डॉ. देवराव होळी, वि. स. स.
(६) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि. स. स.
(७) श्री. दिपक चव्हाण, वि. स. स.
(८) श्री. प्रविण दरेकर, वि. प. स.
(९) श्री. विक्रम काळे, वि. प. स.

**निमंत्रित सदस्य :**

श्री. बाळाराम पाटील, वि. प. स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव
(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
(३) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी
(४) श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी.

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, नवी मुंबई :**

श्री. प्रताप मोहिते, संचालक

**मंत्रालयीन विभागीय सचिव/अधिकारी :**

(१) श्री. श्यामलाल गोयल, अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
(२) श्रीमती वंदना कृष्णा, अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग
(३) श्री. अनुप कुमार, प्रधान सचिव, कृषी व पदुम विभाग
(४) श्री. असिमकुमार गुप्ता, सचिव, ग्रामविकास विभाग
(५) श्री. विवेक नाईक, सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना
(६) श्रीमती विनिता वेद सिंगल, सचिव, महिला व बालविकास विभाग
(७) श्री. ला. रा. गुजर, सह सचिव, महिला व बालविकास विभाग
(८) श्री. मनोहर ठोंबरे, सह सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग
(९) श्री. संजय बनकर, उप सचिव, ग्रामविकास विभाग
(१०) श्री. युवराज अजेटराव, उप सचिव, गृह विभाग
(११) श्री. किरण पाटील, उप सचिव, कृषी विभाग

(१२) श्री. रविंद्र गुरव, उप सचिव, पशुसंवर्धन विभाग

(१३) श्री. म. रं. शेळके, उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग

(१४) श्री. दि. मा. सोनवणे, उप सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग

(१५) श्री. कांतीलाल उमाप, आयुक्त, पशुसंवर्धन विभाग

(१६) श्री. परमेश्वर बाबर, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग

(१७) श्री. ऋषीराज कदम, कक्ष अधिकारी, गृह विभाग

(१८) डॉ. म. बा. बनसोडे, व्यवस्थापकीय संचालक, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर मेंढी व शेळी महामंडळ, पुणे

**जिल्हा परिषद, सांगली :**

(१) श्री. अभिजित राऊत, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली

(२) श्री. चंद्रकांत गजभिये, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली

(३) श्री. जि. रा. पाटोळे, जिल्हा जलसंधारण अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली

(४) श्री. विवेक कुंभार, कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली

(५) श्री. विष्णु द. पालवे, अधीक्षक अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, पुणे

(६) श्री. संजय माळी, कार्यकारी अभियंता, अधीक्षक अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, सांगली

(७) श्री. एस. ए. देसाई, अधीक्षक अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, सांगली

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २०११-१२ च्या लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१२-१३ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात सांगली जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, प्रधान सचिव, कृषी व पदुम विभाग, सचिव, ग्रामविकास विभाग, सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, सचिव, महिला व बालविकास विभाग, सह सचिव, महिला व बालविकास विभाग, सह सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, उप सचिव, गृह विभाग, उप सचिव, ग्रामविकास विभाग, उप सचिव, कृषी विभाग, उप सचिव, पशुसंवर्धन विभाग, उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग, उप सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, आयुक्त, पशुसंवर्धन विभाग, व्यवस्थापकीय संचालक, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर मेंढी व शेळी महामंडळ, पुणे व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांची साक्ष घेतली.

**बुधवार, दिनांक २७ जानेवारी, २०२१**

स्थळ : विधान भवन, मुंबई

**उपस्थिती :**

(१) श्री. संजय रायमुलकर, वि. स. स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. कैलास घाडगे पाटील, वि. स. स.

(३) श्री. अनिल पाटील, वि. स. स.

(४) श्री. संग्राम जगताप, वि. स. स.

(५) श्री. हरिभाऊ बागडे, वि. स. स.

(६) श्री. अंबादास दानवे, वि. प. स.

(७) श्री. विक्रम काळे, वि. प. स.

**निमंत्रित सदस्य :**

(१) श्री. किशोर पाटील, वि. स. स.

(२) श्री. बाळाराम पाटील, वि. प. स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. रंगनाथ खैरे, अवर सचिव (समिती)

(३) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

(४) श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी.

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, नवी मुंबई :**

(१) श्री. प्रताप मोहिते, संचालक, स्थानिक निधी संचालनालय

(२) श्री. कल्याण औताडे, सहायक संचालक, स्थानिक निधी संचालनालय

**मंत्रालयीन विभागीय सचिव/अधिकारी :**

(१) श्री. राजेश कुमार, अपर मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग

(२) श्रीमती वंदना कृष्णा, अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग

(३) श्री. संजय चहांदे, अपर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग

(४) श्रीमती निलिमा करेकट्टा, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग

(५) श्री. श्याम तागडे, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

(६) श्री. एकनाथ डवले, सचिव, कृषी विभाग

(७) श्रीमती आय. ए. कुंन्दन, सचिव, महिला व बालविकास विभाग

**जिल्हा परिषद, सांगली :**

(१) श्री. चंद्रकांत गुड्डेवार, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली

(२) डॉ. मिलिंद पोरे, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली

(३) श्री. संभाजी पवार, समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २०११-१२ च्या लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१२-१३ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात सांगली जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती अपर मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग, अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, अपर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, सचिव, कृषी विभाग, सचिव, महिला व बालविकास विभाग व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांची उर्वरित मुद्यांसंदर्भात साक्ष घेतली.

**शुक्रवार, दिनांक २४ डिसेंबर, २०२१**

स्थळ : विधान भवन, मुंबई

**उपस्थिती :**

(१) श्री. संजय रायमुलकर, वि. स. स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. कैलास पाटील (घाडगे), वि. स. स.

(३) श्री. शेखर निकम, वि. स. स.

(४) श्री. सुभाष धोटे, वि. स. स.

(५) श्रीमती प्रतिभा धानोरकर, वि. स. स.

(६) डॉ. देवराव होळी, वि. स. स.

(७) श्री. कृष्णा गजबे, वि. स. स.

(८) श्रीमती मेघना बोर्डीकर-साकोरे, वि. स. स.

(९) श्री. किशोर जोरगेवार, वि. स. स.

(१०) श्री. अंबादास दानवे, वि. प. स.

(११) श्री. निरंजन डावखरे, वि. प. स.

**विशेष निमंत्रित :**

(१२) श्री. सदाशिव खोत, वि. प. स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(३) श्री. प्रकाश थिटे, कक्ष अधिकारी

(४) श्रीमती सुषमा लोंढे, कक्ष अधिकारी.

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने बैठकीत नवव्या अहवालाच्या प्रारूपावर विचार करून ते किरकोळ सुधारणांसह संमत केले.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई